
# डिटेक्टिव्ह निगेटिव्ह

## निमिष सोनार

हा डिटेक्टिव्ह वेगळा आहे...
याचे SWAGAT पण वेगळ्या प्रकारे होणार!!



# डिटेक्टिव्ह निगेटिव्ह

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# डिटेक्टिव्ह निगेटिव्ह

लेखक

निमिष सोनार

ई साहित्य प्रतिष्ठान

# डिटेक्टिव्ह निगेटिव्ह

लेखक: निमिष सोनार, पुणे

ईमेल: sonar.nimish@gmail.com

व्हाट्सएप/कॉल: +91-8805042502

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.


# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ७ ऑक्टोबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक- आहे.


हे पुस्तक
सृष्टी निर्मात्यास अर्पण

# अनुक्रमणिका

1. जन्मापासून सुरुवात
2. जाणीव
3. सुगावा
4. ती दिसली
5. सायन्स फेस्टिव्हल
6. पुलावरचा घात
7. एक नवी सुरुवात
8. स्मृतीबंधन
9. पहिले प्रेम
10. ताकामिशी क्योदाई
11. दूरदर्शन
12. भटकंती
13. नरिमन टर्निंग पॉईंट
14. सुटका
15. संकट
16. तो आणि ती
17. प्रवास सुरू
18. जहाजावर
19. चाहूल
20. उलगडा
21. पाठलाग
22. परिवर्तन

23. सुपर नेचर कडे
24. सुपर नेचर
25. तयारी
26. वाईट हेतू
27. आव्हान
28. प्लॅनिंगचा मुखवटा
29. प्रस्थानम्
30. पुन्हा पुलावरचा घात?
31. दिसतं तसं नसतं
32. शक्ती प्रदर्शन
33. चकवा
34. त्यांना आमंत्रण
35. हाडाचा लढवैय्या
36. नरिमन ॲक्शन पॉईंट
37. तो येतोय
38. युद्ध आमुचे सुरू
39. प्लॅन्डी
40. अपहरण
41. गीता आणि नीता
42. महायुद्ध
43. वादळ शांत

**लेखकाचे मनोगत**

**लेखक परिचय**

**प्रकाशनपूर्व आलेल्या काही प्रतिक्रीया:**

**लेखिका मेधा इनामदार (पुणे) यांचा अभिप्राय:**

**राहुल दवे (कॅलिफोर्निया) यांची प्रस्तावना:**

**अक्षर प्रभू देसाई (कॅलिफोर्निया) यांची प्रस्तावना:**

**आदित्य भागवत, ठाणे यांचा अभिप्राय**

सूचना: लेखकाचे मनोगत तसेच प्रकाशनपूर्व आलेल्या मान्यवरांच्या काही प्रतिक्रिया, प्रस्तावना हे पुस्तकात मुद्दाम शेवटी दिलेले आहे. कथा वाचण्याआधीच त्याबद्दलचे रहस्य वाचकांना कळू नये हा त्यामागचा उद्देश आहे. म्हणून ते कथा वाचून झाल्यावरच वाचावे असे लेखक सुचवतात.

*ही एक काल्पनिक कथा असून यातील घटना, स्थळे, व्यक्ती, नावे काल्पनिक आहेत. त्यांचे सत्याशी साधर्म्य आढळल्यास तो योगायोग मानावा.*

# 1. जन्मापासून सुरुवात

ही गोष्ट सुरू होते अंदाजे वीस वर्षांपूर्वी. तेव्हा नुकतीच दूरसंचार क्षेत्रातील क्रांतीची सुरुवात होती. मुंबई लोकल ट्रेन्समध्ये डिस्प्ले नव्हते आणि पुढील स्टेशन कोणते येणार हे लोकलमध्ये आयते सांगण्यासाठी कोणताही मंजुळ आवाज मदत करत नव्हता. टीव्ही चित्रपट क्षेत्रात विविध बदलांचे वारे वाहत होते. जागतिकीकरणामुळे भारतामध्ये अभूतपूर्व बदल होऊ लागले होते. सगळीकडे सायबर कॅफे पावसाळ्यातील कावळयाच्या छत्रीप्रमाणे वाढलेले होते. पाश्चात्य जीवनशैली कधी नव्हे एवढी सर्वसामान्य भारतीयांच्या समोर येऊ लागली होती. वेगाने त्याचा अंगीकार आणि अंधानुकरण होऊ लागले होते. अजून लँडलाईन फोनचे महत्व कमी झालेले नव्हते. सगळीकडे एक रुपयात बोलण्यासाठी लाल कॉइनबॉक्स फोन होते. एक पडदा आणि मल्टीप्लेक्स या दोन्ही चित्रपटगृहांची चलती होती.

सायन्स आणि टेक्नॉलॉजीने कधी नव्हे एवढी प्रगती सुरू केली होती. ती प्रगती एक्सप्रेस अशी सुसाट धावायला लागली होती की तिला कोणत्या स्टेशनवर थांबायचे हेच कदाचित समजत नव्हते

म्हणून ती अविरत धावत होती. तिने विविध स्टेशनवर निसर्गाने लावलेले सावधगिरीचे लाल झेंडेपण आपल्या धावण्याच्या धुंदीत दुर्लक्षित केले.  मार्गात अनेक स्टेशनवर न थांबल्याने तीने कुणाकुणाला नाराज केले आणि कुणाला नाही याची तर गणतीच नव्हती आणि तिला याची फिकीर पण नव्हती.

जोडीला कृत्रिम बुद्धिमत्ता एक्सप्रेस पण या सायन्स टेक्नॉलॉजीच्या प्रगती एक्सप्रेसला समांतर धावू लागली आणि तिला मागेही टाकू लागली होती. तीही आधीच्या एक्सप्रेसची जुळी बहीणच! तिचीही तीच वृत्ती! काही ठिकाणी दोघीही एक्सप्रेसचे ट्रॅक एकमेकांत मिसळू लागले होते. ही सगळी नव्या सहस्त्रकातील आधुनिक विज्ञानाची झेप पाहिली तर असे वाटायला लागले होते की जणू काही भविष्यात शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ मंडळी नवनवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपल्या पृथ्वीमध्येच बदल करून तिला रोबोटीक पृथ्वी बनवतील की काय जी विविध उपकरणांच्या बटनांच्या इशाऱ्यावर फिरेल किंवा फिरायचे थांबेल? की मग आकाशातील आपली जागा बदलेल? कोण जाणे?

तर अशाच या वेगवान बदलांच्या काळात राघव साहसबुद्धे हे डोंबिवलीतील पीडीएफ नावाच्या बँकेतील कॅशियर होते. त्यांचे मूळ गाव सज्जन गाव. गावाच्या नावाप्रमाणे त्या गावातील सर्वच

जण सज्जन नसले तरी बहुतेक जण सज्जन होते. शिक्षणानंतर विविध परीक्षा देऊन राघव यांना बँकेत नोकरी मिळाली आणि आता ते कॅशियर होते. त्यांचे लग्न धमकपूरच्या राधाबाई हिच्याशी झाले. राघव यांचे आई वडील गावी शेती सांभाळत आणि त्यांचा लहान भाऊ माधव तिथेच त्यांच्याजवळ राहत होता. दोघांची लग्न झालेली बहीण सुमन ही मध्य प्रदेशात रहात होती.

राघव राधा यांना सुनिल अनिल ही दोन मुलं. सुनिलपेक्षा अनिल मोठा!

डॉक्टर संपन्न सूत्रे यांच्या "संपूर्ण हॉस्पिटल" मध्ये जेव्हा सुनिलचा जन्म झाला तेव्हा त्याचे डोळे डॉक्टरांना वेगळेच भासले. ते डोळे घारे, तपकिरी किंवा काळे असे नसून प्रिझम (त्रिकोणी लोलक) मधून प्रकाश पाठवल्यानंतर जसे वेगवेगळे रंग दिसतील तसे काहीसे दिसत होते. या मुलाला रंगांधळेपणा अथवा रातांधळेपणा होईल किंवा याची दृष्टी अधू असेल असे त्यांना वाटले. तशी पुसटशी शंका त्यांनी सुनिलच्या आई वडिलांना बोलून दाखवली.

पण नंतर काही दिवसांनी नियमित चेकपसाठी जात असताना राघव राधा यांनी सुनिलला नीट दिसत असल्याचे डॉक्टरांना सांगितले, कारण बाळ विविध दिशेने जाणाऱ्या, हलणाऱ्या वस्तूंना व्यवस्थित प्रतिसाद देत त्या दिशेने डोळे वळवत होतं. त्यामुळे आता चिंता मिटली होती, मात्र वेगवेगळया दिशेने पाहिल्यास विविध रंगात आळीपाळीने चमकणारे त्याचे ते दोन डोळे हे डॉक्टरांसाठी कोडं होतं. पण या डोळयांच्या रंगांव्यतिरिक्त इतर कोणताही शारीरिक प्रॉब्लेम त्या बाळात नव्हता आणि अर्थातच वेगळा रंग हासुद्धा काही प्रॉब्लेम नव्हता. बाळ, बाळाची दृष्टी आणि नजर नॉर्मल असल्याचं डॉक्टरांनी जाहीर केलं तेव्हा राघव राधा आणि एकूणच नातेवाईकांनी सुटकेचा निःश्वास टाकला. मात्र सुनिलचे डोळे हे शेजारपाजारी आणि नातेवाईकांमध्ये चर्चेचा आणि आकर्षणाचा विषय ठरले. कधीकधी काहींच्या द्वेषाचे कारण सुध्दा ठरले.

डॉक्टर संपन्न सूत्रे यांनी त्यांची मैत्रीण आय स्पेशलिस्ट डॉक्टर नेत्रा रघुरामन यांच्याशी सुनिलच्या चमकणाऱ्या रंगीत डोळयांबद्दल चर्चा केली. डॉक्टर नेत्रा यांनी निष्कर्ष काढला की कदाचित या मुलाला फार तर कलर ब्लाइंडनेस असू शकतो कारण इतर बाबतीत डोळे नॉर्मल होते. त्या पुढे म्हणाल्या की यासंदर्भात त्या नक्की रिसर्च करतील. डॉक्टर नेत्रा अनेकदा परदेशात

जायच्या, कॉन्फरन्स अटेंड करायच्या. अनेकदा तर संपन्न सूत्रे यांना नेत्रा यांचेबद्दल संशय येऊ लागला होता कारण देशात परदेशात विविध कॉन्फरन्ससाठी जातांना नेत्रा यांचा स्वत:चा छुपा अजेंडा असायचा, त्या काही अज्ञात लोकांना भेटत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते, पण ते उघडपणे नेत्रा यांना बोलले नाहीत कारण कदाचित त्या गोष्टी नेत्रा यांच्या खासगी असतील, व्यवसायाशी संबंधित नसतीलही! आणि त्या गोष्टी डॉक्टर म्हणून नेत्रा यांच्यासोबत काम करतांना अडसर ठरत नव्हत्या. त्यामुळे संपन्न सूत्रे यांनी दुर्लक्ष केले.

तर असं हे सुनिल नावाचं बाळ मोठं होत गेलं. एकदा संपूर्ण अपार्टमेंटमधील लाईट गेली. तेव्हा ते बाळ अंधाराला जराही न घाबरता मजेत खेळत असल्याचं आई वडिलांना नंतर टॉर्चच्या उजेडात दिसलं. बरीच बाळं अंधार झाला की घाबरून रडतात पण हे बाळ तसं नव्हतं.

अंधाराला मोठी माणसे आणि जाणती मुले का घाबरतात? कारण त्यांनी लहानपणापासून वेगवेगळ्या काल्पनिक भीतीदायक गोष्टी ऐकलेल्या, वाचलेल्या किंवा पाहिलेल्या असतात आणि

बरेचदा त्यातील सर्व भीतीदायक प्राणी किंवा भुते ही अंधारातूनच येत असतात अशी धारणा झालेली असते. अंधार म्हणजे अज्ञात! अंधार म्हणजे दृष्टीस काहीही न दिसणे, काहीच आकलन न होणे आणि ज्ञात गोष्टींपेक्षा अज्ञाताची आपल्याला नक्कीच भीती वाटते, नाही का? पण लहान बाळांचे तसे नसते. त्यांच्या मनात अंधाराबद्दल कसलाच पूर्वग्रह नसतो म्हणून बाळ अंधारात रडलेच पाहिजे असे नाही. पण अचानक अंधार झाल्याने आसपास असणारी जवळची माणसं विशेषत: मम्मी आणि पप्पा हे समोर दिसणं बंद झालं या कारणास्तव बाळ रडू शकतं पण हे सुनिल बाळ पक्कं होतं, अंधारात रडायचंच नाही!

अर्थात भूक लागली असेल किंवा काही बिनसलं असेल तर सुनिल बाळ अंधार असो वा उजेड असो, भयंकर मोठमोठ्याने रडून घर डोक्यावर घायचं. मग अनिल दोन चार खेळणी आणून त्याच्या समोर धरायचा. त्यापैकी गुदगुल्या केल्यावर म्यांव म्यांव करणारी खेळण्यातली मांजर पाहिली की सुनिल खुदकन हसायचा! अनिलला आपल्या लहान भावाच्या चमकदार रंगीत डोळ्यांचे आश्चर्य वाटे. तसेच आपला लहान भाऊ अंधारात घाबरत नाही हे कौतुक तो त्याच्या सगळ्या मित्रांना सांगत सुटे!!

हळूहळू हे सुनिल बाळ मोठं होत गेलं. रांगायला लागलं. पप्पा ऑफिसमधून घरी आल्या आल्या ते पप्पांना पायाजवळ धरून उभं राहायचं आणि कडेवर घ्यायला गोड विनंती करायचं. ही विनंती बघून पटकन पप्पा बाळाला कडेवर घेऊन त्याचे भरपूर मुके घ्यायचे. मग लगेच अनिलसुद्धा हातातली खेळणी टाकून यांच्याकडे यायचा मग तेही त्याला छातीशी कवटाळायचे. मग राधा स्वयंपाक बनवायची आणि सर्व कुटुंब आनंदाने जेवण करून झोपून जायचं.

राघवसाठी एक बरं होतं की ते राहात होते डोंबिवलीत आणि बँकसुद्धा डोंबिवलीतच होती, फक्त ईस्ट आणि वेस्ट एवढाच फरक होता. त्यामुळे रोजच्या ऑफिसच्या कामासाठी लोकल प्रवास नव्हता ही खूप दिलासादायक बाब होती.

एकदा राघव यांना दिवसभर ऑफिसमध्ये खूप वर्कलोड झाला तशात त्यांचेकडून काही चुका झाल्या आणि काही कारणास्तव एक दोन सहकाऱ्यांसोबत त्यांचा वादविवाद सुद्धा झाला. त्यावरून बँक मॅनेजर राघव यांना खूप बोलला होता पण राघव यांनीसुद्धा दोन चार शब्द त्यांना सुनावले आणि त्यादिवशी कामात जास्त

त्यांचे मन लागले नाही. संध्याकाळी थोड्या नाराज आणि बिघडलेल्या मनस्थितीतच ते घरी येऊन त्यांनी बेल वाजवली.

टिंग डिंग!!

दरवाजा उघडताच सुनिलचं लक्ष पप्पांकडे गेलं आणि हातातील खेळणे खाली टाकून त्याने रांगत पाप्पांकडे जाण्याचा प्रयत्न केला आणि अचानक रडू लागला. आधी तो अगदी चांगला खेळत होता. त्याचे खाऊन आणि दूध घेऊन झाले होते. अगदी हसत-खेळत मजेत बाळ बसलं होतं. काहीच प्रॉब्लेम नव्हता. नेहमीप्रमाणे सुनिलला कडेवर घेण्यासाठी पप्पांनी हात पुढे केले पण आज वेगळेच घडले. सुनिल अचानक मोठ्याने रडत यांच्या विरुद्ध दिशेने रांगत किचनमध्ये आईकडे जाऊ लागला आणि आईच्या पायाला धरून उभा राहून रडत त्याने आईला कडेवर घेण्याची विनंती केली. आईच्या कडेवरून ते गोड बाळ कधी घाबरत पप्पांकडे बघत होतं तर कधी आईला घट्ट पकडून घेत होतं!

राघव म्हणाले, "आजचा दिवस चांगला गेला नाही. ऑफीस मध्ये वाद झाले, आता घरी आलो तर हा सुनिल असा रडतोय, काय झालं त्याला काही दुखतं आहे का?"

राधाने उत्तर दिलं, "अहो, काहीच झालं नाही त्याला. चांगला ठणठणीत गोपाळ आहे तो! चला विसरा ऑफिस मधलं सगळं आणि जेवून घ्या बरं!"

राघव, "बरं, अनिल कुठे आहे दिसत नाही?"

राधा, "तो खाली गेलाय रखमा आणि इतर मुलांसोबत खेळायला!"

रखमा त्यांची गावाकडून आलेली घरकाम करणारी मावशी!

राघव, "रखमा आहे तर मग काही टेंशन नाही, चल वाढ आता गरमागरम! अनिलने खाल्लं का काही?"

"होय, जेवला तो!"

गरम खिचडी, कढी, आवळ्याचं लोणचं, पापड असा बेत होता. सुनिल बाळ थोड्या वेळाने शांत होऊन कडेवरून खाली उतरून दोघांजवळ बसलं आणि पापड खाऊ लागलं आणि मग पप्पांच्या मांडीवर जाऊन बसलं.

असेच दिवस जात होते, सुनिल अनिल दोघे मोठे होत होते.

^^^

# 2. जाणीव

सुनिल शाळेत जाऊ लागला. अनिलने आवडीने गॅलरीत पिंजऱ्यात एक पोपट पाळला होता. त्या पोपटाचा लळा घरातील सर्वांनाच लागला होता. त्याचे नाव होते - फिनिक्स!

मोठा होईपर्यंत सुनिलच्या बाबतीत विशिष्ट व्यक्तीकडे बघून अचानक कारण नसताना रडायला लागणे असे बरेचदा घडले. काही वेळेस आई-वडिलांना हे अनाकलनीय आणि विचित्र वाटले. मध्यंतरी एकदा त्यांनी संपन्न डॉक्टरला विचारून बघितले की याचा संबंध त्याच्या विशिष्ट प्रकारच्या डोळयांशी तर नसेल? तेव्हा डॉक्टरांनी सांगितले की त्याची दृष्टी नॉर्मल आहे त्यामुळे  चिंता करण्याचे कारण नाही. सुनिलला सगळे रंग पण व्यवस्थित ओळखता येत होते, शाळेतून सुद्धा तशी काही तक्रार आली नव्हती त्यामुळे रंगांधळेपणा असण्याची शक्यता पण नव्हती. मात्र नेत्रा डॉक्टर सुनिलच्या केस मध्ये बारकाईने लक्ष ठेऊन होती. त्या संदर्भातील प्रत्येक माहिती त्यांना हवी असायची.

राघव यांचं बँकेमध्ये आता छान चाललं होतं. बँकेचा परफॉर्मन्स चांगला झाला होता. बँकेचे शेअर सुद्धा वधारले होते. बँकेची कर्ज सुद्धा वेळेवर फेडले जात होती. बँकेत गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या सुद्धा वाढली. बाकी किरकोळ वादविवाद संपून आता राघव यांना बँकेत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. अशातच एकदा बँकेने राघव यांना तसेच इतर अनेक कर्मचाऱ्यांना ज्यांनी गेली दोन वर्षे चांगले काम केले होते त्यांना इन्सेंटिव्ह (प्रोत्साहन) म्हणून ट्रॅव्हल पॅकेज दिले.

त्यानुसार साहसबुद्धे फॅमिली दहा दिवसांच्या टूरवर निघाली. रखमा घरीच थांबली, पोपटाची काळजी आणि गॅलरीतल्या विविध फुलांच्या रोपांना पाणी देण्यासाठी! पॅकेजमध्ये महाबळेश्वर, माथेरान आणि अलिबाग अशी ठिकाणं होती. माथेरानला सनसेट पॉइंट बघून झाल्यानंतर चौघेजण दोन किलोमीटरवर असलेल्या त्यांच्या हॉटेलमध्ये पायी जायला निघाले. सकाळी दोन वेळा घोड्यावरून रपेट मारली गेली असल्यामुळे आता पायी जायचे असे त्यांनी ठरवले.

सुनिल आणि अनिल दोघांची आपल्या वयाप्रमाणे मनासारखी खेळणी खरेदी करून झाली होती. राधानेसुद्धा मार्केटमधून बरीचशी खरेदी केली होती. रस्त्यावरची लाल माती, रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेले जंगल आणि त्यातून असणारी ही पायवाट असे निसर्गाच्या सान्निध्यात चालताना खूप मजा येत होती आणि आल्हाददायक वाटत होतं. सगळी मुंबईची धावपळ लगबग विसरून गेल्याने शांतता जाणवत होती. मनाला गारवा देत होती. राघवजवळ आता छोटा नोकियाचा साधा मोबाईल आलेला होता. मोबाईल कॉल रेट त्यावेळेस महाग होते!

सुनिल आईचे तर अनिल बाबांचे बोट धरून चालत होता. अंधार पडलेला होता. संध्याकाळ झालेली होती. त्या चौघांच्या मागोमाग एक मनुष्याकृती बरंच अंतर राखून संशयास्पदरीत्या पाठलाग करत होती. त्या माणसाच्या मागे बराच अंतर आणि चौघांचे पुढे बरंच अंतर जास्त वर्दळ नव्हती. एखाद-दुसरा घोडेस्वार होता पण त्यांचे अंतर बरेच दूर होते. राधाने खांद्यावर अडकवलेली पर्स त्याला चोरायची होती. पावलांचा किंचितही आवाज तो होऊ देत नव्हता. त्यामुळे कुणाचे तसे लक्षही गेले नाही किंवा कोणाला संशय सुद्धा आला नाही.

अचानक काहीतरी वाटून सुनिलने मागे पाहिले आणि त्या माणसाच्या चेहऱ्याकडे एकटक बघून मोठ्याने रडायला सुरुवात केली. काय झाले म्हणून सगळ्यांनी मागे बघितले तर अचानक झालेल्या रडण्याच्या आवाजाने तो माणूस उलट्या दिशेने पळून आजूबाजूच्या जंगलातील झाडाझुडूपांमध्ये उड्या मारत गायब झाला.

राघव काळजीने म्हणाले, "अगं कुणीतरी आपला पाठलाग करत होता, बरे झाले सुनिल रडला त्यामुळे तो पळून गेला!"

"हो, कदाचित पैशांचे पाकीट किंवा पर्स चोरी करण्याचा त्यांचा इरादा असावा अन्यथा तो असा पळाला नसता", राधा घाबरून म्हणाली.

"होना पप्पा! खरंच, माझा भाऊ खूप हुशार आहे!", अनिल कौतुकाने म्हणाला.

"भर गर्दीत मार्केटमध्ये पर्समध्ये काही ठेवताना किंवा काढताना थोडं सांभाळून राहत जा राधा, मी तुला अनेक वेळा सांगितलेलं आहे. लोक नजर ठेवतात आणि माग काढतात. बरं

असो! बेटा सुनिल त्या माणसाकडे बघून तू का रडलास?", राघव यांनी सुनिलला विचारले.

हळूहळू रडणे थांबत सुनिल म्हणाला, "पप्पा पप्पा त्या माणसाच्या डोक्यावर लाल लाल काहीतरी होते!"

आधीच घाबरलेल्या सगळ्यांना अचानक सुनिलने असं विचित्र काहीतरी सांगितल्याने सर्वांच्या अंगावर शहारे आले. लाल लाल म्हणजे रक्त तर नव्हतं? कुणी गुन्हेगार तर नव्हता ना तो? एक ना अनेक कुशंका!

सगळे विचारात पडले. पण त्या माणसाच्या डोक्यावर लाल असे काही नव्हते. जरी संध्याकाळ होती तरी तो माणूस पाठमोरा पळताना त्याचं डोकं थोड्यावेळा करता का होईना दिसत होतं. त्यांने डोक्यावर काहीही घातले नव्हते आणि लाल रंगाचे तर नाहीच नाही. रक्त असण्याचीही काही शक्यता नव्हती कारण रक्त असते तर याआधीसुद्धा इतर कुणाच्यातरी नजरेस तो माणूस सहज पडला असता. काहीही असो पण अनर्थ टळला हे बरे झाले.

सगळेजण थकले असल्यामुळे लवकर निद्रेच्या अधीन झाले. दुसऱ्या दिवशी पुन्हा भ्रमंती आणि भटकंती होणार होती. लहान वय असले तरीही आपण काहीतरी वेगळे आहोत याची जाणीव सुनिलला होत होती.

राघव यांनी त्यांचा रोल असलेला जुना कॅमेरा सोबत आणला होता. अजून बाजारात मोबाईल मध्ये कॅमेरे आलेले नव्हते, असले तरीही फार थोड्या लोकांजवळ ते असायचे कारण ते मोबाईल महाग होते.

हॉटेलमधल्या रूमवर कॅमेरात फोटो काढून संपलेला आधीचा रोल काढून नवा रोल टाकतांना सुनिलची चौकस बुद्धी जागृत झाली.

त्याने विचारले, "पप्पा, हे काय आहे?"

"बेटा हा कॅमेरा रोल आहे. हा रोल डेव्हलप करायला द्यायचा. यात आपण काढलेल्या फोटोंचे निगेटिव्ह प्रिंट असतात! ते फोटो धुवावे लागतात मग त्यांचे नंतर फोटो तयार होतात!"

"पण पप्पा निगेटिव्ह म्हणजे काय?"

"अरे, निगेटिव्ह म्हणजे विरूद्ध कलर!"

"विरूध्द म्हणजे?"

"जसे चांगला विरूद्ध वाईट, गोड विरूद्ध तिखट असते तसे रंगांचे पण विरूद्ध रंग असतात जसा हा भिंतीचा पांढरा रंग आहे ना त्याचा विरूद्ध रंग असतो काळा! कळलं का बाळा?"

हॉटेल रूममधील टीव्हीवर कार्टून बघता बघता अनिल ब्रेड बटर दूध घेत होता आणि त्याची आई खोलीतले सामान आवरत होती. अनिलचे लक्ष त्या दोघांच्या संभाषणाकडे अधून मधून जात होते.

"पण पप्पा, काळ्याचा विरुद्ध रंग पांढराच का असतो? निळा का नाही? आणि गोड विरुद्ध तिखटच का? कडू का नाही? आणि पप्पा मला सांगा फोटो धुतात तर ते खराब नाही का होणार?"

एवढे विज्ञान राघव यांना माहिती नव्हते.

ते काही सुनिलला सांगणार एवढ्यात आईच म्हणाली, "अरे बाबांनो बस करा आता. चला पटापट तयारी करा. फिरायला निघायचे आहे. गप्पा नंतर मारा!"

ट्रीपमध्ये पुढे त्यांनी एक प्राणी संग्रहालय बघितले. तेव्हा सुनिलला काही प्राण्यांच्या पिंजऱ्यातून एक विशिष्ट प्रकारचा ध्वनी ऐकू येत होता. प्राणी जे आवाज काढतात त्यापेक्षा तो ध्वनी वेगळाच होता.

सुनिल: "अरे दादा, तो शिंह बघ कसा आवाज करतोय विचित्र! आणि त्याच्या डोक्यातून लाल रंगाचा प्रकाश येतो आहे!"

अनिल: "तो सिंह विचित्र आवाज कशाला करेल ? शांत बसलाय तो! दिसत नाही का? आणि त्याच्या डोक्यावर काहीच लाल रंगाचे नाही आहे!!"

सुनिल: "पण मला तर लाल रंग दिसतो आहे आणि आवाज पण येतो आहे!"

अनिल: "आवाज? कसा?"

सुनिल: "सु SS सु SS असा!"

अनिल: "गप बस रे! उगाच आपलं काहीतरी सांगत असतो! पप्पा! याला सांगा ना, उगाच काहीतरी आवाज येतो आवाज येतो असे सांगत बसतो! मला भीती वाटते! याला तुमच्याकडे घ्या!"

राघव राधा हसू लागले.

राघव: "अरे, तो लहान असून तुला आवाज येतो, आवाज येतो, लाल रंग दिसतो असं सांगून घाबरवतो आणि तूही मोठा असून लगेचच घाबरतोस?"

सुनिल: "नाही पप्पा, खरच सु SS सु SS असा आवाज येतोय! मी दादाला घाबरवत नाहीए!"

राघव: "राधा, त्याला सू लागली असावी बहुतेक, बघ जरा! केव्हाचा सु SS सु SS करतोय!"

आणि मग सर्वजण हसले.

ते कुटुंब तिथून निघून गेल्यावर तो सिंह जबडा मोठा करून त्या पिंजऱ्यावर जोरजोरात आपले पंजे मारू लागला होता आणि एक पंजा त्याने पिंजऱ्याच्या गजाबाहेर काढला होता, त्याची नखे फार तीक्ष्ण होती! इतरांचे नाही पण पाठमोरा असतांनाही सुनिलच्या हे पटकन लक्षात आले आणि त्याने मात्र मागे वळून त्या खवळलेल्या सिंहाकडे पाहिले होते. त्या सिंहाचा चिडलेला चेहरा नंतर बरेच दिवस त्याच्या मनातून गेला नव्हता.

मात्र त्यानंतर सुनिलने त्याला अनुभवास येत असलेल्या बऱ्याच गोष्टी घरात सांगणे बंद केले. वयाच्या मानाने इतरांपेक्षा

त्याला खूप लवकर मॅच्युरीटी येत होती, मनाची परिपक्वता येत होती. त्याची विचारशक्ती खूप तीक्ष्ण होती. वेगवान होती. इतरांपेक्षा वेगळी होती.

घरी परतल्यानंतर काही महिन्यानंतर सर्वजण टिव्हीवर कोणतातरी मारधाड एक्शन आणि बदला किंवा सूडकथा सिनेमा बघत होते. त्या पिक्चरमधल्या हिरोला त्याच्याबरोबर पूर्वी घडलेल्या काही वाईट घटना निगेटिव्ह स्वरूपात आठवतात.

"तीन चार जण त्यांच्या घरात घुसून हल्ला करतात, घरात असलेल्या त्याच्या आई वडिल आणि मोठ्या भावावर हल्ला करतात. भावाच्या डोक्यावर सळई मारतात", एवढं आठवून त्या हीरोला असह्य होते, डोक्याला हाताने गच्च दाबून धरतो आणि फ्लॅशबॅकमधून भानावर येतो आणि हा सगळा फ्लॅशबॅक निगेटिव्ह मध्ये दाखवत होते. सुनिलला हा फ्लॅशबॅक आणि वडिलांनी मागे दाखवलेल्या कॅमेरातल्या निगेटिव्ह रोलमध्ये जे दिसत होतं ते सारखंच दिसत होतं. निगेटिव्ह प्रकरण काहीतरी वेगळंच आहे हे त्याला समजत होतं!!

एकदा शाळेतर्फे एका दिवसाच्या ट्रीपला सगळेजण ठाणे येथील 'कला भवन' मध्ये गेले होते. तिथे विविध प्रकारच्या चित्रांचे प्रदर्शन बघून सुनिलला चित्रांविषयी आवड निर्माण झाली. त्याची चित्रकला तशी लहानपणापासून चांगलीच होती पण उत्तरोत्तर चित्रकलेविषयीची आवड कला भवनला भेट दिल्यानंतर वेगाने वाढत गेली. येतांना वडिलांनी दिलेल्या पैशांत त्याने चित्रकलेचे साहित्य विकत आणले. शाळेत असतांना त्याने एलिमेंटरी आणि इंटरमिजीएट चित्रकलेच्या परीक्षेत A ग्रेड मिळवली. निसर्ग, गूढ आणि फँटसी प्रकारातील चित्रे तो काढू लागला. काही प्राण्यांच्या आणि माणसांच्या चित्रांत त्याने डोक्याभोवती लाल वर्तुळे काढली होती. बरेचदा तो  अर्धा प्राणी आणि अर्धा माणूस असे चित्र काढायचा. तसेच सुपरहिरो असलेले कॉमिक्स त्याला वाचायला आवडायला लागले.

पण एक होते की प्रत्येक ठिकाणी सुनिलसोबत सर्वजण फोटो काढायला आवर्जून पुढे येत आणि आग्रह करत, कारण असा हा रंगीत आणि चमकणाऱ्या डोळयांचा मुलगा एकमेवाद्वितीय असा होता. बरेचदा वाईट नजरेपासून वाचण्यासाठी आई त्याला सार्वजनिक ठिकाणी नेहमी गॉगल घालायला लावे.

दहावीत त्याला चांगले मार्क्स मिळाल्यावर त्याचा गॉगल नसलेला रंगीत फोटो स्थानिक वर्तमानपत्रातील पुरवणीत छापून आला होता तेव्हा त्याच्या डोळयांबद्दल सगळीकडे समजले. टीव्हीतील वृत्तनिवेदकाने आवर्जून त्याच्या डोळयांबद्दल सांगतांना असे म्हटले होते - "चमकदार रंगीत डोळयांचा हा मुलगा त्याच्या मार्कांमुळे आणि त्याच्या विशेष डोळयांमुळे सगळयांच्या लक्षात राहील असाच आहे!"

आपल्या माध्यमिक शाळेतील आयुष्यात सुनिलला विज्ञानाचा अभ्यास करायला लागल्यापासून तसेच सुपरहिरोंचे कॉमिक्स वाचून त्याला जाणीव झाली होती - की त्याला इतरांपासून काहीतरी वेगळी अशी शक्ती लाभली आहे. जसे कुणी काही तीव्र नकारात्मक विचार करत असेल तर त्या व्यक्तीच्या डोक्याभोवती आपल्याला लाल रंगाचे वलय दिसते. तसेच आपले लक्ष त्या व्यक्तीकडे नसले तरीही ती व्यक्ती जवळपास असेल तर त्या नकारात्मकतेचा विशिष्ट आवाज ऐकू येतो.

या सगळ्या शक्ती त्याच्यात वयाने मोठा होत असतांना हळूहळू विकसित होत गेल्या. रात्री सर्व जणांना अंधार असल्याने

अर्थातच कमी दिसायचे पण सुनिललाच मात्र रात्री इतरांपेक्षा जास्त ठळक आणि स्पष्ट दिसायचे, हे नक्की का व कसे हे मात्र त्याला अजून नीट उलगडत नव्हते आणि याबद्दल त्याने घरात कुणाला सांगितले नाही.

सुपरहीरोंचे कॉमिक्स वाचून वाचून त्याने एक गोष्ट मात्र मनाशी नक्की आणि पक्की ठरवली होती ती म्हणजे या शक्तीबद्दल कुणालाही न सांगणे! ही शक्ती आपल्याला का मिळाली हे त्याला अजून कळले नव्हते! नंतर नंतर त्याने त्याच्यासोबत घडत असलेल्या अद्भुत गोष्टींची उघड वाच्यता करणं किंवा त्याबद्दल आश्चर्य व्यक्त करणं बंद केलं. घरच्यांसाठी सुनिलचे वेगळेपण म्हणजे फक्त त्याचे रंगीत चमकदार डोळे आणि त्याला रात्रीच्या प्रकाशात थोडे जास्त दिसणे एवढेच होते. बाकी इतर काही त्यांना माहिती नव्हते. त्या गोष्टी स्वतःपुरत्या ठेऊन त्यासंदर्भात आणखी संशोधन करायचं त्याने ठरवलं.

दरम्यान त्याला खात्री झाली होती की, आपल्याला लोकांच्या डोक्यात जेव्हा निगेटिव्ह गोष्टी सुरू असतात तेव्हा त्या ओळखता येतात म्हणून मग त्यांना सकारात्मकतेमध्ये बदलण्यासाठी त्याने

त्याबद्दल विविध पुस्तके वाचायला सुरुवात केली. आता अनिल मेकॅनिकल इंजिनियरिंगला होता तर सुनिल अकरावी सायन्सला गेला. दरम्यान त्याने आपला चित्रकलेचा छंद कायम ठेवला! गॅलरीत पिंजऱ्यात असलेल्या पोपटाला तो अधून मधून आपल्या मनातील गोष्टी अभ्यास करता करता सांगायचा. अनिलचे कॉलेज दूर असल्याने प्रवासात खूप वेळ जाणार होता म्हणून त्याने मुंबईतच माटुंग्याला हॉस्टेलमध्ये राहण्याच्या निर्णय घेतला. मुलांकडे नीट लक्ष देता यावे म्हणून स्वेच्छेने आतापर्यंत हाऊसवाईफ असलेल्या राधाने आता डोंबिवलीतच एका लायब्ररीत पार्ट टाईम जॉब स्वीकारला होता. धुणी, भांडी, बाजार वगैरेसाठी रखमा होतीच.

^^^

# 3. सुगावा

सुनिल जीआयजी सायन्स ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकत होता. लोकल बसने तो घराजवळील एका स्टॉपपासून कॉलेजपर्यंत जायचा. बाहेर वावरतांना शक्यतो तो गॉगल लावायचा आणि आजही त्याने लावला होताच. अधूनमधून आपली चित्रकलेची आवड तो जपत होताच. सुनिल म्हणजे विज्ञान आणि कला यांचा अनोखा संगम होता!

आठवड्यातून एक दोन वेळा ठाणे येथे "रिडर्स रेव्हरन्स" नावाच्या सायन्स लायब्ररी आणि स्टडी रूममध्ये तो बरेचदा अभ्यास आणि विज्ञानातील अनेक आवडीच्या विषयांवर रिसर्च करायला जायचा. त्याच्या बॅगमध्ये भरपूर कागदं, विविधरंगी पेन, पेन्सिल, स्केच पेन आणि वह्या असायच्या. त्याने रिसर्च आणि डेव्हलपमेंट क्षेत्रात करियर करायचे आणि सायंटीस्ट बनायचे असे मनाशी ठरवले होते. त्याचा ईमेल सुद्धा sscientist.ssunil@gmail.com असाच होता. ज्यादाचा एक एस (S) टाकावा लागला कारण एका एस सहित आयडी उपलब्ध नव्हती. लायब्ररीतच तो अधून मधून काही चित्रे काढत बसायचा.

त्याची काही चित्रे फँटसी प्रकारातील तर काही वैज्ञानिक असायची. आता इंटरनेट आल्याने त्याला रिसर्चसाठी चांगले माध्यम मिळाले होते.

आज सुट्टी होती आणि ही संधी साधून तो ठाण्याला जायला निघाला. तिथे त्याचे काही मित्र सुद्धा होते. त्यांनाही भेटायचा बेत होता. डोंबिवली प्लॅटफॉर्मवर आल्यावर तिकीट काढून लोकल येण्याची वाट पाहू लागला. नेहमीप्रमाणे बऱ्याच लोकांच्या डोक्यावर त्याला कमी जास्त तीव्रतेचे लाल वलय अथवा वर्तुळ दिसायला लागले. हे त्याच्यासाठी नेहमीचं होतं. त्याने कुठेतरी वाचलं होतं की मनुष्य कायम काहीतरी विचार करतच असतो. काही विचार जाणून बुजून तर काही नकळत येतात! बरेचदा अनेक विचार काहीच कामाचे नसतात, निरुपयोगी असतात. पण तरीही ते विनाकारण आपल्या मनात येतच राहतात. त्यापैकी बरेच नकारात्मक असतात पण नंतर ते आपण प्रयत्नांनी नष्ट करू शकतो. प्रॉब्लेम तेव्हा होतो जेव्हा नकारात्मक विचारांची तीव्रता वाढत जाते आणि आपण त्यांना नियंत्रित करण्याऐवजी तेच आपल्याला नियंत्रित करायला लागतात!!

लोकल ट्रेन यायला वेळ होता म्हणून तो वर्तमानपत्रात चेहरा खुपसून बसला. बाजूला बेंचवर युनिफॉर्म घातलेला एक शाळकरी मुलगा दप्तर मांडीवर घेऊन बसला आणि स्मार्टफोनवर काहीतरी करत बसला. सहज लक्ष गेल्यावर सुनिलला त्याच्या डोक्यावर साधे छोटे लाल वर्तुळ दिसले.

"असेल एखादे होमवर्कचे टेंशन त्याला किंवा गेममध्ये लेव्हल जिंकेल की नाही याचे टेन्शन आले असेल!" असे म्हणून सुनिल पुन्हा पेपर वाचू लागला.

त्याच दरम्यान तीन चार खांब सोडून आडोशाला एका बेंचवर क्रिकेटची असते तशी उन्हाची टोपी घातलेला आणि तोंडाला पांढरा रुमाल बांधलेला आणि गॉगल घातलेला माणूस खांबाच्या आडून सुनिलकडे डोळे रोखून बघत होता.

काही वेळाने, "सीएसटी जाणारी स्लो लोकल थोड्याच वेळात येत आहे", अशी घोषणा झाली आणि सुनिल बेंचवरून उठून उभा राहीला. आणि त्याला अचानक सु ss सु ss असा आवाज आला तसे त्याने बाजूला पाहिले तर त्या शाळेतल्या

मुलाच्या डोक्यावारचे लाल वर्तुळ स्थिर छोटे न दिसता प्रचंड मोठे प्रखर ज्वाळांसारखे दिसायला लागले होते आणि त्या मुलाच्या चेहऱ्यावर प्रचंड निराशा, विषाद आणि खिन्नता दिसायला लागली. चेहऱ्यावर घामाचे थेंब जमा झालेले दिसत होते. प्रचंड वेगाने काहीतरी मोठा निर्णय घेऊन पटकन काहीतरी चुकीची क्रिया करण्याआधी (जी स्वतःसाठी नाहीतर इतरांसाठी विघातक आणि विनाशक ठरू शकेल) माणूस जसा प्रचंड अस्वस्थ होतो, तसा त्याचा चेहरा झालेला होता!

टोपी, रूमाल आणि गॉगलवाला माणूस अचानक उठून सुनिलकडे येऊ लागला तेव्हाच, "तो शाळकरी मुलगा नेमका रेल्वे स्थानकात लोकल येत होती त्या दिशेने जाईलच आणि रुळांवर लोकलखाली उडी मारेलच!" असे सुनिलला क्षणार्धात प्रकर्षाने वाटले कारण त्या मुलाच्या डोक्यावरचे वर्तुळ अतिशय प्रखर झालं होतं आणि सुनिलचा तो अंदाज अतिशय खरा ठरला.

तो शाळकरी मुलगा आत्महत्येसाठी रुळांकडे वेगाने जायला लागला आणि सुनिल चपळाईने पळत जाऊन त्याच्या समोर जाऊन उभा राहिला आणि त्याला ट्रेनच्या उलट्या दिशेने

प्लॅटफॉर्मवर जोरात फेकले. काही लोकांच्या हे लक्षात आलं आणि लोक तिकडे धावले आणि सुनिलच्या धाडसाचे कौतुक करू लागले. फेकला गेल्याने तो शाळकरी मुलगा भांबावला, त्याचा स्मार्टफोन फेकला जाऊन तुकडे झाले आणि थोडा वेळ त्याची शुद्ध हरपली. या सगळ्या प्रकारामुळे सुनिलच्या मागावर असणारा तो गॉगलवाला माणूस काय घडतंय ते बघत बघत  हळूहळू फूटोव्हर ब्रिजवर चढला आणि काही वेळ ब्रिजवर उभा राहून कठड्याला टेकून खाली काय चाललं आहे ते बघू लागला.

बरेच जण तिथे आले आणि म्हणू लागले, "हे काय बघावं लागतंय? दुर्दैवी आहे हे सगळं! ज्या पोरांना अजून जीवन म्हणजे काय हे नीटसं कळलं नसतं ती पोरं आपलं जीवन कोवळ्या वयात संपवायला का तयार होतात? का जीवावर उदार होतात?"

एक दोन जण त्या मुलाला दटावून विचारू लागले, "काय रे? घर कुठंय तुझं? शाळेतून पळून आलास? शाळेत सरांनी मारलं? की काही चोरी केली? कितवीत आहेस? परीक्षेत फेल झालास? की कोवळ्या वयात प्रेम केलंस? की मोबाईल व्हीडिओ गेम्सच्या नादात आयुष्य संपावतोय? ड्रग्ज घेतोस?"

तो उत्तरे देण्याच्या मनस्थितीत नव्हता. तेवढ्यात पोलीस तिथे आले, त्यांनी सुनिलचे आभार मानले आणि त्यांचे सोपस्कार पूर्ण करून त्यांनी गर्दीला पुढे जायला सांगीतले. गर्दीतील एकाने सुनिलचा दूर पडलेला गॉगल सुनिलला आणून दिला आणि सुनिलने वेळ न दडवता तो घातला. आपल्यातील शक्तीचा वापर एका जीवाचे प्राण वाचवण्यासाठी झाला याचा आनंद सुनिलला झाला असला तरीही या घडलेल्या घटनेमुळे आणि त्याच्या कारणमीमांसा करण्यात विचार करत बसल्याने त्याला बराच वेळ खूप अस्वस्थ वाटले.

ती लोकल निघून गेली होती. पुढची लोकल येईपर्यंत त्याने थोडासा चहा पिला मग त्याला तरतरी आली आणि मग पुन्हा तो वर्तमानपत्र वाचत बसला. यादरम्यान ब्रिजवरून तो गॉगलवाला माणूस परत खाली उतरला आणि सुनिलचे पूर्ण निरीक्षण करायला लागला. सुनिलचा गॉगल निघाला होता तेव्हा त्याचे चमकदार रंगीत डोळे त्या टोपीवाल्या माणसाच्या नजरेतून सुटले नव्हते. सुनिल नंतर आलेल्या एका लोकलमध्ये ज्या डब्यात चढला त्याच डब्यात टोपीवाला माणूससुद्धा चढला, अर्थात सुनिलच्या नकळत!

सुनिलला दिसणार नाही अशा पद्धतीने तो त्याच्या मागे उभा राहिला अचानक सुनिलला काहीतरी आवाज ऐकू आले. सुनिलने मागे पाहिले पण गॉगलमधून तो माणूस नेमका सुनिलकडे लक्ष ठेवून होता की नाही हे ठरवणं मुश्कील झालं आणि त्याचा चेहरा सुध्दा दिसत नव्हता कारण त्याने तोंडाला पांढरं फडकं बांधलं होतं, टोपी पण घातली होती पण त्याच्या डोक्याभोवती लाल वर्तुळ दिसले म्हणून सुनिलला संशय आलाच! मग सुनिलने त्याच्या ठाण्याच्या मित्राला फोन केला आणि डोंबिवली स्टेशनवर घडलेली घटना थोडक्यात सांगितली तसेच ठाण्याला यायला त्यामुळे उशीर होतोय असे त्यांनी सांगितले!

सुनिलचे फोनवरचे बोलणे ऐकून तो माणूस गर्दीमुळे थोडा सुनिलपासून दूर पुढे सरकला कारण अजून ठाणे यायला वेळ होता. आता तो माणूस सुनिलपासून बराच दूर होता पण लक्ष ठेऊन होता हे सुनिलला जाणवले.

कळवा स्टेशन आल्यावर सर्वजण पाण्याच्या धबधब्यासारखे प्लॅटफॉर्मवर उतरले आणि आता लोकल निघणार तेवढ्यात

सुनिलने कळवा स्टेशनवर त्या माणसाला बेसावध ठेऊन उडी मारली. लोकल बरेच अंतर पुढे आल्यावर त्या माणसाला सुनिल गर्दीत कुठेही नसल्याची जाणीव झाली.

कळव्याहून मग पुढच्या लोकलने तो ठाण्याला आला. संध्याकाळी घरी आल्यानंतर घडलेले काहीच त्याने घरी कुणालाच सांगितले नाही. टीव्हीवर फक्त एवढीच बातमी आली होती की प्रसंगावधान राखून एका कॉलेजच्या मुलाने शाळकरी मुलाला आत्महत्या करण्यापासून रोखले.

तो विचार करू लागला, "तो पाठलाग करणारा कोण असेल? जो कुणी असेल तो कधीतरी पुन्हा समोर आला तर? येईलच! आला तर येऊ दे! त्याला घाबरून घरात तर मी बसू शकत नाही! पण माझ्या शक्तीमुळे मला त्या माणसापासून सावध होता आले!"

नकारात्मक घटना घडण्याआधीच वातावरणातील नकारात्मक ऊर्जा आपण डिटेक्ट करू शकतो आणि त्या घटना घडण्यापासून थांबवूसुद्धा शकतो म्हणून त्याने स्वतःचे नामकरण "डिटेक्टिव्ह निगेटिव्ह" असे केले!

वा, शाबास सुनिल राघव साहसबुद्धे, तुमचा आता DN झालाय!

पण थांब DN मित्रा! हरखून जाऊ नकोस!

उद्या इतर कॉमिक्समधल्या सुपरहिरोंसारखे दुहेरी आयुष्य जगावे लागले तर? त्यासाठी तयारी आहे का?

^^^

# 4. ती दिसली

शहरातील एका चकचकीत रस्त्यावरून पाठीवरून सॅक लटकवून गॉगल घातलेला सुनिल चालला होता. बाजूला विविधरंगी छत्रींच्या खाली अनेकजण सिम कार्डस् विकत होते, विविध खाद्यपदार्थ विकत होते! तप्त ऊन पडलं होतं. घाम येत होता. रस्त्यावरून चालताना प्रखर उन्हामुळे रस्त्यावरून प्रकाश परावर्तित होऊन तो डोळे दिपवत होता. त्यानंतर सुनिलला अचानक एका ठिकाणी आल्यावर कसलीतरी वेगळीच जाणीव झाली जणू काही अंगात काहीतरी संचारले आणि बघता बघता त्या रस्त्यातून डांबरी रंग वेगळा झाला आणि आकाशात उडू लागला.

त्याकडे आश्चर्याने सुनिल बघतो न बघतो तोच त्या सिमकार्डवाल्या दुकानातल्या छत्रीमधून सगळे रंग बाहेर पडून उडू लागले. व्होडाफोनचा लाल आणि आयडियाचा पिवळा दोन्ही रंग एकत्र हातात हात घालून वर उडाले आणि नारिंगी झाले. डांबर आणि छत्रीतले सगळे रंग एकत्र होत आणि वेगळे होत उडत गोल फिरत पुढे वेगाने जात होते, जणू काही अत्यंत आनंदी असलेल्या

अनेक मैत्रिणी गोल करुन फुगड्या खेळत वर्तुळाच्या मध्यावर येऊन एकमेकांत मिसळत आहेत आणि पुन्हा लयीत परिघाकडे जात आहेत.

त्या रंगांमधून एक पुसटशी स्त्री चेहेराकृती अधूनमधून प्रकट होत होती आणि मनमोहक हसून सुनिलला खुणावून तिच्या मागे बोलावत होती आणि तो भारावल्यासारखा त्या रंगसमूहाच्या मागे मागे पळू लागला. त्यात झाडांच्या पानांचा हिरवा, खोडांचा तपकिरी, बाजूच्या गार्डनमधल्या फुलांचे, फुलपाखरांचे रंग मिसळत गेले. ती स्त्री आकृती आता स्पष्ट झाली. ती अधांतरी तरंगत होती आणि संपूर्ण नग्न होती. तीचे स्त्रीत्व दर्शवणारे अवयव उठावदार होते आणि एकूणच शरीर अतिशय आकर्षक होते. जणू काही ती पृथ्वीवरची नसून एखादी अप्सराच होती! तिचे संपूर्ण शरीर रंगानीच बनलेले होते. अवतीभोवती रंगांचे आकर्षक वलय गुंडाळून ती आता हवेत स्थिर झाली. मात्र तिचा रंग प्रत्येक क्षणी बदलत होता. कधी कधी ती संपूर्ण रंगहीन पारदर्शक पाण्यासारखी तर कधी स्फटिकासारखी शुभ्र तर कधी काळोखासारखी दिसायची. आता आजूबाजूच्या जगात फक्त रंग आणि केवळ रंगच दिसत होते. त्या रंगांच्या जगात तिची आकृती ठळकपणे उठून

दिसत होती आणि त्यात सुनिल आणि ती स्त्री जणू काही तरंगत होते.

"क कोण तू?", घाबरत सुनिलने विचारले.

"घाबरु नकोस. मी तुझी मैत्रीण आहे! मी आहे रंगमिती. मला सगळे रंग प्रेमाने रंगधारिणी म्हणतात. मला रंगिनी म्हटलं तरी चालेल!", ती सुंदर स्त्री मोहकपणे हसत म्हणाली.

"रंगमिती? रंगधारिणी? रंगिनी? म्ह... म्हणजे? नेमकी कोण आहेस तू?", अजूनही सुनिलला भीतीने घाम येत होता.

"मी रंगाचा जीव आहे, आत्मा आहे! जसे लांबी, रुंदी, खोली, गुरुत्वाकर्षण आणि काळ वगैरे या मिती (डायमेंशन) आहेत तसेच मी रंग मिती - डायमेंशन ऑफ कलर्स", ती म्हणाली.

"म्हणजे? मला समजलं नाही!", सुनिल गांगरून गेला. बावचळला.

"सांगते, नीट लक्ष देऊन ऐक! एखाद्या निर्जीव वस्तूला वर्षानुवर्षे त्याच स्थितीत ठेवले तर जडत्व येते! म्हणजे कित्येक वर्षे स्थिर असलेली निर्जीव वस्तू एखाद्या सजीवाने हलवण्याचा प्रयत्न केला तर ती निर्जीव वस्तू एखाद्या सजीवासारखी हलायला प्रचंड आंतरिक विरोध करते, जागची हलत नाही. याचप्रमाणे फिरते जडत्व प्राप्त झालेली फिरती वस्तू थांबण्यास मनापासून नकार देते! म्हणजे निर्जीव वस्तूमध्येपण विशिष्ट परिस्थितीत एक प्रकारचा जीव निर्माण होतो असे म्हटल्यास हरकत नाही!"

"असे खरंच असते? आणि समजा हे खरे मानलेच, तर त्याचं काय? त्याचा तुझ्याशी किंवा माझ्याशी काय संबंध आहे?"

"याचा संबंध माझ्याशी आहे आणि माझा संबंध तुझ्याशी आहे, तुझ्यात असलेल्या विशिष्ट शक्तींशी आहे. कसं ते सांगते! संपूर्ण सृष्टीतील जे काही एकूण रंग आहेत त्या रंगांचे विशिष्ट सजीव किंवा निर्जीव वस्तूंशी एक संबंध किंवा नाते निर्माण झालेले असते. उदाहरणार्थ झाडांच्या पानांचा आणि हिरव्या रंगाचा एकमेकांशी संबंध! कारण वर्षानुवर्षे पानांच्या हिरव्या रंगामुळे जडत्व तयार होऊन हिरव्या रंगाचा एक जीव तयार होतो आणि तो झाडाशी

सलग्न होतो. तसेच सर्व रंगजीवांचे एकमेकांशी सुद्धा एक नाते तयार झालेले असते. एखादा निर्जीव किंवा सजीव आणि त्यांचा रंग यांचा एकमेकांशी तसेच सर्व रंग यांचा एकत्रितपणे एक जीव निर्माण होतो. किंवा समज की एक मन तयार होते आणि त्या सर्व रंग मनांची मी धारिणी आणि नियंत्रक आहे. त्या सर्व रंगांचा एकजीव झालेला मी जीव आहे. सगळे रंग माझे ऐकतात. मी जशी जीव असलेली मिती आहे तसेच लांबी, रुंदी, खोली, गुरुत्वाकर्षण आणि वेळ वगैरे या मितींनासुद्धा स्वतःचा जीव असतो. जगात काही फक्त एवढ्याच मिती नाहीत, खूप आहेत पण अजून मानवाला त्याचे आकलन झाले नाही!"

सुनिल श्वास रोखून हे सगळे ऐकत होता.

रंगिनी पुढे म्हणाली, "आता पुढचे ऐक. तुला जन्मापासून रंगांशी संबंधित एक विशिष्ट शक्ती मिळालेली आहे त्यापैकी एकाची तुला कल्पना आहे. ती म्हणजे तुला लोकांच्या मनातील निगेटिव्ह विचार लाल रंगांच्या वलयाच्या स्वरूपात दिसतात आणि ते लोक जर तुझ्या दृष्टीआड पण जवळपास असले तर त्या नकारात्मकतेचा एक प्रकारचा ध्वनि ऐकू येतो आणि आता

लवकरच त्या नकारात्मक शक्तींचा तुला विशिष्ट वास पण येणार! पण इतर वासांपासून ते वास वेगळे ओळखता येणार!"

आता सुनिलला उलगडा झाला की त्याला प्रत्येक व्यक्तीमधील नकारात्मक विचार लाल रंगाच्या स्वरूपात डोक्याभोवती दिसतात, आवाज ऐकू येतात त्याचे हेच कारण किंवा हीच शक्ती आहे! आणि माणसेच नाही तर प्राण्यांच्या डोक्यातील नकारात्मक लहरी सुद्धा आपल्याला दिसतात, जसा तो प्राणिसंग्रहालयातील सिंह!

रंगिनी सांगतच होती, "दुसरी आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट जी तुझ्यात आहे पण तुला त्याची संपूर्ण कल्पना नाही!"

सुनिल विचार करू लागला, "इतरांना जिथे रात्री अस्पष्ट दिसते तिथे आपल्याला मात्र स्पष्ट दिसते याच्याशी संबंधित ती दुसरी शक्ती असणार!"

आता सुनिलचे मन अधीर झाले ते ही रंगिनी पुढे काय सांगते ते ऐकण्यासाठी!

तिने पुढे सांगितले, "तुला लहानपणापासून सृष्टीतले सगळे रंग हे निगेटिव्ह दिसतात म्हणजे कॅमेरातली फिल्म असते किंवा चित्रपटात फ्लॅशबॅक दाखवताना निगेटिव्ह मध्ये दाखवतात तसे!"

"पण मला हे कधी जाणवले नाही! कृपया नीट समजावून सांग!"

"तुला कधी जाणवले नाही कारण तू कधी पॉझीटिव्ह सृष्टी पहिलीच नाही. म्हणजे असे की प्रत्येक रंगाचा एक निगेटिव्ह रंग असतो जसे काळ्याचा पांढरा, हिरव्याचा लाल, पिवळ्याचा जांभळा, नारिंगीचा निळा याप्रमाणे! आणि कोणतेही दोन विरूद्ध रंग मिक्स केले तर करडा किंवा ग्रे रंग बनतो हे तुला माहिती असेलच!"

"हो माहिती आहे!"

"व्हेरी गुड, आता ऐक! तुला रात्री काळ्या आकाशाचा काळा रंग हा पांढरा दिसतो त्यामुळे तुला उजेड आहे असे वाटते त्यामुळे

रात्री तुला नीट दिसते त्यामानाने दिवसा तुला अस्पष्ट दिसते कारण तुला प्रत्येक रंग हा निगेटिव्ह दिसतो. बालपणापासूनच जो रंग तुला हिरवा दिसतो तो खरेतर लाल रंग आहे पण तू शाळेत शिकला आहेस की तो लाल रंग आहे. म्हणजे ज्या रंगाला तू लाल म्हणतोस तो खरोखर लालच आहे पण तो तुला दिसतो मात्र हिरवा!"

"आलं लक्षात, म्हणजे रात्री आकाश काळं असतं पण ते मला दिसतं पांढरं पण मी त्याला काळंच म्हणतो आणि मी सगळे रंग तसेच शिकलो आहे म्हणून इतरांशी बोलताना गोंधळ होत नाही, माझा आणि इतरांचाही!"

"बरोबर! आणि तुला प्रत्येक ठिकाणी असलेला छोटा उजेड सुद्धा मल्टिप्लाय होऊन दिसतो म्हणजे जास्त गुणीत होऊन प्रखर होऊन दिसतो जो इतरांना त्यामानाने कमी प्रखर दिसतो. याच कारणामुळे दिवसासुद्धा दिसायला तुला अडचण येत नाही आणि रात्री तर नाहीच नाही. अर्थात रात्री वस्तूंवरून परावर्तीत होणारा जोही प्रकाश तुझ्या डोळ्यांपर्यंत पोहोचतो त्याचा निगेटिव्ह रंग तुला दिसेल. पण संपूर्ण काळोख असला तर त्याऐवजी तुला संपूर्ण पांढरा रंग दिसेल. पण अंधारातील वस्तू व्यक्ती तोपर्यंत दिसणार

नाहीत जोपर्यंत त्यांचेवर थोडासा प्रकाश पडून तो परावर्तीत होणार नाही. पण अतिशय सूक्ष्म प्रकाश सुद्धा मल्टिप्लाय होऊन तुला दिसत असल्याने तुला त्याही परिस्थितीत दिसेलच. आणि नकारात्मकतेचे लाल वलय मात्र तुला चोवीस तास दिसेलच, रात्र असो की दिवस! अर्थात ही शक्ती कार्यरत असेल तेव्हा!"

"ही शक्ती कार्यरत असेल तेव्हा? म्हणजे? या शक्तीला थांबवता सुद्धा येईल?!"

"होय! थांबवता येईल. गरज नसेल तेव्हा! पण एक लक्षात ठेव! तुला मिळालेले वरदान कुणाला सांगू नकोस. जेव्हा तुला खात्री पटेल की तुझ्या वरदानाचा उपयोग चांगल्या कामासाठी होणार आहे तेव्हाच त्या व्यक्तीला ते सांग. तुला माहीतच आहे की प्रत्येक विशेष शक्तीबरोबर एक जबाबदारी पण येते त्यामुळे ही शक्ती वापरताना प्रत्येक वेळेस आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून प्रश्न विचार! जर काही वेळेस काही प्रश्नांची उत्तरे नाही मिळाली तर माझी आठवण काढ, मी येईन! मी तुला आता यापुढे भेटत राहणारच आहे. वेळोवेळी तुला मार्गदर्शन मी करणारच आहे आणि आणखी काही रंगांशी संबंधित नवीन शक्ती देणारच आहे.

या शक्तीचा उपयोग जगामध्ये चांगल्या बदलांसाठी कर! आता मी तुला एक वस्तू देते ज्याद्वारे या शक्तीला निष्प्रभ किंवा कार्यरत करता येईल! "

हे सगळे ऐकून सुनिल मंत्रमुग्ध झाला होता. त्याला बराच वेळ काही बोलणे सुचलेच नाही फक्त आवंढे गिळत होता. तिने सांगितलेले त्याने अनुभवलेले होतेच पण ते स्पष्ट शब्दांत आता त्याला समजत होते. आता ती रंगिनी स्फटिकासारखी पारदर्शक झाली. आजूबाजूचे जग पण स्फटिकासारखे पारदर्शक झाले. जणू काही सर्वत्र एक अदृश्य काच असून त्यात काचेने बनलेले दोघेजण तरंगत आहेत! तिच्या हातात आता एक छोटे चमकणारे एक सप्तकोनी आकाराचे स्फटिक होते. तिने ते सुनिलला दिले.

"हे स्फटिक नीट सांभाळ! हरवू नकोस. कुणाला दाखवू नकोस. यापुढेसुद्धा तुझा सृष्टीतील प्रत्येक नकारात्मक गोष्टींशी संबंध येतच रहाणार आहे म्हणजे त्या तू डिटेक्ट करू शकशील, ओळखू शकशील आणि त्यावर मात करण्याचे उपाय तुला शोधावे लागतील! तुला हे स्फटिक शरिराला स्पर्श होणार नाही अशा पद्धतीने कायम स्वतःजवळच ठेवावे लागेल. जेव्हा शक्तींचा वापर

करायचा असेल तेव्हा या स्फटिकाचा शरिराला एकदा स्पर्श कर म्हणजे शक्ती कार्यरत होतील आणि पुन्हा स्पर्श केल्यास शक्ती काम करायच्या थांबतील! म्हणजे जेव्हा तुला या शक्तींची गरज नसेल तेव्हा नकोसे रंग, ध्वनि आणि वास टाळता येईल! आणि माझी आठवण काढून याला तू हात लावला की मी हजर होईन!"

आणि आता तो पुन्हा त्या चकचकीत रस्त्यावर चालत होता. अगदी क्षणभरात हे आपल्यासोबत नेमके काय घडले हे त्याला समजत नव्हते परंतु सर्व त्याला आठवत होते आणि विशेष म्हणजे ते रंगिनीने दिलेले स्फटिक त्याच्या हातात होते.

त्याने नंतर इंटरनेटवर शोधल्यावर त्याला अशी माहिती मिळाली की माणसांच्या मनातील नकारात्मक विचारांतून विशिष्ट किरण बाहेर पडतात. ते तीव्र झाले की एक विशिष्ट रंग तयार होतो, ती किरणे मानवी क्षमतेच्या डोळ्यांना दिसू शकत नाहीत तसेच त्या किरणांतून एक ऑडिओ फ्रिक्वेन्सी तयार होते. तीचा अवाज मानवाच्या ऐकण्याच्या क्षमतेच्या पलीकडे असतो म्हणजे 30KHz च्याही वर!! काही प्राण्यांत ते किरण बघण्याची क्षमता आणि ते आवाज ऐकण्याची क्षमता असते पण तशीच क्षमता

आपल्याकडे आहे हे वाचून सुनिलच्या अंगावर शहारे आले आणि रंगमिती म्हणल्याप्रमाणे त्याचा विशिष्ट प्रकारचा वास सुद्धा मला येईल?

रंगमिती रस्त्यावर ज्या ठिकाणी मला भेटली किंवा भेटल्याचा आभास झाला ते ठिकाण म्हणजे दोन तीन किंवा जास्त डायमेंशन किंवा मिती एकत्र भेटण्याचे ठिकाण तर नसेल ना? कारण तो जेव्हा रंगांच्या मितीत गेला तेव्हा काळ ही मिती मात्र थांबली होती.

तो विचार करू लागला, "सगळ्या मितींचे एकमेकांशी काय रिलेशन असेल? त्यांचा एखादा फॉर्म्युला बनवता येईल का? इतर अनेक अज्ञात मितींपैकी सकारात्मकता आणि नकारात्मकता यासुद्धा मिती असतील का? त्या दोन्ही मितींनापण एक जीव असेल का? पंचेंद्रियांच्या पण पाच मिती असतील का? रंगमिती सारखा सृष्टीतल्या प्रत्येकच मितीला जीव असेल का? कारण आतापर्यंत नकारात्मकता, रंग, प्रकाश, ध्वनि, वास या मितींचा माझ्याशी संबंध आलाय!"

त्याला आठवले की एकदा त्याने घरी सहज प्रयोग म्हणून उंदीर मारण्यासाठी बनवलेले अल्ट्रासॉनिक मशीन सुरू केले होते

तेव्हा त्याला कानठळ्या बसवणारा आवाज येऊन असह्य झाल्याने त्या मशीनच्या वाटेला तो पुन्हा गेला नाही.

नंतर त्याने विविध ज्ञात मितींबद्दल माहिती मिळवली आणि अज्ञात मितींबद्दल संशोधन सुरु केले. घरी कुणालाच याबद्दल त्याने काहीही सांगितले नाही.

स्फटिकाला स्पर्श केल्यावर त्याला सगळे रंग जे आतापर्यंत निगेटिव्ह दिसत होते ते त्यांच्या मूळ स्वरूपात दिसायला लागले. जग अतिशय वेगळं दिसू लागलं. लोकांच्या डोक्यावरचे लाल वलय दिसणं बंद झालं. डोळ्यांनी आतापर्यंत दिसलेलं हे सारं अचानक वेगळ्या रंगात दिसू लागल्यावर त्याला विचित्र वाटू लागलं. ते सहन न होऊन त्याला चक्कर यायला लागले. मग परत त्याने स्फटिकाला स्पर्श केला. मग काही दिवसांनी या सगळ्याची सवय झाल्यावर तो सावरला. हे सगळे प्रयोग त्याने आई वडील भाऊ रखमा यापैकी कुणीही घरी नसतांना करुन बघितले.

फक्त गॅलरीतून एकटा पोपट हे सगळे बघत रहायचा. आजकाल त्या पोपटाला अधून मधून गॅलरीत येऊन घोंगावणाऱ्या एका हिरव्या-लाल भुंग्याचा नाद लागला होता. तो पोपट

अधूनमधून मूड आला तर सुनिलशी चांगला बोलायचा. अगदी पूर्ण वाक्ये माणसांसारखे बोलू शकणारा तो अनोखा पोपट होता.

"अरे फिनिक्स, काय रे सारखा त्या भुंग्याशी खेळत असतोस?"

"अरे, हा भुंगा ना वेगळाच आहे. चोचीत धरून त्याला चांगला पकडून खायचा बेत आहे पण हातीच येत नाही तो! इकडे येऊन बघ कसा करतो, कसा दिसतो!"

सुनिल त्याला मिळालेल्या स्फटिक आणि रंगिनीच्या आलेल्या अनुभवात हरखून गेलेला होता. त्याला सध्या पोपटपंची करायला वेळ नव्हता. नंतर एका मित्राच्या घड्याळाच्या शॉपमध्ये जाऊन त्याने एक घड्याळ घेतले आणि घड्याळाच्या काचेच्या आत तो स्फटिक बसवून घेतला. डायलवरचा काच उघड बंद करता येत होता. हवे तेव्हा डायलचा काच उघडायचा आणि त्यातील त्या स्फटिकाला बोटाने स्पर्श करायचा म्हणजे त्याची शक्ती तो वापरायला तयार!

^^^

# 5. सायन्स फेस्टिव्हल

काही वर्षानंतर -

बांद्रा येथे प्रचंड मोठा जागतिक सायन्स फेस्टिव्हल सुरु झाला होता. आठ दिवसांसाठी तो चालणार होता. प्रत्येक देशांतून निवडक तरुण जगासाठी आणि मानवजातीसाठी उपयुक्त ठरतील असे आपापले नवनवीन सायन्स प्रयोग येथे घेऊन आले होते. काहींनी आपापल्या प्रयोगांचे पेटंट घेतले होते.

त्यात सुजित लहाने म्हणून एक खेडेगावातून आलेला बुद्धिमान विद्यार्थी होता. अमित बडे या त्याच्या मावसभावाकडे वरळीला तो शिकत होता. सुजितने असे काही उपकरणं बनवले होते की अजूनपर्यंत ते कोणालाही साध्य झालेले नव्हते.

केवळ एक रुपया खर्च करून हवेपासून अतिशुद्ध एक लिटर पिण्याचे पाणी बनवणे आणि दहा रुपये खर्च करून हवेपासून एक लिटर पेट्रोल बनवणे त्या उपकरणांद्वारे शक्य होते. त्यामुळे इंधनाची प्रचंड बचत होणार होती. हे कसे साध्य झाले याचा फॉर्मुला अजून त्याने इतर कुणालाही सांगितलेला नव्हता. त्याने एकट्याने हा

प्रयोग केला होता. प्रयोगाबद्दलची संपूर्ण माहिती त्याने लॅपटॉप मध्ये आणि गुगल ड्राईव्हवर ठेवली होती आणि त्याचा पासवर्ड फक्त त्यालाच माहिती होता.

कडेकोट बंदोबस्तात काही शिक्षकांसह एका व्हॅनमध्ये हे उपकरण येथे त्यांनी आणले होते. इंधन क्षेत्रात ही मोठी क्रांती होणार होती. हे मॉडेल रोज रात्री एका अज्ञात स्थळी नेऊन पुन्हा सकाळी सायन्स फेस्टिव्हलमध्ये आणायचे असे ठरले होते कारण स्वस्तात इंधन निर्मिती हा एक आंतरराष्ट्रीय संवेदनशील विषय होता. फेस्टिव्हल बघायला येणाऱ्या लोकांमधून कुणी स्पॉन्सर मिळाले तर हा प्रयोग जागतिक पातळीवर राबवून सर्वांचे भले होईल अशी अपेक्षा होती. सुजित आणि काही हितचिंतक शिक्षक यांनी भारत सरकारकडे सुद्धा याबद्दल प्रयत्न करायचे ठरवले होते.

सायन्स फेस्टिव्हलच्या प्रवेशद्वाराजवळ एंट्रीसाठी आणि तिकिट खिडकीवर प्रचंड रांग होती. तिकिटाच्या रांगेमध्ये पांढरा रुमाल, गॉगल आणि क्रिकेटची उन्हाची टोपी घातलेला माणूस पुढे सरकत होता. त्याच रांगेत सायली प्रथमे ही मुलगी आणि तिचे कुटुंब हे सगळे नंबर लावून उभे होते आणि पार्किंग एरियामध्ये दूर

एका गाडीजवळ आणखी एक जण संशयास्पदरित्या एक इलेक्ट्रॉनिक उपकरण हातात घेऊन फिरत होता. सिक्युरिटी गार्डस आणि पोलीस यांच्या नजरेपासून बचाव करून आपला कार्यभाग साधण्यासाठी त्याला बरीचशी कसरत करावी लागत होती.

सायलीचा भाऊ सुमित म्हणाला, "अहो पप्पा, तिथे लिहिले आहे की आतमध्ये कॅमेरा अलाउड नाही आहे आणि मोबाईल बंद करायला सांगितले आहे!"

पप्पा म्हणाले, "अरे हरकत नाही सुमित! आपल्यासोबत सायली असल्यावर मग कॅमेराचे काय काम?"

असे म्हणून दोघांनी एकमेकांना टाळी दिली आणि सायलीसुद्धा त्यावर मनापासून हसली.

त्यावर मम्मी म्हणाली, "अरे तुम्हा दोघं बाप बेटे मिळून उगाच सायलीला त्रास देत असता. प्रत्येक गोष्टीसाठी तिच्यावरच अवलंबून राहायची सवय लागली तुम्हाला. पण तुमच्या मेंदूची क्षमता त्याने घटते आहे हे लक्षात ठेवा!"

सायलीच्या नजरेतून एक विचित्र दिसणारा भुंगा सुटला नाही. तो बराच वेळ तिच्या आसपास घोंगावत होता आणि मग प्रवेशद्वारातून तो आतमध्ये गेला. रांग पुढे सरकत होती. अनेक जिज्ञासू विद्यार्थी, विज्ञाननिष्ठ व्यक्ती हे सगळे रांगेत उभे होते. सर्वांना उत्सुकता होती आत मध्ये कोणकोणते वैज्ञानिक शोध, उपकरणे बघायला मिळणार याची!

आत मध्ये भव्य हॉल होता. त्यात एकूण पन्नासच्या वर सेक्शन होते. चार रोबोट पहारेकरी आळीपाळीने प्रत्येक सेक्शनमध्ये फिरत होते, सर्वांना वेलकम करत फिरत होते. पर्यावरण, इंधन, अवकाश विज्ञान आणि संशोधन (स्पेस सायन्स), डिफेन्स सायन्स (संरक्षण विज्ञान), इलेक्ट्रॉनिक्स, इनस्ट्रुमेंटेशन, मेकॅनिकल, बायोलॉजी, बायो फ्युएल (जैव इंधन), बायो डायव्हर्सिटी (जैव विविधता), केमिस्ट्री, फिजिक्स, वगैरे असे विविध विभाग होते. तो भुंगा प्रत्येक सेक्शन मध्ये घोंगावत जाऊन थांबत होता आणि पुढे सरकत होता. जणू काही इतर माणसांसारखे त्यालाही प्रत्येक प्रयोगाबद्दल जाणून घ्यायचे होते!

* * *

सुनिल आता इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि सायबर सिक्युरिटी (ITCS) या शाखेत इंजिनिअरिंग करत होता आणि शेवटच्या वर्षाला होता तसेच अनिलला एका कंपनीत जॉब मिळाला होता. सुनिलला ते स्फटिकवाले घड्याळ सांभाळून ठेवायला फार त्रास व्हायचा. डोळ्यात तेल घालून ते घड्याळ त्याला इतर कोणाच्या हाती जाऊ नये हे बघावे लागत होते.

याच दरम्यान सुनिल साहसबुद्धेची मध्य प्रदेशात दिलेली आत्या सुमन हिचे मिस्टर रणजित बहादूर यांची मुंबईत दादर येथे सुप्रीटेंडन्ट ऑफ पोलीस (एस पी) म्हणून नुकतीच बदली झाली होती. म्हणून सर्वजण दादरला त्यांना भेटायला गेले होते. त्यांचे पोलीस स्टेशन आणि घर दादर परिसरातच होते.

सुनिलला पोलीस डिपार्टमेंटबद्दल खूप कुतूहल होते. विज्ञानाच्या विविध उपकरणांच्या मदतीने पोलीस डिपार्टमेंटला गुन्हेगारांना पकडण्यासाठी कशा प्रकारे मदत होऊ शकेल याबद्दल सुनिल बराच वेळ रणजित यांचेशी चर्चा करत होता. या विषयावर दोघांना सारखाच इंटरेस्ट होता. सध्या ते ऑफ ड्युटी होते आणि आता साध्या वेशात होते. सुनिलला त्यांच्या पोलीस डिपार्टमेंटचे

काम जवळून बघायचे होते म्हणून रणजित आणि सुनिल हे दोघे पोलीस स्टेशनमध्ये जाणार होते, अनिल त्याच्या कॉलेजमध्ये आणि राधा राघव लोकलने घरी जाणार होते आणि त्याप्रमाणे झाले.

आता दादर स्टेशनवर सुनिल आणि रणजित हे दोघेच होते. तिथून मग वेळ मिळाल्यास आज सायन्स फेस्टिव्हलला जाण्याचा सुनिलचा विचार होता. सुनिलने हाताला ते घड्याळ बांधलेले होते. त्याने स्फटिकाला स्पर्श केला किंवा नाही केला तरीही त्याचे डोळे मात्र इतरांना तसेच रंगीत दिसायचे. त्यामुळे तो गॉगल घालायचाच. सध्या त्याच्या शक्ती कार्यरत (ऍक्टिव्ह) नव्हत्या कारण स्फटिक काचेत झाकलेला होता. शरीराला स्पर्श नव्हता. पण आता पोलिस डिपार्टमेंटला जायचे तर विविध गुन्हेगार दिसतील तेव्हा निरीक्षण आणि अभ्यास म्हणून शक्ती कार्यरत केलेली बरी म्हणून त्याने डायल उघडून स्फटिकाला बोटाने स्पर्श केला. अचानक सुनिलसाठी सृष्टी निगेटिव्ह झाली. ते दोघे आता रेल्वे स्टेशनमधून बाहेर निघण्यासाठी फुटओव्हर ब्रिजवरून चालत होते. रणजित साध्या वेषात होते पण त्यांच्याजवळ रिव्हॉल्व्हर होतीच.

"तुमचं काम काय असतं नेमकं मामा?"

"कायदा सुव्यवस्था कायम राखणं, शक्यतो गुन्हेच न होऊ देणं आणि विविध ठिकाणी पोलिसांची व्यवस्था करणं!"

"गुन्हा होऊ न देणं? ते कसं?"

'त्यासाठी आम्हाला गुन्हेगार जसे विचार करतात तसा विचार करावा लागतो, खरे तर पोलीस हा मानसोपचारतज्ज्ञ सुद्धा असावा लागतो असे माझे मत आहे. व्यक्तींची आणि समूहाची मानसिकता पोलिसांना ओळखता आली पाहिजे! चेहेरा एखाद्या व्यक्तीबद्दल बरंच काही सांगून जातो, मनातले विचार चेहऱ्यावर उमटतात म्हणून आम्हाला गुन्हा टाळण्यासाठी फेस रिडींगपण जमलं पाहिजे."

"आणि समजा गुन्हा घडलाच तर?"

"घडलाच तर? घडतोच. काही गुन्हे टाळता येतात, हे नक्की आणि गुन्हा घडलाच तर गुन्हेगाराला पकडणं हे आमच्यासमोर मोठं आव्हान असतं!"

फुटओव्हर ब्रिजवरच्या गर्दीत दोघांच्या थोडं पुढे जाड काळा कोट घातलेला एक माणूस जड दिसणारी बॅग घेऊन इतरांपेक्षा लगबगीने चालत होता असे सुनिलला दिसले आणि त्याच्या डोक्याभोवती प्रचंड आग ओकत तळपणारे अस्थिर लाल वर्तुळ दिसले.

"आणि समजा गुन्हा घडत असतांना पोलीस त्या ठिकाणी योगायोगाने उपस्थित असले तर?", सुनिलने सूचकपणे विचारले.

रणजित हसून म्हणाले, "म्हणजे"?

सुनिल म्हणाला, "म्हणजे असे की, तो बघा तो काळा कोट वाला माणूस! तो मला जरा गडबड वाटतोय मामा! त्याचा चेहरा तर मी पाहिला नाही पण त्याच्या बॉडी लँग्वेज वरून मला तसं वाटतंय", सुनिल घाईत बोलून गेला पण ते त्या माणसाला ऐकू

गेले! त्यामुळे तो दचकून अचानक पळू लागला. सुनिल रणजित यांना असे तर सांगणार नव्हता की त्याला त्या माणसाच्या डोक्याभोवती लाल वर्तुळ दिसले म्हणून त्याला संशय आला!

त्यामुळे खिशातील लपवलेलं रिव्हॉल्व्हर चपळाईने काढून रणजित त्याच्या मागे पळू लागले आणि ओरडले, "ए, थांब, का पळतोयस? बॅगेत काय आहे? थांब नाहीतर गोळी घालीन!"

रणजितच्या मागे सुनिल पळू लागला. तेवढ्या भागात हलकल्लोळ माजला. लोक घाबरून सैरावैरा पळू लागले. त्या कोटवाल्या माणसाने थोड्या वेळाकरता मागे पाहिले. त्याने चेहऱ्यावर प्रदूषणविरोधी काळा मास्क असतो तसा मास्क घातलेला होता. फुटओव्हर ब्रिजवरून इतरांना हाताने दूर करत खाली गर्दीत पायऱ्या उतरू लागला. दोन चार जण धडपडत खाली पडले तर रणजितनी त्यांना आधी उचलून उभे केले. सुनिल ब्रिजवरच एके ठिकाणी बाजूला थांबला.

रणजित यांनी अत्यंत वेगाने दोनचार लोकांच्या खांद्यावर दाब देऊन उडी मारून त्या माणसाच्या पायाला जोराचा धक्का दिला

आणि गर्दी बाजूला झाल्याने रिकाम्या झालेल्या पायऱ्यांवरून धडपडून खाली पडला. रणजित यांनी त्याला पटकन उठून पळू न देता त्याच्या मांडीवर उजवा पाय दुमडून गुडघ्याने जबरदस्त दाब दिला आणि त्याचे हाड काडकन मोडलं.

तो कोटवाला पालथा पडला होता आणि त्याचा मांडीवर पाय देऊन त्याच्या कानाला उजव्या हाताने रणजित यांनी रिव्हॉल्व्हर टेकवली आणि त्याचा मास्क ओढून बाहेर काढला. आतापर्यंत पाहिलेल्या गुन्हेगारांपैकी हा वाटत नव्हता. बॅग ओपन केल्यावर त्यात आधी कधीही न पाहिलेली स्टेनगनसारखी दिसणारी नवीन प्रकारची शस्त्रे होती.

"कुठे घेऊन जात होतास शस्त्रे बोल लवकर?", बराच वेळ कानफटात मारून सुद्धा तो बोलला नाही.

"तुला पोलीस स्टेशनमध्ये जाऊन बोलतं करतो!"

दरम्यान एक लोकल प्लॅटफॉर्मवर धडाडत येऊन थांबली. आसपास बघ्यांची गर्दी जमली. काहीजण मोबाईलवर शूटिंग

करायला लागले. सुनिलपण तोपर्यंत पायऱ्या उतरत तिथे आलेला होता.

"ए, चला आपापल्या कामाला लागा आणि हे काय करताय? शूटिंग करू नका. आजकाल काय काहीही घडलं तरीही त्याची मोबाईलवर शूटिंग करायची सवय लागलीय सगळ्यांना!"

रणजित यांनी फोन करून इतर पोलिसांना बोलावून घेतले आणि त्या मास्कवाल्याच्या मुसक्या बांधून त्याला आणि सुनिललासुद्धा प्रत्यक्षदर्शी पुरावा म्हणून सोबत पोलीस स्टेशनमध्ये स्पेशल व्हॅनमध्ये घेऊन गेले.

पोलीस स्टेशनमध्ये कित्येक गुन्हेगारांच्या डोक्याभोवती प्रचंड प्रखर जळतं अर्धवर्तुळ त्याला दिसलं.

जगात प्रचंड प्रमाणात नकारात्मकता भरली आहे ते या निमित्ताने त्याला कळत होतं.

^^^

# 6. पुलावरचा घात

आता रात्र झाली होती. वांद्रे वरळी सी-लिंक ब्रिज जवळच समुद्रात एक जहाज होते. ते म्हणजे एक तरंगते हॉटेल होते. "ओशन वाईड डायनिंग" लग्झरी फ्लोटिंग हॉटेल! जहाजावर काही भागांत नाच गाणे सुरू होते. एक सुंदर स्त्री संगीताच्या तालावर मादक हालचाल करत बेली डान्स करत उपस्थित मंडळींना घायाळ करत होती. धनिक लोक या जहाजावर सेलिब्रेशन आणि एन्जॉय करण्यासाठी आलेले होते.

वांद्रे वरळी सी-लिंक ब्रिजच्या बरोबर खालच्या बाजूला असलेल्या समुद्राच्या पाण्यातून पाच काळे विंचू पाणी झटकत झर्रकन वर उडाले आणि पुलाच्या खांबांवरून सरपटत जाऊन वर सरकायला लागले. नंतर ते पुलाच्या खालच्या बाजूला उलटे होऊन चिकटले आणि हळूहळू वर सरकू लागले. सरकत सरकत ते पुलाच्या वरच्या बाजूला गेले.

सुजित लहाने याची व्हॅन वेगाने त्या पुलावरून प्रवास करत होती आणि मागे दोन कार थोड्या अंतराने येत होत्या. व्हॅनमध्ये

मागच्या बाजूला सुजित आणि अमित त्या उपकरणांच्या जवळ बसले होते. पुढे ड्रायव्हर जवळ अमितचे वडील होते तर मागच्या त्या दोन कारमध्ये शिक्षक मंडळी होती.

ते पाचही विंचू आता रस्त्यावर आले. पैकी एक विंचू खूप मोठा होता. ते सर्व खरे विंचू नव्हते. टणक धातूने बनवलेले रोबोटिक विंचू होते. सुजितची व्हॅन त्यांच्या जवळ येताच गाडीखालच्या रस्त्यावरून ते व्हॅनच्या खालच्या बाजूने उलट चिकटले. मोठा वगळता इतर चारही विंचू आपापल्या नांग्यांनी गाडीचा खालचा टणक भाग कोरून चिरू लागले तेव्हा ठिणग्या उडू लागल्या. त्यांच्या प्रयत्नातून गाडीला खाली मोठे छिद्र पडले. हे व्हॅनच्या खालच्या बाजूला घडत होते आणि इतक्या वेगाने घडत होते की व्हॅन आणि कारमधल्या कुणालाही ते समजलेच नाही.

पाचवा विंचू डीटोनेटर होता. गाडीखाली आधीच लावलेल्या स्फोटक पदार्थाला त्याने कार्यरत केले आणि क्षणार्धात गाडीत प्रचंड स्फोट होऊन ती पुलावर दोनशे फूट वर हवेत उडाली. व्हॅन हवेत उलटीपालटी होत असल्याने व्हॅनच्या खालच्या बाजूला विंचूंनी पडलेल्या मोठ्या भगदाडातून सुजितने बनवलेले उपकरण

निघून तेही हवेत उडाले आणि प्रचंड वेगाने खाली पाण्यात जाऊन पडले. व्हॅन उलटीपालटी होत होत पुलावरच्या रस्त्यावर मागच्या दोन्ही कारवर वेगाने आदळली. प्रचंड आवाज झाला. दोन्ही कारनी पेट घेतला. ज्वाळा आणि धुराचे लोट दिसू लागले. ती व्हॅन तिथून पुन्हा रस्त्यावर आदळून हवेत उडाली आणि स्वत:भोवती गरगर फिरत  खाली समुद्रात पाण्याकडे जाऊ लागली. मागच्या दोन्ही कार आणखी मागच्या गाड्यांवर आदळल्या. पुलावर एकच हलकल्लोळ माजला.

मागे असलेल्या गाड्या एकमेकांवर आदळू लागल्या. लोक जखमी झाले. काचा फुटल्या आणि काचेचे तुकडे हाता पायांत आणि चेहऱ्यात, डोळयांत जाऊ लागले. स्फोटाची तीव्रता एवढी प्रचंड होती की व्हॅन आणि दोन्ही कारमधल्या सगळया लोकांचा जळता कोळसा होऊन तेही हवेत उडाले. व्हॅन पाण्याकडे खाली समुद्रात येऊ लागली आणि पाण्यात पडली. माणसांची जळलेली शरीरं पाण्यात पडली, काही रस्त्यांवर पडली. ते पाचही विंचू त्या स्फोटात तुकडे तुकडे होऊन इकडे तिकडे विखुरले गेले.

"ओशन वाईड डायनिंग" लग्झरी फ्लोटिंग हॉटेल मधील लोक आ वासून पुलावर जे काही घडत होते ते बघत होते. काहींनी ते मोबाईल कॅमेरात शूट करायला सुरुवात केली. त्या जहाज हॉटेलमधील एका रूममधल्या एका काचेच्या खिडकीतून एक माणूस बायनॅक्युलरने हे सर्व बघत होता आणि त्याच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता.

बऱ्याच वेळानंतर बांद्रा येथे लकी चार्म हॉटेलमध्ये व्हेज मंचुरियन राईस वर ताव मारत असतांना एका माणसाने गॉगल आणि क्रिकेटची टोपी डोक्यावरच ठेवली होती पण तोंडावरचा पांढरा रुमाल काढून बाजूला ठेवला होता. हॉटेलमधल्या टीव्हीवर "आज की दुनिया" न्यूज चॅनेलवर पुलावर झालेल्या बॉम्बस्फोटची बातमी दाखवत होते. हेलिकॉप्टरद्वारे पुलावर राष्ट्रीय सुरक्षा दलाचे जवान उतरले होते व तेथे मदतकार्य सुरु झाले होते. पाण्यातून क्रेनने गाडी वर काढण्यात यश आले पण गाडीतले ते उपकरण सापडले नाही.

सुजित, अमित, अमितचे वडील आणि सर्व शिक्षक यांचा मृत्यू झाला होता. प्रेतं पाण्यातून बाहेर काढण्यात येऊन ओळख पटवली जात होती. रस्त्यावरील पडलेल्या प्रेतांची देखील ओळख पटवली जात होती. विशेष राष्ट्रीय सुरक्षा तपास यंत्रणा म्हणजे

सनसिया (SNSIA) च्या मुंबई शाखेचे हेड जयवंत जसकर तेथे हजर झाले होते.

या सगळ्या बातम्या बघून त्या टोपीवाल्या माणसाला जेवणच गेले नाही. जेवण अर्धवट टाकून जेवणाचे संपूर्ण बिल देऊन लगबगीने हॉटेल बाहेर येऊन त्याने आपल्या मोबाईलवरून कुणालातरी एक फोन केला. दोन वेळा फोन उचलला गेला नाही. तिसऱ्या प्रयत्नात उचलला गेला.

या घटनेनंतर सुजितच्या गावावर शोककळा पसरली. सुजितची आई धाय मोकलून रडू लागली. अमितच्या घरी शोकाकुल वातावरण तयार झालं. या घटनेत शिक्षकांचाही प्राण गेला असल्याने शाळेतल्या सगळ्यांना धक्का बसला.

सुनिलने कुटुंबासह उशिरा रात्री ही बातमी घरी टीव्हीवर पहिली. त्याला आश्चर्याचा धक्का बसला आणि प्राण गमावलेल्यांबद्दल दु:ख झाले. उद्या त्याला सायन्स फेस्टिव्हल बघायचा होता पण आता तो रद्द करण्यात आला होता. संबंधित ठिकाणांचे सगळीकडचे सीसीटीव्ही फुटेज मागवण्यात आले.

सायन्स फेस्टिव्हलमधल्या उरलेल्या सर्व सहभागी विद्यार्थी आणि इतर शास्त्रज्ञांना कडेकोट सुरक्षेत घरी पोचवण्यात आले. काहींना चौकशी करून सोडले तर काहींना ताब्यात घेण्यात आले. राजकीय आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरु झाल्या. न्यूज चॅनेलवाले सुरक्षा यंत्रणांना, फेस्टिव्हल आयोजकांना  धारेवर धरत होते. पोलिसांना प्रश्न विचारत होते.

रात्री बराच वेळ सुनिल रणजित सोबत आलेल्या अनुभवाबद्दल आणि एकूणच घडलेल्या बॉम्बस्फोटाबद्दल विचार करत राहिला. या दोन्ही घटनांचे काही कनेक्शन आहे का याचाही त्यांनी खल करून पहिला पण अजून काही निष्कर्ष काढता येणार नव्हता कारण तसे पुरावे नव्हते!

^^^

# 7. एक नवी सुरुवात

त्या दिवशी रणजित यांच्या चाणाक्ष पोलिसी बुद्धीतून आणि नजरेतून रेल्वे प्लॅटफॉर्मवरचा काहीही ठोस संदर्भ नसतांना अचानक गुन्हेगाराला ओळखण्याचे सुनिलचे अजब कसब सुटले नाही आणि त्यातून विविध प्रश्न निर्माण झाले.

प्रश्नांचा भडीमार सुनिलवर त्याच दिवशी पोलीस स्टेशनमध्ये झाला होता. तसे आधीही रणजित यांच्या कानावर सुनिलच्या रंगीत डोळ्यांबद्दल आलेच होते. रंगिनीच्या सांगण्यानुसार योग्य वेळी योग्य व्यक्तीला सुनिलने त्याच्या अंगी असलेल्या शक्तीबद्दल सांगण्यास हरकत नव्हती आणि मग जास्त आढेवेढे न घेता रणजित यांना सुनिलने त्याच्या अंगी असलेल्या शक्तीबद्दल सांगितले. सर्वप्रथम त्यांचा विश्वास बसला नाही पण लगेच पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी सुनिलची परीक्षा घेतली. कारण त्यांची परीक्षा सुनिलने पास केल्यास सुनिलची क्रिमिनल डिटेक्टर म्हणून चांगलीच मदत होणार होती आणि त्याने निर्ढावलेल्या आणि गुन्हा कबुल न करणाऱ्या गुन्हेगारांकडून गुन्हा कबूल करून घेणं सोपं होऊ शकणार होतं.

एका व्यक्तीने एका महिलेवर बलात्कार करून त्यानंतर तिचा जाळून निर्घृण खून केल्याच्या आरोपावरून अटकेत असलेल्या चार संशयित गुन्हेगारांना सुनिलसमोर उभे केले गेले. अजून चौघांवर थर्ड डिग्रीचा वापर झालेला नव्हता. तिथे हजर असलेल्या पोलीस डिपार्टमेंटमधील कुणालाही सुनिलच्या शक्तीबद्दल न सांगता सहजपणे त्या चौघांच्या समोर इतरांच्या नकळत सुनिलला आणले गेले. चौघेही त्यांचा गुन्हा कबूल करत नव्हते.

चौघांपैकी तिसऱ्या क्रमांकाचा गुन्हेगार ज्याच्या डोक्याभोवती प्रचंड लाल भळभळते वर्तुळ सुनिलला दिसले त्याबद्दल त्याने खुणेने हाताच्या बोटांनी रणजितला तीन आकडा दाखवला आणि मग हसून रणजित यांनी सुनिलला तिथून बाजूला जाण्यास सांगितले. आता सुनिलने सांगितलेल्या त्या माणसावर इतर तिघांच्या आधी थर्ड डिग्रीचा वापर करायला सुरुवात झाली आणि अथक प्रयत्नांनी त्याने गुन्हा कबूल केला. त्याने तसा घटनाक्रम आणि पुरावेपण सांगितले, जे फक्त त्या गुन्हेगारालाच माहिती होते आणि त्याद्वारे मग पोलिसांनी भक्कम केस उभी करून त्याला जलद कोर्टात फाशीच्या शिक्षेपर्यंत पोचवले. त्यानंतर असे बरेच गुन्हेगार सुनिलने ओळखले. त्याच्या आयुष्याची ही एक

नवीनच सुरुवात होती. एक कलाटणी देणारी सुरुवात! आणि दोघांनी हे सुनिलच्या घरी किंवा इतर कुणालाही सांगायचे नाही असे ठरवले होते!

जेव्हा खोटे बोललेले ओळखण्याचे मशीन म्हणजेच "लाय डिटेक्टर" गुन्हेगारांच्या शरीराला जोडले जाते तेव्हा बरेच वेळा त्यातून खोटे ओळखणे शक्य होत नाही कारण गुन्हेगारांना माहिती असते की त्यांचे खोटे बोलणे हे मशीन त्यांच्या शरीराच्या आत खोटे बोलतांना होणाऱ्या बदलांमुळे पकडते आणि मग काही कसलेले प्रशिक्षित गुन्हेगार खोटे बोलत असतांना जाणीवपूर्वक शरीरातील बदल नियंत्रित करून बोललेले खोटे मशीनने ओळखू नये असा प्रयत्न करू शकत होते आणि लाय डिटेक्टर मशीनलाच खोटे ठरवण्यात यशस्वी होत होते.

पण समोर उभ्या असलेल्या सुनिलच्या अंगी निगेटिव्ह विचार ओळखण्याची अशी काही शक्ती आहे हे गुन्हेगारांना माहितीच नसल्याने, सुनिल समोर मुद्दाम त्यांच्या गुन्ह्यासंदर्भात काही ठराविक भावना भडकवणारे प्रश्न विचारले की त्यांच्या नकारात्मक

विचारांचे इंजिन मेंदूत सुरु व्हायचे आणि मग लगेच सुनिलला लाल वर्तुळ दिसायचे आणि तो गुन्हेगार ओळखला जायचा.

अर्थात बरेचदा गुन्ह्याशी संबंधित नसणारा इतर दुसरा प्रखर निगेटिव्ह विचार सुरु असल्याने जजमेंट चुकायचीसुद्धा!! आणि म्हणून रणजित काही डोळे झाकून त्याच्या शक्तीवर विश्वास ठेवत नव्हते. तसेच अगदी प्रत्येकच वेळेस सुनिलवर अवलंबून राहण्याचे रणजित टाळत होते. येथे दोघेजण सारासार विचार आणि सद्सद्विवेकबुद्धी वापरून मार्ग काढायचे.

पोलीस डिपार्टमेंटच्या इतर कर्मचाऱ्यांना सुनिल हा फक्त एक खबरी तसेच पोलिसांना टेक्नोलॉजीच्या सहाय्याने आणि गुन्हेगारांची वर्णनावरून वेगाने चित्रे काढून गुन्हेगार पकडण्यास मदत करणारा एक जागरूक नागरिक आणि त्यांचा एक नातेवाईक म्हणून माहिती होता. सुनिलच्या आणि रणजितच्या घरीसुद्धा थोड्याफार फरकाने हेच माहिती होते.

कॉलेज आणि अभ्यासातून जसा वेळ मिळेल तसा गरजेनुसार सुनिल रणजित सोबत असायचा. निर्जीव लाय डिटेक्टर मशीन

असते तसे आता सुनिल खऱ्या अर्थाने एक सजीव निगेटिव्ह डिटेक्टर झाला होता!!

सुनिलने गेल्या दोन वर्षात पॉझिटिव्ह थिंकिंग बद्दल अनेक पुस्तके वाचली होती. कॉलेज आणि इतर सामाजिक जीवनात त्याला कुणीही मित्र, नातेवाईक ओळखीच्या व्यक्तीत कमी जास्त तीव्रतेचे लाल वर्तुळ दिसायचे तेव्हा तो गरजेनुसार त्या व्यक्तीला प्रश्न विचारून मग आलेल्या उत्तरांच्या आधारे तो सकारात्मक विचारसरणी त्यांच्या डोक्यात पेरायचा. एक वेगळ्या प्रकारची समाजसेवा केल्याचा आनंद त्याला व्हायचा.

पुलावरच्या स्फोटाच्या घटनेचा तपास रणजित यांचेकडे नसला तरीही विशेष राष्ट्रीय सुरक्षा तपास यंत्रणा सनसिया (SNSIA) च्या मुंबई शाखेला त्यांना मदत करावी लागत होती. अजून त्या पुलावरच्या घटनेबद्दल कुणीही पकडले गेले नव्हते. तसेच त्याच दिवशी सुनिलमुळे पकडला गेलेला तो बॅगमध्ये शस्त्रं घेऊन जाणारा माणूस आणि पुलावरचा स्फोट यांच्यात काही कनेक्शन आहे किंवा नाही याबद्दल काही निष्कर्ष निघाला नव्हता

आणि त्या सुनिलमुळे पकडला गेलेल्या माणसाने सांगितलेल्या दोन नावांच्या आधारे तपास सुरु होता.

पुलावरच्या घटनेनंतर घटनास्थळी ज्या काही वस्तू सापडल्या त्यावरून काहीच सुगावा लागत नव्हता. पुलाच्या आसपासच्या परिसरात तसेच "जहाज हॉटेल" वरील लोकांची चौकशी केली गेली. त्यातून फारसे निष्पन्न झाले नाही.

स्फोटाचे व्हिडीओ शुटींग अनेक लोकांनी मोबाईलवर केले होते पण ते सगळे स्फोटानंतरचे होते. हे सगळे रणजित आणि सुनिल या दोघांनाही माहिती होते. अंधाऱ्या रात्रीचे ते पाण्यातून उडी मारून पुलावर येणारे रोबोटिक विंचू कुणाच्याच कॅमेरात कैद झाले नव्हते. घटनास्थळी त्या विंचूंचे तुकडे सापडले खरे पण त्यावरून कोणताच ठोस सुगावा लागत नव्हता कारण ते साधे धातूचे तुकडे होते. सुनिल आणि रणजित हे दोघे शक्यतो सार्वजनिक ठिकाणी उघड उघड भेटणे आणि अशा विषयांवर बोलणे टाळत असत.

पुलावरच्या घटनेला अनेक महिने उलटून गेले होते. हवेपासून पेट्रोल बनवणारे यंत्र नष्ट करण्यामागे कुणा कुणाचा हात आहे याबद्दल अनेक तर्क वितर्क लढवले गेले पण अजून त्याबद्दल कुणाही गुन्हेगारापर्यंत पोहोचता आले नव्हते आणि कुणालाही अटक सुद्धा झालेली नव्हती. कुणी म्हणे हे एक आंतरराष्ट्रीय षड्यंत्र आहे. पण सत्य अजूनही उघडकीस आले नव्हते.

दरम्यान सुनिलने पोलीस डिपार्टमेंटसाठी स्वस्तात विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे बनवलीत जी त्यांना गुन्हेगारांचा शोध लावण्यास मदत करतील. जसे मल्टीपर्पज फिंगर प्रिंट स्कॅनर, युटिलिटी बेल्ट, फेस स्कॅनर सेव्हर वगैरे. पोलीस हवालदारांसाठी त्यांच्या काठीत बसेल पण दिसणार नाही असे ऑडिओ आणि व्हीडिओ रेकॉर्डिंग डिव्हाईस बनवून दिले.

एकदा रणजित यांनी सुनिलकडे एक प्रस्ताव ठेवला होता. सुनिलला लोकांच्या डोक्यातील ज्या फ्रिक्वेन्सीच्या नकारात्मक लहरी दिसतात त्या लहरी एखादे इलेक्ट्रॉनिक उपकरण बनवून त्याद्वारे सुद्धा डिटेक्ट करू शकतो का? म्हणजे सुनिलवरचा ताण

कमी होईल. खरे तर यामुळे सुनिलचे महत्व कमी होणार होते पण समाजाच्या भल्यासाठी त्याने ते आव्हान स्वीकारले.

पोलीस डिपार्टमेंटच्याच एका लॅब मध्ये त्याने सलग आठ दिवस तसे उपकरण बनवण्यासाठी मेहनत घेतली. शेवटी एक उपकरण बनवण्यात सुनिल यशस्वी झाला. लॅब मध्ये फक्त रणजित यांच्या उपस्थितीत सुनिलने ते उपकरण ऑन केले. त्याच्या डिस्प्ले मध्ये लाल दिवा बीप झाला नाही. मग उपकरण स्वीच ऑफ करून ते गर्दीच्या ठिकाणी दादर रेल्वे ब्रिज वर गेले. एका मोठ्या पेटीत ते उपकरण त्यांनी आणले. पेटी उघडून ते उपकरण ऑन केले. क्षणार्धात त्याचा स्फोट झाला. त्या मजबूत पेटीचेही तुकडे झाले. या स्फोटामुळे घाबरून पळापळ सुरू झाली तेव्हा रणजित यांनी सर्वांना हे एक मॉक ड्रिल होते असे सांगून धीर दिला.

लॅब मध्ये परतल्यावर -

"मला वाटते मामा, वातावरणातली सगळीच निगेटिव्हीटी हे मशीन एकत्र पकडतं. आणि त्याची एनर्जी पॉवर या मशीनच्या कपॅसिटी पलीकडची आहे. माझी गोष्ट वेगळी आहे, मला

व्यक्तीनुसार फक्त लाल वर्तुळ दिसते. विशिष्ट व्यक्तीवर फोकस केल्यास तेवढ्याच व्यक्तीबद्दल लाल वर्तुळ, आवाज मला येतात, इतरांकडे मी गरजेनुसार दुर्लक्ष करू शकतो!"

"होय, तुझ्याकडे सिलेक्टिव्ह डिटेक्शन आहे. आणि प्रत्येकच गोष्ट जी माणूस करू शकतो ती यंत्राने करावी असा अट्टाहास माणसाने करूच नये. तुमच्या भाषेत काय म्हणतात त्याला? आर्टिफिशीयल इंटेलिजन्स म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता! एके दिवशी मानवजातीला भारी पडेल ते!"

सुनिलने त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

घरी परत येत असतांना त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होते. कारण खरे तर सुनिलकडे सिलेक्टिव्ह निगेटिव्हीटी ओळखू शकेल असा फॉर्म्युला होता ज्याद्वारे तो तसे उपकरण बनवू शकला असता पण तसे उपकरण गरज पडेल तरच तो बनवणार होता. कारण आता जर तसे उपकरण बनले तर त्याची नक्कल होऊन त्याचा दुरूपयोग होऊ शकला असता. त्यामुळे पुढे जाऊन तसे उपकरण बनवावे लागलेच तर ते फक्त स्वतःसाठी सुनिल वापरणार होता किंवा

एखाद्या अतिशय विश्वासू व्यक्तीला तो ते देणार होता, अन्यथा नाही!

दरम्यान सुनिलचे इंजिनिअरिंग पूर्ण झाले. तो डीस्टींक्शन मिळवून पास झाला. त्याला चांगले 88 टक्के मार्क मिळाले. आयटी कंपनीत दोन तीन जॉब ऑफर पण आल्या पण त्याने स्वीकारल्या नाहीत.

^^^

# 8. स्मृतीबंधन

काही वर्षांपूर्वी मुंबईत एके ठिकाणी -

"तू जेव्हा मला बाळ असताना पहिल्यांदा दूध पाजलं होतंस ना आई, ती फिलिंग, ती गोड भावना, तो मायेचा स्पर्श मी कधीही विसरू शकत नाही आई!", असं 'सायली प्रथमे' जेव्हा सर्वप्रथम म्हणाली होती तेव्हा आईला प्रचंड धक्काच बसला होता पण सायली विनोद करते आहे, आपली फिरकी घेते आहे असे वाटून ती सावरली आणि म्हणाली, "ए, काहीही काय? तुला आठवतं इतक्या लहानपणाचं?"

"अगं हो आई, मला सगळं जसंच्या तसं आठवतं, पिंकी स्वियर! अगदी गळा शप्पथ!!"

"काहीपण सांगून मला बनवू नकोस! पिंकी स्वियर बोलून मी इंप्रेस होईल असं तुला वाटत असेल तर ते चूक आहे!"

"अगं आई मी तुला अजून एक उदाहरण सांगते ते सांगितल्यावर तुझा नक्की विश्वास बसेल. मी बाळ असताना तू मला एकदा खेळवत होतीस आणि हवेत फेकून पुन्हा झेलत होतीस आठवतं?"

"त्यात काय विशेष प्रत्येकच बाळाला तसं आई-वडील खेळवतात!", चेहऱ्यावरील अस्वस्थता लपवत आई म्हणाली.

"अगं आई माझ बोलणं मी पूर्ण केलं नाही अजून! पुढचं ऐक! वर फेकता फेकता मी तुझ्या हातातून एकदा सटकले होते, पण बाजुच्या मऊ बेडवर पडले म्हणून जास्त मला लागले नाही पण तू प्रचंड घाबरली होतीस त्यानंतर मी कितीतरी वेळ रडत होते आणि तुही मला छातीशी धरून रडत होतीस, पण अजूनही तू ही गोष्ट घरात कुणालाही सांगितली नाही, आठवतं?"

आता मात्र आईचा आ वासला गेला. हे तंतोतंत खरे होते कारण ही गोष्ट कुणालाच माहीत नव्हती अगदी कोणालाही नाही! सायलीच्या वडिलांना सुद्धा नाही!

इतक्या लहानपणीच्या गोष्टी हीला आठवतात? पण आणखी मजा तर पुढे होती!

"पटलं ना आता? आणि त्यावेळेस दुपारचे 04:43 झाले होते!", असं म्हणून तिने आईला टाळी दिली आणि हसू लागली पण आईचा चेहरा मात्र प्रचंड आश्चर्याच्या भावनेतून बाहेर निघत नव्हता आणि टाळी घेतल्यावर पण आईचा हात तसाच हवेतच राहिला!

दुपारचे त्यावेळेस किती वाजले होते हे जरी आईच्या लक्षात नव्हते तरी तेव्हा दुपार होती हे मात्र आईला आठवत होते.

त्याच दरम्यान हे संभाषण सायलीचे बाबासुद्धा ऐकत होते कारण ते नुकतेच घरात आलेले होते पण दोघांचे त्यांच्याकडे लक्ष नव्हते. त्यांनाही खूप आश्चर्य वाटले.

मात्र ते खेळकर वृत्तीचे होते. सायली काहीतरी उलट सुलट सांगून तिच्या भोळया आईला बनवते आहे असे त्यांना वाटले. हातातली बॅग बाजूला ठेवून ते सोफ्यावर बसले आणि त्यांनी म्हटलं, "अच्छा असं आहे तर! मग मी आता तुला काही तरी विचारतो की तू नक्की सांग हं सायली!"

"अहो पप्पा, विचारा तर खरं!", वडिलांच्या अशा पवित्र्याचा काहीएक परिणाम न झालेली सायली म्हणाली!

"बरं सांग तू पाच वर्षाची असताना आपण तुझ्यासाठी कोणतं खेळणं आणलं होतं जे लाल रंगाचं होतं?"

"मी 5 वर्ष चार महिन्याची असताना संध्याकाळी साडेपाच वाजता तुम्ही माझ्यासाठी एक लाल रंगाची पिगीबँक आणली होती! मी त्या पिगीबँक मध्ये एकदा वाळू भरून ठेवली होती आठवतं ना?"

आता आश्चर्य व्यक्त करण्याची पाळी सायलीच्या वडिलांची होती पण त्यांनी ते चेहऱ्यावर जास्त न दाखवता काहीतरी विचार केला आणि पुन्हा सायलीला विचारलं, "सांग बरं तुझं सायली हे नाव मी ठेवलं की मम्मीने?"

सायली सांगू लागली, "पप्पा सोप्पंय ते, सांगते की मी! त्या दिवशी मी पाळण्यामध्ये लोळत खेळत पडले होते. चार-पाच दिवसांची होते मी! हात-पाय हलवत होते. छताकडे बघत बसले होते. फिरणारा पंखा मला खूपच आवडत होता. त्यावेळेस छतावर पंख्याच्या बाजूला एक बारीकसा कोळी लटकत होता. त्याला कोळी म्हणतात हे मला तेव्हा चार दिवसांची असताना जरी माहीत नव्हते तरी आता मोठी झाल्यावर मला ते समजले की तो कोळी होता. बरं ते कोळ्याचं सोडून द्या कारण थोड्यावेळानंतर तो फॅन मध्ये अडकून मेला होता. ते असो!"

मग सायली पुढे म्हणाली, "तर मी सांगत होते की तुम्ही आणि मम्मी दोघांनी बाजारातून पप्पांनी आणलेले '2000 मुलींची नावे' हे पुस्तक वाचत होतात आणि तुम्ही दोघांनी प्रत्येक नाव वाचून बघितलं आणि त्यातले आईने दहा आणि तुम्ही पंधरा नाव निवडले. त्यादिवशी तारीख होती 5 मार्च. वेळ होती रात्री 7:15 pm. आणि मग आईने एक आणि तुम्ही एक असे दोन नाव

फायनल केले. आईने जुईली आणि तुम्ही सायना. आणि दोघे नावं एकत्र करून तुम्ही माझे नाव ठेवले सायली!"

पप्पांना आणि मम्मीला दोघांनाही चक्कर येऊन खाली पडण्याचे बाकी होते पण त्यांनी इकडे तिकडे हाताने सोफा, भिंत वगैरेचा आधार घेत स्वतःला सावरले आणि खाली पडण्यापासून वाचवले.

आणि सायली मात्र आणखी बोलतच होती ती म्हणाली, "पण मला तेव्हा लहानपणी चीड येत होती तुमच्या दोघांची, कारण मला त्यावेळेस कळत नव्हतं की तुम्ही माझ्याशी खेळायचं सोडून हे काय गप्पा मारत आहात? म्हणजे माझ्याकडे लक्ष देत नाही आहात. पण आता मोठी झाल्यानंतर आणि शब्द अर्थ कळायला लागल्यानंतर मला कळलं की तुम्ही माझ्यासाठी नावे शोधत होतात! मला लहानपणापासूनच सगळं जसंच्या तसं पाहिजे तेव्हा आठवतं मम्मी आणि पप्पा!"

"अग पण हे कसे शक्य आहे?"

"माझ्या दृष्टीने ही खूप सहज आणि नॉर्मल आहे पप्पा! फक्त एवढेच आहे की ते मला जे जे आठवतं त्याचे मोठे झाल्यानंतर! जन्म होतांना मला काय वाटलं ते पण मी आठवू शकते, सांगू?"

"नको, नको!", एकमुखाने एकचवेळी तिचे आई वडील म्हणाले होते. त्या दिवशी एवढे धक्के त्यांना पुरेसे होते, आणखी नको होते!

* * *

सायली इयत्ता दुसरी मध्ये असताना हे सगळे घडले होते. तिने आतापर्यंत हे सगळं अनुभवलं पण शेवटी आई वडिलांना सांगायचं ठरवलं. वयाच्या मानाने वैचारिकदृष्ट्या ती खूप मॅच्युअर झाली होती.

सायलीला तिच्या आई वडिलांनी मराठी मीडियम मध्ये टाकले होते. आपल्या मातृभाषेतूनच आपण चांगले शिक्षण घेऊ शकतो हा त्यांना गाढ विश्वास होता. जागतिक भाषा इंग्रजी असली आणि इंग्रजीचे महत्त्व जरी वाटत असले तरी दहावीनंतर मातृभाषा शिकलेला माणूस जगातील इतर कोणतीही दुसरी भाषा चांगल्या पद्धतीने आत्मसात करू शकतो हेही त्यांना माहिती होते.

सायली अगदी लहान असतानाच्या सर्व घटना अशा पद्धतीने त्यांना सहजपणे सांगितल्यानंतर ते सायलीला डॉक्टरकडे घेऊन

गेले तेव्हा डॉक्टरांनीही तिच्या बऱ्याच टेस्टस् घेतल्या. त्यांचे नाव होते डॉक्टर व्योमकेश विटे!

त्यांनी एक मोठ्ठे बोर्ड बोलावले. त्यावर शंभर वेगवेगळ्या रंगाचे शंभर वेगवेगळे अकार होते आणि त्यापैकी अर्ध्या आकारात वेगवेगळ्या रंगानी नंबर्स आणि अर्ध्या आकारात विविध शब्द लिहिलेले होते. हे चित्र तिला त्यांनी अर्धा मिनिट दाखवले. सायलीने वरच्या रांगेतून डावीकडून सुरू करून प्रत्येक आकाराकडे दोन दोन सेकंद नजर फिरवली आणि शेवटच्या रांगेत उजवीकडे खाली तळाशी येऊन थांबली आणि डॉक्टर म्हणाले, "सायलीच्या उलट दिशेने वळवा आता हे चित्र!"

ते चित्र खोलीत एके ठिकाणी कोपऱ्यात आणून सायलीला दिसणार नाही अशा पद्धतीने उलटवण्यात आलं, इतरांना मात्र ते दिसत होतं.

मग डॉक्टरांनी विचारले, "चौथ्या रांगेतील डावीकडून पाचवा आकार आठव?"

सायली म्हणाली, "पिवळ्या रंगाने सत्तावीस आकडा लिहिलेला जांभळ्या रंगाचा त्रिकोण!"

डॉक्टर सहीत उपस्थित सर्वजण आश्चर्यचकित!!

अगदी बरोबर आणि अचूक होतं ते उत्तर!

आणि मग तिने पटापट सर्वच आकार आणि त्यांचे रांगेतील स्थान, रंग, शब्द किंवा संख्या म्हणून दाखवले.

आणखी वेगवेगळया टेस्ट करून मग डॉक्टर म्हणाले की, "हिला अगदी दुर्मिळ असलेला हायपर थिमेशिया हा एक आजार किंवा मेडिकल कंडीशन किंवा डीसऑर्डर झालेला आहे. किंबहुना नुसत्या साध्या हायपर थिमेशिया मध्ये अगदी तंतोतंत सर्वच प्रकारच्या गोष्टी आठवत नाहीत पण हिला त्याहीपेक्षा जास्त तीव्रतेचा हायपर थिमेशिया झाला आहे आणि हा त्याहीपेक्षा खूप दुर्मिळ असतो त्याला नाव आहे: हायपर मेमरी ईमप्रिंट अँड रिकॉल डीसऑर्डर HMIARD (हमियार्ड) किंवा मराठीत तुम्ही त्याचे सुटसुटीत नाव "अतिस्मृतीबंधन" असे ठेऊ शकता!"

सर्वजण श्वास रोखून ऐकत होते.

डॉक्टर पुढे म्हणाले, "खरे तर याला आजार म्हणता येणार नाही कारण याचा फायदाच तिला होणार आहे, पण एक मात्र आहे की जसे चांगले तसे वाईट प्रसंग सुद्धा तिला आठवत राहतील. काही वेळेस आयुष्यात सुखाने जगण्यासाठी काही गोष्टी विसरून जाणं आवश्यक असतं पण ही काहीही विसरणार नाही. अशा

मुलांची एक विशेषता असते ती म्हणजे अशी मुले आपली मातृभाषा अगदी लवकर आणि अस्खलितपणे बोलायला लागतात! आणि त्यानंतर इतर भाषा! अशी मुलं कितीही भाषा शिकू शकतात! हिला लिखित तसेच फोटोग्राफिक अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टी तंतोतंत आठवतील. म्हणजेच पाहिलेला प्रत्येक प्रसंग, चित्र तसेच वाचलेले प्रत्येक शब्द, अक्षर, वाक्य, रंग, वास, संगीत, अनुभवलेल्या भावना हे सगळं नेहमी तंतोतंत आठवेल!"

आता सायलीच्या आई वडिलांना लक्षात आले की तिला आतापर्यंत प्रत्येक परीक्षेत पैकीच्या पैकी मार्क का मिळाले तसेच ती आपल्याला लहानपणीचे प्रसंग का सांगू शकली ते!

कालांतराने विटे डॉक्टरांनी इतर काही डॉक्टरांना बोलावून घेतले (ज्यात एक अमेरिकन आणि एक युरोपियन डॉक्टर होता) आणि त्यांच्या समोर सायलीला बरेच प्रश्न विचारले कारण मेडिकल हिस्टरीमध्ये अनेक देशांमध्ये आढळलेली ही प्रथमच भारतातील अशी एक केस होती.

सायलीच्या आई-वडिलांच्या विनंतीवरून त्यांनी डॉक्टरांना याबाबत जास्त कुणाला सांगू नये ही विनंती केली कारण

सगळीकडे गवगवा झाल्यानंतर सायलीला धोका निर्माण होईल किंवा ती अचानक प्रकाशझोतात आल्यानंतर तीचे जगणे मुश्कील होईल हे त्यांना माहिती होते, त्यामुळे विटे डॉक्टरांनी त्यांची विनंती मान्य केली. शेवटी राईट टू प्रायव्हसी म्हणजे गोपनीयतेचा अधिकार सर्वांनाच आहे.

विटे डॉक्टर त्यांचे फॅमिली डॉक्टर होते. त्यामुळे सायलीवर जे काही मेडिकल मॅगझिनमध्ये लेख लिहिण्यात आले त्यात तिचे नाव बदलण्यात आले तसेच तिचा पत्ता किंवा तिच्या बद्दल इतर माहिती गोपनीय ठेवण्यात आली!

विटे डॉक्टरांनी एक सल्ला मात्र सायलीच्या आई-वडीलांना दिला तो असा की हिला नक्की मोठेपणी डॉक्टर बनवा कारण तिची प्रखर स्मृती किंवा मेमरी अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकेल हे नक्की!!

तिच्या रोग निदान करण्यामध्ये कसलीच चूक होणार नाही कारण ती प्रत्येक गोष्टीचा सर्व बाजूंनी विचार करू शकेल आणि कोणतीच गोष्ट तिला आठवणार नाही असे होणार नाही! हा विचार सायलीच्या आई-वडिलांना पटला असे त्यांनी डॉक्टरांना

सांगितले. याबाबत जास्त कुणाकडे वाच्यता केली गेली नाही फक्त घरात सायलीचे आई वडील आणि तिचा मोठा भाऊ यांनाच याबद्दल माहिती होते. तर अशीही सायली प्रथमे! तिचा मोठा भाऊ होता सुमित!!

सुमितचे मात्र म्हणणे वेगळे होते. सायलीने शिक्षक व्हावे असे त्याला वाटे. कोणतेही पुस्तक हातात न घेता, कसलीही चूक न होऊ देता सायलीने गणित, भूगोल, इतिहास आणि सायन्स यासारखे विषय शिकवावेत अशी त्याची इच्छा होती. गणितातील, विज्ञानातील विविध सूत्रे, इतिहासातील तारखा, घटनाक्रम तसेच अचूक भौगोलिक माहिती ती चिरकाल लक्षात ठेऊ शकणार होती.

शिक्षक एक पिढी घडवतो आणि डॉक्टर जीव वाचवतो. दोघांचेही समाजासाठी सारखेच महत्व आहे. तसे पाहिले तर अशी अनेक क्षेत्र आहेत जिथे सायली सारख्या स्ट्रॉंग मेमरीची गरज भासते. सॉफ्टवेअर, अवकाश संशोधन वगैरे सारख्या अनेक क्षेत्रात तिच्या मेमरीचा उपयोग होऊ शकणार होता.

सायलीच्या वडिलांच्या मनात मात्र वेगळाच विचार रुंजी घालत होता, "अशी काही क्षेत्रे आहेत जिथे काही गोष्टी गुप्त ठेवण्याची गरज असते जसे आर्मी किंवा आर्मीशी संबंधित अनेक गोष्टी जसे शस्त्र आणि विस्फोटक निर्मिती तसेच गुप्तचर संस्था, सीआयडी, सीबीआय येथे बऱ्याच गोष्टी गुप्त ठेवाव्या लागतात. समजा सायलीच्या या विशेष शक्तीचा देशासाठी उपयोग केला तर?"

आर्मीमध्ये असलेल्या एका दूरच्या नातेवाईकाला त्यांनी एकदा सहज विचारले की, "समजा अशी एखादी व्यक्ती जीची अमर्याद गोष्टी अमर्यादपणे लक्षात ठेवण्याची क्षमता आहे त्याचा आर्मीत काय उपयोग होऊ शकतो?"

त्याने अनेक शक्यता सांगितल्या, आर्मीत सगळीकडेच उपयोग होईल पण गुप्तचर विभागात जास्त उपयोग होईल असे सांगितले पण त्याने फायद्यापेक्षा धोक्याच्याच जास्त शक्यता वर्तवल्या.

त्या म्हणजे- "अनेक गुप्त गोष्टी सहज लक्षात ठेवण्यासाठी त्या व्यक्तीचा उपयोग होईल खरं आणि हवी तेव्हा ती महिती सहज उपलब्धसुद्धा होईल, पण त्या व्यक्तीला इतरांपासून नेहमीच गुप्त

ठेवणे शक्य होणार नाही आणि ती व्यक्ती शत्रूच्या ताब्यात सापडली तर सगळेच सिक्रेट शत्रूच्या ताब्यात जाण्याची शक्यता जास्त असणार! आणि त्या व्यक्तीच्या जीवाला सतत धोका असणार!!"

त्यामुळे वडिलांनी तो विचार रद्द केला!

* * *

प्रत्येक गोष्ट पूर्णपणे आठवत असल्यामुळे आणि सर्वांना हे कळू नये असे ठरल्यामुळे, परीक्षेमध्ये मुद्दामहून काही प्रश्नांची उत्तरे येत असूनसुद्धा ती रिकामे सोडून देत होती किंवा काही प्रश्नांची चुकीची उत्तरे लिहीत होती पण त्यातही शक्यतो वर्गात मात्र पहिली येईल असा तिचा प्रयत्न असायचा, त्यामुळे आपल्यात अशा प्रकारची सुपर मेमरी आहे हे तिने कुणालाही कळू न देण्याची दक्षता घेतली होती. कोणतेही क्विज शो मध्ये किंवा इतर स्पर्धेत भाग घेताना सुद्धा तीने ही काळजी घेतली होती.

एखादा चित्रपट बघितला किंवा पुस्तक वाचले की ते संपूर्ण जसेच्या तसे सायलीच्या लक्षात राहायचे. एखाद्या फोटोंचा अल्बम एकदा पहिला की ते फोटो जसेच्या तसे तिच्या लक्षात रहात.

एकंदरीत सायली ही एक "स्टोअर हाऊस" झाली होती म्हणजे पेन ड्राईव्ह, हार्ड डिस्क, मेमरी कार्ड सारखी चालती बोलती स्मार्ट मेमरी स्टोरेज डिव्हाईस झाली होती. चालताबोलता डेटाबेस झाली होती. सुमित तिला बरेचदा "दि डेटाबेस गर्ल!" म्हणायचा तर आई वडील तिला "डेटा डॉल" म्हणत!

"कौन बनेगा करोडपती" मध्ये तिने अकरावीत कॉलेजमध्ये असताना भाग घेतला तेव्हा तिला जवळपास प्रत्येक प्रश्नाचे उत्तर पाठ होते कारण त्यासाठी तयारी म्हणून भराभर तिने सामान्य ज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली होती. मध्येच एका पाचव्या प्रश्नाचे उत्तर तिला देता आले नाही कारण त्याबाबत एकदाही तिने माहिती वाचलेली नव्हती पण लाईफलाईन मदतीला धावून आली. कोणालाही संशय येऊ नये म्हणून तिने एक करोडच्या प्रश्नाला उत्तर माहिती असूनही उरलेली तिसरी लाईफ लाईन म्हणजे फिफ्टी फिफ्टी घेतली आणि मग दोन पैकी एक अचूक उत्तर दिले आणि शेवटी एक करोड रुपये जिंकले, सात कारोडच्या प्रश्नाचे उत्तर तिला आले नाही. ते तिने वाचलेले नव्हते. मग एक करोड मधून टॅक्स कापून उरलेली रक्कम सरकारने तिला दिली. ती तिने तिच्या मेडिकलच्या शिक्षणासाठी राखून ठेवली आणि उरलेली रक्कम तिने अनाथ मुलांसाठी द्यायचे ठरवले.

* * *

बांद्र्याच्या सायन्स फेस्टिवलमध्ये सायली गेली होती तेव्हा प्रत्येक सेक्शन मधला प्रत्येक एक्सपिरिमेंट आणि उपकरण तिने जसाच्या तसा लक्षात ठेवला होता. तिथे कॅमेऱ्याला बंदी होती तरीही हरकत नव्हती कारण सायलीने यथायोग्य सगळ्या गोष्टी लक्षात ठेवून त्याचे वर्णन परत घरी सगळ्यांना केले होते. पण सायलीचे पप्पा आणि तिचा भाऊ यांना प्रत्येक गोष्टीसाठी सायलीवर अवलंबून राहायची सवय लागली होती. मग ते पाढे असो की रोजच्या जीवनातले गणिती आकडेमोड असो की टेलिफोननंबर लक्षात ठेवणं किंवा मग विविध ठिकाणचे पत्ते पाठ करणं असो की मग जन्मतारखा असोत!

मात्र एक गोष्ट तिच्या नजरेतून सुटली नव्हती आणि ती म्हणजे जेवढा वेळ ती सायन्स फेस्टिवलमध्ये होती आणि आतमध्ये जाण्यासाठी रांग लावून उभी होती तेवढा संपूर्ण वेळ तिच्या आजूबाजूला एक वेगळाच मोठ्या आकाराचा हिरवा-लाल भुंगा घोंगावत होता. तो तिच्या नेहमी आसपास रहायचा. तिने अनेक वेळा त्याला हाकलले पण तो भुंगा काही तिची पाठ, कान आणि चेहरा सोडेना. सायन्स फेस्टिवल बघून झाल्यानंतर तिने बाहेर निघताना तो भुंगा उडत जाऊन दूर कुणातरी माणसाजवळ जाऊन त्याच्या भोवती घोंगावत असलेला तिला दिसला. कालांतराने ती

ही गोष्ट "विसरून गेली" असे म्हणता येणार नाही पण या गोष्टीकडे तिने दुर्लक्ष केले होते!!

^^^

# 9. पहिले प्रेम

अतिशय कच्ची स्मरणशक्ती असलेला व्यक्तीसुद्धा आपले आयुष्यातील पाहिले प्रेम विसरू शकत नाही तर मग सायली तर अद्वितीय स्मरणशक्ती लाभलेली मुलगी होती आणि पहिल्या प्रेमाची गोष्टच वेगळी असते. प्रेम ही जगातील सर्वात पवित्र आणि हवीहवीशी वाटणारी भावना! आपण कुणालातरी आवडतो किंवा आपल्याला कुणीतरी आवडतं आणि हवंहवंसं वाटतं, कुणाचातरी सहवास हवासा वाटतो ही मखमली भावनाच आपल्या हृदयावर कोमल फुलपाखरू फिरवते आणि आवडती व्यक्ती समोर आली तरी हृदयाची धडधड वाढवते. आवडत्या व्यक्तीशी बोलतांना मनावर मोरपीस फिरत राहातं.

असंच एक मोरपीस एमबीबीएसला असतांना सायलीच्या मनावर फिरत राहून तिला गुदगुल्या करायचं, जेव्हा ती सोबतच्या डॉक्टर सूर्यप्रताप मल्होत्रा सोबत बोलायची. त्याच्या बोलण्याच्या आकर्षक पद्धतीवर ती भाळली! त्याची केसांची विशिष्ट स्टाईल, आवाजातला भारदस्तपणा, नियमित व्यायामाने कमावलेले

एखाद्या बॉलिवूड हिरोप्रमाणे भासणारे शरीर, त्याची अभ्यासातली हुशारी या सगळ्या गोष्टींमुळे ती त्याच्या प्रेमात पडली होती!

कॉलेजमधील सहा सात मुली त्याच्यावर एकतर्फी प्रेम करायच्या. त्या सर्वजणींनी धिटाईने सूर्यप्रतापसोबत झटपट मैत्री करून टाकली होती. पण एकीचीही अजून त्याला प्रपोज वगैरे करण्यापर्यंत मजल गेली नव्हती. त्या सर्वजणींना हे माहिती होते की त्याची कुणीही अजून एकमेव पक्की गर्लफ्रेंड नव्हती. पण खरे काय ते फक्त सूर्यप्रतापलाच माहिती होते. पण सायलीची मात्र जुजबी अभ्यासातील गोष्टी त्याच्यासोबत बोलण्याव्यतिरिक्त त्याच्याशी अवांतर मैत्री करण्याची हिम्मत होत नव्हती. इतर अनेक मुलांशी ती अतिशय मोकळेपणाने बोलू शकायची पण हा समोर आला की तिच्या छातीत धडधड व्हायला लागायची, काय बोलावे तेच सुचेनासे व्हायचे. सहज काहीतरी विषय काढून तरी त्याच्याशी बोलावे असे ती ठरवून त्याच्याकडे जायची पण जुजबी बोलून कसेतरी हसून फजिती होऊन तिथून काढता पाय घ्यायची.

पण एकदा त्याला कॉलेज कँटीनमध्ये एका टेबलावर एकटा गाठून तिने सुरुवात केलीच. त्याला इंग्रजी, हिंदी आणि थोडे मराठीपण येत होते. ह्युमन ऍनाटॉमी बद्दल ते बराच वेळ बोलत बसले, तिने सगळं येत असूनही त्याला बऱ्याच शंका विचारल्या

आणि त्याने दिलेल्या उत्तरांचा दर्जा पाहून ती आणखीनच त्याच्या प्रेमात पडली. मेडिकल अभ्यासक्रमातले खूप लांबलचक स्पेलिंग त्याला सहज लक्षात राहत होते, आणि विशेष म्हणजे त्याला सायली सारखी अनंत हस्ते मुबलक मिळालेली स्मरणशक्ती सुद्धा लाभलेली नव्हती. त्यालाही तिच्याशी त्याच दिवशी पहिल्यांदा एवढ्या मोकळेपणाने बोलून तिच्याबद्दल जाणून घेता आले.

त्या रात्री तर ती हरखून गेलेल्या अवस्थेतच होस्टेलवर बेडवरच्या पांघरुणात शिरली. तिला बराच वेळ झोपच आली नाही. त्याचा बोलतांनाचा चेहरा आणि त्याने लावलेल्या परफ्युमचा वास तिला राहून राहून आठवत होता. तिने पांघरलेल्या अंथरुणातून तिला त्याच परफ्युमचा वास येऊ लागला. ती रात्र स्वप्न बघण्यातच निघून गेली.

लवकरच काही दिवसांनी तिच्या जवळच्या काही मैत्रिणींकडून सूर्यप्रतापबद्दल काही गोष्टी ऐकायला मिळाल्या. त्याच्यासाठी मुली म्हणजे निव्वळ टाईमपास असतात. कोणत्याही मुलीला तो सिरियसली घेत नाही, यापूर्वीचे त्याचे जीवन अशाच घटनांनी भरलेले आहे वगैरे वगैरे. प्रेम वगैरे त्याच्यासाठी केवळ

खेळ आहे. मात्र सायली त्याच्या प्रेमात एवढी आकंठ बुडालेली होती की तिला असे वाटायचे की मैत्रिणी मुद्दाम तिला त्याच्याविषयी उलटसुलट सांगतात. एखादी सुंदर मुलगी किंवा हँडसम मुलगा कॉलेजमध्ये असतो तेव्हा सर्वजण मुद्दामून त्याच्याविरोधात अफवा पसरवत असतात कारण त्याचा प्रभाव काहींना सहन होत नाही. त्यामुळे तिने अशा अफवांवर विश्वास न ठेवण्याचे ठरवले.

बरेचदा आपण ज्या माणसाच्या प्रेमात असतो त्याचेबद्दल वाईट ऐकले तरी आपण त्यावर विश्वास ठेवत नाही. आणि एखाद्याचा द्वेष करायला लागलं की त्याच्याबद्दल कोणी कितीही चांगलं सांगितलं तरीही त्यावर आपला विश्वास बसत नाही. तसेच सायलीचे झाले होते. तिने त्याच्याशी खूप जवळीक वाढवली होती. तो पण तिच्याशी दिवसातून बऱ्याच वेळा बोलायचा. अभ्यासासंदर्भात एकमेकांना कॉलेजबाहेरसुद्धा भेटायला लागले. एकमेकांसोबत हॉटेलिंग व्हायला लागले. पण त्यासोबत तो इतर मुलींशीही तेवढेच मोकळेपणाने बोलायचा पण त्याला सायलीची काही हरकत नव्हती कारण आजकाल कॉलेजच्या ग्रुपमध्ये मुला-मुलींमध्ये एवढा मोकळेपणा असतोच.

तिने एकदा एका गार्डनमध्ये बेंचवर बसले असताना त्याला विचारले, "तुझ्या दृष्टिकोनातून प्रेम म्हणजे नेमकं काय मला सांग बरं!"

"तुला काय सांगू? प्रेम हे व्याख्येत बांधता येत नाही! ती एक तरल भावना आहे, हृदयातून येणारी! तिचे वर्णन करता येणार नाही. प्रेमाचा फक्त अनुभव घेता येतो!"

त्याच्या या उत्तराने ती खूपच खुश झाली, हरखून गेली! तिच्याही मनात प्रेमाबद्दलची अशीच काहीशी भावना होती. त्याचे हे उत्तर म्हणजे आपल्यावरचे प्रेम असून त्याच्या आपल्यावरच्या प्रेमाची ही मूक संमती आहे असे तिने गृहीत धरून टाकले.

एकमेकांवर प्रेम असल्याची स्पष्टपणे स्पष्ट शब्दात कबुली देण्याचा प्रसंग खूप महत्त्वाचा आणि हवाहवासा असतो, पण तो प्रसंग येईपर्यंत अप्रत्यक्षपणे सांगितलेल्या गोष्टीतून आणि विविध कृतीमधून व्यक्त केलेले प्रेमच आहे हे जाणता येऊ शकते. त्यामुळे प्रत्यक्ष स्पष्ट प्रेमाची कबुली देण्याआधीचे अनेक अप्रत्यक्ष कबुली असणारे प्रसंग प्रेमात आकंठ बुडालेल्या मनाला खूप खूप आवडतात.

कॉलेजच्या शेवटच्या वर्षी ते एकमेकांच्या खूप जवळ आले. बराच काळ ते दोघे एकमेकांना भेटत राहीले. त्यांच्यात प्रत्यक्ष शरीरसंबंध अजून जरी आला नसला तरी वरवरचे प्रेमसंबंध त्यांनी अनुभवले होते. अनेकदा किसिंग केले होते, एकमेकांना घट्ट मिठी मारणे झाले होते तसेच तासनतास एकमेकांच्या शरिराला मिठी मारून बसून राहणे हेही झाले होते. अशा गोष्टी सूर्यप्रताप त्या अनेक सात-आठ मुलींसोबत सुद्धा सहजपणे करायचा पण सायलीला हे माहिती नव्हते आणि कदाचित माहिती पडल्यावर तिने अफवा म्हणून विश्वास ठेवला नसता.

शेवटचे इंटर्नशिपचे वर्ष सुरु झाले तेव्हा एकदा सूर्यप्रताप पंधरा दिवस अचानक सुट्टीवर गेला. परत आल्यानंतर त्याने आपले लग्न झाले हे जाहीर केले तेव्हा कॉलेजमध्ये मुलींच्या ग्रुपमध्ये एकच हलकल्लोळ माजला. त्याच्यावर एकतर्फी प्रेम करणाऱ्या मुलींना तर ते असह्य झाले.

घडले असे होते की, सूर्यप्रतापने त्याच्याच मूळ राज्यातल्या त्याच्या लहानपणापासूनच्या एका मैत्रिणीसोबत या पंधरा दिवसांच्या सुट्टीत लग्नही करून टाकले होते, कारण त्या दोघांच्या घरी दोघांच्या प्रेमसंबंधाला विरोध निर्माण झाला होता आणि

आणखी महत्वाचे कारण म्हणजे ती मुलगी त्याच्यापासून प्रेग्नंट होती. लग्न नाही केले तर केस करीन असे तिने धमकावले म्हणून सूर्यप्रताप नमला आणि  त्यांनी पळून जाऊन लग्न केले आणि मग घरच्यांना सांगितले. घरच्यांचाही आता नाईलाज झाला होता.

सूर्यप्रतापच्या लग्नाची बातमी ऐकल्यानंतर अनेक मुली यातून सावरल्या आणि  त्यानंतर आपापल्या कामाला लागल्या कारण आजकालच्या जमान्यात इन्स्टंट प्रेम आणि इन्स्टंट ब्रेकप सहजगत्या होत होते.

पण अगदी मनाच्या गाभाऱ्यापासून आणि हृदयाच्या प्रत्येक कोपऱ्यापासून सूर्यप्रतापवर प्रेम करणारी सायली मात्र आतून कोलमडून पडली.

तिने हॉस्पीटलच्या कॉरीडॉरमध्ये त्याला स्पष्ट आणि मोठ्याने चिडून विचारले, "तुझे माझ्यावर प्रेम होते तर मग तू असे का केलेस?"

जाणारे येणारे पेशंट आणि त्यांचे नातेवाईक एकदम चमकून त्या दोघांकडे बघायला लागले.

तेव्हा तो अगदी शांतपणे आणि सहजपणे म्हणाला, "मी तुला असं केव्हा म्हणालो की माझे तुझ्यावर प्रेम आहे? कधीही नाही! तू

काय आणि त्या चार पाच जणी काय सगळे माझ्या फक्त मैत्रिणी आहेत. यापुढेही तुम्हा सगळ्यांशी माझ्या मैत्रीचे संबंध राहणार आहेत!"

यावरच सायली खूप चिडली आणि रडत्या डोळ्यांनी तिने रागारागाने त्याला सुनावले, "यापुढे त्या सर्वजणी असतील पण मी तुझी मैत्रीण म्हणून राहणार नाही हे लक्षात असू दे आणि माझ्याशी बोलण्याचा भेटण्याचा प्रयत्नही करु नकोस!"

त्याने खेळकरपणे हे घेतले आणि इट्स ओके म्हणून तो निघूनही गेला, पण ह्याचा जास्त त्रास सायलीला होऊ लागला. तिचे एकूणच अभ्यासातून आणि प्रॅक्टिसमधून लक्ष उडाले. त्याच्या सोबत घालवलेला प्रत्येक क्षण न क्षण आठवून आठवून अनेक रात्री रडण्यात घालवू लागली. मनावर स्वार झालेल्या नकारात्मक भावना प्रकर्षाने आठवू लागल्या. विसरू म्हणता विसरणं शक्य नव्हतं. रुग्णांना तपासता तपासता तिच्याकडून चुका होऊ लागल्या होत्या. तेव्हा तिने काही दिवस सुट्टी घेतली आणि घरी गेली.

घरी गेल्यानंतर तिने लगेचच आईला सगळे खरे खरे सांगून टाकले आणि हमसून रडू लागली. आईने तिला अगदी

मैत्रिणीसारखे खूप समजावले. त्यानंतर आईने वडिलांना सुद्धा याबाबत सांगितले. वडिलांनी तिला धीर दिला आणि म्हणाले, "अशा गोष्टी होत असतात. आता तू पुढे चल, मागे भूतकाळात अडकू नकोस! मात्र यापुढे प्रेम करताना सावध राहिले पाहिजे".

पण प्रेम असे सावध राहून ठरवून थोडंच करता येते? ते आपोआप होऊन जाते! असे तिने वाचलेल्या अनेक प्रेम कथांमध्ये आणि पाहिलेल्या अनेक चित्रपटांमध्ये वारंवार सांगण्यात येत होते. तेच जास्त वेळ तिच्या मनावर सुद्धा आपोआप बिंबवले गेले होते. जे आपण परत परत बघतो ऐकतो वाचतो तेच आपल्या मनावर जास्त कोरले जाते आणि तेच आपल्याला खरे सुद्धा वाटू लागते!

काही दिवसांपासून सायली नकारात्मक आणि प्रेमभंग झालेल्यांचे संगीत आणि गाणे ऐकू लागली.

"दिल तो है दिल दिल का ऐतबार क्या किजिये, आ गया जो किसी पे प्यार क्या किजिये?"

"छन् से जो तुटे कोई सपना, जग सूना लागे, कोई रहे ना जब अपना!"

"मेरी जिंदगी एक प्यास, सब पाके सब गवाया!"

"दिल के अरमा आसुओं मे बह गये!"

"ऐसा जखम दिया हैं, जो ना फिर भरेगा!"

"जुदा होके भी तू मुझमे कहीं बाकी हैं!"

"तुमसे मिलकर, ना जाने क्यूँ और भी कुछ याद आता है, आज का अपना प्यार नहीं है, जन्मों का ये नाता हैं!"

अश्या प्रकारची गाणी परत परत ऐकून ऐकून तिने आपली एकूणच हालत आणि तब्येत बिघडवून घेतलेली होती. ही सगळी गाणी जणू काही मेंदूत रेकॉर्ड झाली होती आणि ती इच्छा नसतांनाही मेंदूत आपोआप प्ले व्हायला लागली.  कारण आधीच तिची मेमरी पुसता येण्याजोगी नव्हती! त्यामुळे गाण्यांच्या ओळींच्या ओळी तिला परत परत आठवून आठवून त्रास देत होत्या.

तिने सूर्यप्रतापसोबत आपलं पुढचं सगळं आयुष्य, संसार कल्पून टाकला होता. त्या काल्पनिक स्मृतीपण तिला त्रास द्यायला लागल्या. त्याच्यासोबत आयुष्य कसं जगायचं हे मनातल्या मनात ठरवून टाकलं होतं. त्यामुळे मनाला होणारा त्रास प्रचंड होता.

आई-वडीलांनी एकदा तिला सल्ला दिला की तिने कुठेतरी बाहेर मित्र मैत्रिणींसोबत फिरून यावे म्हणजे ती सगळं या वातावरणापासून दूर राहून विसरून जाईल. पण तिच्या बाबतीत विसरणं हे शक्य नव्हतं पण त्या विचारांना परत-परत येण्यापासून थांबवणं हेच फक्त तिच्या स्वतःच्या कंट्रोलमध्ये होतं. एखादी गोष्ट

भावना वस्तू ठिकाण तारीख हे सगळं तिने मनात योजलं की तिला लगेच त्याच्यासोबत घालवलेल्या क्षणांशी संबंधित सगळं काही तिला इथ्थंभूत आठवायचं. त्यामुळे तिने असे काही विरुद्ध विचार करण्यास सुरुवात केली की ज्याद्वारे त्या गोष्टी आठवण्याची वारंवारता कमी होईल. बंद मात्र होणार नव्हतं!

काही दिवस सुट्टी घेऊन ती केरळ, उटी येथे मित्र मैत्रिणींच्या ग्रुपसोबत जाऊनही आली. त्यामुळे जरा ती कुठे त्या आठवणींपासून दूर जाऊ शकली. इंटर्नशिप संपता संपता हॉस्पिटलमध्ये सूर्यप्रताप आजूबाजूला दिसायचा पण ती त्याला टाळून तिथून दूर निघून जाण्याचा प्रयत्न करायची. असे केले तरच निभावणार होते. तो दिसला की लेगेचच तिच्या मेंदुतून त्याच्या सोबतच्या असंख्य स्मृतींची मालिका मनात प्रकट व्हायची आणि नंतर हृदयातून एक "नकारात्मक लहर" चमकून जायची जी बराच वेळ टिकायची. जेवढा वेळ ती लहर असायची तेवढा वेळ तिला आयुष्य असह्य वाटू लागायचं. शेवटी इंटर्नशिप एकदाची संपली. सायली डॉक्टर झाली.

^^^

# 10. ताकामिशी क्योदाई

दरम्यान जपान देशात -

ताकामिशी आडनावाच्या दोन्ही जापानी जुळया भावंडांनी (भाऊ आणि बहिण) जे आजपर्यंत विज्ञानाचे अभूतपूर्व शोध लावले होते व यापुढेही लावणार होते त्यासाठी टोकियोमधील एका सभागृहात स्टेजवर जापानी सरकारतर्फे आणि प्रेक्षकांतर्फे त्यांचा जयजयकार होत होता. त्याना खूप बक्षिसे मिळत होती.

"योक्कू यात्ता ताकामिशी क्योदाई!"

"योक्कू यात्ता ताकामिशी क्योदाई!!"

असा स्टेजवर जयघोष चालला होता. वेल डन म्हणजे जापानी भाषेत योक्कू यात्ता आणि क्योदाई म्हणजे भावंडं!

जपान हा पूर्व आशियामधील एक द्वीप-देश आहे. जपानच्या पश्चिमेला जपानचा समुद्र, चीन, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया व रशिया, उत्तरेला ओखोत्स्कचा समुद्र व दक्षिणेला पूर्व चीन समुद्र व तैवान आहेत. जपानी भाषेत "जपान" या नावासाठी वापरल्या जाणाऱ्या कांजीचा (कांजी = चिनी / जपानी भाषेचे वर्ण) अर्थ "सूर्य उगम" असा होतो. जपानी भाषेत जपानला "निहोन" किंवा

"निप्पोन" असं म्हणतात. त्यामुळे आणि जपानच्या अतिपूर्वेकडील स्थानामुळे जपानला उगवत्या सूर्याचा देश असे संबोधण्यात येते.

जपान देश पूर्णपणे बेटांवर वसला असून त्याची कोणत्याही इतर देशासोबत जमिनीवरील सीमा नाही. जापानमध्ये थोड्या काळासाठी पण खूप जोरदार पाऊस पडतो, विशेषत: जूनच्या शेवटी / जुलैच्या सुरुवातीच्या काळात आणि सप्टेंबरमध्ये वादळांच्या हंगामात सुद्धा. वास्तविक पावसाळ्याचे दिवस लहान असतात. जपानी द्वीपसमूह अशा ठिकाणी स्थित आहे जेथे अनेक खंड आणि समुद्री प्लेट्स एकत्र येतात. हेच कारण आहे की तेथे वारंवार भूकंप होतात आणि अनेक ज्वालामुखी आणि गरम झरे अस्तित्त्वात आहेत. जर भूकंप समुद्राच्या खाली आलेत तर समुद्राच्या भरतीच्या लाटा (त्सुनामी) ला कारणीभूत ठरू शकतात. हरिकेन किंवा टायफून यासारखी प्रचंड चक्रीवादळेसुद्धा तिथे भूकंप होण्यास कारणीभूत ठरतात.

जपानी लोक विविध कलांमध्ये पारंगत आहेत. हे लोक कागदाच्या घड्या घालून विविध वस्तू बनवतात. याला ओरिगामी

कला असे म्हणतात. कलाकुसरीच्या वस्तू बनवणे, सुंदर निसर्ग चित्रे काढणे, आकर्षक खेळणी बनवणे यांत हे लोक कुशल आहेत. जापानी कार्टून ज्यांना ऍनिमे म्हणतात त्यांना जगभर एक वेगळी ओळख आणि खूप चाहते आहेत. एकूणच जपानी लोक खूप मेहनती म्हणून ओळखले जातात. आणि नवनवीन टेक्नॉलॉजी शोधण्यात तर जापान देश बराच आघाडीवर आहे. जसे डीव्हीडी, डिजिटल कॅमेरा, वॉकमन, सीडी, एलईडी लाईटस्, टीव्ही स्क्रीनचे प्रकार वगैरे असे अनेक शोध सांगता येतील.

तर अशा या टेक्नो जपान देशात ताकामिशी क्योदाई म्हणजे ताकामिशी भावंडे दोघेही खूप मोठे सायंटिस्ट होते आणि त्यांचा नेहमी सत्कार व्हायचा. आजही होत होता. "सोराकैतो ताकामिशी" आणि त्याची बहीण "इचीकाई ताकामिशी" हे दोघेही लहानपणापासून खूप हुशार.

स्टेजवर दोघांनी लावलेल्या वेगवेगळया शोधांची माहिती सांगण्यात येत होती. इचीकाईने लॅपटॉप मोबाईल टीव्ही वगैरे यांच्या स्क्रीन डिस्प्ले क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती निर्माण होईल असा शोध लावला होता. तो म्हणजे विशिष्ट प्रकारचे असे क्रिस्टल ज्यांचा डिस्प्ले बनवल्यानंतर ते जेव्हा प्रकाशमान (इल्युमिनेट) होतील तेव्हा साध्या डोळयांनी त्यावरचे चित्र किंवा व्हीडिओ

कुणाला दिसणार नाही, त्याऐवजी एक चष्मा घालावा लागेल जो त्या प्रकाशमान झालेल्या अनेक क्रिस्टलमधून निर्माण होणारे किरण ओळखू शकेल आणि मग फक्त त्या चष्म्यातूनच त्या स्क्रीनवर काय दिसतंय हे दिसेल.

पण सध्या याची उत्पादन किंमत खूप होती आणि सामान्य माणूस वापरू शकेल इतकी कमी किंमत करता येत नव्हती. हे डिस्प्ले सध्या जिथे गोपनीयता आवश्यक आहे अशा ठिकाणी उदाहरणार्थ मिलिटरी वापरायला सुरुवात झाली होती. म्हणजे तुम्ही लॅपटॉपवर किंवा मोबाईलवर काही बघत आहेत तर आसपासच्या लोकांना दिसणार नाही फक्त वापरणाऱ्या व्यक्तीला त्या विशिष्ट चष्म्यातूनच दिसेल. याचा डेमो दाखवला गेला तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. आता पाळी होती इचीकाई यांच्या भावाची!!

मॉनिटर/ सुपरवायझर, बिल्डर/असेंम्बलर आणि शेफ रोबोट असे तीन स्पेशलाईज म्हणजे विशेष रोबोट सोराकैतो यांनी बनवले होते. जिथे जिथे मॉनिटरिंगची गरज पडते, सुपरवायझरची गरज पडते तिथे तिथे माणसांना वगळून हे रोबोट ते काम करू शकणार होते. फक्त ज्या ज्या क्षेत्रातील जी जी मॉनिटरिंग आणि सुपरवायझिंगची गरज आहे त्या कस्टमरच्या गरजेनुसार प्रोग्रामिंग करून रोबोट बनवून देता येणार होते. रोबोट म्हटले म्हणजे

आपल्या डोळ्यासमोर माणसासारखा दिसणारा अशीच प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर येते पण तसे नसते. रोबोट म्हणजे आपोआप हालचाल करणारं नेमून दिलेलं काम न थकता करत राहणारं मशीन!

बिल्डर रोबोट नावाप्रमाणेच घरे बांधणारा रोबोट असणार होता. गवंडी माणसांना वगळून या प्रकारच्या अनेक रोबोंच्या मदतीने एखादे घर, बिल्डिंग खूप जलद बांधता येणार होती. अर्थात आधी संपूर्ण घराचा नकाशा, ब्लू प्रिंट, आराखडा या गोष्टी तसेच बांधकामाची संपूर्ण माहिती, प्रोसेस यासारखी सगळी माहिती आधी त्यांच्यात प्रोग्रामिंग करून आयसी मध्ये फीड करावी लागत असे. मग बिल्डर रोबोट दिवसरात्र न थकता, उन्हातान्हाची पर्वा न करता अविरत बांधकाम करू शकणार होते. असेंम्बलर रोबोटपण वेगवेगळे पार्ट असेंबल करून वस्तू तयार करू शकणार होता. सध्या स्टेजवर त्यांनी बनवलेले प्रत्येकी एकेक प्रोटोटाईप मॉडेल आणले होते.

बिल्डर रोबोटने वेगाने एका मोठ्या बिल्डिंगचे मॉडेल स्टेजवर बनवून दाखवले. त्याने एकूण किमान आठ वेगवेगळ्या प्रकारच्या घरांना स्टेजवर डमी मटेरियल वापरून झटपट बनवले. अर्थात

खऱ्या बिल्डिंग बनवायला अनेक रोबोट एकाच वेळेस काम करणार होते.

नंतर त्याच रोबोटने असेंम्बलर मोडमध्ये जाऊन स्टेजवर डेस्कटॉप कॉम्प्युटरचे संपूर्ण वेगवेगळे पार्टस जोडून कॉम्प्युटर चालू करून दाखवला. त्यानंतर त्याने मदरबोर्ड पण असेंबल करून दाखवले. वेगवेगळ्या कंपनीचे रेडिओ, फ्रीज, टीव्ही, घड्याळं अशा अनेक गोष्टी असेंबल केल्या. ट्रेन, बस, रिक्षा, कार यांचे डमी छोटे वेगवेगळे पार्ट एकत्र करून ते तयार करून दाखवले.

मॉनिटरिंग/सुपरवायझिंग रोबोटने तिथे असलेल्या प्रेक्षकांपैकी कोण कोण कितीवेळा मोबाईलवर बोलले, कोणी किती वेळा डोळे मिचकावले अशा प्रकारची माहिती सांगितली. आतापर्यंत प्रेक्षकांनी किती वेळा टाळ्या वाजवल्या हे सांगितले हे सांगताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

मग आला शेफ रोबोट! त्याने जपानचे लोकप्रिय खाद्यपदार्थ बनवले नंतर इतर काही देशातील सुद्धा लोकप्रिय पदार्थ बनवले. बिल्डर/असेंम्बलर आणि शेफ रोबोट या दोघांना प्रत्येकी सहा हात आणि दोन पाय होते. मॉनिटर/ सुपरवायझर रोबोट हा कुत्र्याच्या

आकाराचा होता आणि त्याच्या डोक्यावर मोठे मॉनिटर/स्कॅनर होते. कानांच्या ठिकाणी दोन मोठे स्पीकर होते.

नंतर आणखी एक सरप्राईज रोबोट स्टेजवर आला: डान्स अँड योगा रोबोट! हा रोबोट जगातल्या सगळ्या प्रकारचे योगासनं, व्यायाम प्रकार आणि नृत्य न थकता शिकवू शकणार होता. त्यानेही दोन चार डेमो दाखवले. एकूणच स्टेजवरचा हा समारंभ खूपच लोकप्रिय ठरला. या सगळ्या शोधांचे पेटंट दोन्ही भावंडांकडे होते.

ताकामिशी भावंडे एका साध्या घरात रहात होते. ते शिकत असताना त्यांचे आई वडील एका कार अपघातात वारले होते पण नंतर त्यांना मिळालेल्या वेगवेगळ्या शिष्यवृत्ती आणि त्यांची हुशारी, चिकाटी बघून गव्हर्नमेंटने त्यांना केलेली मदत याच्या जोरावर त्या दोघांनी इथपर्यंत प्रगती केली होती.

काही दिवसांत गव्हर्नमेंटच्या विशेष शिष्टमंडळाने दोघांसोबत एक चर्चा सुरू केली. त्यात सरकारमधील अनेक महत्वाचे मंत्रीही होते. त्यांनी दोघांनी लावलेल्या शोधाचा उपयोग देशासाठी आणि सामान्य माणसांसाठी कमीत कमी खर्चात कसा करून घेता येईल

यासाठी ती चर्चा होती. तसेच त्याचा दुरूपयोग कशा पद्धतीने होऊ शकतो आणि तो टाळण्यासाठी काय प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतील याबद्दल साधकबाधक चर्चा होत होती. या चर्चेला इतर अनेक देशातील सायंटिस्टना सुद्धा बोलावण्यात आलेले होते आणि ते हजर होते.

लंच ब्रेक झाला. लंच नंतर चालता चालता एकाशी बोलत बोलत सोराकैतो ताकामिशी वॉशरूमला गेले, सोबत एक जण होता तो बाहेर थांबला. तो एक मोठा अमेरिकन सायंटिस्ट होता- जेकब विल्यम्स! बराच वेळ झाला पण वॉशरूम मधून सोराकैतो बाहेर आले नाहीत म्हणून शेवटी जेकब मध्ये गेला पण आतमध्ये सोराकैतो नव्हते. जेकब बाहेर आला. कदाचित आपले लक्ष नसतांना घाईत सोराकैतो आपल्याला विसरून निघून गेले असावे असे वाटून जेकब पुन्हा मिटिंग रूम मध्ये गेला तर तिथे सर्वजण सोराकैतो यांचीच वाट बघत होते तसेच तिथे आणखी एकजण नव्हता त्याचे नाव- हाराकू नाकामुरा.

याच हाराकू नाकामुरा याला सुद्धा सोराकैतो गेल्यानंतर बाथरूममध्ये जातांना जेकबने पाहिले होते. पण थोडयावेळाने हाराकू बाहेर आला होता आणि लाऊंजमध्ये रेंगाळत नंतर लिफ्टकडे गेल्याचे जेकबला आठवले. खाली मोकळया हवेत

हाराकू फिरायला गेला असेल असे जेकबला वाटून त्याने त्याकडे दुर्लक्ष केले होते.

सगळ्या प्रकारच्या शक्यता पडताळून झाल्या. पोलीस आले, विशेष तपास संस्था आल्या, सगळीकडचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासून पाहिले गेले. त्यातून एकच निष्कर्ष निघाला, तो म्हणजे सोराकैतो बाथरूममध्ये नक्की गेले होते पण तिथून बाहेर आले नाहीत. नक्की आले नाहीत! बाथरूमचे सर्व कोपरे चेक केले गेले. सोराकैतो नव्हते. त्यांचे सगळे कपडे बाथरूममध्ये सापडले पण ते कुठेही नव्हते! वॉशरूमच्या कोणत्याही खिडकीतून ते अशा विना कपड्यांनी नग्नावस्थेत निघून गेल्याचीही अशक्य असलेली शक्यता पण पडताळून पहिली गेली. वॉशरूममध्ये जरी कॅमेरे नव्हते तरीही बिल्डिंगच्या बाहेरच्या बाजूने असलेल्या कॅमेऱ्यातून चेक झाले. ते कोणत्याही खिडकीतून बाहेर गेले नव्हते. हाराकूचा फोन पण नॉट रिचेबल होता. मिटिंगतर अपूर्ण राहिलीच पण संपूर्ण जापान सरकार हादरले होते. इचीकाई या तर हे ऐकून बेशुद्धच झाली होती आणि नंतर अनेक दिवस संभ्रमावस्थेतच होत्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले तेव्हा घराचा ताबा स्थानिक पोलिसांकडे होता. इचिकाई बऱ्या होऊन घरी आल्या तेव्हा त्यांच्या लक्षात आले की त्या दोघांनी लावलेल्या शोधांच्या पेटंट

असलेल्या छापील फाईल्स, कागदपत्रे आणि त्या संदर्भातील डिजिटल दस्तऐवज हा गायब झाला होता. घराला पोलीस संरक्षण असूनही असे कसे झाले याबद्दल सगळेजण आश्चर्य व्यक्त करत होते.

^^^

# 11. दूरदर्शन

दरम्यान एक घटना घडली. सुनिलच्या गॅलरीतील पोपटाच्या पिंजऱ्यात तो वेगळाच भुंगा नेहमीच यायला लागला. तो घरातही घोंगावायचा, पण कुणी त्याला हकलायला लागले की तो लगेच पोपटाजवळ जाऊन खेळायचा. एकदा रखमा मावशीने वर्तमानपत्राच्या घडीचा जोरदार फटका त्या भुंग्याला मारलाच आणि तो भुंगा कोलमडत कोलमडत भिंतीवरून खाली घसरून जमिनीवर पडणार एवढ्यात त्याने पुन्हा जोरदार उसळी घेतली आणि उडून गेला.

रखमा काही वेळाने जवळच्या बाजारात गेली असतांना घरी कुणीच नव्हते तेव्हा तो भुंगा पुन्हा आला आणि पोपटसोबत खेळू लागला. पोपटाने म्हणजे फिनिक्सने त्याला एकदा चोचीत करकचून पकडले पण चोचीतून सुटण्याच्या धडपडीत असतांना तो भुंगा अचानक स्फोट होऊन पेटला आणि त्याचे तुकडे तुकडे झाले. पोपटाची चोच संपूर्ण जळाली आणि अर्धी तुटून पडली, तोंड भाजले गेले आणि तो पोपट यातनांनी ओरडू लागला. रखमा घरी आल्यावर त्या पोपटाने भुंगा जळाला, भुंगा जळाला असे सांगून

प्राण सोडले. पण राखमालाला काही समजेना. तिला वाटले पोपट वेडा झाला, भुंगा कसा काय जळेल?

पोपट भुंगा पळाला ऐवजी जळाला असे म्हणतोय असे राखमाला वाटले आणि भुंग्याच्या नादात कोणत्या तरी आसपासच्या विजेच्या ताराला पोपट चिकटला असणार आणि भाजला गेला असणार असा तिने निष्कर्ष काढला. पोपट पिंजऱ्यात नेहमीच बंद नसायचा. तो बाहेर फिरून पुन्हा गॅलरीत यायचा. घरातल्या सगळ्यांना वाईट वाटले पण कुणालाही कळलेच नाही की पोपट कसा मेला!

* * *

रणजित यांनी सुनिलला एक फिजिकल फिटनेस ट्रेनर दिला होता. पोलिसांसाठी जी ट्रेनिंग देतात त्या प्रकारचा! गेल्या वर्षापासून सुनिल व्यायामाकडे आणि फिटनेसकडे चांगले लक्ष देत होता कारण त्याला मिळालेल्या शक्तीमुळे त्याची जबाबदारी वाढली होती आणि त्याचा सामना यापुढे नेहमी अनेक वाईट तसेच निगेटिव्ह प्रवृत्तींशी नक्की होणार होता, त्यामुळे फिजिकल फिटनेस आवश्यक होतं. तसं पाहिलं तर प्रत्येकाच्या आयुष्यात फिटनेसचे महत्व आहेच, मग तो कोणत्याही क्षेत्रातला कुणीही व्यक्ती का

असेना! शिवाय रोज किमान अर्धा तास सुनिल सूर्यनमस्कार, झुंबा डान्स, योगासने आणि प्रणायाम करायचा.

दरम्यान त्याने रणजित यांच्या सांगण्यावरून पोलीस डिपार्टमेंटच्या आयटी सेक्शनच्या काही परीक्षा दिल्या आणि आयटी विभागात त्याला पोलीस डिटेक्टिव्ह हा जॉब मिळाला. पोलीस डिपार्टमेंट त्याचेवर खुश होते कारण मूळ कामाव्यतिरिक्त त्याची शक्ती वापरून तो गुन्हेगाराला अचूक ओळखू शकत होता. तसेच त्याची चित्रकला चांगली असल्याने गुन्हेगारांच्या वर्णनावरून सहजपणे चित्र काढून देऊ शकत होता ही ज्यादाची मदत होती. मात्र फक्त रणजित यांनाच त्याच्या विशेष शक्तीबद्दल माहिती होते. तथापि एकाच ठिकाणी काम करूनही त्या दोघांची रोज भेट होईलच असे आवश्यक नव्हते! सुनिलचे करियर रणजित यांच्या देखरेखीखाली हे सगळं होत असल्याने या जॉबबद्दल घरच्यांना काही चिंता नव्हती.

* * *

कॉलेजमध्ये असतांना सुद्धा पोरींवरून भांडणे आणि मारामाऱ्या होऊ शकणार असतील किंवा एखाद्या साध्या निष्पाप आणि अभ्यासू मुलाची रॅगिंग होणार असेल तर ती अनेकदा

टाळण्यात सुनिल त्याच्या निगेटिव्ह गोष्टी डिटेक्ट करण्याच्या शक्तीमुळे यशस्वी झाला होता. कॉलेजच्या होस्टेलवरसुद्धा सुनिल बरीचशी भांडणे, राडे, मारामाऱ्या टाळण्यात यशस्वी व्हायचा.

सुनिल जिथे असेल तिथे आसपास शांतता असायची. एखादा व्यक्ती काहीही नकारात्मक करायला जाणार त्याच्या आतच तो शक्य तिथे त्या व्यक्तीशी संभाषण सुरू करून त्या व्यक्तीला विविध प्रश्न विचारून त्याच्या मनातले काढून घ्यायचा, तो काहीतरी निगेटिव्ह गोष्ट करणार आहे हे त्यांचेकडून काढून घ्यायचा आणि त्या व्यक्तीला इतर चांगला पर्याय सुचवून बघायचा. त्याची ही पद्धत बऱ्याच प्रमाणात बहुतेक वेळेस यशस्वी झाली. त्यासाठी सुनिल नियमितपणे एका मानसोपचारतज्ञाचा सल्ला घ्यायचा. रणजित यांनीच त्याचे नाव सुनिलला सुचवले होते. गुन्हेगारांची मानसिकता समजून घेणे हा त्यामागचा उद्देश!

रणजित आणि सुनिलने आणखी एक गोष्ट केली होती जी फक्त रणजित आणि सुनिल या दोघांनाच माहिती होती. ती म्हणजे त्यांनी पोलीस डिपार्टमेंटला मदत करणाऱ्या वेषांतर करण्यात एक्स्पर्ट असलेल्या एका व्यक्तीशी सुनिलची भेट घालून दिली होती. त्याने

सुनिलला वेषांतर करण्याचे आणि आपल्या मूळ रूपात कधीही इतरांना ओळखू न देण्याचे वेगवेगळे धडे दिले होते. सुनिलला विविध प्रकारचे अनेक मास्क त्यांनी दिले होते. ते विशिष्ट पदार्थांपासून बनलेले लवचिक मास्क व्यक्तीला संपूर्णपणे बदलून टाकत होते जणू काही कायमची प्लास्टिक सर्जरी केली आहे! कारण, रणजित आणि सुनिल या दोघांना असे वाटत होते की सुनिल एखाद्या गुन्हेगाराला गुन्हा करण्याच्या आधी डिटेक्ट करून पकडल्यानंतर त्या गुन्हेगाराने पुन्हा त्याला ओळखायला नको, यासाठी बहुतेक वेळेस प्रत्येक ठिकाणी जातांना सुनिल वेगवेगळे मास्क घालत असे. त्यामुळे गुन्हेगारांनी त्याला गाठून त्रास देण्याची शक्यता सध्यातरी नव्हती.

काही गोष्टी सुनिल स्वतःही एकट्याने करायचा त्यापैकी बऱ्याच गोष्टी रणजित यांना माहीत नव्हत्या. पण अशा वेळेस गुन्हेगारांना एकट्याने पकडताना तो जर संकटात सापडला तर रणजित यांना फोन करून मदतीला बोलावून घ्यायचा!

* * *

एकदा ज्वेलरीच्या दुकानात अनिलच्या लग्नासाठी सर्वजण खरेदी करायला गेले होते. वधू-वर यांच्यासाठी आणि इतर काही

जणांसाठी वेगवेगळे दागिने निवडले जात होते. सीसीटीव्ही प्रत्येक ज्वेलरी शॉपमध्ये अत्यावश्यक झालेले आहेत, परंतु सीसीटीव्हीचे मॉनिटर करणाऱ्याचे लक्ष थोडेही इकडे तिकडे झाले तर सीसीटीव्ही स्क्रीन समोर असूनही एखादा चोर दागिना शिताफीने आणि हातचलाखीने चोरण्यात यशस्वी होतो. चोरीला गेल्यानंतर सीसीटीव्हीने कळतं. पण आजकाल योग असा येत होता की जिथे सुनिल असतो तिथे त्याला एखादी तरी निगेटिव्हिटी सापडतच होती किंवा याउलट म्हणायचे झाले तर जिथे निगेटिव्हिटी असेल आणि पुढे काहीतरी चुकीचं घडणार असेल किंवा गुन्हा घडणार असेल तिथं योगायोगाने सुनिल असायचाच!!

तीन लेडीज वेगवेगळ्या काउंटरवर जाऊन, 'हा दागिना दाखव, तो दागिना दाखव!' असे करत तिथल्या कर्मचाऱ्यांना खूप गोंधळात टाकत होत्या. सुरुवातीला कर्मचाऱ्यांना संशय आला, पण तीनही लेडीज सफाईदारपणे इंग्रजी बोलत होत्या तसेच कपड्यांवरून त्या अगदी मॉडर्न आणि वागणुकीवरून सभ्य आणि सुशिक्षित वाटत होत्या, त्यामुळे डायरेक्ट त्यांना रोखण्याची हिम्मत कोणत्याही कर्मचाऱ्याची होत नव्हती. इकडे अनिलच्या लग्नासाठी खरेदी सुरू असताना सुनिलला कसला तरी आवाज आला आणि त्याने मागे वळून बघीतले तेव्हा त्याला तीन लेडीज

पैकी दोघींच्या डोक्यावर प्रचंड लाल ज्वाळा असलेले सर्कल दिसले. डोक्यातून निघणाऱ्या विशिष्ट तीव्र नकारात्मक किरणांना सुनिल लाल रंगात बघू शकत होता आणि त्याची फ्रिक्वेन्सी फक्त सुनिलच्याच कानांना ऐकू येत होती.

सुनिलची खात्री पटली की यापैकी दोन्ही जणी आता वस्तू चोरण्याच्या जाणीवेने अस्वस्थ झाल्यात आणि लाल वर्तुळ ज्वलंत झाल्याने आता त्या एखाद दुसरा दागिना उचलून लपवणार आणि काढता पाय नक्की घेणार एवढ्यात हळूच सुनिल उठला आणि त्याने सीसीटीव्ही मॉनिटर करणाऱ्या व्यक्तीचे ठिकाण काउंटरवरच्या एका माणसाला विचारले. त्याआधी त्याने तिन्ही महिला असलेल्या काऊंटरवरच्या व्यक्तीला डोळयांनी त्या महिलांकडे लक्ष ठेवा असे खुणेने सांगून सावध केले.

मग सुनिल आणि सीसीटीव्ही मॉनिटर करणारा व्यक्ती हे दोघेजण बराच वेळ सीसीटीव्ही स्क्रिनवर लाईव्ह बघत बसले. त्या दुकानात सुनिलची ओळख होती त्यामुळे सीसीटीव्ही जवळ सुनिलला बसू दिले गेले आणि सुनिलच्या म्हणण्याप्रमाणे झाले.

दोनपैकी एका महिलेने डायमंड नेकलेस खिशात घातला आणि तेही कोणाच्याही नकळत! काउंटरवरील माणसालाही ते दिसून आले नाही इतक्या शिताफीने आणि जलद गतीने! तेव्हा सुनिल आणि सीसीटीव्ही मॉनिटर हे दोघे रूम मधून पळून काऊंटरवर आले आणि बरोबर त्या महिलेने लपवलेला डायमंड नेकलेस शोधला. सीसीटीव्ही फुटेज सगळयांना त्या मॉनिटरिंग व्यक्तीच्या मोबाईलवरून दाखवले, जेणेकरून तिथे उपलब्ध असलेल्या इतर ग्राहकांची खात्री झाली. सुनिलने खुणेने काऊंटरवरच्या माणसाला सांगितले की माझे नाव सांगू नका, मी हे ओळखले हेही सांगू नका, आपली चोरी पकडली गेली यातच मिळवलं!!

* * *

नंतर एकदा सुनिल नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकला, जॉगिंगला गेला होता. उजव्या बाजूला काही जेष्ठ नागरिक चालले होते. पळत पळत परत पुढे गेल्यानंतर एका ज्येष्ठ महिलेच्या गळयामध्ये असलेले मंगळसूत्र चोरण्यासाठी एक चोर मॉर्निंग वॉकच्या बहाण्याने वेगाने चालत चालत तिच्या मागे मागे जावू लागला होता. त्याच्या डोक्यावर लाल सर्कल दिसल्याने आणि हाय फ्रिक्वेन्सी आवाज ऐकू आल्याने सुनिलने ओळखले की याचा बेत महिलेच्या गळयातील मंगळसूत्र चोरण्याचा दिसतो आहे. वेगाने

पण आवाज न करता पळत जाऊन सुनिलने त्याच्या पायात पाय अडकून पडण्याचे नाटक केले आणि त्या चोरालाही खाली पाडले. यामुळे घाबरून ती ज्येष्ठ महिला पुढे निघून गेली. सुनिल आणि तो भावी चोर एकमेकांना सॉरी म्हणत म्हणत उठले, चोर थोडा चिडलेला दिसला. सुनिलने त्याला बोलण्यात गुंतवले आणि ज्येष्ठ महिलेला बरेच दूर जाऊ दिले. ती ज्येष्ठ महिला दिसेनाशी झाल्यानंतर मग सुनिलने त्या चोराला जाऊ दिले. थांबवणार कसे आणि थांबवून जाब विचारणार तरी काय? कारण त्याने अजून चोरी केली नव्हती!  परंतु पुढे चोरी करण्याचा बेत रद्द झाला कारण ती महिला तोपर्यंतघरी निघून गेली होती. सुनिलला माहिती होते की ती महिला नेमकी कुठे राहाते त्या गल्लीपर्यंत तिला जाऊन सुनिलने दिसेनासे होऊ दिले. चोर चरफडत पुढे निघून गेला!!

* * *

यानंतरही अनेक निगेटिव्ह घटना घडण्याआधी तिथे सुनिल उपस्थित होता जसे -

एटीएम बाहेर संशयित होता, एका ज्येष्ठ नागरिकाचे पैसे चोरण्याआधी आवाज करून घटना टाळली. नेमका तिथे सुनिल पैसे काढायला आलेला होता.

दारुसाठी पैसे दिले नाही म्हणून बापाला मारण्याआधी घटना टळली कारण सुनिल नेमका त्या घराजवळून जात होता तर त्याला अचानक निगेटिव्ह वास आला! असा वास आजपर्यंत त्याने कधीही घेतलेला नव्हता! आता वासाची शक्ती पण त्याला आलेली होती.

रात्री एकदा मित्रांसोबत पावभाजी गाडीवर पैसे कमी जास्त देण्याच्या वादातून मारामारी होणार त्याआधी सुनिलने घटना संवाद फिरवून टाळली. पावभाजीच्या वासात तो निगेटीव्हीटीचा वास त्याला नेमका ओळखता आला.

एकदा सुनिलने भर ट्रॅफिकमध्ये ट्राफिक पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या एका माणसाला त्यापासून परावृत्त केले. त्या पोलिसाने काल त्याला नियम तोडल्याबद्दल पैसे घेतल्याचा राग त्याच्या मनात आजही ताजा होता.

तसेच रात्री उशीरा एके ठिकाणाहून परत येत असतांना भुयारी मार्गात रात्री एका महिलेवर सामूहिक बलात्कार शिताफीने टाळला. त्याने आधीच चार जणांची नियत ओळखून त्या महिलेला काहीतरी कारण सांगून पर्यायी मार्ग वापरायला प्रवृत्त केले. कारण त्याला या निगेटिव्ह घटनेचा वास आणि आवाज आला आणि नंतर प्रखर ज्वाळाची वर्तुळे दिसली. म्हणजे अयोग्य पद्धतीची नकारात्मक अनियंत्रित घातक वासना सुद्धा त्याला आता लाल वर्तुळाच्या स्वरूपात दिसू शकत होती.

एका क्रीडा मंत्र्यांच्या सभेत तो नेता भाषण देत असतांना त्याच्या अंगावर गर्दीत एकाने कडक क्रिकेटचा बॉल मारून फेकायच्या आत घटना सुनिलने टाळली कारण नेमका सुनिलत्या माणसाच्या मागे होता आणि त्याने त्या माणसाला तो बॉल नेत्याच्या तोंडावर अगदी शिताफीने नेम धरून फेकायच्या बेतात असतांनाच 'बघू कोणत्या कंपनीचा बॉल आहे?' म्हणून बघायला मागितला आणि त्याला बराच वेळ बॉल दिलाच नाही.

* * *

एका महिलेने घरच्या भांडणातून स्वतःच्या मुलीला पुलावरून खाली नदीच्या पाण्यात फेकण्याचा आत घटना टळली कारण त्यावेळेस नेमका बाईकवरून सुनिल तिथून जात होता आणि ती महिला लगबगीने त्याला निगेटिव्ह विचारांनी जातांना दिसली आणि ती पुलाच्या कठड्यावर चढायच्या आतच तिला बोलण्यात गुंतवून आणि धाक दाखवून तिथून घरी जायला भाग पाडले.

आता सूर्य अस्ताला झुकत चालला होता. हा पूल मुंबईतील एका उपनगरातील होता आणि तेथून मित्राला भेटून सुनिल घरी निघाला होता. थोडी गाडी बाजूला लावून पुलाच्या कठड्यावर हात ठेऊन खाली पाण्याकडे बघत उभा राहिला. उजव्या हाताला बांधलेले घड्याळ आणि त्यातला 6 आकड्याच्या जागी बसवलेला चमकणारा स्फटिक दिसत होता. त्या स्फटिकाकडे बघत तो विचार करू लागला:

"अशा किती नकारात्मक घटनांचा साक्षीदार मला बनावं लागणार? ही नकारात्मकतेची डिटेक्टिव्हगिरी मला स्वतःलाच एक निगेटिव्ह माणूस तर बनवणार नाही ना? या सगळ्यांचा माझ्या मनावर नकळत एक ताण येत चालला आहे. बरेचदा रात्री झोप येत

नाही! माझ्या ज्ञानाचा आणि विशिष्ट शक्तीचा उपयोग मला समाजाच्या आणि देशाच्या भल्यासाठी करता येतोय याचा आनंद आहे पण..."

"पण चिंता करू नको", नदीच्या पाण्यातून आवाज आला.

"कोण?" सुनिलने विचारले.

"विसरलास? मी रंगिनी!"

नदीच्या पाण्यातून आणि आजूबाजूच्या अनेक सजीव निर्जीव वस्तूंमधून विविध रंग निघाले आणि संपूर्ण सृष्टी रंगमय झाली. आता त्या रंगीत जगात पुन्हा सुनिल आणि सुंदर रंगिनी अधांतरी तरंगत होते!

"मला मार्गदर्शन कर रंगिनी, मला कधी कधी भीती वाटते या सगळ्यांची!"

"भीती? काढून टाक! मनात शंका ठेऊ नको आणि आता माझे ऐक. आता तुझ्या मनातली भीती काढायला मी आलेली नाही. ते काम तुला स्वतःला करायचं आहे. इतरांच्या मनातील नकारात्मक गोष्टींचा सकारात्मक विचारांत रूपांतर करणारा तू, स्वतःच नकारात्मकतेकडे झुकत चालला आहेस?"

"तसं होतंय खरं! आणि माझ्या मनात निगेटिव्ह विचार सुरू असतांना मी स्वतःला आरश्यात पाहिलं तरी मला माझ्या डोक्याभोवती लाल वर्तुळ दिसत नाही!"

"अर्थातच दिसणार नाही कारण अदृश्य किरणं आरसा डिटेक्ट करू शकत नाही. स्वतःचे निगेटिव्ह वर्तुळ बघायची तुला गरजच काय?"

"मला माहीत आहे, तशी गरज नाही कारण मला स्वतःला महित असेल की मी काय विचार करतोय ते पण तरीही समजा बघायचे तर?"

"असे तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुझाच क्लोन तुझ्यापासून वेगळा होऊन तुला तुझ्या समोरून बघेल!"

खरे तर सुनिल तसे सिलेक्टिव्ह निगेटिव्हीटी डिटेक्ट करणारे उपकरण बनवू शकत होता जे त्याची स्वतःची निगेटिव्हीटी इतरांना सांगेल जे त्याने रणजित यांच्या साठी शक्य असूनही बनवले नव्हते.

"होय खरं आहे. ते जाऊ दे. मला सांग मी असा इतरांच्या नकारात्मक लहरींचा माझ्यावर नकारात्मक परिणाम होण्यापासून स्वतःला कसा वाचवू?"

"त्याकडे तटस्थपणे बघायला शिक! असाच तुझा काल्पनिक क्लोन तयार कर जो या सगळ्यांपासून मनाने, भावनेने आणि बुद्धीने

निराळा असेल, तटस्थ असेल. जमेल हळूहळू तुला! तो क्लोन हवेतून तुला कुठेतरी बघेल, तो क्लोन तू असशील आणि खऱ्या सुनिलकडे तो एक वेगळी व्यक्ती म्हणून बघेल. बरं ते असू दे! खरे तर तुला एका जोडीदाराची साथीदाराची नितांत गरज आहे जी तुला समजून घेईन आणि तुम्ही दोघे एकमेकांना पूरक असाल!"

"खरंच? कोण असेल ती? अशीच कुणीतरी विशेष सुपर पॉवर असलेली?"

रंगिनी हसली.

"मी काही त्रिकालदर्शी भविष्यवेत्ती स्त्री नाही. टाईम डायमेंशन किंवा काळ मिती जीव आहे ना ती असते त्रिकालदर्शी! पण अर्थातच ती कुणाला भविष्य सांगत फिरत नाही, पण तुला तुझ्या तोडीची जोडीदार मिळेलच यात शंका नाही, असो!"

थोडे थांबून ती पुढे म्हणाली, "मी तुला आज हे सांगण्यासाठी आलेय की तुला मिळालेल्या शक्तीचा उपयोग तू कमी काळात इतक्या अनेक चांगल्या कामासाठी केलास की आता त्याहीपुढे जाऊन तुझ्या डोळ्यांना आणखी एक शक्ती मिळाली आहे!"

"आणखी एक शक्ती म्हणजे आणखी एक जबाबदारी?", मनातल्या मनात सुनिल आश्चर्याने आणि साशंकतेने स्वतःला विचारू लागला!

"ती कोणती शक्ती?", सुनिलने विचारले.

"तू मनात जसजसा विचार करशील तसतशी तुझी दृष्टी हवे तेवढया दूरवरचे बघू शकेल!"

"म्हणजे?"

"म्हणजे, तुला आधी प्रकाशाचे नियम थोडक्यात सांगते जे तुला आधीच माहिती असतील! वस्तू आपल्याला दिसतात कारण वस्तूंवरून परावर्तीत होणारा प्रकाश आपल्या डोळ्यांपर्यंत सरळ रेषेत पोचतो, बरोबर?"

"हो, विज्ञानाचा अगदी बेसिक नियम आहे हा!"

"आता पुढे ऐक! पृथ्वी गोल असल्याने आणि प्रकाश किरणे सरळ प्रवास करत असल्याने जास्त दूरवरचे बघायला आपल्याला मर्यादा येतात!"

"हो खरे आहे ते! अथांग समुद्रावरचे दूरचे जहाज काही वेळेस दृष्टीच्या आवाक्यात असूनही आपल्याला दिसत नाही कारण पृथ्वी गोल आहे!"

"बरोबर, पण समजा कल्पना कर की पृथ्वी अगदी हायवेसारखी किंवा अमर्यादित सपाट पृष्ठभागावर पसरवलेल्या गालीच्या सरळ सरळ पसरलेली असती तर तुला किंवा कुणाही माणसाला सामान्य दृष्टीने अगदी जास्तीत जास्त शक्य तेवढ्या दूरपर्यंतच्या वस्तू दिसल्या असत्या, इतक्या दूरच्या की उदाहरणार्थ जिथे पोहोचेपर्यंत आकाशातले विमान दूर जातांना शेवटी अदृश्य होते किंवा दृष्टीआड होते. कारण आपले व्हिजन हे त्रिकोणाकृती किंवा एखाद्या त्रिकोणी शंकूसारखे काम करते! यात एकच अडचण आहे ती म्हणजे अशा काही जवळच्या वस्तू उदाहरणार्थ उंच बिल्डिंग वगैरे ज्या दूरच्या वस्तूंची प्रकाशकिरणे सामान्य डोळ्यांपर्यंत पोहोचू देणार नाहीत!"

दीर्घ श्वास आणि उसासा टाकून सुनिल हणाला, "होय, बरोबर आहे! मग मला मात्र त्या सगळ्या वस्तू दिसतील का?"

"हो, तू एखाद्या दिशेने चेहरा करून जसजशी मनात अंतर वाढवत आणि मोजत कल्पना करत जाशील तसतसे तेवढ्या दूरवरचे तुला दिसण्यासाठी जवळच्या अनावश्यक बिल्डिंग, झाडे किंवा अडथळा आणणाऱ्या वस्तू तेवढ्याकरता तुझ्यासाठी अदृश्य होत जातील आणि प्रकाश किरणे तुला दिसण्यासाठी वाकतील, म्हणजे पृथ्वीच्या समांतर गोल प्रवास करतील तुझ्या डोळ्यांपर्यंत येण्यासाठी! आणि तू स्थिर असतांना तुझा दृष्टीकोन म्हणजे

अक्षरशः दृष्टीला मर्यादा लावणारा तो घन आकाराचा कोन तुझ्याकडे सरकत जाईल म्हणजे कोणतीही वस्तू तुझ्या दृष्टीकोनातून दृष्टीआड होणार नाही!"

"पण हे कसे शक्य आहे? प्रकाश किरणे कशी काय वाकतील?"

"मी जशी रंग मिती जीव आहे तशीच आणखी एक प्रकाश मिती जीव पण असते. आम्ही आमच्या काही गोष्टी नियंत्रित करू शकतो, प्रकाश किरणांनाही करू शकतो! आम्ही सगळ्या मिती एकमेकांत काही सूत्रांनी बांधलेले आहोत आणि तुझ्यासारखे काही जीव पण विविध मितींच्या एका सूत्राने बांधले आहेत! गरज पडली तर तुझ्या सारख्या काही डायमेंशन स्पेसिज किंवा मिती प्रजाती साठी प्रकाश किरणं पृथ्वीच्या परिघाला समांतर प्रवास करायला आम्ही भाग पाडू शकतो! काय समजलास?"

श्वास रोखून हे सगळं सुनिल ऐकत होता कारण त्याचा अंदाज बरोबर निघाला होता की सगळ्या  मिती एकमेकांशी कसल्यातरी फॉर्मुल्याने कनेक्टेड आहेत आणि तो स्वत: एक डायमेंशन स्पेसिज आहे!

"म्हणजे मी मिती प्रजाती आहे?"

"होय! रंग, आवाज, वास, नकारात्मकता आणि प्रकाश या सगळ्या मितीचे असलेले मिश्रण आहेस तू! अशा अनेक प्रकारच्या मितींचे विविध मिश्रण असलेले स्पेसिज जगात आहेत! तुझी भेट होईलच गरज असेल तेव्हा त्यांचेशी! गोल पृथ्वीवर अनंतपणे दूर बघण्याचा तुझा प्रश्न सुटला आणि तू जो भाग दूरदृष्टीने बघशील त्याचा आवाज सुद्धा तुला ऐकू येतील आणि वास सुद्धा जाणवतील! म्हणजे पंचेंद्रीये नेहमीप्रमाणे काम करतील. बरेचदा तुला तुझ्या चेहऱ्याची दिशा बदलावावी लागेल, गरजेनुसार! तुझ्या मेंदूचा गोंधळ टाळण्यासाठी! अन्यथा तू एकाच दिशेला उभा राहून सुद्धा 360 डिग्री सर्कल मधील अनंत गोष्टी पाहू शकतोस!"

"बापरे, ही तर खूप मोठी शक्ती आणि जबाबदारी आहे!"

"होय, म्हणजे आता कितीही दूर कुठेही नकारात्मक घटना घडत असल्या तर तुला लाल वलयाच्या रुपात दिसतील आणि जवळपास असतांना ध्वनी आणि वास मदतीला येतील!"

ती पुढे म्हणाली, "आणि आता राहिला प्रश्न अमर्याद आकाशात बघण्याचा तर तेही तू याचप्रमाणे बघू शकशील! पण ही दृष्टी तू पुढे पुढे सरकवत असतांना तू जिथे उभा असशील तिथले भान तुला ठेवायला हवे नाहीतर संकटात सापडू शकतोस! आणि हो, या शक्तींचा वापर तू चुकीच्या गोष्टींसाठी करायला सुरुवात केली की एकेक करून या शक्ती तुझ्यातून कमी व्हायला लागतील

आणि ज्याच्यावर चुकीचा प्रयोग करशील त्याला या शक्ती हळूहळू मिळायला सुरुवात होईल, लक्षात असू दे! आता मी निघते, पुन्हा भेटूच!!", असे सांगून रंग मिती वेगाने निघून गेली आणि सुनिल पुन्हा पुलाच्या कठड्यावर हात देऊन उभा होता! एवढं सगळं होइपर्यंत काळ थांबला होता! कदाचित रंग मितीने काळ मितीला विनंती केली असावी!! त्याने घड्याळाकडे पाहिले, डायल उघडले आणि स्फटिकाला स्पर्श केला, आणि त्याच्या शक्ती बंद केल्या.

खिशातील गॉगल डोळ्यांना लावला आणि गाडीवर बसून गाडी स्टार्ट करतांना हसत म्हणाला, "म्हणजे मी आता दूरदर्शन पण झालो!' आणि पुलावरून त्याची गाडी "दूर" निघून गेली!!

गाडी चालवताना त्याने एक मात्र मनाशी पक्के ठरवले की या नव्या शक्तीबद्दल कुणालाच सांगायचे नाही, अगदी रणजित यांना सुद्धा नाही!

^^^

# 12. भटकंती

त्या दिवशी घरी गेल्या गेल्या रात्री सगळे झोपल्यावर सुनिलला नवीन मिळालेली शक्ती वापरून पहायची इच्छा अनावर झाली. तो बरेचदा झोप येत नसली की गॅलरीत कानात हेडफोन लावून मोबाईलवर गाणे ऐकत बसायचा. तसाच आजही असेल म्हणून घरचे निवांत होते. तो बेडवरून उठून गॅलरीत आला. गॅलरीत नेहमी असणाऱ्या पोपटाची उणीव भासत होती. पिंजरा टांगलेल्या जागेकडे बघून तो क्षणभर अस्वस्थ झाला पण नव्या शक्तीला वापरून बघायची उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. आहे त्याच जागेवरून त्याच्या दृष्टीला आता सगळी सृष्टी बघायला मिळणार होती. कुठे कुठे जाऊ आणि काय काय बघू असे त्याला झाले होते. घड्याळातील स्फटिकाला स्पर्श करून त्याने त्याच्या सर्व शक्ती कार्यरत केल्या. कुठे जाऊ? आकाशात? नको!आधी पृथ्वीवर काय काय असतंय ते तर बघतो, मग नंतर आकाश!

रात्रीचे अकरा वाजले होते. मनाच्या दृष्टीने विचार करत करत तो थोडे थोडे अंतर पुढे सरकू लागला. लोकल प्रवासाने वैतागून कामावरून घरी परतलेले थकलेले लोक दिसायला लागले. मात्र

ही शक्ती वापरायची अजून सवय नसल्याने त्याच्या डोळयांवर प्रचंड ताण पडत होता. डोंबिवलीतील थिएटर्स, चहा दुकाने, गार्डन, भाजी मार्केट, कपड्यांची दुकाने, गणपती मंदिर, फडके रोड आणि त्यावर चालणाऱ्या तरुण मुली असे सगळे उभ्या उभ्या (घर बसल्या) बघतांना त्याला वेगळीच मजा येत होती. थोडे पुढे सरकून आता त्याची दृष्टी डोंबिवली स्टेशनवर आली, स्टेशनवरच रेंगाळली. स्टेशनवर एका प्लॅटफॉर्मवर एक जोडपे हातात हात घालून प्रेमाच्या गप्पा करत चालले होते. असाच कुणीतरी जोडीदार आता त्याला हवाहवासा वाटत होता. आतापर्यंत अभ्यास, जॉब आणि समाजसेवा करण्याच्या गडबडीत प्रेम करायचे राहूनच गेले होते. ते जोडपे निघून गेल्यावर दृष्टी शून्य नजरेने आपोआप रुळांवर स्थिरावली आणि तो विचार करू लागला. कॉलेजला असतांना एका मुलीकडे तो आकर्षित झाला होता आणि त्याने तिच्याशी मैत्रीही केलेली होती. पण ते फक्त तारुण्यसुलभ आकर्षण आहे की प्रेम आहे आणि सहजीवनाची ओढ आहे हे तो ठरवू शकत नव्हता आणि त्या मुलीकडूनही त्याला तसला काही प्रतिसाद मिळाल्याचे दिसत नव्हते. त्यांचाही मित्रांचा ग्रुप असाच अनेकदा त्याच प्लॅटफॉर्मवरुन येजा करायचा तेव्हा हे दोघे ग्रुपच्या थोडे मागे चालत भान हरपून बोलत चालत राहायचे.अधूनमधून तो तिच्याशी फोनवर बोलायचा पण ते सहज मित्रांत असते तसे बोलणे

असायचे. ती म्हणजे समिधा आणि तो हे इतर कॉलेज ग्रुप सोबत अनेकदा हॉटेलमध्ये जेवायला, चित्रपट बघायला जायचे. तिची आणि त्याची खाण्याची आणि चित्रपटांची आवडही बरीचशी सारखीच होती हेही त्या दोघांच्या लक्षात आले होते. बऱ्याच सामाजिक समस्यांवर आणि बातम्यांवर जेव्हा चर्चा व्हायची तेव्हाही त्यांचे विचार जुळायचे!  आता समिधा काय करते आहे हे चेक करून बघायचा विचार त्याच्या मनात आला आणि ती ज्या उपनगरात राहते तिकडे दृष्टी वळवून आपण तिच्या घरात आपल्या "दूर" दृष्टीने शिरायचे का, तसे करता येईल का? अशा विचारांत असतांनाच समोरच्या रुळांवरून सीएसटीकडून आलेली एक एक्सप्रेस तुफान वेगाने सुनिलच्या एकदम डोळ्यांवरच आली, त्या इंजिनच्या आवाजाने तो दचकला आणि विचारांची तंद्री भंग पावून तो गॅलरीत उभ्या उभ्याच मागे धडपडला, त्याचा पाय रोपाच्या कुंडीला लागला आणि त्यात पाय अडकून धडपडून तो मागे लाकडी फळीवर पडला आणि ती फळी बाजूला पडून मोठा आवाज झाला आणि घरचे जागे झाले!!

तो पटकन भानावर येऊन टी शर्ट आणि पॅन्ट झटकत सावरत उठून उभा राहिला, फक्त थोडेसे खरचटले होते. त्याचे डोळे मात्र

प्रचंड दुखत होते, थोडे सुजले होते. ही नवी 'दूरदृष्टी' देणारी शक्ती वापरणे वाटते तितके सोपे काम नाही याची जाणीव त्याला झाली!

आई गॅलरीत आली, "काय झालं बाळा, कसा काय पडलास?"

"काही नाही आई, असच सहज!"

"असंच, सहज? तरी मी नेहमी सांगते की कानात हेडफोन अडकवून चालत जाऊ नकोस, एके ठिकाणी उभा राहत जा किंवा खुर्चीवर बसून राहत जा, ऐकत नाही!"

"आता मी ऐकेल आई, झोप आता तू!"

तो घरात आला आणि त्याच्या बेडवर झोपला. ही शक्ती आता पुन्हा त्याला दिवसा वापरून बघायची होती. समिधाच्या मनात त्याच्याबद्दल काय आहे हे सुद्धा त्याला आता पडताळून बघण्यासाठी त्या शक्तीचा प्रयोग करायचा होता, पण...!!

^^^

# 13. नरिमन टर्निंग पॉईंट

सकाळीच रणजित यांचा सुनिलला फोन आला.

"ताबडतोब नाश्ता आटोप आणि नरीमन पॉईंटला ये. तिथून मरीन ड्राईव्हला फिरत फिरत तुझ्याशी महत्वाचे बोलायचे आहे!"

मरीन ड्राईव्ह हा मुंबईतील रस्ता नरीमन पॉईंटला सुरू होऊन गिरगाव चौपाटीला संपतो. समुद्रालगत असलेला हा रस्ता प्रेक्षणीय आहे. मुंबईचे सौंदर्य बघायचे तर या रस्त्याला पर्याय नाही. मुळात हा रस्ताच मुंबईराणीच्या गळयातील हार बनून तिचे सौंदर्य वाढवतोय, क्वीन्स नेकलेस बनून!

सीएसटी फास्ट लोकल ट्रेनच्या फर्स्ट क्लासच्या डब्याने तो सीएसटीला उतरला आणि टॅक्सीने नरिमन पॉइंटला आला. ट्रेन मध्ये बसला असतांना खिडकीतून बाहेर बघत त्याने त्याची दूरदर्शन शक्ती वापरण्याचा प्रयत्न केला पण सगळया वस्तू एकमेकांत मिक्स होऊन त्याला सगळी भेसळ मिसळ दिसायला लागली, बुब्बुळे छऱ्याच्या गेमसारखी गरागरा डोळयात फिरत

आहेत असे त्याला जाणवले म्हणून त्याने प्रयत्न तातडीने रद्द केला!!

ट्रायडेंट हॉटेलसमोर उतरला तेव्हा त्याला आता एसएसपी म्हणजे सिनियर सुप्रीटेंडन्ट ऑफ पोलीस झालेल्या रणजित यांची पांढऱ्या कलरची व्हॅन उभी असलेली दिसत होती. त्यातून सिव्हिल ड्रेस मधले रणजित आणि सोबत आणखी दोन युनिफॉर्म मधले पोलीस उतरले आणि एक जण विना युनिफॉर्म गाडीतच बसलेला होता. नुकतीच रणजित यांना बढती मिळाली होती हे सुनिलला माहिती होतं.

सुनिल आणि रणजित मरीन ड्राईव्हच्या रस्त्याला चालू लागले. त्यांच्या पासून थोडे अंतर ठेऊन दोघे पोलीस त्यांच्या मागे मागे सुरक्षेसाठी चालू लागले.

"मी तुला अर्जंट आणि अशा सार्वजनिक ठिकाणी बोलावून घेतले त्याला कारणही तसेच आहे, सुनिल!"

"काय झाले मामा?"

"मी जी तुला माहिती सांगणार आहे ती लीक होऊ नये असे मला वाटते म्हणून अशा ठिकाणी मी तुला बोलावले आणि मीही

सिव्हिल ड्रेस मध्येच आहे. मागे स्टेशनवर आपण एका माणसाला पकडलं होतं तुला आठवत असेलच!"

"स्टेनगनसारखी दिसणारी शस्त्रे त्याच्या बॅगमध्ये सापडली होती, गन्सचा भरपूर साठा होता त्याच्याकडे!"

"होय, त्याला कोर्टाने बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. दरम्यान त्याच्यावरील आणखी काही गुन्हे सिद्ध झाले आणि आणखी त्याची शिक्षा वाढवण्यात आली! त्याचे नाव जग्गू भुसनळ्या!"

"बरोबर, मला वाटते ती शिक्षा त्याची भोगून नुकतीच संपली असेल आणि सुटला असेल तो!"

"हो शिक्षेचा कालावधी संपल्याने त्याला लवकरच तुरुंगातून सोडणार आहेत. त्याची तुरुंगातील वागणूक खूप चांगली होती. त्याला तुरुंगातील केलेल्या कामाचे चांगले मानधन मिळणार आहे!"

"मग?"

"तुरुंगात त्यांचेकडून त्याच्या टोळीची आणि साथीदारांची नावे आम्ही काढून घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याने दोन चार साथीदारांची नावे सांगितली, आम्ही त्यांना पकडले सुद्धा! ती छोटी मोठी भुरट्या चोऱ्या करणे, माल इकडचा तिकडे पोचवणे

अशी कामं करणारी निघाली. सर्वांच्याच चौकशीतून फार काही हाती लागलं नाही! एका मास्क घातलेल्या माणसाने त्याला त्या बंदुकाची बॅग समुद्रकिनाऱ्याजवळच्या एका निर्जन ठिकाणी ठेवायला सांगितले होते! पण त्या बंदुका घ्यायला कोण येणार हे त्याला माहीत नव्हतं आणि बंदुका त्याला कुणी दिल्या हेही नाही आणि त्या कुणाला मारण्यासाठी वापरल्या जाणार होत्या हेही कळलं नाही! त्या बंदुकातून अचूक नेम साधता येतो आणि गोळी झाडतांना आवाजही येत नाही!"

"एक मात्र नक्की की, त्या बंदुकांचा वापर करून जे गुन्हे होणार होते ते टळले!"

"होय, पण खऱ्या चिंतेचे कारण वेगळे आहे सुनिल, सांगतो! गेल्या काही दिवसांपासून तो जग्गू भुसनळ्या तुरुंगात सतत हसतोय आणि म्हणतोय: ते लोकं वाईट आहेत, त्यांचे वाईट हाल होतील! वाईट लोकं येतील आणि वाईट लोकांना मारतील!"

"ते काय तो असंच घाबरवायला म्हणत असेल! आपल्याला अशा प्रकारच्या गुन्हेगारांच्या मानसिकतेबद्दल माहिती आहे!"

"मी त्याला जोराने ओठांवर मारलं, त्याचं रक्त काढलं. आणखी दोन ठोसे मारून त्याचे समोरचे रक्ताने लाल झालेले दोन दात पाडले आणि त्याला विचारलं की तो असं का बडबडतोय?

तर तो फक्त हसला आणि रक्त येत असलेल्या तोंडाने तेच वाक्य बोलला! पण त्याकडे वायफळ बडबड म्हणून दुर्लक्ष आपण करूही शकतो पण हे माझे चिंतेचे कारण नाही. तो हे कशाकरता का म्हणेना, पण योगायोग म्हणजे आपल्या आयटी सेलकडे काल शेकडो जणांनी तक्रारी केल्यात की त्यांच्या फोनवर एक Unknown Number वरून एक मेसेज आला: 'ते लोकं वाईट आहेत, त्यांचे वाईट हाल होतील! वाईट लोकं येतील आणि वाईट लोकांना मारतील!' सगळ्या तक्रारदारांना हाच मेसेज आला, काहींनी रेकॉर्ड करून आपल्याला दिला आहे!"

"हे मात्र जरा विचित्रच आहे!"

"म्हणूनच मी तुला बोलावलंय. जरा चेक कर हे मेसेज कोण करतंय? सायबर एक्सपर्ट आहेस ना!"

"ठीक आहे. मी चेक करतो. पण असं जर असेल तर मग आपण त्याला सोडलं नाही पाहिजे!"

"त्याला आपण थांबवू शकत नाही. कोर्टाचा आदेश धुडकावू शकत नाही! त्याला तुरुंगातून सोडायलाच पाहिजे!"

"आणि बाय द वे त्याला तुरुंगात कुणी भेटायला वगैरे येत होतं का?"

"त्याला त्याचा भाऊ पप्पू भेटायचा कधी कधी!"

असे ते म्हणत असतांनाच त्यांना प्रायव्हेट वॉकीटॉकीवर काहीतरी संदेश आला आणि ते मागे वळले.

"चल तूही आमच्यासोबत गाडीत पोलीस स्टेशनला लवकर! एक अर्जंट केस आहे! आणि जग्गू भुसनळ्याला तुरुंगातून सोडल्यावर त्याच्या मागावर राहा, तुझ्या खास शक्ती त्यासाठी वापर!"

"माझी नवी शक्ती यांना सांगू का?", असे सुनिलच्या मनात आले, पण त्याने स्वतःला रोखले.

पुन्हा दोघे उलट्या दिशेने त्यांच्या व्हॅनकडे जायला निघाले.

"आणि आणखी एक खूप महत्त्वाची गोष्ट! जापानमध्ये एक प्रसिद्ध वैज्ञानिक अचानक गायब झालेत, हे मागे तू ऐकले असशीलच! तसेच काही देशांत अनेक वैज्ञानिक, संशोधक आणि तंत्रज्ञ यांचेवर हल्ले वाढत आहेत! त्यामुळे आता हा तपास इंटरपोलकडे आला असून त्यांनी प्रत्येक देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा तपास यंत्रणेकडे आपापल्या देशात तातडीचा तपास करण्यासाठी काही सूचना दिल्या आहेत. आपल्या सनसिया (SNSIA) च्या मुंबई शाखेचे हेड जयवंत जसकर यांना तशा सूचना आल्यात. त्यांना वाटते आहे की मागे जो सायन्स फेस्टिव्हल मधल्या मुलांच्या गाडीवर हल्ला झाला होता आणि पुराव्याभावी तपास

थांबला होता त्याचा संबंध या सगळ्या जागतिक पातळीवर वैज्ञानिक, संशोधक आणि तंत्रज्ञ यांचेवर होणाऱ्या हल्ल्याशी नक्की संबंध आहे आणि त्या दिवसाच्या आधी आणि नंतर घडलेल्या सर्व गुन्हेगारी घटनांचा तपास पुन्हा नव्याने करायचा आहे! आणि त्यातच आता हे सगळे लोकांना येणारे गूढ SMS आणि तुरुंगातील बडबडणारा तो जग्गू!"

"आणि हो तुला आणखी एक महत्वाचे सांगायचे आहे! खूप महत्वाचे! चल गाडीत बैस! सांगतो", असे म्हणून रणजित गाडीकडे चालू लागले किंवा जवळपास पळायलाच लागले. रणजित यांच्या सूचनेनुसार मागोमाग येणारे दोघे पोलीस आता त्या दोघांच्या पुढे चालत चालत व्हॅन मध्ये मागे बसले, रणजित जवळपास पळत पळतच घाईने व्हॅनकडे आले, त्या वेगाच्या मानाने सुनिल खूप मागे पडला. रणजित व्हॅनमध्ये बसले. सुनिल व्हॅनकडे यायच्या आतच व्हॅनचा प्रचंड स्फोट झाला. सर्वजण हवेत उडाले. सुनिल व्हॅनपासून बराच दूर होता पण गरम हवेच्या झोताने वेगाने मागे फेकला गेला.

^^^

# 14. सुटका

रात्री झोपण्यापूर्वी सहज चॅनेल बदलले असता सेट मॅक्सवर "जानी दुश्मन- एक अनोखी कहानी" सुरु होता आणि गुहेत तपस्या करत असलेल्या अमरीश पुरीच्या नकळत मनीषा कोईराला आणि अरमान कोहली हे प्रेमात धुंद होऊन गुहेच्या छतावर जोराजोरात पाय आपटत नाचत होते आणि गाणे म्हणत होते- "जिंदगी मैं तुझी पे लुटाऊंगा, मैं तो मर के भी तुझको चाहूंगा, आजा ओ sss आजा!" नंतर गुहेला छतावर मोठे भगदाड पडते आणि ते दोघे अमरीश पुरीच्या अंगावर पडतात मग तो त्यांना शाप देतो आणि त्यांची ताटातूट होते मग पुनर्जन्म वगैरे!

उदित नारायणच्या दर्दभऱ्या आवाजाने भारलेलं ते गाणं ऐकून सायलीला सूर्यप्रतापसोबत घालवलेले क्षण आठवले, तिचे मन अचानक मागचे सगळे आठवून नकारात्मक विचारांकडे ओढले गेले.  तिने रिमोटने टीव्ही तडकाफडकी बंद केला आणि डोके दाबून धरले, "ओह गॉड! काय हे? हे बॉलिवूडवाले प्रेमकथांवर वर्षानुवर्षे असंख्य चित्रपट बनवतच राहतात, आणि प्रेमभंग झालेल्यांच्या जखमांच्या खपल्या निघतील अशी दर्दभरी गाणी बनवतच राहतात!"

"झोपेच्या गोळ्या खरं तर मी टाळायला हव्या. मी डॉक्टर आहे, त्याचे दुष्परिणामही मला माहिती आहेत. मी त्या घेणे टाळत आले असले तरीही आता मला वाटतंय की त्या घ्यायला हव्यात!"

तिने ड्रावरकडे हात नेला आणि ते ओढायला लागली तेवढ्यात तिचे हात हलके झाले आणि हळूहळू तळहात, पंजे, मनगट हलके व्हायला लागले आणि त्याजागी तिला हिरव्या रंगाचे 0 आणि 1 हे बायनरी आकडे दिसायला लागले. तिचे शरीर संपूर्णपणे हलके पोकळ होत जाऊन काळसर पार्श्वभूमीवर हिरवे 0 आणि 1 हे असंख्य आकडे  खालून वर, वरून खाली, आणि इकडून तिकडे असे पाण्यासारखे वाहत होते. समोर हातात एक बाहुली घेतलेली आणि असंख्य मेमरी कार्ड्स, हार्ड डिस्क, मॅग्नेटिक टेप्स, मेंदूतील नसा आणि विविध भाग, न्यूरल नेटवर्क आणि इलेक्ट्रॉनिक सर्किट यासारख्या अनेक नैसर्गिक आणि कृत्रिम मेमरी स्टोरेज डिव्हाईसने बनलेली नग्न स्त्री आकृती उभी होती. आणि आजूबाजूला सगळीकडे फक्त विविध अक्षरे, आकडे तरंगत होती.

"काळजी करू नकोस, तुझ्या न विसरण्याचा समस्येचे समाधान माझ्याकडे आहे! मी आहे मेमरी डायमेंशन किंवा स्मृती मिती जीव किंवा स्मृतिका!"

जसे सुनिलला मिती जीव म्हणजे काय याबद्दल रंगमितीने समजावून सांगितले होते तसेच सायलीलाही तिच्या या मितीने सगळे समजावले. सायलीने नंतर तिची थोडक्यात कथा तिला सांगितली आणि सूर्यप्रतापकडून प्रेमात मिळालेला धोकाही सांगितला.

"तुला विसरायचे आहे ना ते?"

"होय, अगदी उतावीळपणे विसरायचे आहे!"

"मग ऐक, तुला मी नवीन शक्ती देते. ती कोणती आणि कशी काम करेल त्या आधी तुला काहीतरी सांगणे आवश्यक आहे!'

"काय?"

"तुला जन्मापासूनच्या सगळ्या गोष्टी चिरकाल आठवतच राहतील हे नक्की पण मेंदू हा आकारानुसार शेवटी कधीतरी फुल होईलच किंवा भरून जाईल. त्याला अजून वेळ आहे पण नको असलेल्या गोष्टी कशा काढून टाकायच्या हे तुला आता शिकवलेच

पाहिजे नाहीतर ऐन वेळी कुठेही कधीही तुझी मेमरी फुल झाली तर तुझ्या मेंदूतील नैसर्गिक RAM (वर्तमानकाळातील घडत असलेल्या गोष्टींसाठी कार्यरत असलेली तात्पुरती मेमरी) आणि ROM (कायमचा साठा) या दोन्ही फुल होऊन तू हँग होशील, कॉम्प्युटर होतो तशी! असं झालं तर कदाचित तुझा मृत्यू ओढवू शकतो!"

"बापरे, कठीण आहे! मग उपाय काय?"

"ही मेमरी डॉल किंवा डेटा डॉल घे", असे म्हणत तिने तिच्या हातातील बाहुली सायलीला दिली.

"माझे बाबाही मला लाडाने हेच म्हणतात- डेटा डॉल!"

स्मृतिका हसली.

"ते डेटॉल ने हात धुतल्यासारखं फिलिंग येतंय, त्यापेक्षा मेमरी डॉल ठीक आहे नाही का?"

दोघीही खळखळून हसल्या.

"मेंदूच्या मेमरीत लक्षात राहणाऱ्या गोष्टींचे आपण आपल्या सोयीसाठी चार भागांत वर्गीकरण करू! सजीव, निर्जीव, संवेदना आणि भावना! चारपैकी कोणत्याही प्रकारातील एखाद्या गोष्टीला त्यातील ऑब्जेट असे म्हणू! आता तुझ्या सूर्यप्रतापला आपण सजीव ऑब्जेक्ट म्हणू. त्या ऑब्जेटचा इतर कोणत्या चार भागात

संदर्भ आहे? निर्जीव भागात त्याच्याशी संबंधित अशा गोष्टी ज्यांना बघितल्यावर तुला त्याची आठवण येईल, सजीव भागात त्याची आठवण करून देणाऱ्या इतर सजीव गोष्टी येतील तर संवेदना म्हणजे पंचेंद्रियाला होणाऱ्या सर्व संवेदना या भागात त्याच्यामुळे जागृत झालेल्या सर्व संवेदना उदाहरणार्थ स्पर्श वगैरे तसेच संबंधित ऑडिओ व्हिज्युअल फोटोग्राफीक संवेदना आणि शेवटी भावना या भागात येईल त्याच्यासाठी तुझ्यामध्ये असलेली प्रेमभावना, द्वेषभावना, प्रेमभंगाची भावना वगैरे!"

"होय, हे खरं आहे!"

"आता पुढे ऐक! एका भागातील ऑब्जेक्टचा संबंध इतर भागांतील ज्या ज्या ऑब्जेटशी येईल ते सर्व डिलीट होतील नैसर्गिकरित्या! म्हणजे कॉम्प्युटरच्या भाषेत सांगायचे तर डेटाबेस ऍडमिन हा डेटाबेस टेबल्समध्ये विशिष्ट माहिती टाकण्यासाठी किंवा काढण्यासाठी जशा क्वेरी कमांड वापरतात तशाच! मग काय होईल? तुला सर्व काही आठवेल पण त्यात जिथे जिथे सूर्यप्रताप आणि त्याच्याशी संबंधित ऑब्जेट असतील तिथे तिथे काळी आकृती किंवा पोकळी दिसेल, संबंधित भावनांच्या वेळी पोकळी जाणवेल म्हणजे कोणतीही भावना नसेल! आलं लक्षात?"

"हो, सांग लवकर, उशीर नको! पण या डॉलचं यात काय काम?"

"अगं, यापुढे तीच तर तुझी जिवलग मैत्रीण असणार आहे! तिच्या केसांना तुझे केस जोड!"

"अरे वा वा! हे तर अगदी स्टीव्हन स्पिलबर्गच्या अवतार पिक्चर सारखं वाटतंय!"

"होय, तसंच काहीतरी! पण इथे तुझे आणि बाहुलीचे केस हे यूएसबी केबल सारखे डेटा ट्रान्सफर करतील, पण नैसर्गिकरित्या! डेटा ट्रान्सफर करण्यापुरतेच फक्त केस जोडणे आवश्यक राहील!"

"अरे वा! हे तर लय भारी काम होणार! अगदी मस्तच!"

"आहे ना भारी! तर पुढे ऐक! जवळ आणले की तुमच्या दोघांचे केस आपोआप ओढले जाऊन जोडले जातील!मग सूर्यप्रताप सोबतचे सगळे प्रसंग सुरवातीपासून शेवटपर्यंत आठव आणि 'सर्व सूर्यप्रताप संबंधित ऑब्जेटस नष्ट कर' असे या बाहुलीला सांग! तुझ्या केसांतून तिच्या केसांद्वारे तिच्यात ते सर्व ट्रान्स्फर होऊन सेव्ह होईल!"

पुढे ती म्हणाली, "अशा प्रकारे इतर सुद्धा काही अनावश्यक गोष्टी कायमस्वरूपी तू तुझ्या मेंदूतून डिलीट करू शकतेस! दोन विशिष्ट तारखांमधले सर्व प्रसंग घटना डिलीट होऊ शकतात! इतर बिनकामाची माहितीसुद्धा डिलीट होऊ शकते! हे तुझ्या सोयीनुसार वापर! तशा कमांड बाहुलीला दे! कमांड देतांना शब्द

काळजीपूर्वक वापर नाहीतर गडबड होईल! पुन्हा ती माहिती बाहुलीकडून परत घ्यायची असल्यास केस जोडून रिव्हर्स असे म्हण आणि बाहुलीला कमांड दे! आता येते मी! पुढे कधी माझी गरज पडल्यास बाहुलीचे केस ओढ, मी येईल! बाहुली हरवू नकोस, कायम जवळ ठेव! ही म्हणजे तुझी बॅकप हार्ड डिस्क आहे! आणि एक लक्षात ठेव. तुझ्या या शक्तीबद्दल तू तोपर्यंत कुणाला सांगू नकोस जोपर्यंत तुझे अंतर्मन तुला सांगत नाही की ती व्यक्ती खरी आणि निर्मळ आहे आणि खरंच त्या व्यक्तीला तुझ्या शक्तीची गरज आहे!"

असे म्हणून स्मृतिका गेलीसुद्धा!!

आणि सायली बाहुलीसह पुन्हा बेडवर होती.

आणि लगेचच सायलीने सूर्यप्रताप ऑब्जेटला मेंदूमधल्या सर्व विभागातून डिलीट करून बाहुलीत ट्रान्स्फर केले आणि तिची प्रेमभंगाच्या आठवणीतून सुटका झाली.

तिने आनंदाने टीव्ही लावला आणि गाण्यांचे चॅनेल लावले तेव्हा त्यात गाणे सुरू होते: "आज मैं उपर, आसमाँ नीचे.. आज मैं आगे, जमाना हैं पिछे ss"

^^^

# 15. संकट

“हो आज मैं उपर, आसमाँ नीचे... आज मैं आगे, जमाना हैं पिछे ss"

ही गाणे सायलीचे सर्वात आवडीचे गाणे झाले होते. कारण निगेटिव्ह मेमरी ऑब्जेक्ट्स डिलीट करणे शक्य झाल्यानंतर ऐकेलेले सकारात्मक गाणे होते ते! त्यामुळे ती अधून मधून हे गाणे गुणगुणायची!

"सायली मॅडम, आसमाँ से नीचे उतर जाओ, पेशंट को होश आया है!", तिची मैत्रीण आणि नर्स असलेल्या सुप्रियाने विनोदाने म्हटले.

"नको तिथे तुझा विनोद वहावत जातो सुप्रिया!", सौम्य रागाने हॉस्पिटलच्या खालच्या मजल्यावर घाईघाईने येता येता सायली म्हणाली.

त्या दिवशी नरिमन पॉईंटला गाडीतील स्फोटात रणजित आणि सोबत असलेले बाकी इतर सर्वजण यांचा मृत्यू झाला होता. सुनिलच्या घरातील सर्वजण मानसिक धक्क्यातून अजून सावरले नव्हते. तसेच पोलीस डिपार्टमेंट सुद्धा हादरून गेले होते.

त्यानंतर दोन दिवस उलटल्यानंतर आज प्रथमच सुनिल शुद्धीवर आला होता. घरचे सर्वजण आणि पोलीस डिपार्टमेंट त्याच्या शुद्धीवर येण्याची वाट बघत होते. चिंताग्रस्त होते.

स्फोटातून आलेल्या तीव्र प्रकाशाच्या झोताने त्याच्या डोळयांना आणि मागे फेकल्या गेल्याने पाठीला मुका मार लागला होता. डोके मात्र वाचले होते. शरीराच्या प्रतिक्षिप्त क्रियेमुळे स्फोटाच्या वेळेस सुनिलने स्वत:चा हात डोळयासमोर धरला होता, त्यामुळे जास्त काही इजा डोळयांना झाली नव्हती. पण अजूनही त्याच्या डोळयांवर पट्टी बांधलेली होती. तो हॉस्पिटलमध्ये बेडवर होता. शुद्धीवर येताच त्याला डोळयासमोर अंधार जाणवला आणि स्फोटाचा आवाज, वर उडणारी गाडी आणि स्फोटाने पोलिसांचे हवेत उडणारे देह, आगीचे आणि धुराचे लोट आठवायला लागले आणि त्यात एक आवाज ऐकू येत होता: "ते लोकं वाईट आहेत, त्यांचे वाईट हाल होतील! वाईट लोकं येतील आणि वाईट लोकांना मारतील!"

एकदम हे सगळे असह्य झाल्याने तो बेडवरून उठून बसू लागला पण शरीराला लावलेल्या वेगवेगळया उपकरणांमुळे त्याला ते शक्य झाले नाही आणि सायलीने त्याचा हात धरून त्याला पुन्हा बेडवर झोपवले आणि नर्स सोबत बोलू लागली.

थोड्या वेळाने त्याच्या डोळ्यावरची पट्टी काढण्यात आली. तेव्हा सुनिलच्या लक्षात आले की हातावर घड्याळ नाही! हे लक्षात येताच त्याने अस्वस्थ होऊन इकडेतिकडे पाहिले तेव्हा समोरच्या टेबलावर त्याचे घड्याळ ठेवलेले त्याला दिसले तेव्हा त्याचा जीव भांड्यात पडला आणि पटकन ते घड्याळ त्याने हाताला बांधले. एवढ्या सगळ्या घटनेत ते घड्याळ हरवले असते तर? विचारही करवत नाही काय झाले असते!! विशेष म्हणजे घड्याळाला काहीही झाले नव्हते! काचेला तडासुध्दा गेला नव्हता.

"र र रणजित मामा कुठे आहेत?",त्याने अंग दुखत असल्याने थोड्या घाबऱ्या, कापऱ्या आणि अस्वस्थ आवाजात विचारले.

शांतता!

पोलीस आयटी सेक्शनमधल्या सारंग दातेला आणि राघव यांना चूप बसण्याची खूण करत सायलीने त्यांना बाजूला नेले.

'थोडे थांबूया आपण. त्यांना लगेच सगळे सांगू नये. तब्येत सुधारतेय त्यांची आता. पण त्यांना लगेच रणजित यांच्या मृत्यूबद्दल सांगितले तर ताण येईल!', सायलीने समजावणीच्या सुरात दोघांना सांगितले.

सारंग पोलिस डिपार्टमेटमध्ये फोन करू लागला आणि राघव यांनी घरी इतरांना कळवले की सुनिल शुद्धीवर आलेला आहे.

"डॉक्टर सायली अगदी घरच्या सदस्यासारखी काळजी घेत आहेत आपल्या सुनिलची! त्याचमुळे तो लवकर बरा झाला असे म्हणायला हरकत नाही!", राघव यांनी राधाला फोनवर सांगितले.

सुनिलला हॉस्पिटलमध्ये आणले गेले तेव्हापासूनच सायलीला त्याचेकडे बघून एक अनामिक आकर्षण निर्माण झाले होते. जणू काही हा आपला जन्मजन्मांतरीचा साथीदार आहे अशी एक लहर तिच्या हृदयात चमकून गेली. विशेष म्हणजे त्याचे चमकदार रंगीत डोळे सायली सोबतच सर्वांच्या कुतूहलाचा विषय होता. त्या चमकदार डोळ्यांमुळे सुनिलच्या चेहऱ्यात एक वेगळीच

मोहकता सायलीला जाणवली. मात्र याच्या अगदी विरुद्ध होते त्याचे शरीर!

जखमांवर उपचार करतांना त्याचे संपूर्ण उघडे शरीर बघितल्यावर तिच्या लक्षात आले होते की मूर्तीकाराने बनवलेल्या अगदी आखीव रेखीव अशा सशक्त मानवाच्या पुतळ्यासारखा तो बनलेला होता. पहिल्याच नजरेत तिचे त्याचेवर प्रेम जडले! पोलिस डिपार्टमेंटकडून त्याच्याबद्दल तिने ऐकले होतेच. जेवढे त्याच्याबद्दल ऐकले तेवढे सगळे तिच्या कायम लक्षात राहिले.

डोळ्यावरची पट्टी काढल्यानंतर जेव्हा सुनिलला सायली दिसली होती तेव्हा तो तिच्याकडे बघतच राहिला होता. सायलीचा चेहरा बघितल्याबरोबर त्याच्या हृदयात एक प्रेमाची लहर उमटू लागली होती. तिच्या कमळाच्या पाकळ्यांप्रमाणे असलेल्या दोन्ही रेखीव, काळ्याशार, बोलक्या आणि निष्पाप डोळ्यांकडे बघतच रहावे असे त्याला वाटले. एकमेकांच्या कायम लक्षात राहतील असे दोघांचे डोळे होते. तिच्या एकूणच व्यक्तिमत्वामुळे तो प्रभावित झाला. एकसारखे डोळे रोखून तो तिच्याकडे आणि ती

त्याचेकडे बघतच होते. जणू काही अदृश्य चुंबकीय लहरींनी त्यांचे डोळे एकमेकांशी बांधले गेले होते!

सायलीच्या हातांचे नाजूक लांबसडक बोटं, तसेच सायलीच्या व्यक्तिमत्वाचा एकूणच कमालीचा नाजुकपणा त्याला आतापर्यंत जाणवत आला होता. जणू काही हीच समोरची व्यक्ती आपल्यासाठी बनलेली जोडीदार आहे अशी दोघांना अंतर्मनातून जाणीव झाली. "समिधा हे तर केवळ एक तारुण्यातील आकर्षण होते आणि हीच आपल्या जन्माची जोडीदार आहे", असे सुनिलला प्रकर्षाने वाटून गेले. हिनेच तर अगदी मनापासून त्याची सेवा सुश्रुषा केली होती, नाही का?

सुप्रिया खाकरली. सुनिल हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यापासूनच तिच्या नजरेतून सायलीचे सुनिलबद्दलचे सुप्त आकर्षण सुटले नव्हते!

"डॉक्टर और पेशंट की लव्ह स्टोरी? क्या बात है!", असे म्हणून तिने सायलीला टाळी द्यायला हात पुढे केला, तर दोघेही भानावर आले.

थोड्याच वेळात राघव आणि सारंग आतमध्ये आले. डोळयांना काहीही इजा झाली नव्हती ही मुख्य जमेची बाजू होती आणि डोक्यालाही मार लागला नव्हता. पाठ थोडी दुखत होती आणि थोडा शरीराला लागलेला मुका मार ठणकत होता, बाकी तब्येत आता उत्तम होती. दोन दिवसांनी डिस्चार्ज मिळायला आता हरकत नव्हती असे सायलीने सांगितले. हॉस्पिटलचा सगळा खर्च हा पोलीस डिपार्टमेंटतर्फे करण्यात आला होता. सुनिलने एक नवा काळा गॉगल मागवून घेतला. त्या दिवशी त्याचा गॉगल तुटला होता. कालांतराने त्याला नवा गॉगल मिळाला.

दुसऱ्या दिवशी सुनिलला सांगण्यात आले की त्या दिवशीच्या स्फोटात रणजित आणि इतर सर्व सोबतचे पोलीस कर्मचारी मृत्यू पावले. सुनिलला प्रचंड धक्का बसला. रणजित यांनी केवढा मोठा विश्वास टाकला होता त्याच्यावर! आणि मिळालेली नवीन दूरदर्शन शक्ती त्यांना न सांगण्याचा निर्णय घेतल्याचा त्याला आता पश्चाताप झाला. आता त्या शक्तीचा वापर करून त्यांच्या मृत्यूचा छडा लावून दोषींना शिक्षा देणे आणि ते तपास करत असलेल्या प्रकरणाच्या मुळाशी जाणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली असणार होती.

रणजित या जगात नसल्याच्या दु:खातून सावरणे आता आवश्यक होते. कारण रणजित यांनी त्या दिवशी जे काही फक्त त्यालाच विश्वासात घेऊन सांगितले होते त्यावर आता लवकर काम करणे आणि त्याचा छडा लावणे अतिआवश्यक झाले होते. नाहीतर अनर्थ होऊ शकणार होता. उद्या सुनिलला डिस्चार्ज मिळणार होता. पण रणजित त्या दिवशी नरिमन पॉईंटला गाडीत बसतांना मला आणखी कोणती महत्वाची गोष्ट सांगणार होते??

"मला सारंगशी महत्वाचे बोलायचे आहे, आताच!", सुनिलने मनाशी एक निश्चय करून सायलीला आग्रह केला.

"आता तुम्ही आराम करा सर!", सायली म्हणाली.

"आराम करायची ही वेळ नाही आहे डॉक्टर! वेळ कमी आहे आणि खूप काही करायचे आहे! सारंगला बोलवा प्लीज!", सुनिल अगतिकतेने सायलीच्या डोळ्यात सरळ सरळ रोखून बघत म्हणाला.

"बरं बोलावते, थांबा!", सायलीने सारंगला बोलावणे पाठवले.

सारंग आल्यावर -

"अर्धा तास फक्त, जास्त ताण नको!", असे म्हणून ती निघून गेली.

आता सारंग आणि सुनिल दोघेच होते.

"सारंग, काही तपास लागला का स्फोट कुणी केला ते?"

"नाही सर! अजून ठोस काही हाती आलं नाही!"

"आणि तो तुरुंगातला गुन्हेगार जग्गू भुसनळ्या? त्याला सोडलं का?"

"नाही, बहुतेक दोन दिवसांनी सोडणार आहेत त्याला तुरुंगातून!"

"आणि लोकांना अनोळखी नंबरवरून येणाऱ्या त्या मेसेजचा काही तपास लागला का?"

"नाही अजून, ते सर्व नंबर्स ओळखण्यात अजूनपर्यंत अपयश आलेलं आहे पण तपास सुरु आहे! आणि हो काल जयवंत जसकर येऊन गेले होते आपल्या डिपार्टमेंटला!"

"ठीक आहे, तू जा आता! उद्या डिस्चार्ज मिळाले की आपल्याला बरीच कामे असतील!"

मग रात्र झाली. एक इंजेक्शन देऊन झाल्यावर सायलीने सुनिलला शांत झोपण्याचा सल्ला दिला आणि ती निघून गेली,

जातांना म्हणाली, "मी अकरा वाजेपर्यंत आहे, काही लागलं तर बोलवा!"

रात्री त्याच्याजवळ आई आलेली होती. बाजूच्या बेडवर आईचा डोळा लागला पण सुनिलला झोप येत नव्हती. पडल्या पडल्या दूरदर्शन दृष्टी वापरून जग्गू भुसनळ्या सध्या तुरुंगात काय करतोय ते बघायचे ठरवून त्याने मनातून डोळ्यांना सूचना द्यायला सुरुवात केली. त्याप्रमाणे डोळे आज्ञा पाळून अंतर सरकवत त्याला रस्ता दाखवू लागले.

हॉस्पिटल कॉरिडॉरमधून दृष्टीने पुढे जाता जाता त्याला सायलीच्या रुममध्ये एकदा डोकावून बघण्याची इच्छा झाली. ती टेबलाजवळ खुर्चीवर बसून भराभर काहीतरी लॅपटॉपवर लिहीत होती. तोंडाने काहीतरी म्हणत होती आणि टाईप करत होती. क्षणभर तिच्या ओठांकडे त्याची नजर स्थिर झाली आणि तिच्या गुलाबी ओठांकडें तो बघतच राहिला. तिचा गोड चेहरा आणि एकूणच मोहक शारीरिक हालचाली याकडे त्याची नजर खिळून राहिली. त्यातून सावध झाल्यावर त्याच्या लक्षात आले की ती कुठेच काहीच न बघता तोंडी सर्वकाही लॅपटॉपवर सहज टाईप

करते आहे. लॅपटॉपकडे जवळ नजर आणल्यानंतर त्याला दिसले की दिवसभरातील ती हॅण्डल करत असलेल्या सर्व पेशंटच्या केसेसबद्दल आठवून ती सर्व रिपोर्ट्स फाईलमध्ये न बघता आठवून आठवून लिहीत होती. पेशंटच्या तपासणीतून आलेले रिपोर्ट आणि त्यातील रीडिंग, नंबर्स, वेगवेगळया औषधांची नावं ती भराभर कुठेही न बघता टाईप करत होती. सुनिलबद्दल माहितीसुध्दा ती न बघता फटाफट लिहीत होती. हे कसं शक्य आहे?  बरं असो, ते नंतर बघतो. प्रथम जग्गू काय करतोय ते बघू असा विचार करून सुनिलने आपली दृष्टी बेडवर झोपल्या झोपल्याच दुसरीकडे वळवली. कॉरिडॉरमधून तो पुढे पुढे सरकू लागला. रात्री हॉस्पिटल मध्ये वर्दळ कमी होती. तुरळक हॉस्पिटल स्टाफ इकडून तिकडे जातांना दिसत होता.

एक नर्स इकडे तिकडे बघत बघत संशयास्पदरित्या हातातील रुमालात काहीतरी गुंडाळून सायलीच्या रुमकडे जातांना सुनिलला दिसली. विशेष म्हणजे तिच्या डोळयाभोवती प्रखर लाल ज्वाळा असलेलं वलय तळपत होतं. म्हणजे हिच्या मनात सायलीसाठी काहीतरी दुष्ट हेतू जरूर असला पाहिजे. आता दृष्टीने नाही तर स्वतःच उठून तिचा पाठलाग केला पाहिजे नाहीतर काहीतरी अघटीत घडेल!!

आईला जाग येणार नाही अशा रीतीने तो हळूच बेडवरून उठला आणि त्या कॉरिडॉरमधून हळूहळू त्या नर्स च्या मागेमागे जाऊ लागला. तिने आपला वेग वाढवला आणि रुमालात गुंडाळलेल्या गोष्टीकडे ती परत परत बघत होती आणि खात्री करून घेत होती. तिने सायलीच्या केबिनला टकटक केली, सायलीने दार उघडले आणि ती मध्ये शिरली. तोपर्यंत सुनिल दरवाज्याच्या मागे बाजूला लपला आणि दृष्टी दरवाजातून आत नेऊन आतले पाहू लागला. ती सायलीच्या ओळखीची नर्स होती.

"मॅडम, ते संध्याकाळी एक मशीन इथे विसरून गेले होते, घ्यायला आले मी!", असे म्हणून ती मशीन शोधण्याचा बहाणा करत अधून मधून संशयास्पदरित्या सायलीकडे आणि हातातल्या रुमालात गुंडाळलेल्या इंजेक्शनकडे ती बघत होती. शोधता शोधता ती थांबली.

"का गं, झालं नाही का मशीन शोधून अजून?", सायलीने लॅपटॉपवर टाईप करता करताच विचारले. नर्स दचकली.

"न न नाही, अजून! शोधते आहे!", असे म्हणून तिने क्षणार्धात हातरुमालाच्या आत लपवलेले एक इंजेक्शन बाहेर काढले आणि सायलीकडे जाऊ लागली. ती नर्स सायलीचा चेहरा एका हाताने

मागून पकडून स्वतःकडे करणार आणि एका हाताने तिचे तोंड दोन्ही बाजूनी गालावर दाबून उघडून इंजेक्शनचा स्प्रे तिच्या तोंडात मारणार तितक्यात वेगाने केबिनचा दरवाजा उघडून सुनिल आत गेला आणि त्याने खुर्चीवर बसलेल्या सायलीला जोराचा धक्का दिला. सायली खाली पडली. आणि पळायच्या बेतात असेलल्या नर्सच्या पायात पाय अडकून सायलीच्या अंगावर सुनिल पडला. या प्रकाराने सायली भांबावली आणि तिने सुनिलच्या थोबाडीत ठेऊन दिली. सुनिलला तिच्या नाजूक शरीरावरून उठायला जमते न जमते तोच ती नर्स ते इंजेक्शन घेऊन वेगाने चालत चालत जाऊन दूर असलेल्या एका वॉशरूम मध्ये शिरली.

"सॉरी मी तुम्हाला का ढकलले ते नंतर सांगतो, मला आधी त्या नर्सला पकडण्याच्या सूचना द्यायच्यात!", असे म्हणून सायलीच्या अंगावरून कसाबसा उठून उभा रहात त्याने हॉस्पिटल बाहेर उभ्या असलेल्या पोलिसांना फोन केला ते पटकन आत आले.

काही वेळासाठी हॉस्पिटलमधून बाहेर निघायला कुणालाही परवानगी नाकारण्यात आली. अर्ध्या तासापासूनचे सीसीटीव्ही

फुटेज तपासायला सांगण्यात आले. नर्सच्या सगळया हालचाली सीसीटीव्ही मध्ये दिसत होत्या पण ती लेडीज बाथरूममध्ये गेल्यानंतर ती बाहेरच आली नसल्याचे स्पष्ट झाले. अनेक वेळा व्हिडीओ प्ले केला गेला पण त्या नर्सचा ठावठिकाणा लागला नाही. नर्सच्या सगळया अंतरवस्त्रांसाहित तिने घातलेले इतर कपडे आणि एक दोन दागिने मात्र वॉशरूममध्ये सापडले. ते कपडे ओले झालेले होते कारण तिथला शॉवर सुरू होता.

हा सगळाच प्रकार एकदम गूढ होता.

त्याने पोलिसांना सूचना देऊन तपास करायला सांगितले. वॉशरूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने तपासावर मर्यादा येत होत्या.

^^^

# 16. तो आणि ती

नंतर उशिरा रात्री बराच वेळ सायली आणि सुनिल एका रूम मध्ये बोलत बसले होते. कारण या नर्सच्या घटनेनंतर चर्चा करणे आता अपरिहार्य होते. सुनिलने तीला स्वत:बद्दल सगळे सांगितले, त्याने तिला का धक्का देऊन पाडले याचे कारण सांगितले. सायलीला इंजेक्शन देण्याचा प्रयत्न करण्यामागे त्या नर्सचा नेमका काय हेतू होता, त्या इंजेक्शनमध्ये नेमके काय होते हेही कळू शकले नव्हते कारण ती नर्सच इंजेक्शनसहित रहस्यमयरित्या गायब झाली होती.

आता सायलीसारख्या काही दिवसांचाच परिचय असलेल्या नवख्या व्यक्तीला आणि डॉक्टरला आपल्या आयुष्याबद्दल सगळं सांगावं की नाही याबद्दल तो सुरुवातीला साशंक होता पण त्याची हॉस्पिटलमध्ये तिने मनापासून आपलेपणाने केलेली सेवा, त्याला तिच्याबद्दल वाटणारे प्रचंड आकर्षण आणि प्रेमभावना तसेच तिच्याही डोळयात त्याने बघितलेले त्याच्याबद्दलचे तेच भाव यामुळे त्याने सायलीला आतापर्यंतच्या सर्व महत्वाच्या घटनांबद्दल, त्याला मिळालेल्या शक्तींबद्दल सर्वकाही थोडक्यात सांगितले. त्याने तिलाही तिच्याबद्दल विचारले की कुठेही न बघता

ती कसे काय सगळे आठवून टाईप करत होती तेव्हा तिने त्याला सर्व सांगितले. तिला जन्मापासून मिळालेल्या विशिष्ट शक्तीबद्दल सांगितले.

त्याची कथा ऐकताना तिलाही अंदाज आला होताच की तिच्याप्रमाणेच तो सुद्धा मितींचे मिश्रण असलेला जीव आहे. इतरांपेक्षा वेगळा आहे. मग तिनेही तिच्या आयुष्यातील महत्वाच्या घटना त्याला सांगितल्या. तिच्या बाहुलीबद्दल सांगितले. त्यात ती अनावश्यक घटनांचा बॅकअप बाहुलीत कशा प्रकारे घेते हेही सांगितले. जसे त्याच्याजवळ त्याच्या शक्ती संदर्भात स्फटिक आहे तसंच तिच्या जवळही बाहुली आहे. फक्त सूर्यप्रताप संदर्भात ती त्याला सांगू शकली नाही कारण तो तिच्या मेमरीतून डिलीट झालेला होता. पण आपण वेळोवेळी कोणत्या तारखेला किती वाजता बॅकअप घेतला हे मात्र तिला तपशीलवार आठवत होते.

पुढे त्यांचे बोलणे सुरूच होते!

"एक महत्वाचा विचार आला आहे सायली!"

"कोणता?"

"आपल्याकडे वेळ कमी आहे. आपल्या दोघांचे जीव धोक्यात आहेतच पण एकंदरीतच रणजित यांच्या सांगण्यावरून आणखी काहीतरी मोठे कारस्थान कुठेतरी शिजते आहे!"

"होय, रात्र वैऱ्याची आहे!"

"पुढे काय करायचे याचा कोणताही प्लॅन करण्याआधी मला एक महत्वाच्या विषयी बोलायचे आहे! माझा स्फटिक घड्याळात असतो. घड्याळ हरवले किंवा कुठे राहून गेले, चोरीला गेले तर मी संकटात सापडेन. स्फटिक अंगठीत घातला तरीही त्याने फारशी परिस्थिती वेगळी होणार नाही. तसेच तुझ्या बाहुलीबद्दल आहे. ती कुठे हरवली तर? कुणी तोडली तर? आपण त्यापेक्षा तुझ्या मेडिकल ज्ञानाचा उपयोग करून सांग की माझे स्फटिक मी एखाद्या आवरणात ठेऊन मग ते आवरण सरळ माझ्या शरीरात कुठेही किंवा चेहऱ्याला कायमचा चिकटवून ठेवू शकतो का? आणि तसेच तुझ्या बाहुलीबद्दल काय करता येईल?"

तेवढ्यात तिथे दोन्ही मितीजीव आल्या, स्मृतीका आणि रंगिनी!

"आम्ही आहोत ना! आम्हाला आनंद होतोय की तुम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलात. असेच प्रेम कायम ठेवा. आणि तुम्हाला पडलेला प्रश्न आम्ही सोडवलाय!"

दोघांना आपापल्या मितीजीव एकत्र आणि अचानक आलेल्या बघून खूप आनंद झाला. ते हॉस्पिटलमधल्या अशा खोलीत होते जिथे सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते. त्यामुळी या सगळया गोष्टी रेकॉर्ड होण्याचा प्रश्न नव्हता. आता दोघांच्या आजूबाजूचे जग रंगमय होते तसेच त्यात भर म्हणून काळसर पार्श्वभूमीवर हिरवे 0 आणि 1 हे असंख्य आकडे  खालून वर, वरून खाली, आणि इकडून तिकडे असे पाण्यासारखे वाहत होते. थोडक्यात दोन्ही मितींचा प्रभाव त्यात होता.

सायली आणि सुनिल उत्सुकतेने ऐकू लागले.

रंगिनीच्या संमतीने स्मृतिका म्हणाली, "सायलीबाबत सांगायचे तर सुनिल, तू तिचा बाहुला होशील का?"

सायली आणि सुनिल हसू लागले. सायली तर सुनिलकडे बघून प्रचंड लाजून आरक्त झाली.

सुनिल सायलीकडे बघत म्हणाला, "चालेल! बाहुल्याची भूमिका सायलीसाठी मी पार पडेन! नाहीतरी सगळ्यांची नकारात्मकता शोधण्याचंच तर माझं आयुष्याचं ध्येय आहे! आणि सायलीची निगेटिव्ह मेमरीज मी आनंदाने माझ्यात साठवून घ्यायला तयार आहे. पण स्मृतिका मला एक सांग, त्या सायलीच्या

साठवलेल्या मेमरीज मला माझ्या स्वत:च्या मेमरीसारखी आठवेल का?"

"होय, सायलीच्या तुझ्या मेंदूत असलेल्या मेमरीज तुझ्या स्वत:च्या आयुष्यातील घटनांपेक्षा वेगळया करून बघण्याची जाणीवपूर्वक सवय तुला करून घ्यावी लागेल! आणि पद्धत तीच राहील! केसांना केस जोडायचे आणि डेटा ट्रान्स्फर करायचा. पण हे वन वे ट्रान्स्फर राहील! म्हणजे फक्त सायलीच तिच्या अनावश्यक मेमरी तुझ्या मेंदूत टाकू शकेल, तू तुझ्या कोणत्याच मेमरीज तिच्या मेंदूत टाकू शकणार नाहीस!"

"चालेल! चालेल! पण एक प्रश्न आहे! जर हिच्या मेमरी घेऊन घेऊन माझीच मेमरी फुल झाली तर? मीच हँग होईल ना!", सुनिल म्हणाला.

स्मृतिका म्हणाली, "ते तुम्ही ठरवा! सायलीने तिच्या मेमरीची कमीत कमी विल्हेवाट लावावी, हवी तेव्हा नको ती मेमरी सुनिलला देत बसू नये! नाहीतर बाहुली आहेच! त्यात टाकू शकतेस! पण निगेटिव्हीटी सोबत जगायला शिक! ते जास्त योग्य होईल! निगेटिव्हीटी वगळता इतर अनावश्यक मेमरी बाहुल्यांमध्ये टाकत जा! हे घ्या चार बाहुल्या अजून! त्या नीट सांभाळून ठेवण्याची जबाबदारी तुमची राहील!"

पुढे रंगिनी म्हणाली, "आणि राहता राहिला तुझा स्फटिकाचा प्रश्न! तू त्याचे योग्य उत्तर आधीच शोधले आहेस. सायलीकडून शस्त्रक्रिया करून तो स्फटिक उजव्या बाजूला चेहऱ्यावर कानाच्या वर केसांनी झाकला जाईल असा बसवून घे!"

त्या दोन्ही जशा अचानक आल्या तशा लगेच निघूनही गेल्या. त्या गेल्यानंतर सायली आणि सुनिल बराच वेळ एकमेकांकडे बघत राहिले. नजर एकमेकांवरून हटेना. एकसारखे एकमेकांकडे बघण्याचा परिणाम असा झाला की त्यांच्यात प्रचंड आकर्षण निर्माण होऊन एकमेकांचा चेहरा हातात घेऊन कीस घेण्याची त्यांना अनिवार इच्छा निर्माण झाली आणि तिच्याही डोळ्यातले तेच भाव ओळखून सुनिलने दरवाजा बंद केला, सायलीला उचलून टेबलावर बसवले, भिंतीला टेकवले आणि तिचे केस चेहऱ्यावरून मागे हटवून अधाशासारखा तिच्या कपाळापासून तिच्या हनुवटीपर्यंत आणि तिच्या मानेच्या प्रत्येक भागाचे तो चुंबन घेऊ लागला. ती आनंदाने डोळे बंद करून हा अनुभव घेत राहिली. नंतर मग त्याने स्पर्शासाठी अधीर झालेल्या तिच्या ओठांवर आपले ओठ टेकवले आणि बराच वेळ तिच्या ओठांचा कीस वेगवेगळ्या प्रकारे वेगवेगळ्या कोनांतून तो घेतच राहिला. अधूनमधून डोळे उघडून त्याच्या रंगीत चमकणाऱ्या डोळ्यांकडे बघत बघत मंत्रमुग्ध

होत तिनेही त्याच्या या किसला अगदी मनापासून साथ दिली. मग तो कीस घ्यायचा थांबला. थोडा वेळ एकमेकांकडे ते बघत राहिले. नंतर लगेच तिने त्याचे बराच वेळ चुंबन घेतले. नंतर थोडा वेळ थांबल्यावर आपण हॉस्पिटलमध्ये असल्याची जाणीव होऊन त्या दोघांनी सावरून आधी बाहुलीचा डेटा सुनिलमध्ये त्याच्या केसांना बाहुलीचे केस जोडून ट्रान्स्फर केला. ती बाहुली आणि इतर नव्या बाहुल्या पर्समध्ये ठेवल्या आणि दरवाजा उघडून ते बाहेर आले.

बाहेर सुनिलच्या आदेशानुसार पोलिसांचा विविध प्रकारे नर्सचा शोध सुरूच होता. आताच रात्री शस्त्रक्रिया करून सुनिलच्या चेहऱ्यावर ते स्फटिक एका आवरणात कायमचे बसवून टाकायचे होते. त्याप्रमाणे सायलीने शस्त्रक्रिया केली. शरीराला कायम स्पर्श होऊ नये यासाठी ते स्फटिक एका अशा धातूमध्ये फिट्ट बसवले ज्याच्यामुळे शरीराला इन्फेक्शन किंवा अपाय होणार नाही आणि मग शस्त्रक्रिया करून ते चेहऱ्यावर कायमचे बसवले. आता चेहऱ्यावर केसांनी झाकलेले ते स्फटिक कुणाला दिसणारही नव्हते आणि आणि त्याच्यापासून कधीही दूर जाणार नव्हते. पण ते घड्याळ मात्र आठवण म्हणून त्याने कायम वापरायचे ठरवले.

^^^

# 17. प्रवास सुरू

रात्री 3 वाजले होते. नुकत्याच घडलेल्या घटनांचा आढावा आणि आता पुढे काय करायचे याबद्दल सुनिल आणि सायली विचार करत होते. दोघांच्या कुटुंबांना एकमेकांच्या प्रेमाबद्दल लवकरच सांगायचे असेही ठरले. सुनिलला आता बरे वाटत होते. स्फोटानंतर झालेल्या त्याच्या जखमा आणि एकूणच त्रास कमी झाल्यात जमा होता.

सुनिलच्या रुममध्ये झोपलेल्या आईला अचानक जाग आली आणि ती पाणी प्यायला उठली तेव्हा तिला सुनिल बेडवर दिसला नाही. तेव्हा पाणी पिऊन ती सुनिलला शोधायला दरवाज्याजवळ यायला लागली.

सुनिल आणि सायली ज्या रूम मध्ये बसले होते त्याच्या खिडकीबाहेर एक वेल होती. ती पार हॉस्पिटलच्या टेरेसवरच्या पाण्याच्या टाकी पर्यंत वाढलेली होती. त्या वेलीच्या आधारे हिरव्या रंगाचा एक साप सरपटत सरपटत आणि लपत छपत टेरेस

वरून हळूहळू खाली येत होता. पण नीट जवळून पाहिले असता तो साप खरा नसून यांत्रिक आहे असे दिसून येत होते.

तो साप वेलीवरून काचेच्या खिडकीवर आला. खिडकीवर येऊन त्याने आपला फणा उगारला आणि त्याच्या जिभेच्या भागातून वेगाने दोन बंदुकीच्या गोळया निघाल्या आणि खिडकीची काच तडकून त्या आत सुनिलकडे आल्या. सायलीचे तोंड खिडकीकडे असल्याने तिला ते जाणवले आणि तिने प्रतिक्षिप्त क्रियेने सुनिलला बाजूला ढकलले आणि वेगाने त्याचा हात धरून तिने त्याला रूम बाहेर ओढले आणि दरवाज्यातून व्हरांड्यात दोघे पळायला लागले.

तोच सुनिलला आई दरवाज्यापाशी दिसली आणि ही गडबड ऐकून सारंग आत पळत येताना दिसला. त्याने सारंगला खूण करून आईची काळजी घेऊन तिला घरी सुखरूप पोचवण्याची विनंती मोठ्याने ओरडून सांगितले कारण तो दूर होता. इतर पोलीस त्या दोघांच्या मदतीला धावले.

तेवढ्यात हॉस्पिटलमधल्या छतावर पण तसाच एक छताच्या रंगाचा यांत्रिक साप सरपटत होता आणि त्याने फणा उगारून खाली पळत असलेल्या दोघांवर गोळीबार करायला सुरुवात केली.

इतर पोलिसांचे आणखी काही सापांकडे लक्ष गेल्यानंतर त्यांनी सापांवर गोळीबार करायला सुरुवात केली आणि ते यांत्रिक साप तुटून तुकडे होऊन खाली पडायला लागले. तोपर्यंत विविध खिडक्यांमधून साप सरपटत आतमध्ये आले आणि सुनिल सायलीवर गोळीबार करू लागले. त्यांच्यापासून वाचण्यासाठी सुनिल सायली पायऱ्यांवरून पळत पळत सर्वात खालच्या मजल्यावर मोठ्या हॉलमध्ये आले. दरम्यान नवीन साप दिसला की पोलीस त्यांच्यावर गोळीबार करून त्यांचे तुकडे करत होते. या गडबडीत सायली स्वत:जवळ पर्स घ्यायला विसरली नाही कारण त्यात बाहुल्या होत्या.

हॉस्पिटल स्टाफमध्ये एकच हलकल्लोळ माजला. पळापळ सुरू झाली. सुनिल सायली हात धरून गोळ्यांचा भडीमार वाचवत पळतच होते.

एवढ्यात मेन गेट जवळ एक अर्धी लाल आणि अर्धी काळ्या रंगाची मोठी सहा आसनी लांबलचक प्रशस्त कार येऊन थांबली. त्या कारच्या खिडकीतून योध्यासारखा पेहराव केलेली आणि ब्लॅक बॉडी फिट्ट ड्रेस घातलेली एक स्त्री हाका मारू लागली, "सुनिल सायली लवकर गाडीत बसा. काहीच विचार करायला वेळ नाही. गाडीकडे पळत या आणि बसा पटकन!"

ही गाडी कोणाची, ही स्त्री कोण, तिला आपल्या दोघांची नावे कशी काय माहित, आपल्यावर हल्ला झाला हे यांना कसे माहिती आणि आपल्याला इतक्या रात्री एवढी मोठी गाडी घेऊन ते का वाचवत आहेत हे सगळे प्रश्न जितक्या वेगाने त्यांच्या मेंदूत आले तितक्याच वेगाने ते दोघे त्या स्त्रीचं ऐकून त्या गाडीकडे पळाले, गाडीचे स्लायडींग दरवाजे उघडले आणि सर्वात मागच्या दोन सीट्स वर ते दोघे घाईत जाऊन बसले. त्यांना दोघांना योगायोगाने गोळ्या लागल्या नव्हत्या, फक्त थोडेसे हाताला आणि खांद्याला खरचटले होते.

ते दोघे बसताच गाडी वेगाने शहरांतील रस्त्यांवर पळायला लागली. त्यांच्या पुढील सीटवर एक स्त्री आणि एक पुरुष बसलेले

होते आणि सर्वात पुढच्या सीटवर ड्रायव्हर आणि ती ब्लॅक ड्रेसवाली हाका मारणारी स्त्री बसली होती. ती मागे वळून म्हणाली, "ठीक आहात ना तुम्ही दोघे?"

सायली आणि सुनिल मानेनेच हो म्हणाले, काय बोलायचे त्यांना सुचतच नव्हते, कारण ते दोघे आधीच घाबरलेले होते. मधल्या सीट वरच्या दोघांनीही मागे पाहिले आणि त्यांना शांत रहा, घाबरू नका असे खुणेने सांगितले. मग त्यांना चालत्या गाडीतच प्रथमोपचार केले गेले.

ती लांबलचक गाडी मुंबईच्या रस्त्यांवरून उत्तर रात्री वेगाने धावत राहिली.

मुंबई महानगराबाबत काय बोलावे? अफाट शहर! प्रचंड माणसे! हे शहर कधीही झोपत नाही म्हणतात! सतत वर्दळ सुरू! मार्केटमध्ये, लोकल ट्रेनमध्ये, बसेस मध्ये सतत गर्दी असते. या शहरातून रोज अनेक लोक विविध निमित्ताने जगभरातील विविध देशांत जात येत असतात. अनेक जण शिक्षण घ्यायला, आपले नशीब आजमावून बघण्यासाठी, नोकरीसाठी देशभरातून या शहरात रोज येत असतात.

शेयर बाजारातील चढ उतारामुळे अनेक जण श्रीमंतांचे आणखी श्रीमंत होत असतात, तर कधी  रस्त्यावर येतात. या शहरात अती श्रीमंती आणि अती गरिबी दोन्हीही बघायला मिळतात.

मेहनत करायची तयारी असली तर आपल्या अंगभूत गुणांना, कलांना, कौशल्यांचा हे शहरच एक व्यासपीठ मिळवून देत तुम्हाला प्रसिध्दी आणि पैसा मिळवून देतं. भारतीय चित्रपसृष्टीचे केंद्र आणि संपूर्ण भारताला चित्रपटसृष्टीचे स्वप्न दाखवणारे दादासाहेब फाळके  आणि मराठी चित्रपटसृष्टी सुद्धा याच मराठी मातीतली! अनेक मोठी हॉस्पिटल्सया शहरातच! जवळ असलेला समुद्र किनारा या शहराच्या उपयुक्ततेत आणखी भर घालतो.

देशाच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका हे शहर निभावतं. पण अनेक कारणांमुळे या शहरात वाढलेली गुन्हेगारी, गुंडगिरी आणि टोळीयुद्ध हे मुंबईच्या कर्तव्यदक्ष पोलिसांची एक डोकेदुखी बनून राहिली आहे. मुंबई पोलिसांचे नाव कर्तव्य दक्षतेच्या बाबतीत जगभरात आदराने घेतलं जातं. मग ते

सीआयडी असो की विशेष तपास यंत्रणा असो, दहशतवाद विरोधी संस्था असो की नेहमीचे पोलीस दल असो! या आणि इतर महत्त्वाच्या गोष्टींमुळेच की काय हे शहर नेहमी दहशतवाद्यांच्या आणि समाज कंटकांच्या निशाण्यावर असतं. या शहराला खिळखिळे केले, जखम केली की संपूर्ण देशच वेदना अनुभवतो हे त्यांना माहीत असतं.

मुंबईने आतापर्यंत अनेक हल्ले झेलले आणि मुंबईकरांच्या कधीही नष्ट न होणाऱ्या एकात्मता आणि ऊर्जा उत्साहाच्या आधारे पुन्हा पुन्हा ती नव्या जोमाने उभी राहिली आहे. आता तर पोलिसांवरच हल्ला झाला होता. रणजित सारख्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांना प्राण गमवावा लागला होता. त्या आधी सायन्स फेस्टीव्हल वर हल्ला झाला होता. मुंबई शहरात नवनवीन हत्यारं पसरवण्याचा डाव सुरू होता. आता तर काहीतरी नवीनच षडयंत्राची चाहूल लागली होती आणि पुन्हा एक हल्ला आय टी सेल मधल्या सुनिल वर झाला होता, पण सायली सारख्या डॉक्टरवर सुद्धा हल्ला का झाला असावा? पण आता मात्र पोलिसांचे एक नवे गुप्त दल सावध झालेले होते आणि ही गाडी त्याचाच एक भाग होती.

ती लांबलचक गाडी आता गेट वे ऑफ इंडियाच्या जवळ येऊन पोहोचली होती. दरम्यान गाडीमध्ये जास्त वेळ कुणी एकमेकांशी बोललं नाही कारण गाडीत सुनिल आणि सायली या दोघांना चेहऱ्यावर अतिशय फिट्ट बसतील असे मास्क देण्यात आले. त्या दोघांव्यतिरिक्त गाडीत असलेले इतर चार जण हेसुद्धा मास्क घातलेलेच होते. म्हणजे सायली आणि सुनिलला त्या इतर चौघांचे खरे रूप, खरे चेहरे अजून माहिती नव्हते. सुनिलची शक्तीसुद्धा त्या गाडीतल्या कुणाबाबतही काही नकारात्मक संकेत देत नव्हती त्यामुळे तसे त्याने सायलीला ही हळू आवाजात सांगितले आणि त्यामुळे तो निश्चिंत होता. दरम्यान प्रत्येक गोष्ट सायलीच्या पूर्णपणे लक्षात रहात होती.

ड्रायव्हरच्या बाजूला बसलेली ब्लॅक ड्रेस घातलेली स्त्री मागे बघून थोडक्यात एवढेच म्हणाली होती की,

"घाबरू नका. आम्ही पोलीस दल, राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा, सैन्याचे तिन्ही दल, सायबर सुरक्षा, भारतीय औषधनिर्माते आणि डॉक्टर्स संघटना, वैज्ञानिक संघटना, तंत्रज्ञ आणि विविध गुप्तचर विभाग यांनी एकत्रपणे सुरू केलेल्या एका नव्या मोठ्या

आंतरराष्ट्रीय व्याप्ती असलेल्या पण स्वतंत्र अस्तित्व आणि स्वतंत्रपणे ऑपरेट होणाऱ्या एका गुप्त पथकाचा एक भाग आहोत, पण हे पथक अजून त्याच्या विकसनशील अवस्थेत आहे आणि तुम्ही दोघे अधिकृतपणे त्याचा लवकरच एक भाग होणार आहात. बाकी माहिती लवकरच मिळेल. त्या आधी आपण लवकर गेट वे ऑफ इंडियाला पोहोचायचे आहे, तिथून कुठे जायचे ते लवकरच कळेल तुम्हा दोघांना. आणि हो, तुमचे मोबाईल फोन सध्या स्विच ऑफ करा!"

सायली आणि सुनिल दोघांनी, "कमीत कमी आम्हाला आमच्या घरी निरोप देऊ द्या!" अशी विनंती केली तेव्हा दोघांनी एकेक फोन करून थोडक्यात झालेल्या हल्ल्याबद्दल घरी माहिती दिली आणि आम्ही सुखरूप आहोत असे सांगितले आणि "लवकरच आम्ही पुन्हा तुम्हाला कॉन्टॅक्ट करू, तेव्हा घाबरू नका!" असे सांगितले. सुनिलची आई सुद्धा घरी सुखरूप पोहोचलेली होती. मग दोघांनी आपापले मोबाईल फोन्स स्विच ऑफ केले.

गाडी एका लांबलचक अंधाऱ्या सब वे मध्ये शिरली. तो बोगदा खूप मोठा होता. मग गाडीने अचानक इतका वेग पकडला की जणू काही ती बुलेट ट्रेन आहे की काय असे वाटले! बऱ्याच वेळानंतर त्या बोगद्यातील एका पर्यायी मार्गाने ती बाहेर आली. वेगाने प्रवास करत लवकरच गाडी गेटवे ऑफ इंडियाला पोचली तिथे अजून पोलीस दलातील चार व्यक्ती त्या गाडीची वाट बघत होते.

मग ड्रायव्हर बाजूची ती स्त्री आणि इतर चार जण असे खाली उतरले. मग पटकन त्यांना समुद्राजवळ जायला सांगण्यात आले. मग तो ड्रायव्हर आणि त्या इतर चार पोलिस दलातील व्यक्ती हे त्या लांब गाडीतून पुन्हा भरधाव वेगाने उलट्या दिशेने निघून गेले.

"चला चला पटकन, जहाज येण्यातच आहे, " ती काळ्या कपड्यांतील स्त्री म्हणाली आणि त्यांना तिच्या मागे बंदरावर चालायचा आग्रह करू लागली.

सायली म्हणाली,  "जहाज? आपण कुठे जातोय? काहीच स्पष्टता नाहीये. कुणी सांगेल का? निदान तुमची नावं कळू शकतील का आम्हाला?"

ती स्त्री त्या इतर दोघांकडे बोट दाखवून हसून म्हणाली, "ही आहे निद्राजीता आणि हा आहे हाडवैरी!"

ते दोघे हात जोडून म्हणाले, "नमस्ते!"

"निद्राजीता, हाडवैरी? ही काय भानगड आहे?", सुनिल तोंड तिरपे करत म्हणाला.

दोघे हसले. ती स्त्री म्हणाली, "तुम्ही दोघे जसे सुपरनॅचरल पावर मिळालेले व्यक्ती आहात, तसेच हे दोघे सुद्धा आहेत!"

"म्हणजे आमच्याबद्दल आणि आमच्या सुपर पावरबद्दल तुम्हाला सगळं माहित आहे? कसं काय?", सुनिल सायली एकदम म्हणाले.

ती स्त्री म्हणाली, "ते मी नंतर सांगेनच! तोपर्यंत किप गेसिंग! आता फक्त भराभर चालत राहा, नुसते बोलू नका! माझ्या मागे या! तुम्ही चौघे एकमेकांचा परिचय करून घ्या आणि माझा परिचय मी नंतर देईन! तोपर्यंत मला मिस ब्लॅक लेडी म्हटलं तरी चालेल!"

ते दोघे जण सुनिल सायलीला त्यांचा परिचय विचारतांना म्हणाले, "आम्हां दोघांना तुमची नावं माहित नाहीत! फक्त एवढेच माहिती होते की आमच्या सारखे फक्त आम्हीच नसून तुम्ही सुद्धा आहात आणि असे आपण महाराष्ट्रातील फक्त चौघेच नाही आहोत तर असे वेगवेगळी पावर असलेले अनेक जिल्ह्यांत,

राज्यांत अनेक आहेत. त्यांची शोधमोहीम सुरु आहे. आता सांगा तुमची नावं काय?"

"मी सुनिल साहसबुद्धे किंवा डिटेक्टिव्ह निगेटिव्ह आणि ही आहे सायली प्रथमे किवा मेमरी डॉल!", सुनिल सांगू लागला.

"हे काय, तुम्हाला मराठीतून नाव नाही?", निद्राजीता ने विचारले.

"न .. नाही, म्हणजे आम्ही तसा विचारच केला नाही!", सायली बोलली.

"आम्हाला तसा तुमच्या पावरबद्दल अंदाज आहे, त्यामुळे आम्ही तुमचे मराठीतून नामकरण केले तर चालेल का?", निद्राजीता म्हणाली.

"नक्की! नक्की!", सुनिल सायली म्हणाले.

"मग.. ऐक तर! तू आहेस नकार शोधक आणि ही आहे अति स्मृती! काय कशी वाटली नावं!"

"नावं छानच आहेत! आवडली. तुमची इंग्रजीतील नावे काय आहेत? आणि तुम्ही दोघे कुठले? मुंबईचेच का?"

"आम्ही पुण्यातील! आमची नावं - ही आहे स्लीपलेस आणि हा आहे बोन ब्रेकर!"

"तुमच्या या नावांवरून आम्ही अंदाज बंधू शकतो की तुला कदाचित कधीही झोपायची गरज पडत नसावी आणि हा इतरंची हाडे ब्रेक करत असावा!"

"वा बरोबर! पण अजून एक आहे, ते म्हणजे माझी हाडे मात्र अनब्रेकेबल आहेत! कधीही तुटत नाहीत! कितीही उंचावरून उडी मारली, कुठेही पडलो आणि धडपडलो तरीही!", हाडवैरी बोलला!

तेवढ्यात सायलीने विचारले, "आणि अजून एक! तुमच्या पण काही मिती नियंत्रक आहेत का?"

याचे उत्तर ते दोघे देणार तेवढ्यात त्या ब्लॅक लेडीने त्यांना चूप केले आणि समुद्रात समोर बघायला सांगितले. रात्रीच्या अंधारात समुद्राच्या त्या अथांग पाण्यातून हळूहळू एक जहाज येतांना दिसले. ते एक दुमजली मोठे प्रवासी जहाज होते जे मोठ्या आणि खोल अथांग समुद्रातून प्रवास करू शकेल. ते पाचही जण त्या जहाजात चढले. त्या काळया पोशाखातील स्त्री च्या मार्गदर्शनानुसार प्रथम ते डेकवर चढले, तिथे कित्येक सिक्युरिटी गार्डस होते. त्या ब्लॅक लेडीने तिचे डिजिटल ओळखपत्र दाखवले आणि मगच त्यांना सर्वांना तिच्या मागे जहाजावर प्रवेश मिळाला. जहाज सर्व प्रकारच्या सुरक्षा यंत्रणांनी सज्ज होते. जसे आग लागल्यास फायर फायटर यंत्रणा होती तसेच जहाजाला कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास, जहाजात पाणी शिरल्यावर जहाजावरील सर्व प्रवाशांना

वाचवण्यासाठी सर्व प्रकारची जीवरक्षक प्रणाली, लहान सुसज्ज होड्या तयार होत्या.

ब्लॅक लेडी म्हणाली, "आता येथे तुम्ही सर्व जण सुरक्षित आहात. या माझ्या मागे पायऱ्यांनी खाली हॉल मध्ये या!"

हॉलमध्ये प्रत्येक ठिकाणी ठराविक अंतरावर जहाजाचा नकाशा लावलेला होता. प्रत्येक मजल्यावरील खोल्या, कॉरिडॉर यांच्या मार्गिका तसेच हॉटेल्स आणि हॉल वगैरे सगळ्या गोष्टींचा तो मॅप होता. आपत्कालीन परिस्थितीत कुठे जावे याचे मार्गदर्शन आणि इमर्जन्सी फोन नंबर्स तिथे लिहिलेले होते तसेच जीव वाचवण्यासाठी काय करावे याच्या मार्गदर्शक सूचना चित्रांसहित सगळीकडे लावलेल्या होत्या. आता उजाडले होते. सूर्य वर यायला सुरुवात झाली होती. समुद्राच्या अथांग पाण्याच्या पार्श्वभूमीवर सूर्य उगवताना बघणे हा काही वेगळाच अनुभव होता. हॉल मधल्या खिडक्यांमधून ते मनोहारी दृश्य दिसत होते. जहाज अधूनमधून सौम्य हेलकावे खात होते. जहाजाचा संपूर्ण यांत्रिक भाग तळमजल्यावर होता. एव्हाना जहाजाने मुंबईहून निघून भारताच्या दक्षिण दिशेला इंडियन ओशनकडे प्रवास सुरू केलेला होता. हॉल

मधून निघून कॉरिडॉर पार करून ते चौघे ब्लॅक लेडी मागे गेले. एका रूमचे दार तिने कोड टाकून आणि फिंगर प्रिंट स्कॅन करून उघडले.

सर्वजण तिच्या सांगण्यानुसार तिच्या मागे रूममध्ये गेले आणि दार बंद झाले.

"आता सर्वांनी मास्क काढण्यास हरकत नाही!", असे म्हणून तिने स्वतःचा ही मास्क काढला आणि सुनिलला तिच्याकडे बघून धक्काच बसला. सुनिलच्या हातातला स्वतःचा मास्क सुद्धा त्या धक्क्याने खाली गळून पडला.

^^^

# 18. जहाजावर

ती स्त्री नेत्रा होती. डॉ नेत्रा रघुरामन. "संपूर्ण हॉस्पिटल" मधले डॉक्टर संपन्न सूत्रे यांची मैत्रीण, आय स्पेशालिस्ट! ज्यांच्याकडे लहानपणी सुनिलला दाखवले होते. दोन्ही डॉक्टर सुनिलच्या फॅमिलीचे चांगलेच परिचयाचे होते.

"मला माहित आहे सुनिल तुला धक्का बसला असेल!" नेत्रा म्हणाली.

"न नक्कीच! गेल्या काही दिवसात जे घडतंय ते सगळंच अतिशय वेगात आणि अनाकलनीय पद्धतीने घडत आहे!", सुनिल श्वास रोखून म्हणाला.

"होय आणि यापुढे आणखी काही अनाकलनीय पण अभद्र आणि तेही वेगाने घडण्याआधी आपल्याला आपला वेग वाढवायचा आहे आणि ते घडणं टाळायचं आहे!", नेत्रा कमालीच्या चिंतेच्या सुरात पण अधिकारवाणीने म्हणाली.

ते चौघेजण एकमेकांकडे आश्चर्याने बघू लागले.

नेत्रा म्हणाली, "मी तुम्हाला सगळं काही सांगते तुम्ही समोर नीटपणे बसून घ्या!"

सर्वजण रूम मधल्या सोफ्यावर बसले. नेत्रा मात्र उभीच होती.

नेत्रा पुढे सांगू लागली, "जयवंत जसकर यांचा एक महत्त्वाचा मेसेज माझ्या गॅजेटवर आता आलेला आहे. माझ्याजवळ हाताला बांधलेले वेगळ्या फ्रिक्वेन्सी बँडमध्ये ऑपरेट होणारे एक मोबाईल सारखे गॅजेट आहे. हे गॅजेट तुम्हालाही लवकरच देण्यात येईल. फक्त आपल्या संस्थेचे अधिकृत मेंबर्सच या गॅजेट्सवर मेसेज पाठवू शकतात. इतर कोणालाही ते वाचणे, ऐकणे आणि डिकोड करणे शक्य होत नाही. त्या मेसेज संदर्भात आणि इतर काही गोष्टींचा उलगडा करण्याआधी मी तुम्हाला हे सांगू इच्छिते की आपण निघालो त्याच दरम्यान आपल्यासारखीच आणखी एक लाल काळी गाडी आणखी एका ठिकाणाहून निघाली होती. त्या गाडीतसुद्धा आपल्यासारखेच असे पाच जण होते म्हणजे ड्रायव्हर वगळता पाच जण! ते पाच कोण होते माहिती आहे तुम्हाला?"

सर्वजण एकमेकांकडे पुन्हा आश्चर्याने बघायला लागले.

"ती पाच जण होते आपणच!"

"आपणच म्हणजे?"

"त्या गाडीत आपल्या पाचही जणांचे हुबेहूब मुखवटे घातलेले इतर पाच जण म्हणजे पाच अगदी खरे वाटणारे विशिष्ट प्रकारच्या मेणापासून बनवलेले पुतळे होते, ड्रायव्हर वगळता! मग आपण

विशिष्ट प्रकारच्या तंत्रज्ञानाने बनवलेल्या आपल्या गाडीचा वेग आपण इतका वाढवला की त्यांना त्या वेगाशी स्पर्धा करता आली नाही आणि आपली गाडी वेगाने सबवे मधून बाहेर पडून गेटवेकडे मार्गस्थ झाली सुद्धा! पण दरम्यान सबवे मध्ये आपला पाठलाग करणाऱ्या त्या गाडीच्या पुढे ती दुसरी डुप्लिकेट काळी लाल गाडी आली आणि त्यांना चकवत सबवे मधून बाहेर काढत तिच्या मागे नेत त्यांना वेगळ्याच रस्त्यावर आणले!"

नेत्रा पुढे म्हणाली, "तुमच्यावर हॉस्पिटलमध्ये हल्ला झाला, तो ज्यांनी केला त्यांचे साथीदार आणखी हॉस्पिटलच्या इमारतीच्या आसपास टपून बसलेले असावे कारण हॉस्पिटल मधून तुम्ही वाचल्याने त्यांचा प्लॅन बी सुरू झाला असावा. म्हणजे आपल्या गाडीचा पाठलाग सुरू झाला होता. कारण यांत्रिक सापांना कंट्रोल करणाऱ्या म्हणजे तुमच्यावर हल्ला करणाऱ्या त्या माणसाने तुम्ही लाल काळ्या गाडीतून पळून जात असल्याचे त्या प्लॅन बी वाल्या गाडीला सांगितले असावे!"

"बापरे, हे इतकं सगळं घडलं आणि ते कशासाठी?", सायली भीतीयुक्त आश्चर्याने विचारत होती.

"या मागची कारणे जेवढी मला माहिती आहेत ती मी तुम्हाला सांगणारच आहे. पण त्यापूर्वी मी जे सांगत होते ते पूर्ण करते. तर, त्यांना पद्धतशीरपणे चकवण्यासाठी आपणही तयार होतो. त्यामुळे

एक डुप्लिकेट काळी लाल गाडी सबवे मध्ये तयार होती आणि आणखी आपल्या गाडीसारख्या गाड्या अनेक ठिकाणी आपण तयार ठेवल्या होत्या. कारण आपल्या जवळही प्लॅन बी, सी, डी होते. मी सांगितले त्यानुसार सबवे मध्ये त्या पाठलाग करणाऱ्या गाडीच्या समोर आता आपल्या गाडीसारखी पण डुप्लिकेट गाडी होती, आपल्या सगळयांच्या चेहेऱ्याचा मास्क घातलेल्या पुतळयावाली! म्हणून आपण इथे आता जहाजावर सुरक्षित आहोत!"

"आणि पुढे त्या गाडीचे काय झाले?'

"होय सांगते. आपले मिशन सक्सेसफुल झाल्याचा मला मेसेज आला. त्यानुसार असे घडले की, डुप्लिकेट गाडी अतिशय वेगाने पुढे जात होती. तिचा पाठलाग करणाऱ्या गाडीमध्ये ड्रायव्हर व्यतिरिक्त दोन माणसे होती. मग आपल्या डुप्लिकेट गाडीने अचानक यू टर्न घेतला आणि त्या पाठलाग करणाऱ्या गाडीच्या समोर वेगाने जाऊ लागली. आपल्या डुप्लिकेट गाडीच्या ड्रायव्हरने लाल काळया गाडीतून वेगाने ठरल्याप्रमाणे उडी मारून स्वतःचा जीव वाचवला आणि दोन्ही गाड्या एकमेकांवर वेगाने आदळून प्रचंड स्फोट झाला आणि पाठलाग करणाऱ्या गाडीतील लोक मारले गेले. आणि महत्त्वाचं म्हणजे तुम्ही चौघे वाचलात

आणि तुमचे पुतळे मारले गेले! आणि आपल्या गाडीच्या ड्रायव्हरला घ्यायला आपला एक माणूस बाईकवर आला होता!"

"तुम्हीपण वाचलात ना नेत्रा डॉक्टर. स्वतःचा जीव धोक्यात घालून आम्हाला तुम्ही वाचवले! तुमचे आभार कसे मानावे हेच कळत नाही", सुनिल कृतज्ञपणे म्हणाला. बाकीच्यांनी सुद्धा संमती दर्शवली.

"होय ते माझे कामच आहे आणि मला माहित आहे तुमच्या मनात आता वेगळ्या शंकाकुशंका आणि प्रश्नांची मालिका सुरू झाली असेल. त्या सगळ्या गोष्टींची उत्तरे मी देणार आहे. किंबहुना ते सगळे तुम्हाला आता लवकरात लवकर सांगणे आवश्यकसुद्धा झालेलं आहे. पण त्याआधी थोडे फ्रेश व्हा, खाऊन घ्या. कारण दरम्यान मला जहाजावर काही महत्वाच्या सूचना द्यायच्या आहेत आणि वेगवेगळे मेसेज करायचेत. मग आपण थोड्यावेळाने बोलू. जयवंत जयकर यांचा जो मेसेज आलेला आहे त्यातून आणखी एका गोष्टीचा उलगडा झालेला आहे तोही मी तुम्हाला सांगेनच!"

असे म्हणून नेत्रा त्या रूम मधून बाहेर निघून गेली.

^^^

# 19. चाहूल

सुनिलला जाग आली. क्षणभर आपण कुठे आहोत हे त्याला उमगलेच नाही, मग त्याने आजूबाजूला बघितले तेव्हा खिडकीतून बघितल्यावर त्याला कळले की तो जहाजवरच्या एका खोलीत आहे आणि जहाज सौम्यपणे हेलकावे खात आहे. रूम मध्ये तो एकटा होता.

"म्हणजे इतर तिघे वर डेकवर गेले असावे आणि मला झोप लागून गेली असावी. आता रूम बाहेर जाऊन सर्वांना शोधतो कारण डॉक्टर नेत्रा पण काहीतरी सांगणार होत्या त्याला माझ्यामुळे उशीर व्हायला नको!", असा विचार करून तो रूम बाहेर आला आणि कॉरिडॉरमधून चालत चालत हॉलमध्ये आला. पण हॉल मध्ये कुणीही नव्हते. अरे? सगळेजण गेले कुठे? त्याने इतर ठिकाणी जाऊन बघितले, अनेक रूम्स ठोठावून पहिल्या, किचन मध्ये चेक केले कुठे, कुठेच कोणीही नव्हते. जहाजाचा कप्तान पण सुकाणू जवळ नव्हता. जहाज आपोआप चालते आहे? असे कसे शक्य आहे?

मग डेकवर जाण्यासाठी पायऱ्या शोधून तो वेगाने वर चढला.

"आपल्याला झोप लागून गेली म्हणून उशीर झाला. सगळेजण नक्की डेकवर जमले असतील. तिथे काहीतरी महत्त्वाची चर्चा चालली असणार!", असा विचार करत पायऱ्या चढतांना त्याला अपराध्यासारखे वाटत होते.

डेकवर येऊन बघतो तो काय, शुकशुकाट होता. कुणीही नव्हते. सगळेजण गेले कुठे? नक्की काहीतरी गडबड आहे, मी आता माझी दूरदृष्टी वापरतो. असे म्हणून त्याने डेकवर असलेल्या कठड्याला धरून उभे रहात केसांच्या आत लपलेल्या स्फटीकाला स्पर्श केला. थंड समुद्री वारा वाहात होता आणि जवळपास माथ्यावर सूर्य आलेला होता. त्याने जहाज जात असलेल्या दिशेच्या विरूद्ध दिशेने तोंड केले आणि मनाने डोळयांना सूचना देऊ लागला आणि थोडे थोडे अंतर कापत कापत त्याची दृष्टी गेटवे ऑफ इंडियाला पोहोचली. दुपार असूनही तिथे कुठेही माणसांची वर्दळ नव्हती. ताज हॉटेलमध्ये दृष्टीने शिरून त्याने पहिले की सर्व दरवाजे रूम उघडे होते, किचन मधले दरवाजे उघडे होते, परंतु कुठेही माणसे दिसत नव्हती. अरेच्या? ही काय भानगड आहे! नंतर

पुढे जाऊन एकेका मजल्यावरच्या कॉरिडॉरमध्ये तो आपली दृष्टी नेऊ लागला. सर्वत्र शुकशुकाट दिसत होता.

शेवटी एका मजल्यावरच्या कॉरिडॉरमध्ये दूर एक माणूस त्याला दिसला. त्याच्या चेहऱ्यावर निराशा, खिन्नता आणि विषाद असे भाव होते. तो अतिशय करुणपणे रडत होता आणि त्याने दोन्ही हात मदतीसाठी पसरलेले होते आणि जणू काही तो म्हणत होता की मला वाचवा! मी इथे एकटा आहे. सुनिलने वेगाने त्याची दृष्टी त्या माणसाकडे नेण्याचा प्रयत्न केला तसतसा तो माणूस आहे त्याच स्थितीत उभा असतांनाही दूर दूर जात असल्याचे त्याला जाणवले. हे काय बघतो आहे मी? हे चाललेय तरी काय?

"मला सांग काय झाले, तू का रडतो आहेस? इथली सगळी माणसे कुठे गेली? तू इथे एकटा कसा अडकलास?", तो माणूस दूर जात असतानाही सुनिलने त्याला तरीही हे प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला आणि तो माणूस निश्चल उभा राहून नवनवे अश्रू सांडत करुणपणे हसायला लागला.

त्यामुळे सुनिलने तिथून दृष्टी बाजूला नेऊन मुंबईच्या रस्त्यांवर नेली. अनेक बेस्ट बसेस धावत होत्या. त्यातील खिडक्यांमधून त्याने दृष्टी आतमध्ये नेली. काही बसेस या ड्रायव्हर आणि प्रवासीविना धावत होत्या, तर काहींमध्ये फक्त ड्रायव्हर होते तर काही बसेस मध्ये फक्त एकटा प्रवासी मनुष्य किंवा स्त्री होते.

एक स्त्री एका बसच्या खिडकीबाहेर हात काढून चेहऱ्यावर खिन्न भावाने एकसारखी शून्यात कुठेतरी बघत होते. तीची नजर एकाच ठिकाणी खिळून राहिलेली होती. असेच इतर अनेकांचे होत होते. त्या नजरा सुनिलला सहन झाल्या नाहीत. तो पुढे गेला.

सीएसटी स्टेशनवर सुद्धा शुकशुकाट होता. तेवढ्यात एक लोकल ट्रेन धडधड आवाज करत एका प्लॅटफॉर्मवर येवून थांबली. ती संपूर्ण लोकल रिकामी होती. म्हणजे त्यात प्रवासी नव्हते, फक्त लोकलचा ड्रायव्हर म्हणजे मोटरमन त्यात होता. लोकल थांबल्यानंतर तो मोटरमन यंत्रवत पद्धतीने गाडीतून उतरला आणि यंत्रवत पद्धतीनेच चालू लागला. जणू काही त्याच्यात जीव नव्हता! तो पाठमोरा होता. सुनिलने दृष्टीने त्याचा पाठलाग सुरू केला.

सुनिलने त्याला विचारले, "सगळे लोक कुठे गेले? तू एकटाच कसा काय लोकल चालवतो आहेस?"

यांत्रिक पद्धतीने चालता-चालता तो थांबला. त्याला कळत नव्हते की हा आवाज कोठून आला? थोडा वेळ तो निश्चल उभा राहीला आणि मग त्याने मागे वळून बघितले. त्याच्या चेहऱ्यावरसुद्धा निराशा, खिन्नता, विषाद असे भाव होते. त्यानेही दोन्ही हात पुढे पसरून मी लाचार, हतबल आहे अशा प्रकारचे हावभाव केले आणि स्थिर उभा राहिला.

त्या मोटारमन व्यतिरिक्त संपूर्ण सीएसटी स्टेशनवर कुणीही नव्हते. अनेक टिकीट खिडकी पैकी एका टिकीट खिडकीत बसलेला कर्मचारी डोक्याला हात लावून शून्य नजरेने कुठेतरी हरवल्यासारखा बघत होता.

तेवढ्यात आणखी दोन लोकल ट्रेन स्टेशनात येऊन थांबल्या.त्यापैकी एक लोकल संपूर्ण रिकामी होती. त्यात मोटरमन पण नव्हता. त्यातल्या एका डब्यातून एक तीनेक वर्षांची मुलगी उतरली. तिच्या एका हातात फिरकी होती, ती फिरकी न थांबता

गर्रगर्र फिरत होती. ती मुलगी दुडूदुडू चालू लागली. तिच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव होते. चालता चालता सुनिलच्या दृष्टीच्या दिशेने तिचे डोळे वळताच ती अचानक थांबली. तिच्या हातातली फिरकी फिरायची थांबली. ती सुद्धा त्या मोटरमन सारखी स्थिर निश्चल उभी राहिली. चेहऱ्यावर पुन्हा तेच भाव, इतरांसारखे!

स्टेशनवरच्या घड्याळात बारा वाजले होते. मग त्याच्या लक्षात आले की आतापर्यंत जिथे जिथे तो दृष्टीने गेला होता त्या प्रत्येक ठिकाणी जे घड्याळ होते तिथे बाराच वाजले होते.

हे सगळे बघणे त्याला असह्य झाले, त्याच्या छातीत धडकी भरली, नजर बंद करू लागली तेव्हा त्याने त्याची दृष्टी पुन्हा हळूहळू मागे मागे नेली, तेव्हा येताना दिसलेली प्रत्येक व्यक्ती हवेत हळू हळू विरत जाऊन छोटी होत गायब होत गेलेली त्याला दिसली. तो छोटी मुलगी, तो मोटरमन, बेस्ट बस मधली स्त्री, ताज हॉटेल मधला तो माणूस, सगळे!!

"अरे मला काही सांगाल की नाही? कुठे नष्ट होत चाललात तुम्ही सगळे? आणि कुठे गेलेत बाकी इतर सगळे?"

बाजूला जागी असलेली निद्राजीता सुनिलला हलवून झोपेतून उठवत म्हणाली, "आम्ही कुठे जात नाही आहोत! इथेच आहोत आपण सगळे. सायली आणि हाडवैरी झोपलेत अजून. आपण सर्वजण नाश्ता करून पुन्हा रुममध्ये येऊन झोपलो आहोत. तुला आता जाग आली, बडबड करत होतास. काय स्वप्न पडलं की काय?"

डोळे चोळत सुनिल झोपेतून जागा झाला. काय अभद्र आणि विचित्र स्वप्न होते ते! ते पण भर दुपारी? दिवास्वप्न! मला दूरदृष्टी अजून पूर्ण क्षमतेने वापरता येत नाही पण स्वप्नात मात्र मी ती वापरत होतो आणि दूरच्या प्रसंगातील आवाज मला जरी ऐकू येत असला तरी मी तिथल्या लोकांशी बोलू शकत नाही पण स्वप्नात मात्र मी ते करू शकत होतो. पण त्या स्वप्नाचा काय अर्थ असेल?

भर दुपारी ते सर्वजण झोपले होते. निद्राजीताच्या आणि सुनिल च्या आवाजाने सायली आणि हाडवैरी पण आपापल्या सोफ्यावर उठून बसले. त्यांनाही दुपारची डुलकी लागली होती.

"काय झाले? कुणाला स्वप्न पडलं?", हाडवैरी आणि सायली डोळे चोळत म्हणाले.

"मला पडलं. जाऊ द्या विसरा. ते सांगून तुम्हालाही मी संभ्रमात टाकू इच्छित नाही!" असे म्हणून सुनिलने विषय टाळण्याचा प्रयत्न केला. कारण स्वप्नात त्याने जे अनुभवले ते त्याला पुन्हा इतरांना सांगून अनुभवायचे नव्हते, तशी हिम्मत होत नव्हती. नंतर गरज पडली तर नक्की सांगू पण आता नको असा विचार त्याने केला.

तेवढ्यात नेत्राने त्यांना डेकवर बोलवल्याचा निरोप आला. सर्वजण तिथे जमले. नेत्रा आणि ते चौघे या व्यतिरिक्त तिथे इतर अनेकजण त्यांच्यासारख्याच काळ्या रंगाच्या अंगाला फिट बसणाऱ्या फायटर्स कपड्यात उपस्थित होते. समुद्री वारा वाहत होता. त्यामुळे सूर्याचे ऊन कमी जाणवत होते.

^ ^ ^

# 20. उलगडा

आता सर्वजण डेकवरील एका शेड खाली जमले होते.

नेत्रा बोलू लागली, "ओशन सिकनेस ज्यांना आहे किंवा जे जहाजावर प्रथम प्रवास करत आहेत आणि ज्यांना माहिती नाही की आपल्याला हा सिकनेस आहे की नाही त्यांचेसाठी आपल्या जहाजावर डॉक्टर्स उपलब्ध आहेत, काही त्रास झाल्यास त्यांना सांगावे. मूळ मुद्द्यावर येऊन सांगायचे झाल्यास सायन्स फेस्टीव्हल मधल्या सहभागी विद्यार्थ्यांच्या गाड्यांवर पुलावर जो हल्ला झाला त्यातून आधी काही ठोस पुरावे मिळाले नव्हते पण आता तुमच्यावर जो यांत्रिक सापांद्वारे हल्ला झाला त्यातील यांत्रिक सापांचे तुकडे आणि पुलावर मिळालेले यांत्रिक तुकडे आणि रणजित यांच्या गाडीच्या स्फोटात सापडलेले अवशेष हे सारख्याच प्रकारचे आहेत, हे सिद्ध झाले आहे! आमचा संशय खरा ठरला आहे! मती चक्रावून गेल्यासारखे वाटते आहे. जयवंत जसकर यांच्या नुकत्याच मला आलेल्या मेसेजने हे आताच सिद्ध झाले आहे."

"ओह, सगळंच अनाकलनीय, अद्भुत आणि अनपेक्षित आहे!", हाडवैरी म्हणाला.

"हो ना! कमी खर्चात ते लोक पेट्रोल डिझेल बनवून स्वतःच्या संस्थेच्या काळया कारवाया तडीस नेत आहेत. त्यामुळे त्यांचे लाखो रुपये वाचले आहेत. आता पाठलाग करणारी ती गाडीसुद्धा स्वस्तातलं पेट्रोल वापरत होती हे नक्की. त्या सुजित लहाने याने बनवलेल्या प्रोजेक्टचे मशीन चोरून त्यांनी हे सगळं केलं. आमच्या अंदाजानुसार पाण्याखालून एखाद्या पाणबुडी मधून, तुमच्यावर हल्ला करणाऱ्या सापांसारखेच एखादे यांत्रिक प्राणी पुलावरच्या गाडी खाली आणून, कुणीतरी जवळपास असलेल्या एखाद्या जहाजावरून रिमोटने त्यांचा कंट्रोल करून सुजित लहानेच्या गाडीचा स्फोट करवला असावा आणि ते मशीन पाण्याखालून पाणबुडीतून चोरून गुप्तरितीने त्यांच्या एखाद्या जहाजावर नेऊन मग त्यांच्या ठिकाणी पळवले! मला आपल्याच एका टोपीवाल्या माणसाने त्या दिवशी ही बातमी बघून फोन केला पण त्या वेळेस मी ऑपरेशन करत होते, कालांतराने मी त्याचा फोन उचलला. सायन्स फेस्टिवलचा तो दिवस आमच्यासाठी कलाटणी देणारा ठरला. त्या दिवसापर्यंत आपली संस्था आकारास येत होती. दरम्यान समुद्रातील एका ठिकाणाचा शोध आपल्या संस्थेतील

वैज्ञानिकांना लागला होता. मग आपल्या या संस्थेने हालचाली अधिक गतिमान करायच्या ठरवल्या. आपल्या संस्थेत वैज्ञानिक आणि डॉक्टर्स यांची कमी नव्हती पण तुमच्यासारख्या सुपर पॉवर असलेल्या लोकांची सुद्धा अधिकाधिक गरज भासू लागली. लहानपणी सुनिलच्या विशेष डोळ्यांबद्दल आम्हाला कळले तेव्हाच मी त्याबद्दल अधिक संशोधन सुरु केले आणि अशा विशेष शक्ती असलेल्या व्यक्तींना आपल्या संस्थेत घ्यायचे हे ठरवले. माझे वडील आर्मीत होते. मी सुद्धा आर्मीत काही वर्षे डॉक्टर म्हणून काम केले आहे. त्यामुळे देशासाठी काहीतरी करायचे संस्कार आमच्या कुटुंबात आधीपासून आहेत. मग मी माझ्या काही माणसांना सुनिलच्या मागावर पाठवले. सुनिलच्या घरच्यांशी तसे उघडपणे बोलता येणार नव्हते कारण या पद्धतीच्या कामात जीवाला धोका असतो त्यामुळे त्यांनी नाही म्हणण्याची शक्यता जास्त होती तसेच त्यांना सुनिलच्या या सुपर पॉवर बद्दल सांगणे पण योग्य नव्हते. त्यामुळे त्यांनी सुनिलवर बंधने घातली असती. आता घडून गेल्यावर त्यांना कळले जरी तरी काही हरकत नाही पण आधी कळणे योग्य नव्हते. म्हणून आम्ही छुप्या पद्धतीने आमचे काम सुरु ठेवले. तुमची पॉवर नेमकी कशी आहे, आपल्या संस्थेच्या कामास उपयोगी ठरेल का हे आम्ही शोधत राहिलो.अजून सुनिल मोठा होईपर्यंत त्याला संस्थेत घेता येणार नव्हते. तोपर्यंत आपल्या

संस्थेशी सलग्न असलेल्या पोलिसांना म्हणजे रणजित यांना योगायोगाने तुझ्या शक्तीबद्दल कळले. मग त्यांच्याबरोबर काम करून असाही तू अप्रत्यक्षपणे आम्हाला मदत करतच होतास. रणजित यांनी आम्हाला हे ही सांगितले होते की सुनिलने त्याच्या घरच्यांना त्याच्या सुपर पॉवरबद्दल सांगितले नाही आहे. आम्हालाही हेच हवे होते. पण दुर्भाग्याने पुढे रणजित यांच्या गाडीचा स्फोट झाला. ते शहिद झाले. अशाच कसल्यातरी रिमोटने ऑपरेट होणाऱ्या यांत्रिक प्राण्यांच्या मदतीने त्यांनी तो स्फोट केला असावा. नरीमन पॉईंट जवळच्या एखाद्या इमारतीतून त्यांच्या एखाद्या माणसाने ते रिमोटने कंट्रोल केले असावे! स्फोटानंतर तिथे सापडलेले तुकडे पण त्या सापांच्या तुकड्यांसारखेच आहेत. आपले दुर्भाग्य की आपण रणजित यांच्यासारखा कर्तव्यदक्ष अधिकारी गमावला."

सुनिल रणजित यांच्या आठवणीने थोडावेळ स्तब्ध झाला. रणजितसुद्धा त्यांच्या गाडीचा स्फोट होण्यापूर्वी त्यानाही अशाच प्रकारे काहीतरी माहिती आणि सुगावा लागल्याचे ते सांगत होते, हे सुनिलला आठवले.

पण सुनिलने शंका उपस्थित केली, "पण डॉक्टर नेत्रा, मला एक कळत नाही त्या सगळ्या पेट्रोल तयार करणाऱ्या मशीनला

ऑपरेट करण्याचा फॉर्म्युला आणि पासवर्ड वगैरे हे फक्त एकट्या सुजीतला माहित होते म्हणे. मग ते मशीन चोरूनही त्याचा जो फॉर्मुला आहे आणि पासवर्ड आहे तो त्यांच्याकडे गेला कसा?"

नेत्राने स्पष्टीकरण दिले, "नुसता सुजितचाच नाही तर जपानच्या जुळया सायंटिस्टने शोध लावलेले रोबोट आणि क्रांतिकारक डिस्प्ले पण त्यांच्या हाती लागले असावे कारण इचिकाई हॉस्पिटलमध्ये होत्या तेव्हा त्यांच्या घरून ते शोध, त्यांचे सिक्रेट फॉर्म्युले आणि पेटंट हे सगळे चोरीला गेले. ते लोक यांत्रिक प्राणी जसे तयार करतात तसे उडणारे यांत्रिक पक्षी, कीटकसुद्धा तयार करतात आणि इकडे तिकडे फिरवतात जसे की यांत्रिक भुंगे किंवा त्यासारखे उडणारे इतर कीटक त्यांनी बनवले आहेत आणि त्यात कॅमेरे आणि माईक असावेत. ते असे पासवर्ड सहज रेकॉर्ड करून ट्रान्समीट करू शकत असतील. ते भुंगे सिक्युरिटी कॅमेरात दिसू नये याची ते दक्षता घेत असतील. त्यांची डिझाईन अशी आहे की ते खरे भुंगे वाटत असावे त्यामुळेते दिसले तरीही लोक त्याकडे दुर्लक्ष करत असतील. आपल्या जवळ असणाऱ्या डॉक्टर आणि वैज्ञानिकांपेक्षाही जास्त हुशार आणि तज्ञ त्यांचेकडे आहेत. पण त्याला तोडीस तोड तंत्रज्ञ लोक आपल्याकडे तयार होत आहेत ही आनंदाची बाब आहे! त्यात भर म्हणून तुम्ही चौघे आलात!

तुमच्याकडे तर सुपर पावर आहेत. आता नक्की आपण त्यांचा सामना करू शकू!"

सायली पटकन काहीतरी आठवून म्हणाली, "हो! मला आठवतं मी सायन्स फेस्टिवलला रांगेत उभी होते तेव्हा तोंडाला रुमाल आणि टोपी घातलेला एक माणूस होता आणि एक भुंगा आसपास घोंगावत होता!"

नेत्राने सायलीचे कौतुक केले आणि म्हणाली, "तुझ्या कधीही नष्ट न होणाऱ्या मेमरीमुळेच तू आमच्या ग्रुप मध्ये आहेस!"

सुनिलने सायलीकडे एक चोरटा कटाक्ष टाकला. सायली लाजली.

सगळ्यांच्या ते लक्षात आल्यावर सुनिलने नजर वळवून नेत्राकडे केली आणि म्हणाला, "मला पण एकदा रेल्वे स्टेशनवर असा तोंडाला रुमाल आणि टोपी घातलेला माणूस माझा पाठलाग करताना दिसला होता पण त्याला मी चकवले होते, तो आपल्याच ग्रुपचा भाग होता तर! आणि एक भुंगा सतत आमच्या गॅलरीतील

पोपटाजवळ सारखा घोंगावायचा! त्याचा उद्देश माझी हेरगिरी करणे हा होता तर! कारण मी अनेकदा पोलीस डिपार्टमेंट साठी स्वस्तात विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे बनवायचो जे त्यांना गुन्हेगारांचा शोध लावण्यास मदत करतील जसे मल्टीपर्पज फिंगर प्रिंट स्कॅनर, युटिलिटी बेल्ट, फेस स्कॅनर सेव्हर वगैरे. पोलीस हवालदार साठी मी त्यांच्या काठीत बसेल पण दिसणार नाही असे ऑडिओ आणि व्हीडिओ रेकॉर्डिंग डिव्हाईस बनवून दिले होते ज्याचा चांगला उपयोग त्यांना होतो आहे. भुंग्याच्या मदतीने हेरगिरी करून त्यांनी अशी अनेक उपकरणे कॉपी करून स्वतःसाठी बनवली असतील. त्या भुंग्यामुळे आमचा लाडका पोपट फिनिक्स मेला कारण तो भुंगा त्याच्या चोचीत नेमका फुटला! हेरगिरी करून संपले असेल नाहीतर मग अपघाताने त्या यांत्रिक भुंग्याचा स्फोट झाला असावा! कदाचित पोपटाने खरा भुंगा समजून त्याला त्रास दिल्याने त्यांना माझी हेरगिरी जास्त करता आली नसावी. मग नंतर त्यांनी माझा नाद सोडला असावा!"

नेत्रा पुढे सांगू लागली, "नक्कीच! कारण नेहमीच भुंगे ऑपरेट करणाऱ्या लोकांना आजूबाजूला पब्लिकच्या आणि कॅमेरांच्या नजरेला न येता ते करण्यासाठी लपायला वेगवेगळया जागा परत परत मिळणे हे काही सोपे नाही. तर या कारवाया ते विविध यांत्रिक

कीटक, पक्षी आणि प्राण्यांद्वारे करतात. पोलिस हेडक्वार्टरमध्ये आणि तुरुंगातसुद्धा अनेकदा असे भुंगे दिसून आले होते पण काही पोलिसांच्या ते लक्षात आल्यानंतर त्यांना आम्ही जाळून टाकले होते मग असे भुंगे येणे बंद झाले! पण शोध घेतल्यानंतर सुद्धा आम्हाला कुणी तसे सापडले नाही. कदाचित त्यानंतर त्यांनी आपल्या पद्धतीत बदल केला असावा किंवा त्यांना अनेक तंत्रज्ञ वैज्ञानिक त्यांच्या मदतीला येऊन मिळाले असावेत ज्यांनी त्यांना विविध हेरगिरी करू शकणारे इतर इन्स्ट्रुमेंट्स बनवण्यास मदत केली असावी!"

निद्राजीता उद्विग्न होऊन म्हणाली, "कोण मूर्ख लोकं असावीत ही भुंगे ऑपरेट करणारी? टेक्नोलॉजीचा विघातक कामांसाठी वापर करत आहेत. या मागे नक्की कुणीतरी अती हुशार मेंदू लीडर म्हणून कार्यरत असावा!"

नेत्रा पुढे सांगू लागली, "आमची अशी अनेक माणसे सायली आणि सुनिल या दोघांच्या मागावर होती आणि तशीच हाडवैरी आणि निद्राजीता यांच्याही मागावर होती! सुनिलला त्या पुलावर जी दूरदृष्टीची नवी शक्ती मिळाली त्यावेळेस सुनिलचा मितीजीव

सोबतचा संवादपण आमच्या अशाच एका माणसाने ऐकला आणि आम्हाला सांगितलं!"

"पण ती शक्ती अजून मी पूर्ण क्षमतेने वापरायला शिकलो नाही आहे!", सुनिलने स्पष्टीकरण दिले.

"असू दे! आपण हळूहळू बदलत जातो, सुधारत जातो तसेच या शक्ती पण विकसित होत जातात. माणूसही काल जसा असतो तसा तो उद्या नसतो. परवा तो आणखी वेगळा असतो. आता आपली हीच संस्था बघा ना! ती विकसित होते आहे. तुमच्या सारखी अशी सुपरनॅचरल शक्ती ज्यांच्यात आहे अशा लोकांचा भारतभर शोध अजूनही सुरू आहे. पण मध्यंतरी आपली ही संस्था मोडकळीला येण्याच्या बेतात होती कारण आपल्या अनेक लोकांवर हल्ले होऊन ते मेले आणि आपल्याला आर्थिक मदत ज्यातून होत होती अशा अकाऊंटवर पण सायबर हल्ले होऊन आपले खूप आर्थिक नुकसान पण झाले, पण हळूहळू आपण त्यातून सावरलो! एक मात्र नक्की की ती विघातक संस्थापण आपल्या सारखीच विकसित होते आहे! त्या संस्थेचे उद्देश काय आहेत हे मात्र अजून नीटपणे आपल्याला कुणालाच समजले नाही आहे! तू तुझ्या दूरदृष्टी शक्तीने ते शोधून काढू शकतोस DN!"

"खूप संघर्षमय आहे हे सगळे. देशातील सर्व सामान्य जनतेसाठी आणि एकूणच मानवतेसाठी आपली आणि अशा अनेक संस्था पडद्यामागे ज्या काही संघर्षातून आणि संकटांतून जात असतात ते कुणालाच दिसत नाही!", हाडवैरी म्हणाला.

"खरं आहे. आपल्याला आपल्या देशातील सरकारचा आणि अनेक मित्र देशांच्या सरकारचा सपोर्ट आहे. पण काही ठराविक परिस्थितीतच. अन्यथा आपल्याला स्वायत्तपणे काम करावे लागते. आणि मग अशा वेळेस आर्थिकसहित इतर सगळ्या बाजू आणि आघाड्या आपल्यालाच सांभाळाव्या लागतात आणि लागतील! सरकारला आणि मिलिटरीच्या तिन्ही दलांना आणि विविध गुप्तचर यंत्रणांना अधिकृतपणे जे काही करता येत नाही ते करण्यासाठी आपला वापर होतो! आणि मग ते सगळे आपल्याला सुद्धा मदत करतात! पण आपण आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवायचे आहे हे लक्षात ठेवा! जेव्हा संकट आंतरराष्ट्रीय असते तेव्हा भारत आणि मित्र देशांचे संरक्षण दले आणि गुप्तचर संस्थासुद्धा आपल्याला मदत करतात ही जमेची बाजू! पण आपल्याकडून चुका मात्र होता कामा नयेत, नाहीतर या सगळ्या

मदत करणाऱ्या संस्था आपल्यालाच नष्ट करायला मागेपुढे पाहणार नाहीत!", नेत्राने पुढे स्पष्टीकरण दिले.

"हाडवैरी आणि निद्राजिता यांना आम्ही कसे शोधून काढले त्याची एक वेगळीच कथा आहे. हाडवैरीचे खरे नाव आहे विशाल आणि निद्राजीताचे नाव आहे निशा! त्या दोघांना ती पॉवर कशी मिळाली हे त्या दोघांकडून तुम्ही कधीतरी ऐका. सुनिल आणि सायली तुम्ही दोघे आमच्यात सामील होण्याच्या काही दिवस आधी हे दोघे आमच्या संस्थेत आले! सायलीच्या वडिलांनी कुटुंबाच्या इतर सदस्यांच्या नकळत एका आर्मी ऑफिसरशी संपर्क साधला होता. सायलीच्या विशेष क्षमतेचा वापर मिलिटरीसाठी करता येईल का अशी शक्यता पडताळली होती. पण विविध कारणास्तव तिच्या जीवाला धोका, तसेच ती शत्रूच्या तावडीत सापडल्यास तिच्याकडून तिच्या मेमरीत असलेले सगळे सिक्रेट शत्रूला मिळण्याचा धोका जास्त वाढतो त्यामुळे तो प्लॅन रद्द झाला होता. परंतु अशा प्रकारच्या आपल्या गुप्तपणे ऑपरेट होणाऱ्या समांतर संस्थेमध्ये सायलीचा उपयोग नक्की होईल असे त्या आर्मी ऑफिसरला वाटले आणि त्याने आम्हाला सांगितले. योग्य वेळेस आता सायलीसुद्धा आमच्या सोबत आहे!"

सायलीला हे ऐकून आश्चर्य वाटले आणि वडिलांचा अभिमानपण वाटला. आता तिला वडिलांशी बोलावेसे वाटले पण ते लगेच शक्य नव्हते.

"आणि रणजित यांच्या गाडीचा स्फोट झाला त्या दिवशी रणजित तुला आपल्या या संस्थेबद्दल सांगणारच होते आणि सायलीला घेण्यासाठी मी पण त्या दिवशी जाणार होते पण रणजितबद्दल वाईट घडले आणि मग आम्ही तू बरे होण्याची वाट बघण्याचे ठरवले. त्यानंतर तुम्ही दोघे योगायोगाने हॉस्पिटलमध्ये होतात आणि अशा प्रसंगात शेवटी आपली सगळ्यांची भेट झाली! तुम्हाला सगळ्यांना गुप्त ठिकाणी घेऊन जाण्याचा प्लॅन तयार होताच पण त्या आधीच तुमच्यावर हॉस्पिटलमध्ये हल्ला झाला! मला तर अशी शंका आहे की त्या दिवशी रणजित आणि सुनिल तुम्हा दोघांना नरीमन पॉईंटलाच एकत्र मारण्याचा प्लॅन असावा! ", नेत्राने स्पष्टीकरण देत म्हटलं.

हे ऐकून सुनिलच्या अंगावर शहारे आले. त्याला आठवले. त्या दिवशी स्फोटाच्या थोडे आधी रणजित म्हणत होते, "आणि

हो तुला आणखी एक महत्वाचे सांगायचे आहे! खूप महत्वाचे! चल गाडीत बैस! सांगतो"

नेत्रा पुढे म्हणाली, "आता त्या विघातक टीमच्या कारवाया गेल्या काही महिन्यांत इतक्या वाढल्यात की आपण लवकरच आता आपला काहीतरी प्लॅन आखला पाहिजे. ती टीम किंवा संस्था जी कुणी आहे ते लोक जगभर विविध सायंटिस्ट, संशोधक, डॉक्टर्स, पोलीस लोकांना आपले टार्गेट करत आहेत, मारत आहेत. हे सगळं करण्यामागे त्यांचा काय हेतू आहे, ते लोक कोण आहेत हे अजून आपल्याला नीट कळलेलं नाही! आणि जपानचा वैज्ञानिक जसा बाथरूममधून अचानक गायब झाला तशाच पद्धतीने ती नर्सपण हॉस्पिटलच्या बाथरूममधून गायब झाली. याचे गूढ अजूनही उकलले नाही! आणि बाथरूममध्ये कॅमेरे नसल्याने शोध घेणे आणखी कठीण होऊन बसले आहे!"

सुनिलला काहीतरी आठवलं. तो म्हणाला, "नेत्रा डॉक्टर! तो तुरुंगात बंद असलेला जग्गू भुसनळ्या, तुरुंगातून सुटल्यावर काय करतो हे बघण्यासाठी मी सारंगला गुप्तपणे त्याच्या मागावर रहाण्याचे आधीच सांगितले आहे आणि तो तुरुंगात विचित्रपणे

हसत हसत बोलत असलेले ते अनाकलनीय वाक्य आणि त्याच वाक्यांचे एस एम एस काही लोकांना येत आहेत याचेही गूढ अजून उकलत नाही आहे!"

दुपारच्या लंचची वेळ झाली होती. अजून चर्चा बाकी होती आणि ती सुरूच राहणार होती. दरम्यान चौघांनी नेत्राला मोबाईल फोन ऑन करून घरी फोन करण्यास परवानगी देण्याची विनंती केली.

पण नेत्राने त्यांना तसे करण्यापासून रोखले. त्याऐवजी तिच्या स्पेशल गॅजेटद्वारे चौघांना जे काही घरी सांगायचे आहे ते थोडक्यात सारंगला सांगायला सांगितले आणि तो मग चौघांच्या घरी निरोप देणार होता.

चौघांव्यातिरिक्त कुणीही त्या जहाजावर नेहमीचे स्मार्ट फोन वापरत नव्हते. शहरात गेल्यानंतर किंवा फिल्डवर असताना काही अपवादात्मक परिस्थितीत त्या टीमच्या सदस्यांना स्वतःचा मोबाईल वापरण्याची परवानगी देण्यात आलेली होती.

लंचला जाण्यापूर्वी सायलीने तो चौघांच्या मनातला प्रश्न विचारलाच, "नेत्रा, आपण सर्वजण नेमके कुठे जात आहोत?"

नेत्रा हसली आणि म्हणाली, "आपण एका बेटावर जात आहोत ज्याचे नाव आहे सुपर नेचर! तिथे आपल्याला सुरक्षित राहता येणार आहे!"

^^^

# 21. पाठलाग

सुपर नेचर बेटावर पोहोचण्यासाठी आणखी काही दिवस लागणार होते. दरम्यान चौघांना जहाजावर प्रशिक्षित व्यक्तींकडून विविध अपेक्षित किंवा अनपेक्षित परिस्थितीत संकटात सापडल्यावर त्यातून स्वत:ला कसे वाचवायचे याची ट्रेनिंग देण्यात आली. नेत्राजवळ होते त्या प्रकारचे कम्युनिकेशन गॅजेट्स त्यांना दिले गेले, जे सॅटेलाईटद्वारे ऑपरेट होत होते. या संस्थेचे नाव Allied Secret Forces असे होते परंतु आता सुपरनॅचरल पॉवर असलेले लोक त्यात समाविष्ट केले गेल्याने त्याचे स्वागत म्हणजेच SWAGAT = Supernatural Warriors And Gadgets Assisted Team हे नाव ठेवण्यात आले. तर अशाप्रकारे त्या चौघांचे या संस्थेत काही दिवसांपूर्वी स्वागत झाले होते आणि अशाच प्रकारच्या सुपर पॉवर असलेल्या अनेक व्यक्तींना शोधून त्या सर्वांचे ह्या संस्थेत स्वागत यापुढे ही होणार होते.

नेत्रा त्या स्वागत संस्थेची सध्या प्रमुख होती. त्या संस्थेच्या उभारणीपासून आतापर्यंत नेत्राने खूप मेहनत घेतली होती. संस्थेमधील प्रत्येकाला एक सांकेतिक नाव देण्यात आले होते.

त्यामुळे इतर जगापासून त्यांचे खरे नाव लपून राहणार होते. हे सर्वजण एकाच ध्येयाने प्रेरित होते, ते म्हणजे जागतिक पातळीवर सध्या वाढलेल्या विशिष्ट पद्धतीने विशिष्ट प्रकारच्या व्यक्तींवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटना आणि त्यामागे कोण आहे आणि त्यांचा हेतू काय हे शोधून काढणे आणि आणखी अशा घटना पुढे होण्यापासून थांबवणे!

दरम्यानच्या काळात जहाजावर सुनिलला सारंगकडून कळले होते की जग्गू भुसनळ्या तुरुंगातून सुटल्यानंतर त्याच्या भावाला भेटायला धारावीतील त्याच्या घरी गेला होता. त्याच माहितीच्या आधारे नेत्रा आणि इतर तिघांशी विचार विनिमय करून मुंबईच्या दिशेला चेहरा करून सुनिलने नजर पुढे नेत सारंगने सांगितलेल्या ठिकाणी दृष्टीने जाण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्यावेळेस जग्गू तिथे नव्हता. बरेचदा सुनिलचा अंदाज चुकायचा. पण हळूहळू दूरदृष्टी वापरण्याची सवय सुनिलला झाली. कधीकधी त्याची डोळे दुखायला लागायचे. डोळ्यांवर, मेंदूवर, मनावर एक प्रकारचा ताण निर्माण व्हायचा आणि दृष्टी शेवटी तो परत स्वतःकडे घेऊन यायचा.

दरम्यान सायलीने या संस्थेविषयी सर्व माहिती वाचून काढली तसेच या संस्थेसाठी जे जे काही म्हणून वापरले जाते त्या सर्व

गोष्टींची, व्यक्तींची माहिती इतरांकडून प्रश्न विचारून गोळा केली आणि अर्थातच ती कायमची तिच्याकडे मेंदूत साठवली गेली. इतर अनेक प्रकारची उपयुक्त माहिती सुद्धा तिने जहाजावरील काही पुस्तकांतून तसेच इंटरनेटवरून वाचून काढली. कोणत्या माहितीची केव्हा भविष्यातगरज पडेल हे सांगता येत नव्हते त्यामुळे जास्तीत जास्त उपयुक्त माहिती तिने आपल्या मेंदूत साठवली.

नेत्राने आता सुनिलला जग्गूचा पाठलाग करून लवकर ते प्रकरण निकाली काढण्याची विनंती केली आणि ते करणे आवश्यकच होते.

जग्गूचा भाऊ पप्पू एका फॅक्टरीत वर्कर म्हणून काम करायचा. आता दोघे मिळून काहीतरी संशयास्पद करत आहेत असा सुनिलला संशय होता. कारण दोघांच्या डोक्याभोवती बहुतेक वेळेस लाल वर्तुळ दिसायचे. जग्गू पप्पू यांच्या बोलण्यातून सुनिलला असे जाणवले की, आता पोलिसांची नजर जग्गूवर असल्याने त्याची कामे पप्पू करायचा. पण सध्या या दोघांच्या फक्त मागावर राहणे आवश्यक होते. सुनिल सिक्रेट फोन करून माहिती सारंगला द्यायचा आणि सारंग आवश्यकता भासल्यास तिथे

पोहोचायचा आणि दोघांवर लक्ष ठेवायचा. पण अजून पर्यंत दोघांनी कसलेही गुन्हेगारी कृत्य केलेले नव्हते. करण सुनिलच्या दृष्टीचा वापर करून सारंगला तिथे पाठवून त्या दोघांना रेड हॅन्ड पकडायचे होते. सारंगसुद्धा स्वागत टीमचाच एक भाग होता.

साधारण रोज रात्री फॅक्टरी मधून पप्पूचे काम संपल्यानंतर सुनिल आपली दृष्टी तिकडे नेऊन थांबवायचा. एके दिवशी पप्पू रात्री काम संपल्यानंतर फॅक्टरीतून घरी न जाता जवळच असलेल्या निर्जन ठिकाणी एका पुलाच्या खाली गेला. त्याच्या डोक्यावर प्रखर जळते वर्तुळ दिसले. सुनिल दृष्टीने त्याचा पाठलाग करु लागला. एका काळ्या रंगांचा मास्क घातलेल्या माणसाने पप्पूला एक पॅकेट दिले. ते पप्पूने बॅगेत टाकले आणि त्या माणसाकडून पैसे घेऊन पप्पू निघाला. निघतांना तो माणूस म्हणाला, "आणि लक्षात ठेव, पॅकेट ठरलेल्या ठिकाणी गुप्तपणे पोचवण्याची पद्धत जग्गूला माहीत आहे! त्याचेकडून गायडन्स घे. जराही चूक झाली नाय पायजेल. नायतर तुम्ही दोघीबी राम नाम सत्य!"

मग हसून तो म्हणाला, "वाईट लोक येतील आणि वाईट लोकांना मारतील!"

हे तेच वाक्य होते जे जग्गू परत परत तुरुंगात असतांना म्हणायचा. हे तेच वाक्य होते जे अनेक मोबाईलवर SMS ने अज्ञात नंबर वरून यायचे आणि लोकांना घाबरवून सोडायचे. सायबर सेल ला त्याचा छडा अजून लागला नव्हता.

पप्पू सरळ घरी आला तिथे त्याने जग्गूला पॅकेटवाली बॅग दिली. पॅकेटमध्ये काय आहे हे उघडून बघण्याची परमिशन नव्हती. तशी कडक सूचना त्या माणसाने पप्पूला दिलेली होती. कारण नुसत्या वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचण्यासाठी त्यांना भरपूर पैसे मिळत होते. पण त्या रात्री दोघांना त्या पॅकेटमध्ये काय आहे हे बघण्याचा मोह झालाच आणि सुनिलची दृष्टी तिथे होतीच. त्या पॅकेटमध्ये 10 छोट्या पारदर्शक बाटल्या होत्या आणि त्यात कसलेतरी केमिकल होते. त्यामुळे त्यांनी ते बघून पुन्हा पॅकेटमध्ये बंद करून टाकले. या आधी पार्सल मध्ये फक्त शस्त्र प्रकार असायचे, आता हे केमिकल वगैरे काय भानगड आहे हे त्या दोघांना कळत नव्हते.

पप्पू ते पॅकेट कुठे पोहोचवणार त्यासाठी सुनिलची दृष्टी पप्पूचा पाठलाग करणार होती आणि सारंगने मुद्दाम पप्पूपासून लांब अंतरावर राहून फोनवर सुनिलचे वेळोवेळी मार्गदर्शन घेऊन पावले उचलायची असे ठरले होते. त्या पॅकेटमधले केमिकल काय आहेत आणि केमिकलचा वापर नेमका कसा कुठे केला जातो हे जाणणे आता आवश्यक झाले होते त्याशिवाय छडा लागणार नव्हता. अशा पद्धतीने हा महत्त्वाचा पाठलाग सुरू झाला: सुनिलच्या दृष्टीचा आणि सारंगचा!

पप्पू पॅकेटवाली बॅग घेऊन घरातून निघाला. बेस्ट बसमधून तो जुहूला आला. त्याच बसमध्ये सावध राहून त्याला कळू न देता त्याच्या मागावर सुनिलच्या नजरेच्या मार्गदर्शनाखाली सारंग होताच. बसमधून उतरल्यावर त्याच्या मागोमाग सुरक्षित अंतर ठेऊन सारंग चालू लागला. जुहू बीचवर दूरवर एक काळा मास्क घातलेला माणूस पप्पूची वाट बघत समुद्राच्या बऱ्याच आतमध्ये कमरेपर्यंत पाण्यात उभा होता. त्याच्या डोक्याभोवती लाल प्रखर वर्तुळ होते. म्हणजे तो पप्पूचा घात करणार?

मग पप्पूलाही त्याने तिथेच बोलावले. सारंग दूर उभा होता, मात्र सुनिल दृष्टीनेच त्या दोघांकडे पाण्यात काय चाललंय ते बघत होता. पप्पूने त्या मास्कवाल्या माणसाकडे त्याचा मोबदला मागितला. दोघांमध्ये काहीतरी वादावादी झाली आणि नंतर ते हमरीतुमरीवर आले. त्या मास्कवाल्याने पप्पूला पाण्यात ढकलले, पॅकेटमधून एक केमिकलची बाटली काढली आणि ती धरून तोही पाण्यात गेला, त्याने पाण्यातच पप्पूच्या नाकात आणि घशात त्या पॅकेटमधले केमिकल ओतले आणि पुढे जे घडले ते सुनिल आश्चर्यचकित होऊन बघतच राहिला आणि सारंगला फोनवरून काही सूचना द्यायचे तो विसरला....

केमिकल शरीरात जाताच पप्पूचे डोक्यावरचे केस हळूहळू विरळ होऊन नष्ट झाले मग डोके, चेहरा, मान, हात, छाती, पोट, हाडे, शरीराच्या बाहेरचे आणि आतमध्ये असलेले एकेक अवयव हळूहळू नष्ट होत होत दोन्ही पाय नष्ट झाले. आता पप्पूच्या जागी एक छोटा पेशींच्या समूहाचा तुकडा होता. पप्पूने अंगावर घातलेले सगळे कपडे ढिले होऊन पाण्यात वाहून जायला लागले. पप्पूच्या पेशीसमूहाचा तुकडा त्या माणसाने मुठीत पकडला आणि पाण्याच्या बाहेर उसळी मारली...

सारंगला घातपाताचा संशय आलाच होता त्यामुळे तो सुनिलच्या सूचनेची वाट न बघता गर्दीतून मार्ग काढत मास्कवाल्या माणसाकडे पळू लागला.  सारंगला पाण्यात काय घडले हे माहिती नव्हते. सुनिलने विचार केला तेच झाले. सारंगने त्या माणसाकडे एकदम जायला नको होते त्या ऐवजी तो आता येथून कुठे जातो ते बघायचे असे सुनिल सारंगला फोन करून सांगणार होता कारण त्या केमिकलमुळे जसा पप्पू नष्ट झाला तसा आणखी कुणाकुणाला नष्ट करायचा प्लॅन आहे ते मास्कवाल्या माणसाचा आणखी पाठलाग केल्यावर कळले असते पण...

आपल्याकडे कुणीतरी म्हणजे सारंग पळत येत आहे आणि तो आपल्यावर झडप घालून पकडणार हे दिसताच मास्कवाला सावध झाला आणि त्याच्या तावडीत कदापि सापडायचे नाही असा निश्चय करून त्याने स्वत: ते केमिकल स्वतःच्या नाकात आणि घशात ओतले आणि सारंगने झडप घालून त्याला खाली पाडले खरे, पण त्याच्या अंगाखाली त्या मास्कवाल्या माणसाचे एकेक अवयव नष्ट होत होत गेले, त्याचे सर्व कपडे ढिले होत अंगावरून निघाले आणि बाजूला पडले. शेवटी समुद्रकिनारी निश्चल पडलेल्या कपड्यांच्या आत पप्पूचा आणि मास्कवाल्या माणसाचा असे छोटे दोन पेशीसमूह सारंगला सापडले. केमिकलची बॅग झटापटीत दूर जाऊन एका दगडाला लागून फुटली

आणि सगळे केमिकल वाळूमध्ये पडले आणि जिरले आणि लाटेबरोबर वाहून गेले.

तेवढ्यात सुनिलने फोन करून ते दोघी पेशीसमूह ताब्यात घेऊन तडक पोलीस स्टेशन गाठून ते कुणाकडे तरी सोपवून पुढील सूचना मिळेपर्यंत सांभाळून ठेवायला सांगितले. सारंगला हे सगळे कल्पनातीत आणि अद्भुत वाटत होते.

सारंगने त्याच्या असिस्टंटला त्याच्या पेक्षाही काही अंतरावर मागोमाग यायला सांगितले होते. त्यांनी आणलेल्या गाडीतून तो पोलीस स्टेशन मध्ये आला आणि सायन्स अँड रिसर्च सेक्शन मध्ये त्याने दोन वेगवेगळ्या बाटलीत ते दोन छोटे पेशीसमूह बंद करून एका लॉकरमध्ये ठेवले. सायन्स अँड रिसर्च सेक्शन मधील डॉक्टर आणि सायंटिस्ट श्री राजमे यांना त्याने घडलेला प्रकार सांगितला आणि केमिकल आणि पेशीसमूहाबद्दल सांगितले.

सुनिलची दृष्टी इकडे समुद्र किनाऱ्यावर बिझी होती तेव्हा पप्पूच्या घरी एक घटना घडली. त्याच्या घरात एकजण शिरला. त्याने दारू नशेत धुंद पडलेल्या बेसावध जग्गूला ते केमिकल

पाजले आणि जेव्हा त्याचे पेशीसमूहात रूपांतर झाले तेव्हा ते घेऊन तो पसार झाला. पोलिसांना कळलेच नाही की जग्गू आणि पप्पू हे दोघे भाऊ शहरातून कुठे गायब झालेत?

इकडे जहाजावरच्या डेकवर उभे राहून आपल्या दृष्टीने बीचवरील हे सगळे बघून आश्चर्यातून सुनिल अजूनही बाहेर येऊ शकला नव्हता. त्याने जे बघितले त्या संदर्भातील विविध शक्यता, कारणे आणि परिणाम यांच्या विचारांतून अजूनही बाहेर येऊ न शकलेला सुनिल अजून धक्क्यातून सावरला नव्हता!

आता वेगाने आपली दृष्टी मागे मागे घेत सुनिल उभाच होता आणि त्याची दृष्टी अजून परत त्याचेकडे जहाजावर यायची बाकी होती.....

सुनिल आणि सारंग हा सगळा जग्गूचा पाठलाग करत असताना नेत्राने सुनिलला हा छडा लागेपर्यंत दृष्टी परत घेऊ नकोस आणि डेकवरच रहा असे बजावले होते. तसेच तोपर्यंत सुनिलचे संरक्षण करण्यासाठी दोन फायटर त्याचेजवळच राहावेत असे नेत्राने

आदेश दिले होते. कारण लवकर शोध लावणे आता आवश्यक होते. वेळ दवडून चालणार नव्हता.

दूरदृष्टीचा उपयोग आता सुनिल बऱ्याच चांगल्या क्षमतेने करू शकत होता. तो डेकवरच होता. दोनेक ब्लॅक कपड्यातील फायटर डेकवर फिरत होते आणि सुनिल त्याच्या कामात बिझी होता.

^^^

# 22. परिवर्तन

त्या दरम्यान एका स्त्रीने नेत्रावर खालच्या मजल्यावर हल्ला केला होता. हे कळले तरी डेकवरील सुनिल च्या संरक्षणार्थ असलेले दोन्ही फायटर तिथेच सुनिल जवळच राहिले होते...

त्याचे झाले असे की, नेत्रा पहिल्या मजल्यावरील हवेशीर कॉरिडॉरमध्ये समुद्राकडे बघत उभी होती तेवढ्यात पाण्यातून वर सूर मारत एक स्त्री डायव्हरच्या पोशाखात जहाजावर उडी मारून आत आली आणि सरळ नेत्रावरच तिने अनपेक्षितपणे हल्ला केला. एका हाताने त्या हल्लेखोर स्त्रीने नेत्राच्या मानेभोवती विळखा घातला. त्यावेळेस निद्राजीता जवळच होती. ती पळतच आली. त्या हल्लेखोर स्त्रीच्या एका हातात एक दंडगोलाकार वस्तू होती आणि तिला दोन्ही बाजूनी झाकणे होती. तिच्या अविर्भावावरून असे वाटत होते की तिला ती दंडगोलाकार वस्तू उघडून त्याच्या आधारे काही करायचे होते. निद्राजीताने हल्लेखोर स्त्रीवर वेगाने उडी मारली आणि तिच्या हातांचा नेत्राच्या मानेभोवती असलेला विळखा सोडवण्याचा प्रयत्न केला. स्वागतचे इतर फायटर्स तिथे जमा झाले पण हल्लेखोर स्त्रीला जिवंत पकडायचे म्हणून तिला गोळी मारायची नाही असे खुणेने नेत्राने त्यांना बजावले.

निद्राजीता ही द्वंद्वयुद्धात पारंगत होती. तिच्यात अशी शक्ती होती की समोरचा जसा फाईट करेल त्या प्रकारच्या फाइट्स लगेच समोरच्याकडून आत्मसात करून ती लगेच तसे वार आपोआप क्षणार्धात शिकून परतवून लावू शकत होती. नेत्राच्या मानेभोवतीचा विळखा सुटताच नेत्रा खाली पडली आणि इतर दोघींमध्ये जुंपली.

तोपर्यंत आपले काम संपवून सुनिल आणि ते दोन्ही फायटर्स डेकवरून खाली आले होते. डेकवरच्या सारंग सोबत दृष्टीने केलेल्या पाठलागातून पाहिलेल्या विचित्र दृश्याचा धक्क्यातून सावरत नाही तोवर त्याला आता हे बघावे लागले.

नेत्राला जहाजावरील एका सुरक्षित रूममध्ये हलवण्यास इतर फायटरनी सुरुवात केली, तोवर निद्राजीताशी लढतांना त्या लाल ड्रेसमधील फायटर स्त्रीने अचानक निद्राजीताला पायात पाय अडकवून खाली पाडले आणि स्वतःच्या पॉकेटमधून एक छोटा विषारी चाकू काढला आणि वेगाने नेत्राकडे मानेवर फेकून मारला. त्यामुळे नेत्राच्या मानेला जखम होऊन नेत्राला वेदना होऊ लागल्या...

यामुळे निद्राजीता विचलीत झाली आणि सावरणार, तोवर फायटर्सनी बंदुकीतून हल्लेखोर स्त्रीवर गोळ्या झाडण्यास सुरुवात

केली. पण त्या चुकवत त्या स्त्रीने वेगाने कॉरिडॉरकडे धावायला सुरुवात केली. तिला पकडण्यासाठी निद्राजीता तिच्या दिशेने वेगळ्या मार्गाने पळाली. मग हेल्लेखोर स्त्रीच्या खांद्याला आणि मानेला एक गोळी लागली. पण त्या स्त्रीने जहाजावरुन वेगाने पाण्यात उडी मारली आणि समुद्राच्या खोल पाण्यात दिसेनाशी झाली. पाण्यात उडी मारण्याआधी वेगाने पळण्याच्या गडबडीत तिच्या हाताचा धक्का जहाजाच्या एका दरवाज्याला लागून तिच्या हातातील ती दंडगोलाकार वस्तू तिची पकड सुटून जहाजावरच पडली आणि घरंगळत एके ठिकाणी कोपऱ्यात जाऊन थांबली. ती वस्तू परत घ्यावी की न घ्यावी याचा विचार करून ती क्षणभर थांबली पण मग लगेच तिने विचार बदलून पाण्यात उडी मारली.

या घटनेच्या वेळेस बरेच जण जहाजाच्या त्या मजल्यावर नव्हते. तिथे हाडवैरीसुद्धा पळतच आला.

सायली, सुनिलच्या गाडीचा पाठलाग करणाऱ्या लोकांना गाडीसहित स्फोटात मारल्याचा बदला म्हणून त्यांनी त्या स्त्रीला नेत्राला मारण्यासाठी पाठवले असावे की आणखी दुसरा कोणता उद्देश होता?

एखाद्या छोट्या पाणबुडीतून किंवा जवळपास असलेल्या एखाद्या छोट्या बेटावरून किंवा कुठूनतरी पोहत ही स्त्री अचानक जहाजावर आली असल्याची शक्यता होती पण हे सर्व अंदाज होते.

त्या स्त्रीचा समुद्रात पाठलाग करण्यासाठी निद्राजीताने डायव्हरचा पोशाख खालून रक्ताच्या रंगाच्या पाण्याच्या दिशेने तिचा समुद्रात पाठलाग करायचा प्रयत्न केला पण ती कुठे दिसली नाही. कारण तोपर्यंत ती दृष्टीआड निघून गेली होती. दोन गोळ्या लागल्यानंतर तिचे जिवंत असणे आता शक्य नव्हते असा अंदाज तिने बांधला. मग निद्राजीता थोड्या वेळाने परत जहाजावर आली.

जहाजावर घरंगळत एके ठिकाणी कोपऱ्यात स्थिर झालेल्या त्या दंडगोलाकार वस्तूला सुनिलने उचलले. ती कोणत्यातरी वेगळ्याच धातूपासून बनलेली होती. त्या वस्तूच्या प्रत्येक टोकाला एकेक लाल वर्तुळ सुनिलला दिसायला लागले. आतापर्यंत सजीवांच्या विचारांतील नकारात्मक लहरी त्याला लाल वर्तुळाच्या स्वरूपात दिसायच्या पण आता या सिलिंडरमध्ये असे काय आहे की ज्याच्या भोवती लाल वर्तुळ त्याला दिसते आहे?

सुनिलने ती वस्तू उचलली आणि जहाजावरील त्याच्या रुममधल्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवली आणि धावतच नेत्राला जिथे नेले होते त्या रूममध्ये पोहोचला. तेवढ्यात ओली झालेली निद्राजीतापण तिथे आली.

सायलीने डॉक्टरी ज्ञानाचा वापर करून नेत्राला वाचवण्याचे हर प्रकारे प्रयत्न केले. जहाजावरील त्यांच्या टीममधील डॉक्टर्स पण काही करू शकले नाहीत. पण त्या चाकूतील विषारी द्रव्य नेत्राच्या शरीरात पसरले होते. एका वेगळ्याच प्रकारचे ते विष होते आणि शरीरावर जलद गतीने वाईट प्रभाव टाकत होते. नेत्रा काळी निळी पडली आणि मग तिचा मृत्यू झाला. ही बातमी स्वागतच्या शहरातील कार्यालयांत आणि नेत्राच्या घरी कळवण्यात आली. आता माघारी फिरणे शक्य नव्हते, त्यामुळे प्रेत जहाजावरील शवागारात सांभाळून मग घरी परत नेणे शक्य नव्हते त्यामुळे आता घरच्यांच्या परवानगीने त्याचे जहाजावर इलेक्ट्रिक दहन करण्यात आले.

यातून सर्वजण लवकरच सावरले आणि सर्वांनी शहरांतील कार्यालयातील महत्त्वाच्या व्यक्तींशी सल्ला मसलत करून नंतर

जहाजावर तातडीची मीटिंग बोलावली आणि एकमताने सुनिलला स्वागत संस्थेचा तात्पुरता अध्यक्ष नियुक्त केले. सुरुवातीला सुनिल नाही म्हणाला कारण अचानक आलेली ही फार मोठी जबाबदारी कशी पेलवेल याबद्दल तो कमालीचा साशंक होता पण शेवटी परिस्थितीची आणि काळाची गरज म्हणून त्याने शेवटी ही जबाबदारी स्वीकारली. नंतर मीटिंगमध्ये सर्वांना त्याने जहाजाच्या डेकवर उभे राहून नेत्रावर हल्ला होण्याआधी आपल्या दृष्टीने काय काय पाहिले होते ते सांगितले. सारंग आणि बीचवरील त्या प्रसंगबद्दल सांगितले. नेत्राचे पासवर्ड आणि फक्त तिच्याच फिंगर प्रिंटने उघडणारी सर्व उपकरणे आणि इतर गोष्टी आता मास्टर की ने अनलॉक करुन मग त्याचा तात्पुरता ताबा सुनिलकडे देण्यात येणार होता. त्यातील एका लॉकर मध्ये नेत्राने लिहिलेले मृत्युपत्र सापडले, ज्यात तिने अलाईड सिक्रेट फोर्सेसबद्दल जहाजावर स्पष्टीकरण दिलेल्या अनेक गोष्टी होत्या, अनेक खुलासे होते, काही खासगी गोष्टी होत्या ज्या वेगळ्या पानांवर लिहिल्या होत्या ज्या फक्त तिच्या कुटुंबासाठी होत्या. संस्थेसाठी लिहिलेल्या एका पत्रात असेही लिहिले होते जे सर्व जणांनी वाचले:

"सुनिलला मी लहानपणापासून ओळखते. त्याला मिती जीवांकडून मिळालेल्या शक्तीमुळे आणि त्या शक्तींचा नैतिकतेने

वापर करण्याच्या त्याच्या दृढ निश्चयाच्या आधारे तसेच आतापर्यंत त्याने पोलीस डिपार्टमेंटला केलेल्या अतुलनीय मदत आणि योगदानामुळे, त्याच्या अंगी असलेल्या हुशारीमुळे, व्यवहार ज्ञानामुळे आणि त्याने रणजित यांच्या हाताखाली ट्रेनिंग घेऊन कमावलेल्या शारीरिक ताकदीमुळे तसेच अनेक लोकांना त्याने निराशेतून बाहेर काढले या त्याच्या सामाजिक योगदानामुळे मला असे निश्चितपणे वाटते की यदाकदाचित मला काही झाले तर आपल्या संस्थेचा पुढचा प्रमुख म्हणून सुनिलच योग्य आहे!"

मुंबईत असलेल्या नेत्राच्या वकिलांशी संपर्क साधून या संदर्भात कायदेशीररित्या त्याचा सल्ला घेण्यात येऊनच मग सगळे निर्णय घेण्यात आले होते. या संस्थेबद्दल आवश्यक तेवढी गुप्तता कशी ठेवायची हे त्या वकिलांना माहिती होते. नेत्राच्या त्या पत्रानंतर आता सुनिलला स्वागत संस्थेचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. सगळे अधिकार त्याला बहाल करण्यात आले.

^^^

# 23. सुपर नेचर कडे

जहाजावर दुसऱ्या दिवशी सारंगला सुनिलने त्याच्या घरी पाठवले आणि तो स्वतः नजरेने त्याच्या घरातील दृश्य पाहू लागला. मग सारंगजवळील फोन वरून तो आधी आईवडील मग भाऊ, वहिनी आणि नंतर आत्या यांचेशी बोलला आणि सत्य परिस्थिती सांगितली. त्याला घरची खूप आठवण येत होती. त्यांना प्रत्यक्ष बघून त्याला बरे वाटले, मात्र घरचे फक्त फोनवरून सुनिलशी बोलू शकत होते त्याला बघू शकत नव्हते. सायली आणि निद्राजीता या दोघीही आपल्या घरी फोनवर संपर्क साधून होत्या. दोघींच्या कुटुंबियांना सुनिलने आपल्या दृष्टीने बघून त्याबद्दल दोघींना सांगितले आणि सुनिलही त्यांच्या कुटुंबियांशी बोलला.

सायलीला त्याने आधी जहाजावर लग्नासाठी रीतसर मागणी घातली आणि मग तिच्या आरक्त होऊन लाजलेल्या चेहऱ्यासह मिळालेल्या होकारानंतर फोनवरून तिच्या कुटुंबातील मंडळींनासुद्धा लग्नाचा निर्णय दोघांनी सांगितला. या सर्वांच्या कुटुंबियांना गोपनीयतेची शपथ दिली गेली होती की सायली, निद्राजीता आणि सुनिल हे जे काही काम करत होते त्याबद्दल

कुणालाही काहीही सांगायचे नाही. मग जहाजावर त्यांनी सर्वांसमोर सात फेरे घेऊन छोटासा लग्नविधी आटोपला. त्याचे फोटो आणि व्हीडिओ नंतर घरच्यांना पाठवला.

तसेच गेल्या काही दिवसांतील सर्व वेगवान घटनांनंतर सुनिल रात्री विविध शक्यतांचा विचार करू लागला, "हॉस्पिटलमध्ये ती नर्स सायलीला असेच इंजेक्शनमधील स्प्रेचा वापर करून, गायब करून छोट्या पेशीसमूहात रूपांतर तर करणार नव्हती ना? जसे पप्पूचे झाले! जपानचा तो रोबोट एक्स्पर्ट सायंटिस्ट बाथरूममध्ये अशाच पद्धतीने तर गायब झाला नसेल ना? व्यक्तींना गायब करून त्यातून उरलेल्या त्या पेशीसमूहाचे ते लोक काय करत असतील? क्लोन की आणखी काही? त्या पेशी समूहातून त्यांना त्या व्यक्तींच्या जीवनाची सगळी माहिती मिळत असावी का? मला पडलेले ते दिवास्वप्न हेच दर्शवत होते का? त्या स्वप्नानुसार जगातले सजीव हळूहळू अशा रितीने गायब होणार होते का? यामागे नेमके कोण हे आणि त्यांचा उद्देश्य नेमका काय आहे?"

एक ना अनेक वेगवेगळया विचारांची त्याची जणू काही झोप उडाली. अशा विचारांनी रात्री त्याला झोप न आल्याने तो अस्वस्थ झाला. सायलीसुद्धा त्याच्या सोबतच रूममध्ये होती पण तिला झोप लागली होती. तिला त्याने झोपेतून उठवले नाही आणि तो

त्या मजल्यावरच्या कॉरिडॉरमध्ये येऊन कठड्यावर हात ठेऊन रात्रीच्या अथांग समुद्राकडे बघत राहिला. समुद्रातील अथांग पाण्याकडे बघून त्याला शांत वाटायला लागले. सगळीकडे पाणीच पाणी होते.

थोड्या वेळाने विचार शांत झाल्यावर तो पुन्हा जहाजावरील आपल्या रूममध्ये आला. सायलीजवळ पहुडला आणि पाठीमागून तिला मिठी मारली. त्याच्या हातांचा तिच्या छातीला स्पर्श झाल्याने तिला जाग आली. तो स्पर्श तिला अचानक आणि अनपेक्षितपणे मिळाल्याने खूप आवडला आणि तिला आणखी तसा स्पर्श हवाहवासा वाटला. मग त्याचे हात तिने आणखी स्वतःच्या हाताने तिच्या छातीच्या दोन्ही उभारांवर घट्ट दाबून धरले. यामुळे सुनिल उद्दीपित झाला आणि आता दोघांनाही भावना अनावर झाल्या. त्याने तिला स्वतःच्या दिशेने कूस बदलवून फिरवले आणि ओढले. मग आवेगाने तिच्या ओठांचा किस घ्यायला सुरुवात केली आणि एका हाताने तिचे कपडे काढायला लागला आणि दुसऱ्या हाताने तिची नाजूक कमर पकडली. मग आपोआपच दोघांनी एकमेकांची अंतर्वस्त्रे पण क्षणांत बाजूला केली. आता ती दोन शरीरे एकमेकांना अतिशय उत्कटतेने अशी बिलगली जणू काही त्यांचे दोघांचे मिळून एकच शरीर आहे.

प्रेमासाठी आसुसलेल्या अनावृत्त शरीराच्या तिच्या प्रत्येक अंग प्रत्यंगाचा वेध सुनिलचे हात हळुवारपणे घेऊ लागले. तिने डोळे मिटून घेतले होते आणि या सर्वांचा ती सुखद अनुभव घेऊ लागली. दोघांचेही श्वास गरम होऊन हृदय वेगाने धडधड करायला लागले. ओठांचा किस घेऊन झाल्यावर त्याने तिच्या कपाळाचा, डोळयांचा, नाकाचा, कानांच्या पाळयांचा, मानेचा आणि नंतर छातीच्या दोन्ही उन्नत उभारांचा हळुवारपणे पुन्हा पुन्हा किस घ्यायला सुरुवात केली. त्याच्या त्या हळुवार नाजूक स्पर्श मालिकेने तीचे शरीर खुलून बहरले जसे काही कळीचे क्षणांत फुल व्हावे! मग बराच वेळ तो तिला घट्ट पकडून तिच्यात प्रवेश करत राहिला. या क्षणी आपण कुठे आहोत याची काहीही जाणीव दोघांना नव्हती. शेवटी प्रेमाच्या या खेळातील परमावस्थेतील अत्युच्च अनुभूती दोघांना एकाच वेळेस मिळाली आणि दोघांनीही एक परमोच्च सुखद अनुभूतीचा सुस्कारा टाकला आणि मग ते दोघे एकमेकांच्या बाहुपाशात काही वेळातच गाढ झोपून गेले.

निद्राजीता मात्र कधीही जहाजावर कोणत्याही रात्री झोपली नाही. तिला जहाजाच्या डेकवर फिरतांना तिचा प्रियकर आठवत होता. सायली सुनिलची जोडी पाहून तिलाही त्याची आठवण झाली. तिला तिच्या बालपणापासूनच्या काही घटनासुद्धा आठवत होत्या.

दोन दिवसानंतर दुपारी जहाजावर एक बातमी येऊन धडकली. गेट वे ऑफ इंडिया गायब झाले होते म्हणे, रात्रीतून! प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमची इमारत आणि नंतर त्यातील सर्व दुर्मिळ मुर्त्या वस्तू हे सगळे गायब झाले होते. मुंबईतील अनेक महत्वाच्या वास्तू गायब झाल्या होत्या  अशाच बातम्या एक दोन दिवसांतच जगभरातून येऊ लागल्या की जगातील सात आश्चर्य एका रात्रीतून गायब झाले होते. त्या सर्व इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेरे पण गायब होत होते. त्या वास्तूंच्या आजूबाजूला असलेल्या इतर सीसीटीव्ही कॅमेरांतून असे दिसत होते की एका क्षणी ती वास्तू होती आणि दुसऱ्या काही सेकंदांतच ती हळूहळू नाहीशी होत नष्ट झालेली होती. सगळीकडे संभ्रम आणि हाहा:कार माजला होता. अनेक क्षेत्रांतील महत्वाच्या व्यक्ती तर गायब होतच होत्या आणि आता जगभरातील महत्वाच्या वास्तू आपोआप गायब होऊन नष्ट होत होत्या.

नेत्राने आधी एकदा सांगितल्याप्रमाणे सुपर नेचर बेटावर लवकर पोहोचून तिथे नुकत्याच वसवल्या गेलेल्या पण अजून विकसित होत असलेल्या स्वागत संस्थेचे जे मुख्यालय होते तिथे असे काहीतरी होते ज्यामुळे सर्वजण तिथे सुरक्षित राहणार होते. विशेष म्हणजे हेरगिरी करणारी विमाने आणि इतर कोणत्याही

रडारयुक्त उपाकरणांना आणि बऱ्याच इतर सॅटेलाईट्सना सुद्धा आपल्या विविध कॅमेरांतून हे बेट दृष्टीस पडत नव्हते. इतर जगासाठी तिथे फक्त समुद्राचे पाणीच दिसायचे पण तिथे होते एक बेट. हे बेट जगाच्या नकाशावर नव्हते. मादागास्कर आणि मॉरिशस या बेटांच्या मध्ये ते बेट होते. जेव्हा तिथून इतर जहाजे जात, त्यांना ते बेट न दिसल्याने वेगाने टक्कर होऊन नष्ट होत. मग हळूहळू सावधगिरीचा उपाय म्हणून तेवढया विशिष्ट भागातून प्रवास करणे विविध जहाजे टाळू लागले होते. पण स्वागत संस्थेशी संबंधित सर्व इतर संस्था व्यक्ती ज्या जगभर होत्या त्यांनी आपापल्या सॅटेलाईट्समधून त्या बेटावर जात असणारी जहाजे नंतर अदृश्य होतात त्या संबंधित मेसेजेस आणि व्हीडिओज वेळोवेळी इतर सामान्य जनतेपासून लपवून ठेवलेले होते. असे काय होते तिथे ज्यामुळे ते बेट अदृश्य होते? इतर कुणी जरी त्याचे व्हीडिओ बनवले तरीही ते समुद्रातील एक न उलगडलेले रहस्य म्हणून त्यापासून दूर राहणे पसंत करत होते.  जहाज दोनेक दिवसांनी सुपर नेचर बेटावर पोहोचले आणि बेटाभोवतालच्या एका सुरक्षा कवचात हळूहळू शिरले. इतरांच्या दृष्टीने किंवा सॅटेलाईट्स मधून पाहिल्यास ते जहाज अचानक नष्ट किंवा गायब झाले होते.

^^^

# 24. सुपर नेचर

सुपर नेचर बेट म्हणजे पृथ्वीचा असा भाग होता की जिथे निसर्गाचे आणि विज्ञानाचे नियम थोडे वेगळे होते आणि काही नियम वैज्ञानिकांनी वाकवले होते. जसे की तेवढ्या भागात सगळीकडे असणाऱ्या सजीव आणि निर्जीव गोष्टींवरून परावर्तित होणारी किरणे ही परावर्तित झाल्यावर कमजोर होतील अशी त्यावर प्रक्रिया केलेली होती. ही प्रक्रिया तिथे असलेल्या विशिष्ट मॅग्नेटिक फिल्ड मुळे शक्य होती. म्हणजे ती किरणे परावर्तित झाल्यावर फारच थोडे अंतर कापू शकत होती आणि प्रवास करून ठराविक अंतरावर थांबत होती आणि त्यापेक्षा दूर अंतरावरील इतर कुणा माणसाच्या डोळ्यांपर्यंत किंवा कोणत्या कॅमेऱ्यापर्यंत पोहोचतच नव्हती. म्हणजे त्या बेटाभोवती जणू काही एक अर्धवर्तुळाकार असे अदृश्य कवच तयार झाले होते ज्या कवचाच्या आत काय आहे हे कवचाच्या बाहेरून कुणालाही दृष्टीस पडणे शक्य नव्हते.

त्या अर्धगोलकार अंतरापर्यंत येऊन थांबलेल्या किरणांच्या तयार झालेल्या पातळीवरून मग आजूबाजूच्या समुद्राच्या

पाण्यावरून परावर्तीत होऊन आलेले किरण मग इतरांच्या दृष्टीस पडत. म्हणजे बेटाच्या ठिकाणी समुद्राचे पाणीच आहे असे दिसायचे पण जणू काही एखाद्या भिंगातून तेवढ्या समुद्रात आपण बघतोय असे वाटायचे. मात्र बेटावर आत असणाऱ्यांची दृष्टी बाहेर जाण्यात काही अडचण नव्हती कारण त्या अर्धगोलाकार आवरणाबाहेरील कोणत्याही वस्तूंवर पडून परावर्तित झालेली किरणे बेटावर असलेल्या लोकांच्या डोळयांपर्यंत पोहोचण्यास काही अडचण नव्हती.

तसेच बेटावरच्या विशिष्ट नैसर्गिक आणि वैज्ञानिक वातावरणामुळे बाहेरची रडार वेव्हज येथे प्रवेश करू शकत नव्हती. ती वेव्हज त्या विशिष्ट अर्धगोल वातावरणात शिरली की इतकी कमजोर होऊन जात की पुन्हा वेव्हज पाठवणाऱ्या उपकरणाकडे परत पोहोचूच शकत नव्हते. जरी एखाद्या बॉम्ब किंवा तत्सम वस्तूचा काही कारणास्तव हल्ला झालाच तर अर्धगोल अदृश्य कवचावर ते आपटून हवेतच नष्ट होऊ शकेल अशी व्यवस्था होती. त्या अदृश्य कवचाचा खालचा समुद्राजवळाचा काही भाग टीमचे जहाज आले की फक्त तिथल्या यंत्रणेद्वारे मोकळा करता यायचा आणि जहाज आत गेले की बंद व्हायचा. इतर जहाज वेगाने आले तर ते कवचावर आदळले जाऊन नष्ट होत. स्वागत टीमचे

कम्युनिकेशन गॅजेट्स ज्या टेलिकॉम वेव्हज वापरत होत्या त्या मात्र त्या अर्धगोल कवचातून आरपार जाऊ शकत होत्या. थोडक्यात एका अर्धगोल अदृश्य कवचाच्या आत हे बेट सुरक्षित होते आणि अदृश्य होते.

या बेटावरील तंत्रज्ञ टीम आता टीमसाठी वेगळ्या धाटणीची, सुरक्षित आणि विविध यंत्रणांनी सज्ज अशी दोन हेलिकॉप्टर्स बनवण्यात व्यस्त होती. या बेटावर नैसर्गिक नियम पण बदललेले होते जे वनस्पती, प्राणी, कीटक, जीव जंतू, जलचर प्राणी वगैरे सगळ्यांना लागू होते. जसे की या बेटावर प्रत्येक जीव जंतूंच्या जगण्याचा कालावधी इतर जगापेक्षा जवळपास दुप्पट होता. इथली संपूर्ण हवा शुद्ध होती. इथे जवळपास जगातील सर्व प्रकारचे प्राणी आणि सर्व प्रकारची झाडे, वनस्पती उगवत होती आणि वाढू शकत होती कारण इथे असलेल्या वातावरणातील हवेत एक आणखी असा एक पोषक तत्व असलेला वायू होता जो संपूर्ण पृथ्वीवर कुठेही आढळून येत नव्हता. त्याचे नाव होते किर्मोटो.

त्या बेटावर असलेल्या छोट्या नद्या, तलाव, तळे यात असलेले पाणी वेगळ्याच गुणधर्माने युक्त होते. ते पाणी कधीही

दूषित किंवा अशुद्ध होत नव्हते. समुद्राचे पाणी विशिष्ट चॅनेलद्वारे थोडे थोडे या बेटावर येऊ दिले जात होते आणि ते या बेटावर आले की इथल्या वातावरणाने शुद्ध होत होते. किर्मोटो वायूमुळे आणि इतर शुद्ध वातावरणामुळे तिथे अशा काही वनस्पती आणि झाडे उगवायची ज्यांची फळे एकदा खाल्ली की त्यातून आठ दिवस पुरतील अशी शरीराला आवश्यक अशी पोषक तत्वे मिळत. मग आठ दिवसानंतरच भूक लागत असे. तसेच तिथल्या तळ्यातील वेगळे असे अतिशुद्ध पाणी ग्लासभर पिले तरी पुढील आठ दिवस शरीरातील पाण्याची गरज भागत असे. त्या पाण्याला ते अमूर्तजल म्हणत. तिथे रबरसारखा लवचिक आणि काचेसारखा पारदर्शक धातू पृथ्वीच्या पोटात सापडायचा ज्याचे नाव होते झिरकोडीयम! तो द्रव आणि वायू मध्येही रुपांतरीत करता यायचा.

येथे जगभर असलेल्या सर्व प्राणी पक्षी कीटक जलचर तसेच वनस्पती यांना पोषक वातावरण तर होतेच पण जगात इतरत्र कुठेही न आढळणाऱ्या अशा अनेक वनस्पती आणि प्राण्यांचे प्रकारही होते. त्यांच्यासाठी इथे एक वेगळा अभयारण्यासारखा भाग आरक्षित होता. तिथे ते सगळे गुण्या गोविंदाने रहात होते. इथे असलेल्या अनेक छोट्या मोठ्या पर्वतांच्या आतमध्ये कित्येक नैसर्गिक गुहा होत्या. त्यापैकी काही गुहांमध्ये अनेक वैज्ञानिक

आपल्या सुसज्ज प्रयोगशाळेत विविध प्रयोग करायचे. अर्थात तेथील निसर्गाला काही इजा पोहोचू नये याची ते दक्षता घेत असत.

तिथे वडासारखी दिसणारी पण वडापेक्षा प्रचंड मोठा आकार असलेली झाडे होती. त्यावर नैसर्गिकरित्या ट्रीहाऊसेस तयार झाली होती. त्यातच आणखी बदल करून तिथे असणारी सर्वजण राहत होती.

आता जहाजवरून आलेले सर्वजण रिकाम्या असलेल्या ट्रीहाऊसेस मध्ये राहणार होते. त्या बेटावर अनेक ट्रीमॅन म्हणजे झाड मानव रहात होते! त्यांना कुणी या बेटावरचे नियम तोडतांना आढळले तर ते मानवांना वेगवेगळ्या शिक्षा करायचे.

ही आणि आणखी अशी अनेक आश्चर्ये त्या बेटावर चौघांची वाट बघत होती. त्यांच्या मनात अनेक प्रश्नांची मालिका तयार होत होती. तसेच जगभर घडत असलेल्या घटनांबद्दल मनात संभ्रम होता आणि मानवतेला त्यापासून वाचवण्याची जबाबदारी त्यांचेवर आलेली होती.

^^^

# 25. तयारी

संध्याकाळ झाली होती.

वैज्ञानिक डॉ. शिशिर आणि त्यांची टीम डॉ. राधाकृष्णन, हिमांशू, सर्वेश, मिनाक्षी, स्कार्लेट, अब्दुल, फिलिप, लिओनार्दो, अलोंझो आणि नतालिया हे सगळेजण बेटावरील गुहेतील सुसज्ज प्रयोगशाळेत उपस्थित होते.

आतापर्यंत घडलेला सर्व वेगवान घटनाक्रम थोडक्यात चौघांनी त्या वैज्ञानिकांच्या टिमला सांगितला. नेत्राच्या मृत्यूबद्दल सर्वांनी हळहळ व्यक्त केली. स्वागत संस्थेचा पहिला प्रमुख असलेली नेत्रा हिचा बेटावरील नैसर्गिक साधने वापरून एक पुतळा बनवायचा ठरवला गेला आणि तो त्या बेटावरच्या सर्वात मोठ्या तळ्याच्या मध्यभागी उभारायचे ठरले. नेत्रा चांगल्या कारणासाठी शहिद झाली होती याचा आनंद सुद्धा सगळ्यांच्या चेहऱ्यावर होता आणि आता तिचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्याची मोठी जबाबदारी सगळ्यांवर येऊन पडली होती. दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून मग चर्चेला सुरुवात झाली. आता वेळ दवडून चालणार नव्हते. शत्रूची ताकद, कारवाया आणि त्याने जगभर सुरू केलेले

नुकसान वाढत चालले होते. त्याआधी सर्वांनी एकमेकांची नीट ओळख करून द्यायला सुरवात केली.

डॉ. शिशिर म्हणाले, "आम्ही प्रत्येकजण विज्ञानातील एकेक क्षेत्रात तज्ञ आहोत. फिलिप आणि स्कार्लेट मेडिकल क्षेत्राशी संबंधित आहेत तर इतर आम्ही वैज्ञानिक आहोत. तुम्हाला आधी या बेटाबद्दल पडलेल्या प्रश्नांची उत्तरे सांगतो. हाडवैरीने मला थोड्या वेळापूर्वी विचारले की इथे वीज कशी तयार होते! त्याबद्दल सांगतो. आपले हे बेट पृथ्वीवर समुद्रात जिथे आहे तिथे एक विशिष्ट प्रकारची चुंबकीय शक्ती आहे. येथे भूगर्भात नेहमी विशिष्ट लयीत फिरत राहणारे चुंबकीय क्षेत्र आहे. चुंबकीय उत्तर दक्षिण ध्रुव एकमेकांच्या जवळ धरून ठेवल्यास जो अदृश्य मग्नेटिक फ्लक्स (चुंबकीय धारा) दोघांमध्ये वाहातो तो इथे कायम फिरत्या अवस्थेत आहे. तुम्हाला कल्पना आहे की स्थिर फ्लक्समधून कॉपर वायर फिरवली तर त्यात वीज निर्माण होते पण इथे फिरते फ्लक्स असल्याने स्थिर कॉपर वायरची योजना आपण केली असून येथे सतत वीज निर्मिती होत राहाते!"

"अदभुत आहे हे सगळं!", सायली म्हणाली.

पुढे राधाकृष्णन सांगू लागले, "आपल्या बेटा भोवती जसे नियम बदललेले प्रकाशाचे कवच आहे जे आपल्याला अदृश्य बनवते तसेच या चुंबकीय फिरत्या शक्तीमुळे एक कवच बेटाभोवती तयार होते ज्यामुळे त्यावर काहीही आदळले तर ती वस्तू नष्ट होते त्यामुळे कोणत्याच वस्तू जसे जहाज, विमान आणि इतर उडत्या वस्तू आपल्या अदृश्य चुंबकीय कवचावर आदळून नष्ट होतात आणि प्राणी माणसे असतील तर ते आदळून पुन्हा समुद्रात फेकले जातात. बेटावर यायचे झाले तर त्यासाठी तेवढ्या भागाचा अदृश्य चुंबकीय प्रवाह किंवा फ्लक्स आपण प्रयोगशाळेतून मोकळा करतो आणि आत शिरल्यावर पुन्हा पूर्ववत करतो. आपल्या या बेटावर जे प्राणी, झाडे वनस्पती आहेत ते इथले आधीपासूनच रहिवासी आहेत. ते इतर प्राण्यांच्या प्रजातींपासून वेगळे आहेत!"

नंतर स्कार्लेट म्हणाली, "मी आणि मिनाक्षी त्या जहाजावर सापडलेल्या दंडगोलाकार वस्तूबद्दल आज रात्री संशोधन करणार आहोत. तोपर्यंत तुम्ही सर्वजण आपापल्या ट्री हाऊसेस मध्ये आराम करा. हात पाय दुखत असल्यास ट्रीमेनच्या फांद्यांवर बसा, ते तुम्हाला तुमच्या ट्री हाऊसेस पर्यंत पोहोचवतील! पण ते हळू चालतात, वेळ लागतो! पण तुम्ही मस्त बेटावरचे सौंदर्य बघत बघत जाऊ शकता! उद्या सकाळी येथेच भेटू सगळेजण!"

सुनिलने दोघींना थोडे सावध राहायला सांगितले कारण त्या दंडगोलाकार वस्तू मध्ये त्याला नकारात्मक अस्तित्व जाणवले होते. या सर्व चर्चे दरम्यान सुनिलच्या मनात बरेच काहीतरी सुरु होते.

थोडा वेळ विचार करून सुनिल म्हणाला, "मला वाटते हे संशोधन करतांना मी आणि सायलीसुद्धा तुमच्या सोबत असावे. कारण मला दोन वेगवेगळ्या प्रकारच्या घटनांची साखळी एकत्र गुंफली आहे असे वाटते आणि या दंडगोलाकार वस्तूमध्ये त्याचे उत्तर आपल्याला एकत्रितरित्या मिळेल! आणि सायली यासाठी की ती आपले सुपर कॉम्प्युटर आहे. आपल्या सगळ्या संशोधन करत असलेल्या गोष्टी ती लक्षात ठेवेल!"

सर्वांनी संमती दर्शवली.

मीनाक्षी आणि स्कार्लेट पुढे म्हणाल्या, "दोन कोणत्या वेगळ्या घटनांची साखळी तुम्ही म्हणत आहेत DN?"

DN म्हणजे सुनिल म्हणाला, "तुम्ही नका म्हणू मला. तू म्हणा. त्यात आपलेपणा आहे. मी तुमचा आपला DN आहे. तर आता सांगतो या घटनेची साखळी क्रमांक एक. सजीव गोष्टी गायब

होण्याच्या घटना. त्यापैकी आपल्याला माहिती असलेल्या घटना म्हणजे जपानचे सायंटिस्ट बाथरूममध्ये गायब होणे आणि त्यांचे फक्त कपडे सापडणं, हॉस्पिटलमध्ये सायलीवर हल्ला करणारी नर्स पुन्हा बाथरूम मध्येच गायब होणं आणि तिचे अंगावरचे सगळे कपडे आणि दागिने सापडणं तसेच मी दूरदृष्टीने पाहिलेले पप्पू आणि त्या मास्कवाल्या माणसाच्या शरीराचे लहान होत जाणे आणि पेशी समूहात रूपांतर होणे. तसेच नंतर त्याच दिवशी जग्गू पण घरातून गायब झाला. त्याचं पण असंच कुणीतरी पेशी समूहात रुपांतर केलेलं असावं. कारण कोणत्याच सीसीटीव्ही कॅमेरात तो दिसला नाही. यापैकी जपानी सायंटिस्टचा पेशीसमूह कुणीतरी बाथरूममधून चोरला असावा आणि नर्सचा उरलेला पेशीसमूह? तो कुठे गेला असावा? कदाचित पाण्याबरोबर तो वाहून गेलं असावा. कारण नर्सचे कपडे सापडले तेव्हा तिथे शॉवर सुरू होता. म्हणजे तिने स्वतः आपण पोलिसांच्या तावडीत सापडू नये म्हणून स्वतःला इंजेक्शनचे लिक्विड वापरून नष्ट तर केलेच पण त्याआधी शॉवर चालू करून आपल्या शरीराचा उरलेला पेशी समूह कुणाच्या हाती न लागता पाण्याबरोबर वाहून जाईल अशी पुरेपूर व्यवस्था केली जेणेकरून मागे कोणताही पुरावा रहाणार नाही!"

मीनाक्षी म्हणाली, "यू आर जिनियस DN!"

सुनिल हसला. सायली त्याच्याकडे बघू लागली.

सुनिल पुढे म्हणाला, "मला वाटतंय की तेच लिक्विड या दंडगोलाकार वस्तूमध्ये एका बाजूला असावे आणि त्या नेत्रावर हल्ला करणाऱ्या स्त्रीचा प्लॅन पण तिला पेशीसमूहमध्ये रूपांतर करून तो समूह चोरण्याचाच असावा. पण तिचा प्लॅन फसला आणि तिने विषारी शस्त्राने नेत्राला मारले. आता प्रश्न पडतो की समजा तिने नेत्राचा पेशीसमूह स्वतः सोबत नेला असता, तो ती कुणाकडे घेऊन जाणार होती आणि त्याचे ते अज्ञात लोक पुढे काय करतात? एखादा क्लोन? की आणखी काही?"

स्कार्लेटला हे सगळे समजत होते कारण सर्वांकडे ऑललँग्वेज ट्रान्सलेटर (सर्वभाषी भाषांतर करणारे) गॅजेट होते.

स्कार्लेट म्हणाली, "मग आता ते लिक्विड या दंडगोलाकार वस्तूमधून बाहेर काढणे योग्य होणार नाही, बरोबर?"

"काढू शकतो पण ते वस्तूच्या कोणत्या बाजूला आहे हे आपल्याला माहिती नाही आणि दुसऱ्या बाजूला काय आहे हेही माहिती नाही. मला दोन्ही बाजूला निगेटिव्ह लाल वर्तुळ दिसले आहे. ते लिक्विड जरी आपण बाहेर काढले तरीही ते इथे कुणाच्याही शरीरात जाणार नाही याची काळजी घ्यावी लागेल!"

मीनाक्षी म्हणाली, "आणि ती दुसरी कोणती गोष्ट आहे DN, जी या सगळ्या घटनांशी साखळीने बांधली गेली आहे?"

"ती दुसरी गोष्ट म्हणजे, नुकत्याच सुरू झालेल्या काही महत्वाच्या घटना म्हणजे निर्जीव वस्तू नष्ट होणाच्या घटना. जगातील महत्वाच्या वास्तू नष्ट होणे. त्याच्याशी संबंधित एखादी गोष्ट दंडगोलाकार वस्तूच्या दुसऱ्या बाजूत असेल याची मला खात्री आहे. म्हणजे त्या हल्लेखोर स्त्रीला नेत्राचा पेशीसमूह सोबत घेऊन जायचा होताच पण त्याच सोबत कदाचित निर्जीव गोष्ट म्हणजे आपले जहाज सुद्धा नष्ट करायचे होते असे मला वाटते आहे! आणि हे सगळे कोण करते आहे आणि कशासाठी हे शोधून आपण सगळ्यांनी त्यांना धडा शिकवायचा आहे!"

डॉ. शिशिर आणि त्यांची टीम DN चे विश्लेषण ऐकून प्रभावित झाली. अगदी नेत्राप्रमाणेच याचीही बुद्धी विलक्षण तीव्र होती!

"आता प्रश्न असा आहे की सजीवांवर जसा लिक्विडचा प्रयोग होतो तसा निर्जीव वस्तू नष्ट करण्यासाठी ते नेमके काय वापरतात? पावडर, लिक्विड की एखादा गॅस? म्हणजे दुसऱ्या बाजूला काय आहे आणि त्याचा वापर आणि प्रभाव कसा पडतो हे आपल्याला माहिती नाही. म्हणून सध्या ती दंडगोलाकार वस्तू उघडण्याची घाई करण्यापेक्षा, त्याचा थोडा वरवरचा तुकडा तोडा आणि तो धातू

कोणता आहे ते आधी तपासा! कारण मला तो धातू कोणत्याच परिचित धातूंपैकी वाटत नाही. कदाचित त्या दोन्ही गोष्टी फक्त याच प्रकारच्या धातू मध्ये सुरक्षित रहात असाव्यात!"

सर्वांना ही सूचना पसंत पडली.

नंतर हाडवैरी, निद्राजीता ट्रीमेन वर बसून आपापल्या ट्रीहाऊसेस कडे निघाले.

सायली आणि सुनिल प्रयोगशाळेतच थांबले. सकाळपर्यंत धातूच्या तुकड्यावर संशोधन सुरू होते. पृथ्वीवर प्रचलित असलेल्या कोणत्याच धातूशी (मेटल शी) किंवा गुणधर्मांशी त्या तुकड्याशी साधर्म्य नव्हते. साम्य नव्हते. त्या धातूंवर वेगवेगळ्या तापमानाचा प्रयोग करून बघण्यात आला.

त्या बेटावर एका गुहेत अशीही एक प्रयोगशाळा होती जिथे बेटावरच्या बदललेल्या वातावरणापासून मुक्त आणि जसे पृथ्वीवर इतर ठिकाणी वातावरण आहे तसे वातावरण निर्माण केले होते तिथेही नेऊन त्या तुकड्यावर वेगवेगळ्या तापमानात संशोधन केले गेले पण शेवटी असा निष्कर्ष निघाला - हा धातू पृथ्वीवर प्रचलित असलेल्या धातूंपैकी नाही!!

सकाळी 5 वाजता सर्वजण पुन्हा चर्चेसाठी जमले. सुनिलने सर्वांना बोलावून घेतले. रात्रभर संशोधन सुरू होते तेव्हा मनाच्या एका कोपऱ्यात सुनिलचा एक प्लॅन तयार होत होता तो सांगण्यासाठी त्याने ही मिटिंग बोलावली.

"हे बघा, मला दूरदृष्टीची सुद्धा शक्ती आहे हे फक्त आपल्या स्वागत टीमला माहिती आहे. मला निगेटिव्ह विचार व्यक्तीच्या डोक्याभोवती लाल प्रकाशमान वर्तुळाकार स्वरूपात दिसतात हे सुद्धा सगळ्यांनाच माहिती नाही. ती जी कुणी विघातक टीम आहे तीला समजा माझ्या नकार शोधक शक्तीबद्दलच माहिती आहे असे मानले तरीही माझ्या दूरदृष्टीबद्दल माहिती असण्याची शक्यता नाही. कारण ही शक्तीच मुळात मला अलीकडेच मिळाली आहे आणि त्याबद्दल मी स्वागत टीम व्यतिरिक्त कुणालाच सांगितले नाही. त्यामुळे मी जहाजवरून जुहूच्या समुद्र किनाऱ्यावरच्या पप्पूला पाहिले असल्याचा विचार त्यांनी केला असेल याची शक्यता नाही. त्यामुळे त्यांना असे वाटले असेल की हल्लेखोर स्त्रीने जहाजावर विसरलेले दंडगोल आपण उघडले की, त्यातील सजीव निर्जीव वस्तू नष्ट करणारे पदार्थ जहाजाला आणि आपल्याला नष्ट करतील आणि जहाज त्यामुळे नष्ट झाले असेल. आपण सर्व नंतर बुडून मेले असू!"

हाडवैरी म्हणाला, "शक्य आहे, शंभर टक्के!"

सुनिल पुढे म्हणाला, "आता तुम्ही एक करा. भारतातील आणि जगातील महत्वाच्या ऐतिहासिक आणि सरकारी तसेच महत्वाच्या वास्तू, पर्यटन स्थळे आणि अति महत्त्वाचे व्यक्ती रहात असणाऱ्या घरांच्या आणि ऑफिसेसच्या आसपास असणाऱ्या सीसीटीव्ही कमेऱ्यांचे प्रक्षेपण शहरात ठिकठिकाणी असलेल्या आपल्या टीमकडून आपल्याला दिसेल अशी व्यवस्था करा. सायली, मिनाक्षी दिवसा आणि निद्राजीता रात्री असे तुम्ही सीसीटीव्हीचे फुटेज मॉनिटर करत रहा. लागल्यास तुमच्या मदतीला आणखी काहीजण घ्या. मला खात्री आहे की उडणारे भुंगे किंवा कीटक यांच्या आधारे ते काहीतरी लिक्विड किंवा पावडर किंवा एखादा गॅस रिमोटने ऑपरेट करून एखाद्या निर्जीव वस्तूवर स्प्रे करत असावे. असा एखादा संशय आलाच तर आपण त्या ठिकाणचा लाईव्ह कॅमेरा झूम करू आणि कीटक दृष्टीस पडला की मी वेगाने दूरदृष्टीच्या आधारे तिथे जाण्याचा प्रयत्न करीन आणि त्या उडणाऱ्या यांत्रिक कीटकांचा पाठलाग करेन आणि हे शोधण्याचा प्रयत्न करीन की ते कीटक कुठे कुणाकडे जातात! मग एखाद्या व्यक्तीचा सुगावा लागला की त्याचा पाठलाग करून मी

काही शोध लागेल का ते बघेन. एकदा का त्या विघातक टीमचा ठावठिकाणा आणि त्यांचे हेतू आपल्याला समजले की मग आपल्याला त्यांच्या कारवाया नष्ट करणे सोपे होईल! आहात का सर्वजण तयार?"

सर्वजण एकमुखाने म्हणाले, "आम्ही तयार आहोत!"

इतर जगासाठी त्या बेटाच्या ठिकाणी फक्त एक शांत समुद्राचा भाग होता पण ठराविक लोक वगळता कोणालाही हे माहिती नव्हते की इथे जगावर येऊ घातलेल्या संकटावर मात करण्याचे प्रयत्न सुरू आहेत!

^^^

# 26. वाईट हेतू

दरम्यान भारतातील विविध शहरांत तसेच जगभर, "वाईट लोक येतील, वाईट लोकांना मारतील..." हा मेसेज अजूनही लोकांना आपल्या मोबाईल फोन्सवर येतच होता. ज्या त्या देशातील आणि राज्यातील भाषेतून हा मेसेज येत होता. तसेच काही दिवसांपूर्वी जगातील काही वास्तू, स्मारके, जागतिक सात आश्चर्ये अर्धवटरित्या गायब झाली होती. जगातून मेडिकल, सायन्स आणि पोलिसी क्षेत्रातील बरेच महत्वाचे व्यक्ती गायब होत होते अन्यथा त्यांना ठार मारण्यात आले होते. ज्या वास्तू, स्मारके नष्ट झाल्या त्या संपूर्णपणे नष्ट न होता ओबडधोबड पद्धतीने नष्ट झाल्या होत्या. नष्ट झालेल्या वास्तूंजवळ कसलेही गांभीर्य न ठेवता काही असंवेदनशील लोक तिथे गर्दी करत होते, सेल्फी काढू लागले होते आणि फेसबुक, इन्स्टाग्राम व इतर सोशल मीडियावर ते फोटो अपलोड करून फोटो खाली विविध कमेंट लिहू लागले होते. तशाच प्रकारच्या लाईन्सचे शिर्षक घेऊन न्यूज चॅनल्सवाले सुद्धा विविध प्रोग्राम दिवसभर दाखवायला लागले. वर्तमानपत्रात विविध लक्षवेधी हेडलाईन दिसत होत्या. संपादकीय लिहिले जात होते. सर्व मिडीयाला चघळण्यासाठी आणखी एक नवीन विषय

मिळाला होता त्यामुळे ते खुश होते. सोशल मिडीयावर पण वेगवेगळे ट्रेंड आणि हॅशटॅग बनवून चर्चा झडत होत्या.

"भग्न वास्तू जवळ आम्ही आत्म मग्न!"

"भग्न झाल्या वास्तू, नग्न झाली सुरक्षा व्यवस्था!"

"वास्तू आणि स्मारके गायब करण्याचा विरोधकांचा डाव!"

"लवकरच पृथ्वी सुद्धा गायब होणार. आपण सर्व जण आकाशात तरंगणार!"

एक नागरिक म्हणाला, "असे झाले तर फार छान होईल. मी आणि माझी गर्लफ्रेंड दोघेही आकाशात मुक्त विहार करू!"

दुसरा: "सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे ह्या सगळ्या गोष्टी गायब होत आहेत!"

तिसरा: "या सगळ्याला विरोधी पक्ष जबाबदार आहे!"

चौथा: "हे सगळे अपक्ष उमेदवार घडवून आणत आहेत, जे गेल्या निवडणूकीत हारले!"

पाचव्याने माईकवर बोलायला नकार देता देता काढता पाय घेतला आणि मागे वळून तो एवढेच म्हणाला, "जग नष्ट होणार

आहे लवकरच. वाचवा स्वत:ला, लोकांचे इंटरव्ह्यू काय घेत बसलात?"

ह्या सगळ्या बातम्या सुरु असतांनाच एके दिवशी भारतातील न्यूज चॅनेल्सकडे एक व्हिडीओ आला. त्यांनी तो जगभरातील इतर चॅनेल्सला सुद्धा पाठवला. त्या व्हिडिओमध्ये मास्क घातलेले पाच जण एका खोलीत बसलेले दिसत होते.

मुंबईहून हाच व्हीडिओ स्वागत टीमकडे पण पाठवला गेला आणि सगळीकडे जगभर त्या त्या भाषेत सबटायटल टाकून आणि काही देशांत डबिंग करून वेळेच्या थोड्याफार फरकाने प्रसारित केला गेला.

व्हीडिओमध्ये पाचपैकी एक जण जो त्यांचा प्रमुख वाटत होता तो एका मोठ्या स्क्रीनच्या समोर उभा होता. बाकी चार जण खुर्च्यांवर बसलेले होते. दोन जण डावीकडे, दोन उजवीकडे. त्यात दोन लेडीज होत्या ज्यांनी काळ्या रंगाचा तंग टीशर्ट आणि पांढऱ्या रंगाच्या शॉर्ट जीन्स पॅन्ट तर जे बसलेले जेन्ट्स होते त्यांनी पांढऱ्या रंगाचा तंग टीशर्ट आणि काळी जीन्स पॅन्ट असे कपडे घातलेले

होते. त्यांच्या उभ्या आलेल्या प्रमुखाने जांभळे जॅकेट आणि लाल रंगाची ट्राउझर घातली होती, पण जशी तो हालचाल करत होता तसे ट्राउझरचे रंग चमकत चमकत बदलत होते. कधी हिरवा तर कधी तपकिरी तर कधी पिवळा. प्रत्येकाच्या टीशर्ट वर विरुद्ध रंगाने WAAAIT असा शब्द लिहिलेला होता. वाईट?

प्रमुखाने व्हायरस सारख्या दिसणाऱ्या चेहऱ्याचा मास्क घातला होता. खुर्चीवर बसलेल्या दोघा जेन्ट्सपैकी एकाने एक असा मास्क घातला होता की तोंडाच्या जागी पासवर्डचा आयत आणि त्याजागी स्टार स्टार स्वरूपात लिहिलेला पासवर्ड होता तर दुसऱ्याने भीतीदायक जळत असला राक्षसी चेहरा असलेला मास्क घातला होता.

लेडीज पैकी एकीने नेटवर्क दर्शवणारे बॅकराउंड असलेला चेहरा तर दुसरीने grep ही युनिक्स ऑपरेटिंग सिस्टिम ची एक कमांड छापलेला एक चेहरा असा मास्क घातला होता.

प्रमुखाने म्हणजे त्या पाचही जणांच्या लीडरने एक रिमोट उचलला आणि एक बटन दाबले आणि समोर स्क्रीनवर

WAAAIT अशी अक्षरे उमटली आणि खाली त्याचा लॉंग फॉर्म लिहिलेला होता.

War Against Automation, Artificial Intelligence and Technology

मग तो मोठ्याने हसायला लागला, त्याचे हसणे वाढतच गेले, मग त्याने स्वतःच्या डोक्यावर जोराने दोन चार टपल्या मारल्या आणि हसता हसता तो खाली बसला. थोडा वेळ त्याने खाली चेहरा केला, मान गुडघ्यात घातली आणि जमिनीकडे बघून मान अनेकदा डावीकडे आणि उजवीकडे वळवली. मग अचानक गंभीर झाला आणि वेगाने पुन्हा उठून उभा राहिला आणि हवेत वेगवेगळे असंबद्ध हातवारे करत म्हणाला,

"नमस्कार, तुम्हा सगळयांना आम्ही आधीच थोडे घाबरवायला सुरू केले आहे. तुमच्यापैकी बरेचजण आतापर्यंत गायब झाले असतील, तसेच बऱ्याच निर्जीव गोष्टी ज्यांचा तुम्हा मानव जातीला अभिमान होता त्या आता अर्ध्या नष्ट झाल्यात, विद्रुप झाल्यात. हे सगळे आम्ही केले. आता तुम्हाला प्रश्न पडला

असेल की आम्ही कोण? आतापर्यंत कुणालाच आम्ही कोण आहोत हे माहिती नव्हते. आम्ही आहोत वाईट लोक! शब्दशः 'वाईट' आणि वृत्तीनेही वाईट! पण आम्ही सुरुवातीपासून असे नव्हतो बरं का! जन्मापासून कुणीही वाईट नसतं, व्हिलन नसतं! परिस्थिती तसे बनवते! आतापर्यंत अगणित चित्रपटांत तुम्ही हा डायलॉग ऐकला असेल, नाही? होय, कारण ते खरे आहे!"

स्क्रीनवर आता एक चित्र दिसत होते ज्यात जगभरातील चित्रपटातील गाजलेल्या खलनायकांचे फोटो एकत्र केलेले होते. स्क्रीनकडे बघून त्याने सुस्कारा टाकला आणि स्वतःच्या हाताने मानेच्या मागच्या बाजूला दोन तीन चपट्या मारल्या आणि मग गोल फिरून म्हणाला, "अरे अरे मी बोलतांना भरकटत चाललोय! तुम्हाला तत्वज्ञान शिकवायला लागलो, सॉरी सॉरी! आता मुद्द्यावर येतो. आधी माझे नाव सांगतो. मी आहे व्हायरसिक! आणि हो जरा थांबा, सगळ्यात आधी मी एक गोष्ट क्लियर करतो, आमची भाषा जात धर्म याबद्दल कोणतेच तर्क वितर्क लढवू नका आणि आमची वर्गवारी करू नका. आम्हाला जवळपास सगळ्या भाषा अस्खलितपणे बोलता येतात. आणि हो, आमची एकच वर्गवारी आहे! ती म्हणजे आम्ही सगळे बेरोजगार आहोत म्हणजे तुमच्या भाषेत बेकार! या सर्व बेकार लोकांना शोधून शोधून मी

काम दिले, रोजगार दिला! हे बेकार होते पण आता माझ्यासाठी काम करून करून हे सगळे लई बेक्कार झालेत हां! यांच्या नादी लागू नाका बरं तुम्ही!"

खुर्चीवर बसलेल्या दोघा जेन्ट्सकडे बोट दाखवून तो म्हणाला, "हे आहेत पासवर्डन आणि फियरवॉल!"

आणि दोन्ही लेडीजकडे बघून तो म्हणाला, "या दोघी आहेत नेटवर्किता आणि युनिक्सा!"

"फक्त हे चारच नाहीत तर आम्ही खूप जण आहोत, सगळीकडे विखुरलेले आणि पसरलेले आहोत. तुमच्या शहरात गावात सगळीकडे! ऑटोमेशन (स्वयंचलित मशीन), आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि रोज येणारी नवनवीन टेक्नॉलॉजी (तंत्रज्ञान) यामुळे बेरोजगार झालेली ही सगळी लोकं आहेत! या सर्वांच्या विरोधात आम्ही युद्ध पुकारले आहे. एक वर्ष सरत नाही की आले नवीन तंत्रज्ञान, मग आधीचे तंत्रज्ञान बेकार आणि ते शिकलेला माणूस पण बेकार! किती बेक्कार परिस्थिती आहे, नाही?"

आता स्क्रीनवर अनेक रोबोट मानवांच्या पाठीवर बसून त्यांना चाबूक मारत हसत आहेत असे चित्र होते.

जगभर सगळे लोक टीव्हीवर हा व्हीडिओ बघत होते. न्यूज चॅनेल्सनी लगेचच स्वतःचे डोके उथळपणे चालवून वेगवेगळे तर्क वितर्क लढवायला सुरुवात केली. स्वतःच निष्कर्ष काढायला सुरुवात केली. स्वागत टीम सुद्धा सुपर नेचर बेटावर हे सगळे बघत होती.

तो माणूस चिडून टेबलावर तीन चार वेळा रिमोट आपटून आपटून पुढे म्हणाला, "कॅसेट गेली, सीडी आली, डीव्हीडी आली, नंतर लगेच पेन ड्राईव्ह आले, मेमरी कार्ड आले. अरे काय चालवलं काय तुम्ही? एकावर आधारित नोकरी व्यवसाय करा आणि त्यात जम बसेपर्यंत दुसरा शोध लागतो. लगेच तिसरा. इंटरनेट आले, सायबर कॅफे सुरू झाले मग काही वर्षातच मोबाईल आले आणि मोबाईलवर इंटरनेटची सोय आली मग सायबर कॅफे बंद पडले. एसटीडी बूथ सुरू झाले, कॉइन बॉक्स आले त्यात जम बसत नाही तोवर मोबाईल आले, म्हणून एसटीडी बूथ आणि कॉइन बॉक्सचा धंदा बसला. मोबाईलमध्ये कॅमेरे आले, तर फोटो

स्टुडिओवाल्यांचा धंदा बसला. डिजिटल स्वरूपात फोटो साठवता यायला लागल्यामुळे फोटो प्रिंटिंगचा धंदा बसला! अशी किती उदाहरणे देऊ?"

स्क्रीनवर त्याने सांगितलेल्या सगळ्या वस्तू दिसत होत्या आणि प्रत्येक वस्तूवर लाल फुली मारलेली होती.

पुढे तो म्हणाला, "हे झाले टेक्नॉलॉजी बद्दल! मग तुम्ही महान सायंटिस्ट दिमागवाल्या लोकांनी ऑटोमेशन संस्कृती आणली आणि अनेकांचे जॉब पुन्हा गेले. ऑटोमेशन आले, स्वयंचलित मशीन आले त्यामुळे त्यावर काम करणारे कामगार देशोधडीला लागले. ऑफिसमध्ये कॉम्प्युटर आले आणि दोन चार माणसांचे काम एकच कॉम्प्युटर करायला लागले! वेगवेगळे फास्ट प्रिंटर आले आणि त्यांनी अनेक कलाकाराची रोजीरोटी हिसकावून घेतली. ऑइल पेंटने अगदी छान हाताने पोस्टर चित्र आणि शब्द लिहिणारे कलाकार देशोधडीला लागले कारण प्रिंटर त्यांचे काम करू लागले. आता तर थ्रिडी प्रिंटर आणले तुम्ही! म्हणजे अनेक प्रकारच्या वस्तूपण आता कॉम्प्युटर आपोआप निर्माण करणार म्हणजे उत्पादन करतांना ज्या कामगारांच्या हाताला काम मिळत होते ते बंद झाले!"

प्रिंटरमधून कागदाऐवजी सपाट आणि चपटा झालेला एक माणूस बाहेर यतोय असे चित्र स्क्रीनवर होते.

"मोबाईलचा शोध लागला त्यामुळे माणसे जगभर एकमेकांशी जोडली गेली, जगाच्या कानाकोपऱ्यात काही झाले तरीही त्याचे पडसाद जगाच्या दुसऱ्या टोकाला उमटू लागले. पण फायद्यापेक्षा नुकसानच खूप झाले. मोबाईलद्वारे चोवीस तास उपलब्धतेमुळे ऑफिसचे काम घरी यायला लागले. घरचे ऑफिस झाले. मोबाईलवर दहशतवादी अगदी सहजपणे एकमेकांच्या संपर्कात राहू लागले!"

एक दीर्घ श्वास घेऊन तो पुन्हा म्हणाला, "मेडिकल क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान आले पण त्यातही लोक गौरफायदा घेऊ लागले. एकाचा अवयव दुसऱ्याला बसवता येऊ लागला, दुसऱ्याचा डोळा तिसऱ्याला, तिसऱ्याचे हृदय चौथ्याला. मान्य आहे यामुळे प्राण वाचले पण सर्व सामान्यांना याचा उपयोग होतोय का? मूठभर श्रीमंतांनाच याचा उपयोग होतोय! उलट सजीव शरीराशी खेळून तुम्ही त्यात बदल करून मानवजातीला नष्ट करण्याचा घाट घातलाय. कधी तुम्ही काही आगाऊ डॉक्टर लोक कृत्रिम व्हायरस

तयार करता तर कधी सायंटिस्ट लोक चेन रियाक्शनचा शोध लावता आणि अणुबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब यासारखी विघातक अस्त्रे बनवून देशादेशातील युद्धाच्या आणि शत्रुत्वाच्या नावाखाली आपल्याच मानवजातीला नष्ट करायला निघालात? मूर्ख लेकाचे!"

नंतर तो पाठमोरा झाला, मास्क काढून त्याने पाणी पिले, पुन्हा मास्क लावला आणि कॅमेरासमोर आला आणि म्हणाला, "आता तर तुम्ही हद्द केली! कलाकार लोकांनाही सोडले नाही. तुमचे कॉम्प्युटर आणि रोबोटच कविता पण करायला लागले, कथा लिहायला लागले, कथा वाचून दाखवायला लागले भाषांतर करायला लागले, चित्र काढायला लागले. ह्युमन टच नाहीसा होत चाललाय सगळीकडे! "

आता स्क्रीनवर लेखकाचा पेन आणि कलाकाराचा ब्रश एक रोबोट पायाखाली चिरडत आहे असे चित्र होते.

"कोणताही नवीन शोध, नवीन टेक्नॉलॉजी हे सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात नसेल तर त्याचा  काय उपयोग? आयटी क्षेत्रात रोजगार निर्माण केले, प्रोग्रॅम लँग्वेज बनवल्या! ओके!

त्यामुळे घरबसल्या कॉम्प्युटर आणि मोबाईलवर वेबसाईट, अँपद्वारे बिल भरता येते, ऍडमिशन घेता येते, खरेदी करता येते, बँकिंग व्यवहार ऑनलाईन सुरळीतपणे आणि सोपे  होतात, वेळ वाचतो हे खरे!! पण ऑनलाईन फ्रॉड पण त्याच प्रमाणात वाढले. व्हायरस टाकता येईल, हॅकिंग करता येईल असे प्रोग्रॅम का बनवले? काय उपयोग तुमच्या या सगळ्या गोष्टींचा? एखादा दरोडेखोर कॅश चोरायचा पण त्याला मर्यादा तरी होत्या. पण आता? ऑनलाईन बँकिंग मध्ये काय होते आहे? एक पासवर्ड माहीत झाला तर क्षणांत हॅकर लाखो करोडो रुपये इकडचे तिकडे करू शकतो!"

आता स्क्रीनवर चमचामध्ये टाकून पैसे खाणाऱ्या हॅकरचे चित्र होते.

"आयटी क्षेत्र निर्माण झाले आणि नंतर तुम्हीच तुमच्या पायावर धोंडा मारला. त्यातही तुम्ही आणखी कमी वेळेत जास्त आणि अचूक काम करण्याच्या हव्यासापोटी ऑटोमेशन आणले आणि परत काही जॉब गेले. म्हणजे इतरांचे जॉब ज्यांच्यामुळे आणि ज्या टेक्नॉलॉजीमुळे गेले त्याच टेक्नॉलॉजीमुळे पुन्हा त्यांचेच जॉब गेले!!"

आता स्क्रीनवर पृथ्वीचे चित्र होते पण त्यावर झाडांऐवजी ज्वाला होत्या.

"ह्या सर्व विज्ञानाच्या नादात आपण सर्वजण निसर्गाला विसरत चाललो, निसर्गाचे नुकसान करत चाललो आहोत! मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड, जंगलतोड करून सिमेंटचे जंगल वसवले! आणि निसर्ग? त्याने तुम्हाला दिलेल्या साधन संपत्तीच्या बदल्यात तुम्ही निसर्गाला काय दिले रे बिनडोक मानवांनो? स्वतःला विज्ञानवादी म्हणवणारांनो? विज्ञान विज्ञान करत करत मानवता आणि निसर्ग हेच तुम्ही विसरलात? बावळट आणि बिनडोक लोकांनो! अकलेच्या कांद्यानो! ज्या फांदीवर बसता तीच कापणाऱ्या विश्वासघातकी आणि कृतघ्नांनो!"

असे म्हणून त्याने स्वतःचे डोके स्क्रीनवर तीन चार वेळा आपटले. आपटत राहिला!! स्क्रीन होल्डर धडपडून खाली पडण्याच्या बेतात होता तसेच प्रोजेक्टरच्या वायरी ताणल्या जाऊन तुटू शकणार होत्या तेवढ्यात नेटवर्किता आणि युनिक्सा खुर्चीवरून उठल्या आणि दोघींनी त्याला धरले आणि एका

रिकाम्या खुर्चीवर बसवले आणि म्हणाल्या, "बॉस, जास्त डोक्याला त्रास करून घेऊ नका. जास्त स्पष्टीकरण पण देऊ नका. फक्त आता यांना आपला पुढचा प्लॅन सांगा म्हणजे यांच्या पायाखालची जमीन सरकेल!"

सावरून नेटवर्किताच्या रिकाम्या खुर्चीवर बसत हताश व्हायरसिक म्हणाला, "नेटवर्किता, आता तूच सांग पुढचं!"

^^^

# 27. आव्हान

नेटवर्किता सांगू लागली, "आमच्या व्हायरसिक सरांनी नुकतेच जगभर विविध क्षेत्रांतील कंपनीतून वेगवेगळ्या कारणास्तव कामावरून काढून टाकलेल्या जवळपास तीन लाख कर्मचाऱ्यापैकी पन्नास हजार जणांना सोशल मिडीयाच्या माध्यमांतून डमी अकाऊन्ट बनवून संपर्क साधला आणि आमच्या टीममध्ये काम दिले. त्यांना आधी होता तितकाच पगार आम्ही देणे सुरु केले आणि ते जिथे आहेत तिथेच राहून आमच्यासाठी काम करू लागले. ते असे लोक होते ज्यांना जॉब गेल्यानंतर नंतर पुढे कुठेच नोकरी मिळाली नव्हती आणि ते व्यवसायसुद्धा सुरु करू शकत नव्हते त्यामुळे स्वत:चा आणि कुटुंबाचा आत्मघात करायला निघाले होते."

आता स्क्रीनवर लाल रंगाचा एक व्यक्ती आणि त्याच्या अवतीभोवती काळ्या रंगाचे इतर व्यक्ती दिसत होते. ते एक प्रतिकात्मक चित्र होते ज्यात त्या लाल मानवाकृतीने इतर आकृत्यांना जणू शरण दिली होती.

"शास्त्रज्ञ, डॉक्टर, संशोधक आणि इतर असे सर्व लोक जे जगभर अन्यायकारक पद्धतीने लोकांचे व्यवसाय किंवा नोकऱ्या नष्ट करण्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरत आहेत त्या सर्वांना आम्ही आता नष्ट करणार आहोत कारण आता टीम मध्ये जास्त लोक जॉईन झालेत!"

"आमच्या सरांना पृथ्वीवरच्या या सर्व ठराविक सजीव निर्जीव गोष्टी नष्ट करून दुसरीकडे एक प्रतिसृष्टी उभारायची आहे, ज्यात निसर्गाशी आत्मीयतेने वागणारी माणसे आणि प्राणी असतील. सरांचेच सगळे ऐकणारी सजीव सृष्टी तिथे असेल. आम्ही भग्न करत असेलल्या इमारती, वास्तू बघून निसर्गावर अतिक्रमण केल्याची आणि विज्ञानाच्या नादात मानवतेचा पैलू विसरल्याची तुम्हाला सतत आठवण येत राहील. शास्त्रज्ञ, डॉक्टर, संशोधक यांनी लावलेले सगळे शोध आम्ही नष्ट करून, काहींना गायब करून आमच्या सोबत आमच्या प्रतिसृष्टीत नेऊ तर काहीना आम्ही इथेच जीवे मारू. ज्यांना प्रतिसृष्टीत नेऊ तेथे त्यांना पूर्ववत करू आणि त्यानंतर ते आमच्या सरांचेच ऐकतील आणि त्यांचे दास होतील! आणि हे सगळे आम्ही तुमचेच संशोधन, तंत्रज्ञान, विज्ञान वापरून करणार आहोत. जसे आम्ही सुजित लहाने याने बनवलेले हवेपासून अतिशुद्ध एक लिटर पिण्याचे पाणी आणि एक

लिटर पेट्रोल बनवणारे मशीन चोरून पाण्याची तहान कायम भागवत आहोत आणि पेट्रोल विकून पैसा उभारत आहोत. पेट्रोल स्वतःसाठीसुद्धा वापरत आहोत. तसेच ताकामिशी क्योदाई यांचे क्रांतिकारक अदृश्य स्क्रीन आणि रोबोट आमच्याकडे आता पाणी भरत आहेत. असे अनेक क्रांतिकारक शोध जगापुढे येण्याआधीच आम्ही हायजॅक केले. आमच्याकडे काम करणारे नोकरी गमावलेले कुशल तंत्रज्ञच आणि डॉक्टर्स आता त्यांच्या ज्ञानाचा उपयोग तुम्हाला शह देण्यासाठी करत आहेत. आमच्याकडे जगातील सर्वात कुशल हॅकर्स आहेत. तेच आमच्यासाठी सायबर गुन्हे करून तुमच्या सारख्या अपराधी लोकांच्या अकाउंटमधून पैसे ऑनलाईन चोरून आमच्या अकाऊंटमध्ये टाकत आहेत. तेच हॅकर्स 'वाईट लोक येतील..' हा एस एम एस सर्वांना पाठवत आहेत आणि तुमची आयटी डिपार्टमेंट अजूनही शोध लावू शकली नाही की हे एस एम एस येतात कोणत्या सर्व्हर वरून?? लोहा लोहे को काटता है यानुसार आम्ही विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करून आमचे ध्येय साध्य करणार!"

व्हिडीओ बघतांना अनेक जणांना हे खोटे वाटले तर काहींनी टर उडवली. काहीना वाटले हे फक्त भीती पसरवण्यासाठी काहीतरी

खोटेनाटे दावे करत आहेत. अशी प्रतिसृष्टी कुठे बनवता येते का? काहीतरीच काय? पण व्हिडीओ अजून बाकी होता!

त्या व्हिडीओमध्ये नेटवर्किता पुढे म्हणाली, "आणि हो... मला माहिती आहे हे सगळे ऐकून तुम्हाला खोटे वाटेल म्हणून आता मी तुम्हाला जे सांगते आहे ते ऐकून तुमच्या पायाखालची जमीन सरकेल. कदाचित संपूर्ण पृथ्वीच सरकू शकते!"

असे म्हणून तिने स्क्रीनवर बिग बॅंग थियरी दर्शवणारी एक आकृती आणली आणि तिने पुढचा भाग सांगण्यासाठी युनिक्सा हिला बोलावले आणि ती खुर्चीवर जाऊन बसली.

युनिक्सा उभी राहून सांगू लागली, "संशोधकांच्या मते, हे विश्व 12 मूलभूत कणांपासून बनले आहे. या कणांचे विभाजन होत नाही. सुमारे चौदा अब्ज वर्षांपूर्वी एका छोट्या बिंदूतून मोठा स्फोट होऊन विश्वाची निर्मिती झाल्याचे "बिग बॅंग' सिद्धान्त सांगतो. ज्या वेळी हा स्फोट झाला, त्या वेळी अवकाश, ऊर्जा, पदार्थ हे सारे एका बिंदूत सामावेलेले होते. मग त्याचे प्रसरण होत गेले आणि मूलकणांची निर्मिती झाली. अणूमध्ये प्रोटॉन, न्यूट्रॉन आणि

इलेक्ट्रॉन असे अनेक कण आहेत, पण प्रोटॉन, न्यूट्रॉन यांसारखे कण हे त्यापेक्षाही लहान कणांपासून बनलेले आहेत ज्यांना आपण मूलकण म्हणू. ऊर्जेचे द्रव्यात रूपांतर होताना त्याला वस्तुमान प्राप्त होते! हा मोठा स्फोट व्हायला कारणीभूत उर्जेला अमर्यादितपणे उद्दीपित करणारा एक धनभारीत (पॉझिटिव्ह चार्ज') मूलकणच होता."

पुढे स्क्रीनवर एका प्रयोगशाळेचे चित्र आले.

"विश्वाच्या निर्मितीचे रहस्य जाणण्यासाठीच्या प्रयोगाला युरोपियन सेंटर फॉर न्यूक्लिअर रिसर्चमध्ये (CERN सर्न) 2008 ला सुरवात झाली. जीनिव्हाजवळील या प्रयोगशाळेत 'लार्ज हॅड्रॉन कोलायडर'मध्ये 'प्रोटॉन'च्या दोन कणांची टक्कर घडवून आणण्यात आली. 'बिग बॅंग' सिद्धान्तानुसार विश्वाच्या निर्मितीला कारक असलेल्या महास्फोटाची छोटी आवृत्ती स्थिती प्रयोगशाळेत निर्माण करण्यात जगभरातील शास्त्रज्ञांना 30 मार्च 2010 रोजी यश आले. जीनिव्हा येथील 'लार्ज हॅड्रॉन कोलायडर' (एलएचसी) प्रयोगशाळेत प्रोटॉनच्या दोन किरणांच्या टकरीत सातशे अब्ज इलेक्ट्रॉन व्होल्ट ऊर्जा निर्माण झाली. याच प्रयोगशाळेत आमचे

सर 2009 पर्यंत काम करत होते पण नंतर प्रयोगाच्या पद्धतीबद्दल इतर वैज्ञानिकांशी वाद होऊन त्यांनी हा प्रयोग सोडला. त्यांच्या समर्थनार्थ आणखी काही जणांनी तिथली नोकरी सोडली!"

"या प्रयोगशाळेत आमचे सर एका विशिष्ट हेतूने आले होते. त्याआधी बरीच वर्षे आमच्या सरांची नोकरी गेली होती, ते एका सरकारी अणु संशोधन कंपनीत होते. ऑॅटोमेशनमुळे त्यांची नोकरी गेली. पेन्शन होते पण त्यांना ते घेऊन आरामात राहणे किंवा दुसरी नोकरी शोधणे पसंत नव्हते. तशातच त्यांच्या कुटुंबातील आणि नात्यांतील अनेक सदस्यांची सुद्धा नोकरी गेली, कुणाची ऑॅटोमेशनमुळे तर कुणाची आर्टिफिशियल इंटेलिजन्स मुळे! त्यांच्या कुटुंबातील तीन जणांनी निराशेतून आत्महत्या केली! भारतात आणि जगभर निरपराध लोकांच्या जॉब जाण्याच्या अनेक घटनांनी त्यांचे लक्ष वेधले. आमचे सर निराश झाले, पण त्यांनी हार मानली नाही. आतापर्यंतच्या अनुभवच्या आधारे त्यांनी अभ्यास केला, वेगवेगळया परीक्षा दिल्या, ओळखींचा वापर केला आणि थेट सर्न मध्ये प्रवेश मिळवला कारण त्यांच्या मनात काहीतरी वेगळेच चालले होते!"

"सर्न मध्ये प्रयोगाच्या पद्धतीबद्दल इतर वैज्ञानिकांशी वाद होऊन त्यांनी हा प्रयोग 2009 साली सोडला त्यांनी आपल्या पद्धतीने गुप्तपणे आणखी एक प्रयोगशाळा स्थापली. त्यात त्यांनी असा यशस्वी प्रयोग केला की त्यात छोट्या स्वरूपातील खरोखरची आकाशगंगा तयार करण्यात यश आले! त्याला आम्ही 'सुपर बिग बॅंग' नाव दिले. नंतर नोकरी गमावलेल्या पण हुशार लोकांना हाताशी धरले. त्यांनी मग आणखी एक उलटा प्रयोग केला. जसे 'सुपर बिग बॅंग' सिद्धान्तानुसार ऊर्जेचे द्रव्यात रूपांतर होताना त्याला वस्तुमान प्राप्त झाले तसेच त्यांनी असा प्रयोग यशस्वी केला ज्यात जग नष्ट होऊ शकेल! म्हणजे असे कण शोधले ज्याद्वारे वस्तुमानाचे पुन्हा उर्जेत रुपांतर झाले. पण छोट्या प्रमाणावर! त्याला आम्ही 'सुपर बिग कोलॅप्स' असे नाव दिले. म्हणजे आता आमच्याकडे दोन प्रकारचे उद्दीपित करणारे कण (कॅटॅलिस्ट) तयार झाले. एक धनभारीत मूलकण आणि दुसरा ऋणभरीत (निगेटिव्ह चार्ज) मूलकण!! छोट्या प्रमाणावर हा प्रयोग आधी यशस्वी झाला. त्यातून मिळालेल्या कणांतून आम्ही निर्जीव वस्तू नष्ट करू शकलो म्हणजे त्यांचे उर्जेत रुपांतर झाले. ती सुप्त स्वरूपात तोपर्यंत राहील जोपर्यंत तिला पुन्हा वस्तुमानात रुपांतरीत करत नाही! याच सिद्धांतावर आधारित मग सजीवांवर पण प्रयोग करता येईल का असा विचार आमच्या सरांच्या मनात आला. मग

त्यांनी काही हुशार वैद्यकीय तज्ञांना हाताशी घेऊन असा व्हायरस तयार केला जो मानवी पेशीतील न्युक्लीयसचे स्ट्रक्चर किंवा बांधणी अस्थिर करेल आणि हळूहळू सर्व पेशी त्यामुळे आक्रसून नष्ट होतील मात्र मेंदूतील न्यूरल नेटवर्कवर याचा परिणाम व्हायला नको होता. अथक संशोधन आणि परिश्रमानंतर त्या प्रयोगाला यश आले. तो व्हायरस 'सिक्रियम ट्राय- नायट्रोफोस्फाईड' या केमिकल मध्ये अनेक दिवस जिवंत राहतो. त्या व्हायरस असलेल्या लिक्विडला तोंडावाटे किंवा नाकावाटे मानवाच्या किंवा प्राण्याच्या शरीरात सोडल्यास पेशी आक्रसत जाऊन एक छोटा पेशीसमूह उरतो ज्यात संपूर्ण शरीराची मेमरी, DNA, RNA आणि इतर आराखडा असतो, जो पुन्हा उलट प्रयोगाद्वारे मानवात रुपांतरीत करता येतो, हेच प्रांण्याच्या बाबतीत सुद्धा लागू होते!"

तिला थांबवून नेटवर्किता सांगू लागली, "थोडक्यात -सुपर बिग बॅंग म्हणजे काय? तर उर्जेतील सुप्त अणु संरचना (त्यांच्यात असलेल्या मूळ कणांच्या प्रसरणामुळे) प्रसरण पावणे आणि एका वस्तुमानात स्थिर होणे! कोणामुळे? तर धनभारीत उद्दीपित करणाऱ्या त्या मूलकणामुळे!. सुपर बिग कोलॅप्स म्हणजे अणु संरचना कोलमडणे किंवा अस्थिर होणे आणि उर्जेत रुपांतरीत होणे! हे निर्जीव आणि सजीव या दोघांसाठी आम्ही करू शकतो.

आमच्या प्रतिसृष्टीत आम्ही तुमचे पेशी समूहात रुपांतर केलेले सजीव आणि तसेच उर्जेत रुपांतरीत झालेले निर्जीव पुन्हा पूर्ववत करू! यातील सजीवांवर आमचे कंट्रोल राहील. तसेच दोन सजीव पेशी समूह आम्ही एकत्र करून त्यांचे पुन्हा एकत्रित एकाच सजीवात रुपांतर करू शकतो. दोन मानवांचे किंवा एक प्राणी एक मानव किंवा पक्षी प्राणी असे काहीही! त्यात एकाचा मेंदू असतो तर दुसऱ्याचे शरीर! आम्ही उडत्या यांत्रिक कीटकांच्या मदतीने कणांचा फवारा मारून आधी निर्जीव वस्तू नष्ट करतो! पण ते कीटक कोण रिमोटने ऑपरेट करतात, माहित आहे? मानवी मेंदू असलेले प्राणी पक्षी किंवा कीटक! आणि यांत्रिक उडते भुंगे हे काही फक्त कण स्प्रे करायला नाही तर काही भुंगे हे विविध लोकांवर पाळत ठेवायला पण आम्ही वापरत असतो, त्यात कॅमेरे असतात. त्याद्वारे आम्ही विविध व्यक्ती आणि ठिकाणे यांचे सर्व्हे करतो, माहिती मिळवत असतो."

मग व्हायरसिक उभा राहिला आणि कपाळावर मूठ आपटत आपटत मोठ्याने हसत म्हणाला, "या एकत्रीकरणाचा शोध योगायोगाने लागला. जेव्हा हाराकू नाकामुरा याने चोरून आणलेला सोराकैतो ताकामिशी यांचा पेशीसमूह आम्ही अभ्यासत होतो तेव्हा बाजूला एका मांजराचा आमच्याकडून

आक्रसलेला पेशीसमूह अनवधानाने त्याला स्पर्श करून ठेवलेला होता. सजीवांचा सुपर बिग बॅंग व्हायरस ज्या पेशीसमूहात आम्ही इंजेक्शनने सोडला होता (ताकामिशी) त्याचा मेंदू आणि दुसऱ्याचे (मांजराचे) शरीर असा प्राणी तयार झाला. मग असे प्राणी तयार करून आम्ही त्यांच्या मदतीने रिमोटद्वारे इतर यांत्रिक प्राणी कीटक ऑपरेट करतो! त्यामुळे कोणाच्या हाती काही लागण्याचा प्रश्नच उरत नाही! त्यामुळे आमचे बरेचसे काम सोपे झाले! फक्त एकच प्रॉब्लेम आहे की एकदा आक्रसलेल्या पेशीसमूहाचे रूपांतर पुन्हा सजीवात केले की पुन्हा त्याला पेशी समूहात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला तर तो मरतो. त्यामुळे आता हा ताकामीशी, ताकात मिशी बुडवून आयुष्यभर ताक आणि दूध पीत राहील! आणि आम्हीही यानंतर दुधाने जीभ पोळल्यावर ताक फुंकून पितो, या ताकामिशी सारखे, मिशी बुडवून बुडवून!"

मग तो स्वतःच्या जोकला पोट धरून हसायला लागला. मग व्हिडीओमध्ये एक मांजर समोर आणले गेले ज्याच्या चेहऱ्यात सोराकैतो ताकामिशी यांच्या चेहऱ्याची झलक होती पण ते होते एक मांजरच!!

त्या मांजराने व्हायरसिक सोबत हस्तांदोलन केले आणि ते माणसासारखे हसू लागले.

व्हायरसिक पुढे म्हणाला, "आता मानवजातीला आम्ही एक आव्हान देतोय! पुढचा हल्ला आम्ही दोन जणांवर करणार! येत्या 8 तारखेला सोमवारी!! मुंबईत राहणाऱ्या भारतातील एका प्रसिद्ध डॉक्टरवर ज्यांचे नाव R आणि आडनाव H अक्षराने सुरू होते आणि पुण्यातील एका मोठ्या अणू शास्त्रज्ञावर ज्यांचे नाव H अक्षराने आणि आडनाव R अक्षराने सुरू होते. त्यांना पेशी समूहात रूपांतरित करून ते समूह सर्वांच्या डोळ्यासमोर आम्ही चोरून नेऊ आणि तुम्ही बघतच राहाल! बघतोच एकेकाला आता! महाविनाशाला सुरुवात मुंबई पुण्यापासून करू या! नंतर बरेच काही होईल पण आधी तुम्ही या दोघांना वाचवून दाखवा! Allied Secret Forces तर आता राहिली नाही! इतर संस्था तर काय असून नसल्यासारख्या आहेत! लेच्या पेच्या! मग बघू तुम्हाला कोण वाचवते ते!"

सगळ्यांनी आजची तारीख बघितली. आज तारीख होती चार!

थोडे थांबून तो व्हीडिओमधील व्हायरसिक पुढे म्हणाला, "हॉस्पिटलमध्ये हल्ल्यातून तुम्ही वाचलात, तुमच्या माणसांचे नकली पुतळे करून आमच्या माणसांना चकवून गाडीत स्फोट करून मारले पण आम्ही तुम्हाला जहाजावर शेवटी गाठलेच आणि नष्ट केलेच!! फक्त आमची एकच खंत राहील. आमची स्पायवियरा नावाची लढवय्यी टीम मेंबर मारली गेली असावी तुमच्या Allied Secret Forces च्या एका जहाजावरून परत येतांना! कारण ती आमच्याकडे परत आली नाही. पण तिने जहाज नक्की नष्ट केले असा आमचा विश्वास आहे. बरे झाले! आता आम्हाला विरोध करणारी टीमच उरली नाही!"

मग मांजरासाहित पाचही जणांनी बाय बाय केले, कॅमेरा दूर दूर होत गेला.

अंधार झाला आणि व्हिडीओ बंद झाला!

^^^

# 28. प्लॅनिंगचा मुखवटा

हा व्हिडीओ "वाईट" ने  फक्त सरकारी संस्थांना न पाठवता सरसकट सर्वच न्यूज चॅनेल्सला पाठवल्यामुळे सर्व सत्य अचानक अक्षरशः जगजाहीर झालं. काही भाग लोकांना कळला नसता तर बरं झालं असतं असं विविध गव्हर्मेंट संस्थांना वाटत असलं तरी आता काही उपयोग नव्हता. एखाद्या चॅनलने आचारसंहिता पाळून व्हिडिओ मधला काही भाग वगळायचा ठरवला तरीही इतर अनेक चॅनल्सनी संपूर्ण व्हिडिओ दाखवायला सुरुवात करून दिली होती. वाईट संस्थेलासुध्दा कदाचित हेच हवे होते. मात्र एक बरे झाले की त्यांना असे वाटत होते की अलाईड सीक्रेट फोर्सेस आता संपली.

सुपर नेचर बेटावर सर्वजण हा व्हिडिओ बघत होते. आता तातडीने ॲक्शन प्लॅन बनवायची आवश्यकता होती. हा व्हिडिओ बघून काही वेळ विचार करून डिटेक्टिव्ह निगेटिव्ह तिथे उपस्थित असलेल्या सर्व महत्त्वाच्या व्यक्तींना म्हणाला -

"म्हणजे त्यांना असे वाटते आहे की अलाईड सिक्रेट फॉर्सेस संस्था आता संपल्यात जमा आहे. रणजित आणि माझ्यावर हल्ला

यासाठी केला असावा की मी आणि रणजित, आम्ही सोबत काम करून त्यांच्यासाठी काम करणारे अनेक अपराधी पकडले होते. मला वाटत नाही की त्यांना माझ्या सुपरपॉवरबद्दल माहिती आहे. आम्हा दोघांना त्यांना पेशी समूहात रुपांतरीत करायचे नव्हते! मारायचेच होते! नर्सने सायलीला पेशी समूहात रूपांतरित करण्याचा प्रयत्न जरूर केला कारण आपल्या प्रतिसृष्टीमध्ये एक हुशार शार्प बुद्धिमान डॉक्टर कुणाला नको असेल? तो प्रयत्न फसला. मग त्यांनी चिडून तिला मारायचे ठरवले असावे कारण ती माझ्यावर उपचार करत होती आणि अर्थात माझ्यावरही पुन्हा हल्ला केला कारण मी नरीमन पॉईंटला रणजितवर झालेल्या हल्ल्यातून वाचलो होतो. त्यांना नेत्रा यांचाही पेशीसमूह हवा होता ज्याद्वारे आपल्या संस्थेची सगळी महिती त्यांना मिळू शकली असती."

नेत्रा आणि रणजित यांचा संदर्भ आल्यावर थोड्या वेळाकरता सगळेच जण भावूक झाले. या संस्थेला इथवर आणण्यात नेत्राने जेवढी मेहनत घेतली तेवढी खचितच कुणी घेतली असेल. आज नेत्राच्या नियोजनामुळेच ते चौघे जिवंत होते आणि रणजित यांचेही अप्रत्यक्षपणे खूप योगदान होतेच!

पुढे सायली म्हणाली, "पण हाडवैरी आणि निद्राजीता यांच्याबद्दल "वाईट" ला माहीत असण्याची शक्यता नक्की नाही. कारण नेत्रा यांनी सांगितल्याप्रमाणे दोघांना गुप्तपणे शोधून आपल्या ग्रुपमध्ये सामील करण्याचा प्लान केला गेला होता!"

सुनिल पुढे म्हणाला, "बरोबर आहे! अलाईड सीक्रेट फॉर्सेसची प्रमुख मारली गेली आणि संस्था संपली असे त्यांना वाटते आहे, परंतु ह्या संस्थेचे रुपांतर होऊन ती स्वागत या नव्या नावाने बनली आहे, हे त्यांना माहिती असल्याचे दिसत नाही! आता आपण चौघांनी मुखवटे घालून आपली ओळख लपवायला हवी. भारतातील आपल्या वेगळ्या शहरातील कार्यालयात तसेच मुख्यालयात संपर्क साधा. त्यानंतर ते वेगवेगळ्या देशांची संपर्क साधतीलच. जगाचे नेतृत्व आज आपल्याला करायचे आहे आणि जगाची मोठ्या संकटातून सुटका करायची आहे!! कारण भारतानंतर ते कोणत्या देशांना आणि कधी टार्गेट करतील सांगता येत नाही! आणि कदाचित त्यांनी सांगितलेल्या तारखेच्या आधीच ते घातपात करू शकतात. त्यामुळे आपण एक दिवस आधीच जायला हवे. त्या आधीसुद्धा जर का त्यांनी काही घातपात केला तर आपल्या पुणे आणि मुंबई शहरातील टीम्स आहेतच. "

सायली म्हणाली, "होय! आणि आपल्या टीम मध्ये आता जास्तीत जास्त सुपरपॉवर असलेले लोक आपण शोधून ॲड करायला हवे. अर्थात सुपर पॉवरच्या जोडीला गॅजेट्स आणि वेगवेगळे वैज्ञानिक शोध आवश्यकच आहेत कारण आपल्याला त्यांची मदतच होते.  म्हणजे दुग्धशर्करा योग! SWAGAT = Supernatural Warriors And Gadgets Assisted Team"

सुनिल पुढे म्हणाला, "हा जो कोणी बॉस आहे जो स्वतःला व्हायरसिक म्हणतो त्याची कळकळ योग्य आहे परंतु ते सिद्ध करण्यासाठी त्यांनी जे काही आरंभले आहे ते चुकीचे आहे. हे मात्र नक्की की विज्ञानाच्या मदतीने मानवाने जितक्या चांगल्या गोष्टी शोधल्या त्यापेक्षा जास्त वाईट गोष्टी शोधल्या. नुकसानकारक गोष्टी शोधल्या. निसर्गाचे नुकसान केले. निसर्गावर अतिक्रमण केले. पशुपक्ष्यांवर, प्राण्यांवर अतिक्रमण केले. त्यांचे अधिकार हिरावून घेतले. ऑटोमेशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स तसेच इतर कारणांमुळे खरोखरच लोकांच्या नोकऱ्या जात आहेत हे मान्य! मात्र त्यावर उपाय म्हणून अशा विघातक कारवाया करणे आणि प्रतिसृष्टी वगैरे उभारणे हे खचितच योग्य नाही. हे अति झालं. तो जर स्वतः इतका हुशार आहे तर नोकरी गमावलेल्या युवकांना हाताशी धरून एखादी कंपनी काढून तो रोजगार देऊ शकला

असता. असो! हा सगळा विचार करत बसण्याची आता वेळ नाही कारण आजची तारीख आहे 4!! आपल्याकडे फक्त तीन दिवस आहेत. काहीतरी प्लॅन करून लवकरच आपल्याला इथून निघायला हवे आणि त्या दोघांना वाचवायला हवे. त्यांचा ठावठिकाणा आपल्याला शोधायचा आहे!! त्यासाठी माझी दूरदृष्टी आहे पण नेमकेच ते कुठे कोणत्या दिशेला असू शकतात याच्यावर बराच विचार करावा लागेल. त्याबद्दल सध्या आपल्याकडे काहीच क्लू नाही पण ते महाराष्ट्रातच कुठेतरी असावेत. कदाचित पुणे किंवा मुंबईतच!!"

हाडवैरी म्हणाला, "मला वाटते सायली तू लवकरच इथल्या टीमच्या मदतीने आपल्यासाठी पोशाख डिझाईन कर. आमच्या सगळयांच्या बारीक-सारीक सुपरपॉवर आम्ही तुला थोड्याच वेळात पुन्हा एकदा नीट सांगतो!"

सायली हसून म्हणाली, "हरकत नाही मी करीन, पण इथल्या टीमची मदत घेण्यापेक्षा आपल्याकडे परफेक्ट चित्रकार आहे- सुनिल! म्हणजेच आपले डिटेक्टीव निगेटिव्ह हे स्वतः सुद्धा एक चित्रकार आहेत!"

सर्वजण आश्चर्याने एकमेकांकडे बघायला लागले.

हाडवैरी आणि निद्राजीता म्हणाली, "अरे वा! ही गोष्ट आम्हाला माहिती नव्हती, हे तर छानच झाले!"

सुनिल म्हणाला, "हे डिझाइन करण्याची माझी पण आधीपासून इच्छा होतीच, पण मी आता थोडक्यात रफ स्केच तुम्हाला बनवून देईन. मग आपले कॉम्प्युटर एक्सपर्ट तो फायनल करतील आणि मग थ्रीडी प्रिंटरच्या मदतीने आपण पोशाख प्रिंट करू आणि आपल्या चौघांना आपापल्या शहरात लोक ओळखत असल्याने आपल्याला चेहरा संपूर्ण झाकला जाईल असे मास्क बनवावे लागतील. आपले चेहरे संपूर्ण बदलले पाहिजेत. आपण चौघे संपूर्ण वेगळे व्यक्ती वाटले पाहिजेत. असे की जणू काही आपण प्लास्टिक सर्जरी केली आहे. आणि आपल्याला जास्त काळ ते घातले तरी त्रास होणार नाही. मला वाटते इथल्या सर्व टीमसाठी हे करणे फारसे कठीण नाही. थोड्याच वेळात आपण आपले चेहरे साईज् साठी 3D स्कॅन करून घेऊ. तसेच कोणती उपलब्ध साधने गॅजेट्स इन्स्ट्रुमेंट्स आणि वाहने आपल्याकडे आहेत लवकर विचार करून ठेवा. वाहनांसाठी इंधन आपल्याकडे

जहाजांवरून येत असते हे मला काल येथील टीमकडूम कळले. सर्व प्रकारचे इंधन आपल्याकडे सध्या पुरेसे उपलब्ध आहे. पोशाखासाठी स्केच बनवल्यानंतर आपल्याला इतर भरपूर कामं असणार आहेत. तयारी करावी लागणार आहे!"

सायली म्हणाली, "सुनिल! आपण आपले चेहरे बनवताना आपल्या आवडीच्या कलाकारांचे चेहरे मिक्स करावयाचे का? नाहीतरी आपण कॉम्पुटर वापरून 3D मिक्सिंग आणि प्रिंटिंग करणार आहोत. जसे मला माधुरी दीपिका आणि निकोल या अभिनेत्री आवडतात. त्यामुळे जरा आपला कॉन्फिडन्स पण वाढेल नाही का? काय बोलतो?"

सुनिल," वा यार सायली! ग्रेट कल्पना आहे. मला तर बुवा सुबोध अक्षय आणि टॉम आवडतात! आणि हो मला हॅट आणि कोट असला पाहिजे बरं का! मी सुपर पावर असलेला डिटेक्टिव्ह असलो तरी आहे डिटेक्टिव्हच ना!"

सायली लाजली. तिने मनात कल्पना केली की माझा सुनिल हॅट कोटमध्ये किती स्मार्ट दिसेल आणि त्याच्या बाजूला मी बंदूक घेतलेली त्याची असिस्टंट!!

हाडवैरी, "मला लक्ष्मीकांत, गोविंदा आणि अरनॉल्ड फ्लेवर प्लिज!"

निद्राजीता हसायला लागली, "वा वा वा. क्या बात! काय भारी कॉम्बिनेशन आहे. कसा दिसेल हा नवा चेहरा? कल्पनाच करवत नाही! बरं, माझेकडून सोनाली, आलिया आणि ज्युलिया घ्या!"

सर्वजण हसायला लागले आणि सर्वांना कल्पना पसंत पडली. तणावपूर्ण वातावरणात थोडे हलके क्षण आले.

डॉक्टर शिशिर म्हणाले, "तुम्ही चार जण आलात म्हणून खूप छान झाले, अन्यथा आम्ही कल्पना करू शकत नाही हा संघर्ष कसा झाला असता? पण तुम्हाला चौघांना मला काहीतरी सांगायचे आहे. आपण शत्रूवर यशस्वीपणे मात करूही परंतु त्यानंतर आम्हाला आणि डॉक्टरांना यावर भरपूर विचार करावा लागणार आहे कारण विज्ञानाचा दुरुपयोग होत आहे आणि निसर्गाचे नुकसान आपण करत आहोत आणि त्याचाच गैरवापर करुन ते आपल्याला शह देऊ बघत आहेत, मात करू बघत आहेत. यावरून जगभर संदेश गेलाच आहे. पण आपण सर्व स्वागत टीमने संपूर्ण जगभर शक्य होईल तिथे शक्य होईल तसे आणि शक्य होईल

तेव्हा याबद्दल जनजागृती करायला हवी. निसर्ग पशुपक्षी प्राणी यांच्यावर अतिक्रमण करून आपल्याला जगायचे नाही, तो आपला उद्देश नाही. सृष्टी निर्मात्याचा पण हा उद्देश नाही. अन्यथा पुढे सगळी मानवजात आपोआप नष्ट होईल, निसर्ग ती नष्ट करेल, कोणत्या ना कोणत्या रूपाने. तसे होण्याआधी या वायरस आणि त्यांच्या वाईट टीमने आपल्याला सावध केले. मग ते चुकीच्या पद्धतीने का होईना! पण आता तरी सर्व मानव जातीचे डोळे उघडले आहेत!"

सुनिल म्हणाला, "अगदी बरोबर आहे डॉक्टर तुमचे. तसेच ते पाच मास्क घातलेले लोक, त्यांची खरी नावं आणि त्यांच्या टीममध्ये कोण कोण आहेत, ते कुठून आलेत हे समजा एखाद्या दिवशी शोधलेही तरी त्याने काय साध्य होणार? त्यापेक्षा त्यांच्यावर ही पाळी कळाली हे शोधण्याची आज गरज आहे!"

डॉक्टर राधाकृष्णन म्हणाले, "अगदी बरोबर सुनिल! आता जास्त चर्चेत वेळ न घालवता आपण सर्वांनी कामाला लागावे हे उत्तम!! आज जमेल तेवढं जे काही प्लॅनिंग करता येईल ते सर्वजण करा आणि रात्री मात्र पुरेशी झोप सुद्धा घ्या. आपली या बेटावरची

को-ऑर्डिनेशन टीम सतत शहरातील कार्यालयांशी संपर्कात आहे आणि ती आपल्याला अपडेट देत राहील!"

सुनिल म्हणाला, "त्यांनी आता शहरांमध्ये शरीर पशु पक्षी प्राणी यांचे पण मेंदू मानवाचा अशा किती प्रजाती सोडल्या याचा आपल्याला काहीच अंदाज नाही आणि ते ओळखण्याची काही खूण सुद्धा आपल्याकडे नाही. त्यामुळे ते खुश आहेत. त्यांना वाटते की गुप्तरितीने हे प्राणी त्यांच्या टीममधील माणसांच्या मदतीने त्या दोन महत्त्वाच्या व्यक्तींना पेशीसमूहात रूपांतर करण्यात यशस्वी होतील. परंतु तुम्हा सर्वांना मला एक गोष्ट सांगायची आहे. मला फक्त मानवामधलीच नकरात्मक उर्जा लाल स्वरूपात दिसते असे नाही तर प्राणी पशु पक्षी नकारात्मक विचार करत असला तरी त्यातील निगेटिव्ह एनर्जी लाल वर्तुळाच्या स्वरूपात दिसते. त्यामुळे त्यांनी पाठवलेले मानवी मेंदू असलेले हे प्राणी तर मला सहज ओळखता येतील. फक्त प्रश्न असा आहे की ते कुठे आहेत, तितक्या सगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष किंवा दूरदृष्टीने सुद्धा मला पटापट जाणे शक्य होणार नाही. आणि त्या व्हिडिओमुळे आता लोक सगळीचकडे वेगवेगळ्या पशु पक्षी कीटक यांचे कडे संशयाने बघू लागतील. निरुपद्रवी प्राण्यांना पण घाबरू लागतील. कदाचित त्यांच्याविरुद्ध हिंसा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झाले की वाईट टीमला अजून आनंद होईल. असे होऊ नये यासाठी

आपल्याला काहीतरी उपाय करावा लागेल, लोकांना टीव्ही किंवा इतर माध्यमांतून दिलासा द्यावा लागेल. तरी आपण त्या महत्त्वाच्या व्यक्तीकडे फोकस करू. RH आणि HR अक्षराने सुरु होणारे अणुशास्त्रज्ञ आणि हृदयरोग तज्ञ पुणे मुंबईत किती आहेत ते शोधायला लागा!"

सायली म्हणाली, "कशाला शोधाशोध करता. मी सांगते की!"

सुनिल म्हणाला, "अरेच्चा! विसरलोच की रे आपण! हा चालता बोलता सायली-पिडीया आहे ना आपल्याकडे!"

सायली लाजली आणि दहा सेकंद विचार करून म्हणाली, "RH आणि HR असे नाव असलेले चारच जण आहेत जे डॉक्टर आणि अणुशास्त्रज्ञ आहेत:

रणवर्धन हस्तक, मुंबई (अणुशास्त्रज्ञ)

रजक हडपकर, मुंबई (डॉक्टर)

हरित रागवे, पुणे (डॉक्टर)

हितेन राज, पुणे (अणुशास्त्रज्ञ)!"

सुनिल म्हणाला, "हे तर फारच छान झाले सायली. व्हिडीओनुसार तर आपल्याला रजक हडपकर, मुंबई (डॉक्टर) आणि हितेन राज, पुणे (अणुशास्त्रज्ञ) या दोन जणांकडे फोकस

करून त्यांना संरक्षण द्यायला हवे! पण काय सांगावे, ती टीम उलटही करू शकते! म्हणून त्यापेक्षा आपण चौघांनाही संरक्षण देऊ!"

सगळेजण या गोष्टीशी सहमत झाले.

सुनिल पुढे म्हणाला, "आणि आपल्याकडे जी दंडगोलाकार वस्तू आहे ती आता आपल्या कामास येऊ शकते. फक्त त्यात मला दोन दिशेला दोन निगेटिव्ह लाल वर्तुळ जाणवले होते म्हणजे त्यात नक्की एका बाजूला "बिग कोलॅप्स निगेटिव्ह कण" आणि दुसऱ्या बाजूला "बिग कोलॅप्स निगेटिव्ह व्हायरस" लिक्वीड असावे आणि पॉझिटिव्हबद्दल पण तसेच! आता वेळ आली की याचा योग्य उपयोग आपण करू!"

आणि ते सर्वजण आपापल्या तयारीला लागले.

^^^

# 29. प्रस्थानम्

चौघांचे 360 डिग्री अँगल मधून चेहरे आणि संपूर्ण शरीराचे कॉम्प्युटरने स्कॅन करण्यात आले. चौघांनी सांगितलेल्या माहितीनुसार आणि गरजेनुसार सायलीच्या मदतीने चौघांचे पोशाख डिझाईन तयार होऊन त्यांचे 3D प्रिंटिंग पण झाले होते. चौघांना ते व्यवस्थित फिट बसले. प्रत्येकाने दिलेल्या आवडीनुसार चौघांचे किमान प्रत्येकी 20 मुखवटे आणि पोशाख तयार होते. कारण एक मास्क एकदाच वापरता येणार होता आणि पोशाख जोपर्यंत खराब होत नाही तोपर्यंत वापरता येणार होता.

संस्थेच्या प्रायव्हेट सॅटेलाईटद्वारे एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी मोबाईलसारखे कम्युनिकेशन गॅजेट्स मास्कच्या आतमध्ये फिट करता येईल असे बनवले होते. चोवीस तास ते गॅजेट्स चालू असतील आणि केव्हाही त्याद्वारे एकमेकांशी संपर्क करता येईल अशी सोय होती. त्यांची बॅटरी डिस्चार्ज झाली तरीही चौघांच्या शरीराच्या हालचालीमुळे त्याची बॅटरी चार्ज होईल अशी इलेक्ट्रॉनिक व्यवस्था त्या सर्वांच्या पोशाखात होती. त्या कम्युनिकेशन गॅजेट्सचा मोड बदलला तर नेहमीच्या

मोबाईलसारखे ते वापरता येत होते. ते चौघे जगातील कुणाच्याही मोबाईलवर कॉल करू शकत होते पण त्यांचा नंबर इतरांना कधीही दिसू शकणार नव्हता अशी सोय त्यात होती आणि लोकेशन डिटेल्स सॅटेलाईटद्वारे डिलीट केले जाण्याची व्यवस्था होती त्यामुळे कुणालाही ते कुठून बोलत आहेत हे कधीही समजू शकणार नव्हते. त्यासाठी सायलीने शक्य तितके मोबाईल नंबर नावसाहित वाचले आणि कायमचे लक्षात ठेवले आणि सगळयांच्या मोबाईलवर सेव्ह पण केले. अनेक जुन्या नव्या टेलिफोन डिरेक्टरी वाचून काढल्या. यामुळे तिच्यावर ताण आला होता, पण देशासाठी हे करायलाच हवे होते!

सुनिलला ब्लॅक हॅट कोट चष्मा असा अवतार ठरला. सुनिलच्या उजव्या कानाच्या वर रंगिनीने दिलेला आणि सायलीने पक्का बसवलेला स्फटिक असल्याने, स्पर्श करण्यापुरता तो उघडा राहील अशी काळजी त्या मुखवट्यात घेण्यात आली होती. त्याची हॅट ही डोक्याद्वारे मुखवट्याला जोडलेली होती. मुखवटा काढला तरच हॅट निघू शकणार होती. त्या हॅट मध्ये सुनिलने एक बटनाद्वारे उघडू शकणारी एक झडप बसवली ज्यात त्याने कामाच्या बऱ्याच गोष्टी ठेवलेल्या होत्या. अनेक मोठ्या वस्तू आणि उपकरणे झिरको टेक्निकद्वारे छोट्या आकारात रूपांतर करून त्या हॅटखाली लपवून

ठेवण्याचे तंत्र शोधण्यात शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांना सुनिलच्या मदतीने दिवसभरात यश मिळाले. फक्त सुपर नेचर बेटावर सापडणाऱ्या एक काचेसारखा पारदर्शक आणि रबरासारखा लवचिक धातूमुळे (ज्याचे नाव झिरकोडियम होते) आणि फक्त तिथेच अस्तित्वात असणाऱ्या किर्मोटो वायूला कॅटॅलिस्ट म्हणून वापरल्याने हे शक्य झाले. नॅनो टेक्नॉलॉजीच्याही पुढे जाणारी आणि आधुनिक अशी ही झिरको-टेक्नॉलॉजी होती. या संशोधनात सायलीचा फास्टर आणि कायम लक्षात ठेवणारा मेंदू कामास आला कारण तिने पटापट सगळी वैज्ञानिक माहिती प्रोसेस केली तसेच डॉक्टर असल्याने बॉडीवर या सगळ्यांचे होऊ शकणारे संभाव्य परिणाम याबद्दल तिने माहिती दिली.

सगळ्यांचे एक्स्ट्रा मुखवटे पोशाख, इतर अनेक वस्तू, उपकरणे सूक्ष्म स्वरूपात सुनिलच्या हॅटमध्ये ठेवायचे ठरले. हवे तेव्हा त्या वस्तू त्यांच्या मूळ स्वरूपात आणता येणार होत्या. पण हे करण्यासाठी त्या वायूला द्रव स्वरूपात कॅटॅलिस्ट म्हणून सुनिलच्या शरीरात इंजेक्शनद्वारे टोचण्यात आले होते. मग सुनिल हवे तेव्हा तोंडाने फूक मारून त्या वस्तूला सूक्ष्म स्वरूपात आणि मूळ स्वरूपात रूपांतर करू शकेल. फक्त सुनिलचे शरीरच असे होते

ज्याला झिरको टेक्नॉलॉजी सूट होत होती, मानवत होती! त्यामुळे त्याची मालकी सुनिलकडेच होती.

सायलीला अंगाला फिट बसेल असा मजबूत व्हाइट कलरचा पोशाख ज्यावर हसणाऱ्या मेंदूचे चित्र होते.

हाडवैरीला त्याच्या आवडीच्या लाल रंगाचा बॉडी फिट असा पोशाख मिळाला ज्यावर हाडांनी बनलेल्या कवटीचे चित्र होते कारण हाडवैरीने कितीही उंचावरून उडी मारली किंवा कुठेही तो आपटला गेला तरीही त्याची हाडे तुटत नसत तसेच त्याच्या त्वचेला पण काहीही होत नसे. साधे खरचटत सुद्धा नव्हते.

निद्राजीताला निळ्या रंगाचा फिट पोशाख मिळाला ज्यावर रातरणीच्या फुलाचे चित्र होते. ती एक फायटर होती. समोरचा ज्या पद्धतीने लढेल तीच पद्धत क्षणार्धात ती आपोआप आत्मसात करून समोरच्याशी जास्त ताकदीने लढू शकत होती. विशेषकरून रात्रीच्या वेळेस तिला अनेकपट जास्त शक्ती प्राप्त होत होती.

मग स्वागतच्या आदेशानुसार मुंबई पुण्यातील ऑफिसला कॉन्टॅक्ट करून रणवर्धन, रजक, हरित आणि हितेन या चौघांच्या घरी चोवीस तास पोलीस पहारा लावला गेला आणि येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाची चौकशी केली जात होती तसेच आजूबाजूला असणाऱ्या प्रत्येक जीव जंतू प्राणी कीटक पक्षी यांचेवर लक्ष दिले जात होते. शहरभर पोलीस सतर्क झाले होते. तसे सावधगिरी म्हणून भारतातील सर्वच शहरांतील डॉक्टर, वैज्ञानिक आणि विविध कंपन्यांचे प्रमुख ज्यांनी कर्मचाऱ्यांना जॉबवरून काढले होते त्यांना काही सूचना दिल्या गेल्या होत्या आणि थोड्या प्रमाणावर त्यांच्याही संरक्षणार्थ पोलीस होतेच.

आज पाच तारखेची रात्र होती. एकमेकांपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या तिन्ही ट्रीहाऊसेसच्या छतावर असलेल्या गोलाकार खिडकीतून आकाशातील चंद्र निरखत सर्वजण पहुडले होते. निद्राजीता स्वतःच्या ट्रीहाऊसच्या लाकडी छतावर जाऊन कपाळावर हात ठेऊन आकाशाकडे बघत पहुडली होती. रोज तिला रातराणीची फुले खायला लागायची. त्यातूनच तिला खास शक्ती मिळाली होती. रातरणीच्या फुलांशी तिचा खास असा बंध तयार झाला होता. तिच्याजवळ नेहमी रातराणीच्या फुलांचा अर्क

असायचा, तो ती प्यायची. कधी फुलं मिळाली तर खाऊन घ्यायची. फ्लॉवर मितीकडून तिला ही शक्ती मिळाली होती.

तिचा प्रियकर सूर्यविराट अनाथ होता. त्याने केलेल्या एका चुकीमुळे तो शिक्षा भोगत होता. फ्लॉवरमितीनेच त्याला एका सनफ्लॉवरमध्ये रूपांतर करून जमिनीत राहण्याची शिक्षा दिली होती. ते सूर्यफूल रोज रडायचे. त्याला कुंपण बांधून निद्राजीताने त्याची काळजी घेतली होती. सूर्यविराटला फ्लॉवरमितीतर्फे सूर्यफुलाकडून शक्ती मिळाली होती. आकाशात सूर्य तळपत असेपर्यंत त्याच्यात अफाट आणि अचाट शक्ती येत असे. पुन्हा त्याची भेट कधी होईल हे माहिती नव्हते. पण निद्राजीताने जर का तिच्या शक्तीचा वापर करून खूप चांगली कामं केली तर त्याची शिक्षा कमी होणार होती आणि तो पुन्हा मूळ सूर्यविराट रुपात येऊ शकणार होता. आता पुढे चालून आलेली ही चांगली संधी होती. सूर्यविराट भेटला तेव्हापासून त्याला शिक्षा मिळाली तोपर्यंत सगळा घटनाक्रम तिला आठवत होता. त्याला शिक्षा मिळाली त्यात तिचीही चूक कारणीभूत ठरली होती...

आणखी एक दिवस विविध प्रकारच्या तयारीत आणि नियोजनात गेला. सुनिलने अनेक पर्यायी प्लॅन्सचा विचार केला होता. मिशनला जाण्यापूर्वी एक महत्वाची बैठक पार पडली.

शेवटी सहा तारखेला सुपर नेचर बेटावरून मजबूत बांधणीचे काळ्या निळ्या रंगाचे पट्टे असलेले दोन भव्य हेलिकॉप्टर्स रात्री अकरा वाजता उडाले ज्यावर स्वागत संस्थेचा सायली आणि सुनिलने मिळून बनवलेला लोगो होता. त्या लोगो मध्ये एका गर्द निळ्या रंगाच्या वर्तुळात स्वागत करणारे दोन पांढऱ्या रंगाचे हात होते जे उडणाऱ्या पक्ष्यासारखे भासत होते, ज्याच्या डोक्यावर डिटेक्टिव्हची काळी हॅट होती आणि त्या हातांवर पिवळ्या रंगाचे प्लस म्हणजे अधिक चिन्ह होते आणि गोलकारात इंग्रजीतून SWAGAT असे पांढऱ्या रंगात लिहिले होते.

हेलिकॉप्टर उडाले त्यावेळेस कोणी आकाशात आसपास असते तर त्यांना अचानक समुद्राच्या पाण्यामधून दोन हेलिकॉप्टर निघाले असे दिसले असते कारण सुपर नेचर बेट अदृश्य होते!!

^^^

# 30. पुन्हा पुलावरचा घात?

पुणे: तारीख 7, सकाळी 7 वाजेच्या सुमारास

पुण्यातील विश्रांतवाडी, लोहगांव, येरवडा, विद्यानागर वगैरे परिसरातील लोक सकाळी मॉर्निंग वॉकला निघाले होते, तेव्हा त्यांनी आकाशात दोन भव्य आणि वेगळीच हेलिकॉप्टर्स उडत असतांना पाहिले. नेहमीच्या फायटर जेट विमानांच्या आवाजाची सवय असतांना हा आवाज जरा वेगळाच वाटत होता.

"हे काय? आज लोहगांव विमानतळावरून सकाळी 8 ऐवजी लोकांच्या कानठळया बसवायला एकदम 7 वाजता जेट प्रॅक्टिस सुरू केली की काय?

"अरे, नीट बघ. ते फायटर प्लेन नाहीत. आतापर्यंत न पाहिलेले वेगळेच हेलिकॉप्टर दिसत आहेत. त्यावर लिहिलेले कंपनीचे नाव पण वेगळेच दिसतेय, स्वागत!"

"मला वाटते मागे तो व्हीडिओ नव्हता का आला टीव्हीवर? ज्यात चार मुखवटेधारी माणसांनी शास्त्रज्ञ डॉक्टर का कोण ते त्यांना मारायची धमकी दिली आहे ती तारीख उद्याची आहे!"

"हो ना! आधीच आपल्या शहरात नाकाबंदी आणि सुरक्षा वाढवली आहे. मला वाटते त्या व्हीडिओनंतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काहीतरी हालचाल होतेय!"

"युद्ध तर नाही ना होणार? ते व्हीडिओ मधले पाच मास्कवाले आपल्या शेजारच्या देशातील दहशतवादी असावेत. त्या लोकांचे हे षडयंत्र असावे! अनेक देशांतील बरीच स्मारके नाहीशी झालीत. ते लोक म्हणे माणसांना एक लिक्विड खायला देऊन किंवा शरीरात टाकून छोट्या पेशीत रूपांतर करतात!"

"हो ना, अरे! आणि त्यात बदल करून पुन्हा त्यातून मेंदू माणसाचा आणि शरीर प्राण्यांचे असे सजीव ते तयार करत आहेत किंवा त्यातून पुन्हा माणूस तयार झाला तर तो त्या वाईट संस्थेच्या आज्ञेनुसार कार्य करतो!"

"हो. मी तर माझ्या जवळचा पाळीव कुत्रा एके दिवशी सकाळी सकाळी अंधारात झेड पुलावर जाऊन सोडून आलो. कोण जाणे तो प्राणी नसून एखाद्या गुंड माणसाचा मेंदू असलेला कुत्रा असावा?"

पुण्यात ठिकठिकाणी अशाच पद्धतीच्या चर्चा व्हायला लागल्या होत्या.

विविध न्यूज चॅनेलवर या दोन हेलिकॉप्टर्सची तीच तीच दृश्यं वारंवार दाखवली गेली! जगभरातील अनेक न्यूज चॅनेल्स हे प्रक्षेपण लाईव्ह दाखवायला लागले.

"काय सांगशील अनघा, काय वाटते तुला? तू आता लोहगांव विमानतळाबाहेर उभी आहेस! काय एकंदरीत स्थिती आहे तिथली? कोणती हेलिकॉप्टर्स आहेत ती?"

"किशोर, इथे पत्रकारांना आतमध्ये जाऊ देत नाही आहेत. पण विमानतळावर असलेले लष्करी अधिकारी म्हणतात की त्या दोन अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या संरक्षणार्थ असलेल्या एका मोहिमेचा हा एक भाग असून स्वागत या एका नव्या संस्थेच्या चार स्पेशल एजंट्सना घेऊन हे हेलिकॉप्टर आले आहेत. त्यांच्या सोबत इतर स्वागत-फायटर्स आहेत! चौघे एजंट म्हणे सुपरहिरो आहेत. त्या चार जणांपैकी दोन जण पुण्यात आणि दोन मुंबईत जाणार आहेत. एकाचे नाव डिटेक्टीव्ह निगेटिव्ह असे कळाले असून इतर तिघे एजंट त्याचे साथीदार आहेत, असे कळते!"

"म्हणजे अनघा? एका साध्या डिटेक्टीव्हला एवढे मोठे काम दिले आहे? आणि आपल्याला चक्क सुपरहिरो ची मदत घ्यावी लागते आहे? काय गंमत चालवली आहे यांनी? प्लब्लिकला वेडे समजतात की काय हे? असे सुपरहिरो खऱ्या आयुष्यात असतात तरी का कुठे? "

"हो ना किशोर! मलाही काही कळेनासं झालंय, मी आणखी काही प्रश्न येथील अधिकाऱ्यांना विचारते!"

अनेक न्यूज चॅनेल्सचे प्रतिनिधी, कॅमेरामेन आणि त्यांच्या व्हॅन्स यांची तिथे गर्दी झाली होती.

तेवढ्यात तिथे आतमधून विमानतळाबाहेर काळा कोट आणि हॅट घातलेला माणूस, त्याच्या बाजूला आणखी एक जण आणि मागे दोन लेडीज होत्या. त्यांनी विशिष्ट प्रकारचे पोशाख घातले होते असे न्यूज चॅनेल वाल्यांना जाणवले.

अचानक विमानतळाबाहेर एक अग्निशमन दलाची गाडी आवाज करत आली.

अनघा डिटेक्टिव्हला प्रश्न विचारू लागली.

"तुम्हीच का ते डिटेक्टीव्ह निगेटिव्ह?"

"होय मीच तो! कृपया जास्त प्रश्न विचारू नका, मला लवकरच त्या अग्निशमन दलाच्या गाडीच्या शिडीवर चढायचे आहे!"

"काय? तुम्ही आग विझवायला आलेत? एवढ्या दुरून हेलिकॉप्टरमधून? कुठे लागली आहे आग? आणि त्या दोन VIP चे काय होणार? काय चाललंय काय?"

"सध्या मला जास्त काही सांगायला वेळ नाही. मी एवढंच सांगू इच्छितो की हा त्या मोहिमेचाच भाग आहे. आग वगैरे लागलेली नाही. या गाडीच्या शिडीवर चढून मी संपूर्ण पुणे शहर नजरेखाली घालणार आहे. गाडी दिवसभर पुण्यात फिरणार! मला आपोआप आधीच समजतं की शहरात कुठे काही गुन्हा होणार आहे का ते! आणि त्या व्हिडीओत सांगितल्याप्रमाणे RH अक्षरानुसार चार जण आहेत. दोन डॉक्टर आणि दोन अणु शास्त्रज्ञ! त्यापैकी दोन पुण्यात तर दोन मुंबईत आहेत. त्या चौघांचेही संरक्षण आम्हाला करायचे आहे! त्यापैकी पुण्यातील दोघांपैकी एक गणेशखिंड रोडवर राहतात तर दुसरे मनपा भवनच्या मागे. त्यांचे

संरक्षण आम्ही दोघे करणार तर मुंबईतील दोघेजण नरिमन पॉईंट परिसरात राहतात त्यांचे रक्षण दोन्ही लेडीज एजंट करतील!! "

कॅमेराकडे बघत अनघा म्हणाली, "हे बघ किशोर! एकंदरीत असा प्रकार आहे! एकीकडे हे असे आहे आणि दुसरीकडे सर्व लोक आधीच घाबरलेत कारण आता कोणताही प्राणी, कीटक, पक्षी हा माणसाचा मेंदू असलेला स्मार्ट आणि म्हणून घातक असलेला असू शकतो. तसेच जगभरातील अनेक महत्वाची ठिकाणे गायब झालीत त्यामुळे लोकांत घबराट आहे! "

"खरं आहे अनघा! कदाचित ही जगाच्या अंताची सुरुवात तर नसेल? एकेक करून सर्व मानव छोट्या पेशीत किंवा त्यांना प्राण्यात रुपांतर करून तसेच महत्वाची ठिकाणे गायब होतील आणि पृथ्वीवर काहीच उरणार नाही, कदाचित फक्त प्राणी, कीटक, पक्षी हेच उरतील?"

"मलाही तसेच वाटते आहे किशोर! पण आता आपण ही चर्चा नको करायला नाहीतर लोक आणखी घाबरतील!"

"ठीक आहे अनघा! बरं त्यांना विचार की ते इतर तिघांची नावे काय आहेत?"

डिटेक्टीव्ह निगेटिव्ह आणि अजून एक जण तोपर्यंत अग्निशमन दलाच्या गाडीवर चढला होता आणि दोन लेडीज एका

काळ्या निळ्या भक्कम कारमध्ये मागे बसल्या, पुढे दोन गार्ड आणि गाडी मुंबईच्या दिशेने रवाना झाली.

"डिटेक्टीव्ह जी, तुमच्या इतर तिघा साथीदारांची नावे काय आहेत? आणि अशा पद्धतीने शिडीवर चढून तुम्ही काय सिद्ध करणार आहात?"

शिडीवर चढता चढता थांबून डिटेक्टीव्ह म्हणाला, "हा माझा साथीदार हाडवैरी! त्या दोन जणी होत्या त्यांची नावे आहेत निद्राजीता आणि मेमरी डॉल! त्या मुंबईला जात आहेत. आणि शिडीवर चढून मी काहीही सिद्ध करणार नाही तर साध्य करणार आहे! आता आम्हाला आमचे काम करू द्या!"

कॅमेराकडे बघत अनघा म्हणाली, "हे बघ किशोर! एकंदरीत असा मूर्खपणा सुरु आहे! दर्शकांना आम्ही सांगू इच्छितो की दिवसभर आम्ही आपणासमोर या फिरत्या डिटेक्टीव्ह गाडीचं लाईव्ह प्रक्षेपण दाखवणार आहोत!"

डिटेक्टीव्ह निगेटिव्ह बराच उंच शिडीवर चढला होता, तो म्हणाला, "प्लीज, आमच्या मागे येऊ नका. तुमच्या जीवाला धोका होऊ शकतो!"

अनघा म्हणाली, "नाही आम्ही काळजी घेऊ. आम्ही तुमच्या मागे येणारच! आणि तुम्ही स्वतःला सुपरहिरो म्हणवता मग आमची रक्षा नाही करू शकत तुम्ही?"

डिटेक्टीव्ह म्हणाला, "तुमच्याशी मला जास्त वाद घालायचा नाही! तुम्हाला वाटेल ते करा! जशी तुमची मर्जी!"

विमानतळावरील अधिकारी आणि बंदूकधारी फायटर्स तिथून निघून गेले आणि नंतर दोन्ही हेलिकॉप्टर्स लोहगांव विमानतळावरच कव्हर्ड एरियात पार्क करण्यात आले.

मग अग्निशमन दलाची गाडी वेगाने शहराकडे निघाली. 509 चौक आणि तिथून येरवडा भागातून ती संगमवाडी पुलाकडे जाऊ लागली. न्यूज चॅनेल वाल्यांच्या मागे मागे पोलिसांची व्हॅन पण येत होती. तोपर्यंत निद्राजीता आणि मेमरी डॉल ची गाडी खडकी बाजार मार्गे मुंबईच्या दिशेने मार्गस्थ झाली होती.

अग्निशमन दलाच्या गाडीच्या शिडीवर उंच चढलेला आणि हातातल्या दुर्बिणीतून टेहळणी करणारा काळा कोट हॅट घातलेला डिटेक्टिव्ह त्यांच्या मागे धावणाऱ्या न्यूज चॅनेल्सच्या गाड्या असे

दृश्य पुणे शहरात सकाळी सकाळी दिसत होतं. सगळयांना हे टीव्हीवर लाईव्ह दिसत होते.

संगमवाडी पुलाच्या खाली तोंडावर हातरुमाल बांधलेला एक माणूस उभा होता. त्याच्या एका हातात साखळी होती ज्याच्या दुसऱ्या टोकाला एक रागीटपणे गुरगुरणारी रानमांजर बांधलेली होती. दुसऱ्या हातात मोबाईलवर तो माणूस बातम्या बघत होता. ती अग्निशमन दलाची गाडी संगमवाडी पुलावर येण्याची तो वाट बघत होता. न्यूज चॅनेलवाले आयतेच त्याला गाडीचा ठावठिकाणा सांगत होते. त्याला कालपासूनच सूचना मिळाल्या होत्या की आजचा दिवस महत्त्वाचा असणार आहे. त्यामुळे तो तयार होताच. त्या एरियातला वाईट टीमचा इंचार्ज तोच होता. अग्निशमन गाडी संगमवाडी पुलावर आली आणि त्या माणसाने रानमांजराच्या पुढच्या दोन पायांपैकी उजव्या पायात बंदूक दिली आणि सांगितलं, "तो शिडीवर चढलेला माणूस आहे ना, त्याला गोळी मार. लागलीच मेला पाहिजे तो. त्याच्या चेहऱ्यावर डायरेक्ट गोळी मार!"

रान मांजर गुरगुरत पुलावर धावत आलं. त्याच्या पायातल्या पिस्तूलकडे कुणाचं लक्ष नव्हतं. ते वेगाने पळत जाऊन अग्निशमन गाडीकडे धावत आलं आणि त्याने एक उंच उडी मारली. त्याने पुढचा उजवा पाय माणसाच्या हातासारखा वर करून पिस्तूलचा ट्रिगर दाबला. गोळी वाचवायच्या नादात डिटेक्टिव्ह निगेटिव्ह तोल जाऊन शिडीवरून खाली रस्त्यावर पडला आणि बेशुद्ध झाला. पोलीस व्हॅन मधील एका जणाने रान मांजराच्या हातात बंदूक पाहिल्याने व्हॅनच्या टपावर चढून रान मांजराला गोळी मारली. त्यात रान मांजराचा मृत्यू झाला. प्लॅन चुकला पण कमीत कमी डिटेक्टिव्ह निगेटिव्हला बेशुद्ध करण्यात पहिल्याच दिवशी यश आलं या आनंदात त्या पुलाखाली असलेल्या माणसाने काढता पाय घेतला आणि तो त्याच्या घरात गेला आणि पुन्हा न्यूज चॅनेल बघू लागला.

जखमी डिटेक्टिव्हला संचेती हॉस्पिटलमध्ये नेण्यात येत होते. वाईट टीम आनंदात होती. त्यांचा प्लॅन विफल करायला आलेल्या प्रमुख व्यक्तीलाच त्यांनी पहिल्याच दिवशी बेशुद्ध केले होते. कदाचित तो मरेल सुद्धा! त्याच्या बरोबर असलेला तो हाडवैरी? त्याला संपवायला हॉस्पिटलमध्ये जावे लागेल! त्यासाठी प्लॅन

करायला पुण्यातील वाईट टीमच्या आणखी एका व्यक्तीला त्या रानमांजरवाल्या माणसाने कॉल केला.

या प्रकाराने हाडवैरी सुद्धा हादरला कारण मोहिमेतील पहिल्याच प्रयत्नाला असे वाईट घडले. तोही हॉस्पिटलमध्ये इतर पोलिसांसोबत डिटेक्टिव्हची काळजी घ्यायला थांबला.

काही वेळाने पोलिसांनी न्यूज चॅनेल वाल्यांना परत पाठवले. डिटेक्टिव्हच्या प्रकृतीबद्दल त्यांना पोलिसांकडून वेळोवेळी सांगण्यात येईल या आश्वासनानंतर ते परत गेले.

पण प्राणीमित्र संघटनांनी यावर आक्षेप नोंदवला. अनेक वाद, विवाद, चर्चा, कुचर्चा सुरू झाल्या. काही अधिकाऱ्यांना यासाठी धारेवर धरण्यात आले.

"हे बरोबर नाही. तुम्ही असे प्राण्यांना गोळी नाही मारू शकत. क्रौर्य आहे हे!"

"अहो पण, तुम्ही स्वतः लाईव्ह बघितलं की ते रानमांजर मानवी मेंदू असलेला वाईट टीम चा वाईट प्रयोग होता. त्याला नसतं मारलं तर त्याने स्वागत च्या एजंट ला गोळी मारली असती!"

"हे बघून सगळे लोक प्राण्यांची कत्तल करायला मागेपुढे बघणार नाहीत!"

"असे होणार नाही मॅडम. खात्री बाळगा. स्वागत टीम आणि लष्कर विनाकारण कोणत्या प्राण्यांवर हल्ला करणार नाहीत!"

"पण मॅडम, काही प्राणी हे यांत्रिक आहेत तर काही मानवी मेंदू असलेले कृत्रिम पद्धतीने वाईट टीमने तयार केलेले प्राणी आहेत!"

"होय, आम्हाला माहीत आहे पण म्हणून खऱ्या निष्पाप प्राण्यांना मारण्याचे लायसेन्स तुम्हाला मिळत नाही हे लक्षात ठेवा!"

"नक्की मॅडम, आम्ही काळजी घेऊ!"

"आम्हाला आश्वासन हवे, लेखी आश्वासन!"

"ठीक आहे. ए! लेटरहेड आण. आम्ही लिहून देतो. काही ठोस कारण सापडल्याशिवाय स्वतःहून कुणीही कोणत्याच प्राणी, पक्षी, कीटक, जंतू वगैरे यांच्यावर हल्ला करणार नाही! समोरून

त्यांनी हल्ला केल्यास स्वतःच्या जीवाच्या बचावासाठी कृती करण्यास प्रत्येकजण स्वतंत्र आहे! "

थोड्या वेळानंतर-

"हे घ्या मॅडम!"

"हे सगळीकडे प्रसारित करा. पत्रकार परिषद घेऊन जाहीर करा सगळीकडे!"

^^^

# 31. दिसतं तसं नसतं

जेव्हा प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी सरकारला प्रश्न विचारून धारेवर धरले तेव्हा भारत सरकार आणि तिन्ही लष्कर यांच्या वतीने पंतप्रधानांनी देशाच्या नावे सकाळी एक संदेश जारी केला:

"भारत सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या नव्या स्वागत संस्थेवर विश्वास ठेवा. आपण या संकटावर नक्की मात करू. कृपया एकच विनंती जनतेला आणि प्रसार माध्यमांना आहे की त्यांनी स्वागत च्या कार्यात अडथळे येतील असे काही वागू नका! आपण त्या दोघा महत्वाच्या व्यक्तींना केवळ वाचवण्यातच यशस्वी होणार नाही तर मला विश्वास आहे की आपणच जगाचे नेतृत्व करून जगावर घुटमळत असलेले हे संकट परतवून लावू! आणि जनतेला विशेषतः पुणे मुंबई जिल्ह्यातील जनतेला विनंती आहे की येणारे दोन तीन दिवस घराबाहेर पडू नका. अगदीच आवश्यक असेल तरच घराबाहेर पडा!"

आता सर्व प्रसारमाध्यमे मुंबई पुण्यातील त्या चौघा VIP च्या घराच्या जवळपास तसंच पुण्यातील संचेती हॉस्पिटलजवळ केंद्रित

झाले होते. मग विविध चॅनेल्सनी वेगवेगळ्या चर्चा सुरू केल्या. सरकारवर टीका करणाऱ्या तसेच सरकारची प्रशंसा करणाऱ्या विविध हेडलाईन्स ऑनलाईन न्यूजपेपर्समध्ये यायला लागल्या.

“कोणतीही परिस्थिती हाताळण्यास सरकार सक्षम!”

"आता सरकार सुपरहिरोसारख्या दिसणाऱ्या लोकांवर अवलंबून राहणार काय?"

"तिन्ही लष्कर कमी पडतात की काय, जेणेकरून सरकारला अशा एका संस्थेवर अवलंबून राहते आहे?"

"आता सरकार लष्कराची कामे पण आऊटसोर्स करायला लागलं आहे"

"आजच्या या युगात माणसे आधीच हिंसक झालीत, पैशांसाठी खून करत आहेत आणि आता तर प्राणी सुद्धा त्यात सामील झालीत, जगाचा अंत जवळ आला आहे का? माणसाने विज्ञानाचा वापर चांगल्या पेक्षा चुकीच्या गोष्टी करण्यासाठी केल्याने ही आज जगावर पाळी आली आहे!"

जगभरातील विविध देशांतील प्रसार माध्यमे पण या घटनेकडे लक्ष ठेऊन होती. भारतातून त्यांना वेळोवेळी अपडेट देण्यात येत

होते. अनेक देशातील विविध प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी सुद्धा वार्तांकन करत होते.

संचेती हॉस्पिटलमध्ये:

बेशुद्ध पडलेल्या डिटेक्टिव्ह निगेटिव्हला काहीच इजा झालेली नव्हती. खरे तर डिटेक्टिव्हच्या वेशात तो हाडवैरी होता. कितीही उंचावरून पडला तरीही त्याला काही होत नव्हते. शिडीवरून तो पडला तेव्हा त्याने बेशुद्ध पडल्याचे नाटक केले होते आणि अग्निशमन गाडीत हाडवैरीच्या वेशात एक साधा स्वागत-फायटर होता. नंतर तो साधा फायटर हॉस्पिटलमध्ये बेडवर डिटेक्टिव्ह म्हणून लोळला.

डिटेक्टिव्हने त्याला तिथेच राहू द्यायला सांगितले. डॉक्टरांना विश्वासात घेऊन हाडवैरीने सगळे सांगितले, तसेच ही गोष्ट गुप्त ठेवायला सांगितली. खात्रीसाठी डॉक्टरांचे फोनवर लष्करी अधिकाऱ्यांशी बोलणे करून दिले. डॉक्टरांना सूचना देऊन साध्या वेशात हाडवैरी रिक्षेने पुन्हा लोहगाव विमानतळावर गेला. तिथे सुनिल आणि इतर काही स्वागत फायटर्स आणि लष्करी अधिकारी हे एका केबिन मध्ये बसले होते.

सुनिलने आधीच हा प्लॅन बनवला होता, कारण त्याला माहिती होते की भारतात आल्यानंतर प्रसारमाध्यमे हात धुऊन मागे लागतील. त्यांना टाळणे कठीण होऊन बसेल. या मोहिमेबद्दल टीव्हीवर सगळीकडे ते लाईव्ह दाखवतील. ते लाइव्ह प्रक्षेपण दुश्मन बघतील आणि फायदा घेतील आणि त्यानुसार त्यांचा प्लॅन बदलतील. त्यामुळे अचानक जगासमोर ही मोहीम सुरू झाल्याचे खोटे दाखवायचे जेणेकरून प्रसारमाध्यमे याचे लाइव्ह प्रक्षेपण करतील. आणि पुणे-मुंबईतील वाईट टीमचे साथीदार सावध होतील आणि काहीतरी असे पाऊल उचलतील की ज्यामुळे पुणे मुंबई शहरात लपलेले वाईट टीम मेंबर्स चा माग काढता येईल आणि हेही कळेल की त्या व्हीआयपी व्यक्तींवर हल्ला करण्याचा प्लान कसा आणि कुठे शिजतो आहे.

म्हणजे थोडक्यात त्या वाईट टीमच्या मेम्बर्सला बिळाबाहेर काढण्यासाठी हा एक चकवा होता.

आणि या लाईव्ह प्रक्षेपण चा फायदा आपण स्वतः घ्यायचा असे सुनिल ने ठरवले. पण ते इतक्या लवकर हल्ला करतील असे सुनिल ला वाटले नव्हते, पण त्यामुळे स्वागत चे काम सोपे झाले खरे पण एक मात्र नक्की झाले की वाईट ने पुण्या मुंबईत किती जागोजागी आपले माणसं तैनात करून ठेवले होते याचा विचार

करवत नव्हता. ही सगळी माणसे बेरोजगार असावीत जी थोड्या पैशांसाठी वाईट टीमला सामील झाली असावी. त्यानुसार जेव्हा विमानतळावरच बसलेल्या सुनिलने टीव्हीवर संगमवाडी ब्रिज खालून रान मांजर पुलावर उडी मारताना पाहिले तेव्हाच त्याला पुलाखाली आणखी एक लाल वर्तुळ असलेला ठिपका वेगाने जातांना दिसला. तो ठिपका म्हणजे रान मांजर हॅण्डल करणारा माणूस होता. सुनिलने बरोबर दिशा पकडून दूरदृष्टीने त्याचा पाठलाग सुरू केला. तो माणूस बाईकने एके ठिकाणी जाऊ लागला त्याचा पाठलाग सुनिल दृष्टीने करू लागला.

जेएम रोडवर येऊन तो बाईकवाला माणूस मंगला मल्टिप्लेक्स कडे वळला. तिथून पुलाखालून तो मनपा भवन जवळच्या एका पीएमटी स्टॉपकडे गेला. तिथे पुलावर चढण्यासाठी असलेल्या पायऱ्यांवर एक माणूस बसलेला होता. त्याने तोंडाला रुमाल बांधलेला होता. त्याच्या डोक्यावर प्रखर ज्वलंत लाल वर्तुळ सुनिलला दिसत होते.

^^^

# 32. शक्ती प्रदर्शन

सुनिलच्या प्लॅन नुसार निद्राजीता आणि मेमरी डॉल या दोघी जणी काही स्वागत फायटर्स सोबत एका प्रवासी विमानाने लोहगांव विमानतळावरून मुंबईला रवाना झाले होते. त्यांना सुनिलने एक महत्त्वाचें काम दिले होते.

विमानतळावरून जी स्वागतची गाडी मुंबईसाठी रस्त्याने निघाली होती त्यात स्वागतच्या इतर दोन नेहमीच्या लेडीज फायटर होत्या. त्या दोघी जणी निद्राजीता आणि मेमरी डॉल नव्हत्या. त्यांच्यासोबत दोन आणखी स्वागत फायटर्स होते जे गार्ड च्या वेशात होते. फिमेल फायटर 1, 2 (FF1, FF2) आणि मेल फायटर 1, 2 (MF1, MF2). दोन्ही फिमेल फायटरनी निद्राजीता आणि मेमरी डॉलचा वेष घेतला होता.

एक मजबूत बांधणीची बाईक खडकी पासून त्या चौघांच्या मजबूत काळ्या निळ्या रंगाचे पट्टे असलेल्या कारचा संशय येणार नाही अशा प्रकारे अंतर ठेऊन पाठलाग करू लागली. बाईकवर मास्क घातलेले दोन जण बसले होते, दोघांनी मास्क सारखे

वाटणारे हेल्मेट घातले होते ज्यातून त्यांचे फक्त डोळे दिसत होते आणि संपूर्ण शरीरावर मजबूत काळा कोट घातला होता. मागे बसलेल्या माणसाच्या हातात एक उपकरण होते ज्यात विविध लाईट्स ऑन ऑफ होत होते. त्याला एक जॉय स्टिक होती जी 360 डिग्री अँगलने फिरू शकत होती तसेच चार दिशांची चार बटणे होती आणि एक मोठे लाल बटन होते. ते उपकरण त्या माणसाने त्याच्या कोटाच्या आतमध्ये लपवले होते जेणेकरून ते कुणाच्या नजरेस पडू नये.

कार दृष्टीच्या टप्प्यात आल्यावर बाईकवरच्या मागच्या माणसाने एक बटन दाबले आणि बाईकच्या खालच्या बाजूचे काही कप्पे दोन्ही बाजूंनी उघडले आणि डाव्या उजव्या बाजूने एकेक यांत्रिक कुत्रा बाहेर पडला. दोन्ही कुत्रे बाईकच्या दिशेने पुढे वेगाने धावायला लागले.

त्यांच्यावर खऱ्या कुत्र्यांसारखे आवरण असल्याने ते खरे कुत्रेच वाटत होते. त्यांच्या हालचाली नीट बारकाईनं बघितल्या तरच समजू शकत होते की ते यांत्रिक कुत्रे आहेत. ते कुत्रे वेगाने कारचा पाठलाग करायला लागले. आता त्यांच्याशी स्पर्धा

करायला चित्ता असता तरीही त्याला या दोघांनी मागे टाकले असते.

मागच्या व्हीडिओ कॅमेऱ्यातून चौघांना दिसले की दोन कुत्रे अमानवीय (की अप्राणीय?) वेगाने त्यांचा पाठलाग करत आहेत तेव्हा -

MF1: "मला वाटते हे कुत्रे खरे नाहीत. एक तर ते यांत्रिक असावे नाहीतर मानवी मेंदू असलेले पुनर्निर्मित प्राणी असावेत.

MF2: "मला पण त्यांच्या वेगामुळे त्यांच्यावर संशय येतोय की ते खरे नाहीत! नाहीतरी कोणत्या ना कोणत्या प्रकारचा हल्ला आपल्यावर होणार हे आपण गृहीत धरले होतेच! आणि खरं सांगू का? आम्ही दोघे मूळचे पुण्यातलेच. लहानपणी याच रस्त्यावर मी स्कुटरने जायचो तेव्हा खऱ्या कुत्र्यांचा घोळका वेगाने मागे पाळायचा तेव्हा भीतीने अशी गाळण उडायची की काय सांगू?"

दोन्ही FF पैकी FF2 (मेमरी डॉलची डुप्लिकेट) कार चालवत होती आणि FF1 (निद्राजीताची डुप्लिकेट) पुढे तिच्या बाजूला बसली होती. FF1 म्हणाली, "आम्ही दोघीजणी मुंबईच्या! आणि एकमेकांच्या मैत्रिणी! तुम्हा दोघा MF सोबत प्रथमच आम्हाला

काम करायला मिळतंय हे आमचं भाग्य. तुमचं दोघांचं नाव खूप ऐकलंय, त्या मानाने आम्ही ज्युनिअर आहोत पण स्वागत मध्ये जॉईन होण्याआधी मुंबईत आम्हीसुद्धा पालिस कॅम्पमध्ये खूप काळ ट्रेनिंग घेतलंय. त्यामुळे आता तुम्हा दोघांना आम्ही चांगली साथ देऊ! आणि बाय द वे, आम्ही लहानपणी असल्या कुत्र्यांना काय करायचो माहितीये? स्कुटरचा वेग कमी करून एक पाय जमिनीवर टेकवत राहायचो आणि दुसऱ्या पायांच्या सॅंडलची जोरदार लाथ कुत्र्यांना मारायचो, मग ते भेलकांडत भेलकांडत वुई वुई कुई कुई ओरडत रस्त्याच्या कडेला जाऊन आदळायचं. सॉलिड मजा यायची!"

FF2, "हो ना. असे नाही केले तर आपलीच स्कुटर सटकून आपण रस्त्यावर पडून अपघात होण्याची आणि जीवावर बेतण्याची शक्यता असते!"

ते कुत्रे प्रचंड वेगाने पाठलाग करतच होते.

MF1, "कुत्र्यांना गती आणि मूर्खांना प्रगती सहन होत नाही असे मी कुठेतरी ऐकले होते. आजपर्यंत भटक्या कुत्र्यांनी अनेक लहान मुलांना जखमी केले आहे!"

MF2, "महापालिकेने ठोस पावले उचलली पाहिजेत यांच्यासाठी नाहीतर..."

FF1, "महापालिकेचं सोड रे, या दोन कुत्र्याचं आपण काय करायचं ते ठरवा आधी नाहीतर..."

एवढ्यात कारचा वरच्या बाजूला हातोडा आपटल्यासारखा आवाज आला. तिघांनी दचकून वर पाहिले. दोन पैकी एक यांत्रिक कुत्रा उडी मारून गाडीच्या वर चढला होता आणि गुरगुर करत आपल्या तीक्ष्ण दातांनी गाडीला छतावरून छिद्र पडण्याचा प्रयत्न करत होता.

FF2 ने गाडी उजवीकडे डावीकडे वळवून गाडीला हेलकावे देण्याचा प्रयत्न केला जेणेकरून तो कुत्रा गाडीवरून खाली पडेल परंतु तसे झाले नाही कारण त्या कुत्र्याची चारही पाय गाडीला चुंबकासारखे चिटकले होते पण कारच्या नागमोडी हालचालीने ट्रॅफिकला अडथळा येऊन दोन रिक्षावाले त्या कार वर जाम चिडले. त्यांनी कार वर चाललेला एकंदरीत प्रकार पाहून ट्रॅफिक पोलिसांना फोन केला.

FF2 ने विमानतळावर डिटेक्टीव निगेटिव्हला फोन केला आणि म्हणाली, "सुनिल, इकडे आमच्यावर यांत्रिक कुत्र्यांचा हल्ला झालाय. न्यूज चैनल वाल्यांना ब्रेकिंग न्यूजची गरज आहे. पाठवा त्यांना. जगाला दिसू द्या. वाईट टीमला वाटत राहील की त्यांनी स्वागतच्या चार एजंटपैकी आणखी दोघांवर हल्ला केला आहे. न्यूज चॅनलवालेसुद्धा हेच सगळीकडे दाखवत राहतील. तेवढेच तुम्हा चौघांना तुमचे काम गुप्तपणे करायला उसंत मिळेल! तसेच तुझे तिकडचे काम झाले असेल तर इकडे आम्हाला ट्रॅफिकमध्ये शोधून दे नेमके या कुत्र्यांना ऑपरेट करणारे कोण आहेत ते?"

"सुनिलची दृष्टी इतर एका पाठलागात बिझी आहे. तोपर्यंत तुम्ही मॅनेज करा! बाकीचं न्यूज चॅनेलचं काम मी करतो", असे म्हणून हाडवैरीने विमानतळावरील अधिकाऱ्यांना सांगून न्यूज चैनल वाल्यांना आणि पोलिसांना फोन करायला सांगितले. सुनिलचा फोन हाडवैरीने घेतला होता कारण सुनिलची दृष्टी बिझी होती.

यांत्रिक कुत्र्याने गाडीचे टणक छत तीक्ष्ण दातांनी फोडले आणि तो त्याचा चेहरा आत मध्ये घालून गुरगुरू लागला. त्याचा जबडा MF1 ने दोन्ही हातानी धरला. चौघांनी संरक्षक पोषाख घातलेले होते तसेच हातमोजे घातले होते.

आसपासची ट्राफिक थांबवण्याचा प्रयत्न ट्राफिक पोलिस करत होते परंतु तेवढे सोपे नव्हते. शहर पोलीस अजून तिथे पोहोचणे बाकी होते परंतु संचेती हॉस्पिटलमधून परत निघालेल्या न्यूज चॅनल्सच्या व्हॅन्स आता तिथे पोचल्या आणि लाईव्ह शूटिंग करू लागल्या.

"अनघा, काय सांगशील? काय परिस्थिती आहे तिथे?"

"बघ ना किशोर! स्वागत टीमने या मोहिमेसाठी पाठवलेल्या चार जणांपैकी थोड्या वेळापूर्वी त्यांचा प्रमुख डिटेक्टिव्ह निगेटिव्ह जखमी झाला तो सध्या हॉस्पिटलमध्ये आहे, आणि त्यापैकी दोन लेडीज ज्या मुंबई चालल्या होत्या आता त्यांच्यावर हल्ला झाला आहे! एक आहे निद्राजीता आणि दुसरी मेमरी डॉल."

"अनघा, कॅमेरामन आणि तू थोडी दूर राहून शूटिंग कर!"

"कि कि किशोर का का काळजी करू नकोस. आम्ही का का काही अंतर राखून मग शू शू शूटिंग करत आहोत!", अनघा घाबरली होती.

"सध्या काय दिसते तुला अनघा तिथे?"

"किशोर एक भव्य कु कु कुत्रा त्या कारच्या टपावर चढला आहे आज त्याने गाडीचे छत फ फ फोडले आहे आणि आपला जबडा मध्ये घा घा घातला आहे! तो कुत्रा नक्कीच साधा कुत्रा नाही यांत्रिक कुत्रा असावा! त्याच्या अंगातून ठी ठी ठी .... ठिणग्या उडत आहेत."

"हे बघतांना तुझ्या मनात काय भ भ भावना आहे अनघा?", तिची बघून त्याचीही त त फ फ होऊ लागली.

"कि की ... किशोर! मला आता एकच वाटते आहे की अशा का का कामांसाठी तू फिल्डवर येत चल आणि मी तिथे स्टुडिओत ब ब बसून बातमी देत जाईन आणि तुझ्याकडून लाईव्ह अपडेट घेत जईन! हे असलं भ भ भयंकर झेपत नाही मला आता!"

किशोरची बोबडी वळलेलीच राहिली. तो म्हणाला," ठ ठ ठीक आहे अनघा, प प पुढच्या वेळेस मी ज ज जाईन नक्की! डील!"

MF1 ने कारच्या छतावरील छिद्रातून तो जबडा वर ढकलला कारण तो कुत्रा आतमध्ये ओढला जात नव्हता. संपूर्ण ताकदीने तो जबडा वर ढकलून मग त्यातून MF1 कारच्या छतावर आला आणि त्या पाठोपाठ FF2 (निद्राजीताची डुप्लिकेट) छतावर चढली. ती कार नेहमीच्या कार पेक्षा भव्य आणि लांब होती. तिने जवळ असलेले दोन लोखंडी हातमोजे MF1 ला दिले आणि दोन स्वतः घातले. आता निद्राजीता पूर्ण ताकदीने त्या कुत्र्याशी लढू लागली. त्याच्यातून अधून मधून ठिणग्या निघत होत्या आणि त्याची नकली त्वचा काही भागांत फाटून गळून पडत होती. त्या कुत्र्याने MF1 ला आलिंगन दिल्यासारखा विळखा घातला. MF1 भांबावला आणि त्याचा तोल जाऊन तो कारवरून रस्त्यावर पडता पडता वाचला. तोपर्यंत दुसरा कुत्रा वेगाने कारच्या पुढे आला आणि समोरच्या काचेवर त्याने धडक मारली आणि काच फोडण्याचा प्रयत्न करू लागला जेणेकरुन FF1 ला पुढचे दिसू नये.

पोलीस नेम धरून दोन्ही कुत्र्यावर स्टेनगनने गोळी मारण्याचा प्रयत्न करत होते पण वेगाने हालचाल होत असल्याने आणि इतर नागरिक किंवा चौघे स्वागत टीम मेंबर्स ला इजा होऊ नये याची खबरदारी घ्यावी लागत होती त्यामुळे ते अजून गोळी मारू शकले नव्हते. तसेच रस्त्यावरच्या ट्राफिक मध्ये नेमकं कोण आणि

कोणत्या वाहनातून यांत्रिक कुत्र्यांना ऑपरेट करतंय हे ओळखणं अशक्य होतं. कारच्या मागून येणारी सर्व ट्राफिक रोखली तर? तर मग कुत्र्याशी रिमोटचा संपर्क तुटेल पण नेमके रिमोट ऑपरेट करणारे लोक कसे शोधणार? ट्राफिक थांबवल्यावर ते उलट्या मार्गाने निघून गेले तर? किंवा त्यांनी रिमोट कुठे फेकून दिले आणि नष्ट केले तर? तर ते पकडले जाणार नाहीत. आणि अशा प्रत्येक हल्ल्याच्या वेळेस ट्राफिक अडवत बसले तर गोंधळ होईल.

विमानतळावर सुनिल त्या माणसाचा पाठलाग करत होता तोपर्यंत टिव्हीवरचे यांत्रिक कुत्र्यांचे लाईव्ह प्रक्षेपण बघून हाडवैरी विचार करत होता, "जर परिस्थिती त्या चौघांच्या नियंत्रणात नाही आली त्या मला बचावासाठी जावे लागेल!"

FF1 कार चालवतांना काचेतून समोरचे न दिसल्याने सुरुवातीला भांबावली पण तिने पुढचा एक इमर्जन्सी कॅमेरा ऑन केला आणि त्यातून ती पुढे बघून कार चालवू लागली. तेवढ्यात त्याने गाडीचे वायपर पुढच्या पायांनी तोडून टाकले. कार वेगाने धावतच होती. FF2 ने आपला हात संपूर्ण ताकदीने MF1 ला विळखा घातलेल्या कुत्र्याच्या जबड्याच्याआत घातला आणि

त्याच्या आतमध्ये असलेल्या वायरी आणि इलेक्ट्रॉनिक सामान ओढून बाहेर काढले. त्यामुळे त्याची पकड ढिली झाली आणि तिने त्या कुत्र्याचे चारही पाय आपल्या एकाच हातात धरले आणि शेपटी दुसऱ्या हातात धरली. दरम्यान MF1 ने काचेवरचा कुत्रा काच फोडण्याच्या बेतात असतांना, त्या आधीच पूर्ण ताकदीने वर ओढला.

दरम्यान सुनिलने त्या माणसाचा दृष्टीने पाठलाग थांबवला आणि दृष्टी या घटनेकडे वळवली. त्याला थोड्याच वेळात गर्दीत बाईकवरचे कुत्रे ऑपरेट करणारे दोघेजण दिसले कारण त्यांच्या डोक्यावर प्रखर ज्वालाचे लाल वर्तुळ होते. नंतर दृष्टी कोटाच्या आतमध्ये नेऊन त्याला ते रिमोट दिसले. हे हाडवैरीला सांगून सुनिल पुन्हा त्या मनपा जवळच्या माणसाचा पाठलाग करू लागला. हाडवैरीने कॉल करून त्या बाईकचे वर्णन FF1 ला सांगितले. FF1 ने हा निरोप गाडीच्या छताला पडलेल्या छिद्रातून मोठ्या आवाजात छतावरच्या दोघांना सांगितला. हाडवैरीने हाच निरोप पोलिसांना कॉल करून पण सांगितला. कारच्या छतावरील दोघांनी दोन्ही कुत्र्यांना शेपटी धरून गोल फिरवले आणि सरळ गर्दीतील त्या बाईकवर जोराने भिरकावले. बाईकवर ते दोन्ही कुत्रे एकापाठोपाठ आदळले आणि बाईकचा तोल जाऊन दोघेजण

खाली पडले. इतर वाहने बाजूला होऊन थांबली. कुत्रे बाईकवर आदळून बाईकचा प्रचंड स्फोट झाला. रस्त्यावर खराब होऊन पडलेले रिमोटकडे बघत जखमी अवस्थेत भांबावलेले ते दोघे उठून पळू लागले कारण त्यांना हे कळत नव्हतं की त्यांचा पत्ता गाडीवरील दोघांना लागला कसा?

जवळच मुंबईला जाणारा रेल्वे ट्रॅक होता, एक ट्रेन मुंबईच्या दिशेने निघाली होती, वेगाने पळत पळत ते दोघे त्या ट्रेन ला जाऊन लटकले. पोलिसांनी त्यांची व्हॅन बाजूच्या रोडने त्या ट्रेनला समांतर चालवायला सुरुवात केली. त्यांच्या मागोमाग चौघे स्वागत फायटर्सची गाडी जाऊ लागली. गाडीच्या छतावर FF2 अजूनही उभी होती. जमलं तर त्या ट्रेनच्या डब्याला लटकलेल्या दोघांच्या अंगावर उडी मारून त्यांना खाली जमिनीवर पडता यईल का या शक्यतेचा ती विचार करत होती.

^^^

# 33. चकवा

थोड्यावेळापूर्वी लोहगांव विमानतळावर-

सुनिलने दृष्टीने त्या पुणे मनपा भवन जवळच्या पुलाच्या पायऱ्यांवर बसलेल्या त्या दोघांचा नंतर पाठलाग सुरू केला होता. त्यापैकी आधी जो पुलावर बसला होता त्याच्याजवळ एक मोठे पोते होते. ते दोघे बाईक वर मधमाशी पालन केन्द्रात गेले. तिथे त्यांनी एका माणसाशी काहीतरी संभाषण केले. ते पोते त्याला दिले. त्यानंतर ते दोघे जण हितेन राज या अणु शास्त्रज्ञांच्या घराकडे जाऊ लागले. रानमांजर कुणी पुलावर सोडलं हे सुनिल व्यतिरिक्त प्रत्यक्ष डोळयांनी कोणी बघितले नव्हते. त्यामुळे त्या दोघांवर संशय घेण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे कुणीही त्यांच्या मागावर नव्हते. आणि सुनिलला हेच हवे होते कारण तरच तो त्यांचा पाठलाग दृष्टीने करू शकणार होता.

विशेष म्हणजे हितेन राज यांच्या घरी सिक्युरिटीने त्या दोघांना बाहेर अडवले. पण हितेन स्वतः बाहेर येऊन त्या दोघांना आत येऊ द्या अशी विनंती करू लागले. थोडेफार प्रश्न विचारून त्या दोघांना सिक्युरिटी आणि पोलीस यांनी आत मध्ये जाऊ दिले.

त्यानंतर ते दोघे हितेन यांना भेटले. त्या दोघात एका बंद रूम मध्ये संभाषण झाले. त्यांच्यात जे संभाषण झाले त्याबद्दल हितेन

यांच्या फॅमिलीला सुद्धा काहीच माहिती नव्हते. त्यानंतर ते दोघे जण बाहेर आले आणि बाईकवर बसून शहराच्या दिशेने निघून गेले. त्यानंतर हितेन यांनी हॉटलाइन वरून कुणालातरी फोन लावला. त्यानंतर ते बराच वेळ कुणाशीतरी बोलत होते. त्या संभाषणाच्या आधारे मग सुनिलने त्याची दृष्टी वेगाने अनेक किलोमीटर दूर असलेल्या एका ठिकाणी नेली आणि तिथे त्याला काहीतरी दिसले आणि त्याला स्वतःच्या दृष्टीवर विश्वास बसला नाही. त्याने थोड्या वेळापूर्वी जे ऐकले होते त्याची पुष्टी करणारे दृश्य तो आता समोर बघत होता. मग त्या ठिकाणी आतमध्ये दृष्टी नेऊन सुनिलने काहीतरी पाहिले, तिथले संभाषण आणि हालचाल पाहिली...

हा पाठलागाचा आणि त्यानंतरचा सगळा प्रसंग विमानतळावर बसून डोळ्यांनी बघता बघता सुनिलच्या चेहऱ्यावरचे भाव खूपच बदलू लागले, आश्चर्याने आ वासू लागला, चेहऱ्यावर घाम दिसू लागला. असे काहीतरी ऐकायला बघायला मिळेल असा त्याने विचार केला नव्हता. थोडा संशय त्याला होताच परंतु आता तो संशय पक्का होत चालला होता. पूर्वी प्लॅन करताना हा मुद्दा सुद्धा त्याने विचारात घेतला होता. परंतु असे खरेच घडेल असे त्याला वाटले नव्हते. सुनिलने दृष्टी हळूहळू परत स्वतःजवळ आणली. त्याला थकवा जाणवत होता. थोड्या वेळ

त्याने डोळे बंद ठेवले आणि उघडले. त्यानंतर चेहऱ्यावरचा घाम पुसला आणि पाणी प्याला. मग हाडवैरीला तो बाजूला एका कॉरिडॉरमध्ये घेऊन गेला आणि चालत चालत त्याच्याशी बोलू लागला.

"काय झालं सुनिल?", हाडवैरी म्हणजे विशाल म्हणाला.

"अरे, विशाल काय सांगू? या सगळ्या खेळात हितेन आणि मुंबईतील डॉक्टर रजक पण सामील आहेत!"

"काय? आणि ते दोघे स्वतःलाच किंवा आपल्याच क्षेत्रातील लोकांना म्हणजे रणवर्धन आणि हरित यांना मारण्याचा प्लॅन का बनवतील?"

"तो प्लॅन नाही विशाल. या चौघांपैकी दोघांना उद्या परवा पेशी समूहात रुपांतर करण्याचा जो प्लॅन आहे तो आपल्याला मूर्ख बनवण्यासाठी त्यांनी केला आहे. मुळात तसा प्लॅनच नाही आहे! वाईट टीम त्या कुणाला मारणार नाहीच आहेत! त्यांचा खरा प्लॅन तर वेगळाच आहे!"

"खरा प्लॅन? कोणता?"

"आपल्याला वाटतं की खोटे सुपरहिरो त्यांच्या समोर आणून आपण त्यांना चकवलं! पण खरं तर त्यांनी आपल्याला खूप मोठा चकवा दिला आहे! त्यांना वाटलं होतं सिक्रेट अलाईड फोर्सेस

संपली पण स्वागत नावाची नवी संस्था अचानक समोर आल्याने त्यांनी आपल्यावर हल्ले सुरू केले आणि त्यांच्या प्लॅनची तारीख बदलली आहे!"

"कोणता चकवा? कसा प्लॅन?"

"आज दुपारी एक अद्भुत घटना घडणार आहे जिला आपल्याला कोणत्याही परस्थितीत घडू द्यायचं नाही आहे नाहीतर..."

"काय घडणार आहे दुपारी?"

"अल्ट्रा ग्रेव्हीटी बर्स्ट एनर्जी फोर्स साहायाने त्यांनी त्यांच्या जवळ जमलेला सगळा पेशी समूह, ऊर्जा रुपी वस्तुमान हे आधीच वर अवकाशात पाठवले आहे. आणि आज दुपारी दोन वाजेच्या आत वाईट टीम त्यांच्या "ताकामिशी" मांजरासहित हितेन आणि रजक यांच्यासहित पण त्यांच्या फॅमिली वगळता आणि जगभरातील वाईट टीम मेंबरसहित आकाशात प्रतीसृष्टीवर राहण्यासाठी जाणार आहेत, कायमचे!"

"काय? कुठून जाणार आहेत ते अवकाशात? आणि प्रतिसृष्टी त्यांनी केव्हा निर्माण केली? कुणालाच ती दिसली कशी नाही?"

"तुला विश्वास बसणार नाही, वाईट टीमची मोठी प्रयोगशाळा खंडाळ्याच्या घाटात एका गुहेत आणि त्या खाली असलेल्या भव्य

तळघरात आहे! प्रतिसृष्टी निर्माण करायला त्यांनी सुरुवात केली आहे. त्यामुळे ब्रह्मांडातील असंतुलन वाढेल!"

"काय? खंडाळ्यात? आणि अजूनपर्यंत कुणाच्याही ते लक्षात कसे आले नाही?"

"ते लोक कधीपासून याची प्लॅनिंग करत आहेत, अतिशय गुप्तपणे हे कार्य करत आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून भारतातून आणि जगभरातील अनेक लोक पुणे मुंबई परिसरात येत आहेत. ते तेच लोक आहेत ज्यांना प्रतिसृष्टीत घेऊन जायचे आमिष व्हायरसिकने दिले आहे. तिथे एक अदृश्य स्तंभ त्यांनी बनवला आहे. त्या गुहेचे प्रवेशद्वार पण त्या अदृश्य स्तंभातून जाते, त्यामुळे कुणी गुहेत प्रवेश केला तर ते दिसून येत नाही. हे सगळे घाटातील एका निर्मनुष्य खोल दरीत असल्याने दिसत नाही. या सगळ्या गोष्टी तयार करण्यामागे मोठा हात ताकामिशी याचा आहे, जो आता मांजर रुपात आहे. स्तंभातून त्यांनी आधीच रॉकेट लाँच करून अवकाशात एका नुकत्याच नष्ट झालेल्या ताऱ्याच्या रिकाम्या झालेल्या जागेत प्रतिसृष्टी उभारायला सुरुवात केली आहे, असे त्यांच्या बोलण्यातून मला समजले!!"

"ओह, म्हणजे ते लोक आपल्याला या चार जणांच्या संरक्षणार्थ बिझी करतील, आपल्यावर वेगवेगळ्या प्राण्याद्वारे हल्ला करतील आणि तोपर्यंत ते अवकाशात पोहोचले असतील.

तिथे त्या व्हिडिओमध्ये सांगितल्यानुसार प्रतिसृष्टीचे काम पूर्ण करतील!"

"येस, पण त्यासाठी त्यांना हितेन आणि रजक यांना पेशी समूहात नाही तर त्यांच्या मूळ रूपातच न्यायचे आहे! हितेनने स्वतःकडे एक फॉर्म्युला ठेवलाय ज्याच्या शिवाय सर्वजण प्रतिसृष्टीत जाऊ शकणार नाहीत. फक्त हितेनच नाही तर रजक डॉक्टरने असा एक लिक्वीड पदार्थाचा फॉर्मुला शोधला आहे की जो घेतला की आपण आपल्या मनातील सगळ्या भावना आपल्या मनाप्रमाणे नियंत्रित करू शकतो. म्हणजे राग, लोभ, प्रेम, इर्षा, हास्य, रडणं.. सगळं सगळं! प्रतिसृष्टीमध्ये सगळे जण हे लिक्विड पितील!"

"अच्छा, म्हणजे ते दोघे रजक आणि हितेन आज कधीतरी पुण्यातून आणि मुंबईतून खंडाळ्याला जायला निघतील? आणि त्यानंतरच वाईट टीमचे लोक प्रतिसृष्टीवर जायला निघतील?"

"होय. कधीतरी नाही ते सकाळी 9 वाजता निघणार आहेत. आता आपल्याला त्यांना घराबाहेर जाण्यापासून रोखावे लागेल आणि त्याआधीच ...", बोलतांना सुनिलच्या चेहऱ्यावर प्रचंड ताण जाणवत होता.

"आणि त्याआधी काय होईल सुनिल??"

"मुंबईतील आणि पुण्यातील विविध ठिकाणी विविध प्रकारचे मानवी मेंदू असलेले प्राणी, तसेच रिमोटने चालणारे यांत्रिक प्राणी हल्ला करणार आहेत. असे दोन जण आधीच बाहेर आलेत, ज्यांनी मुंबई रस्त्यावर आपल्या नकली निद्राजीता आणि मेमरी डॉल आणि इतर दोघांवर हल्ला केलाय!"

"बापरे, भयंकर आहे हे सगळे! पण सध्या पोलीस तिकडे मुंबई रस्त्यावर आहेत आणि एव्हाना चौघांनी त्या बाईकवरील दोघांना पकडले असेलच!"

"तशी आशा करूया. आणि मधमाशी पालन केंद्रातून खऱ्या मधमाशा आणि त्याच्यात खोट्या मधमाशा मिक्स करून यांत्रिक मधमाशा खऱ्या मधमाश्यांच्या उडणाऱ्या आकृत्याचा पाठलाग करतील, तसे त्यांच्यात प्रोग्रॅम केले आहे. त्या माणसाच्या पोत्यात यांत्रिक मधमाशा होत्या. तसंच मुंबईतून रजकसुद्धा असंच काहीतरी करून निघून जाईल. हितेन आणि रजक यांनी मुद्दाम शेवटचा पत्ता स्वतः कडे ठेवलाय म्हणजे नव्या सृष्टीमध्ये दोघांना घेतल्या शिवाय वाईट टीम निघणार नाही! आणि ते गायब झाल्याचा ठपका आपल्यावर येईल आणि लोकांमध्ये त्या दोघांची प्रतिमा चांगली राहील!"

"पण हे सगळे त्यांना गुप्तपणे करता आले असते, व्हिडीओ प्रसारित करून सगळ्यांना सावध करायची काय गरज होती?"

"कारण, चौघांच्या रक्षणासाठी आपल्यासारखे लोक, पोलीस वगैरे मुंबई पुण्यात येतील आणि प्रतिसृष्टीकडे प्रस्थान केल्यावर वाईट टीम रिमोटने गुहेतील एक यंत्र सुरु करतील. त्या यंत्रातून हळू हळू "बिग कोलॅप्स निगेटिव्ह कण" एका स्फोटाद्वारे पसरतील आणि त्याचा आपल्या शहरावर नेमका काय, कसा आणि किती परिणाम होईल हे सांगता येणार नाही! पण परिणाम भयंकर असतील, हे नक्की!"

"ओह, असा प्लॅन आहे तर! हा व्हायरसिक बहुतेक पुण्या मुंबईतीलच असावा, आणि त्याचे दुश्मनपण पुण्या मुंबईतील बरेच जण असावेत!

"हो! आणि म्हणूनच त्याचा एवढा रोष या दोन शहरांवर आहे! पण त्याचा तो प्लॅन आपण फेल करूच!!"

"सुनिल, तू त्यांचे चेहरे पाहिले?"

"त्या चौघांचे चेहरे मी गुहेत दूरदृष्टीने पाहिले पण मी त्यांना ओळखत नाही!"

"ओह, पण त्यांना ओळखण्यापेक्षाही आता महत्वाचं आहे त्यांना थांबवणं!!"

"होय विशाल!! हे सगळं आपल्याला मुंबईकडे निघालेल्या निद्राजीता आणि मेमरी डॉल यांना कळवायला हवं! म्हणजे

दोघीजणी सावध होतील आणि आपल्या मुंबईच्या ऑफिसेसमध्ये पण तशा सावधगिरीच्या सूचना देतील. त्या दोघींना मी जे काम दिले आहे ते लवकर झालेच पाहिजे आणि मी लवकरच इसरो आणि नासा तसेच जगभरातील अवकाश संशोधन केंद्रांना सावध करून सूचना द्यायला सांगणार आहे की अवकाशात चोवीस तास देखरेख ठेवा. काही असाधारण गोष्टी दिसल्या तर कळवा. तसेच कदाचित असे हल्ले इतर देशांत पण होतील तेव्हा सगळीकडे सावधगिरीच्या सूचना देण्यात आल्या आहेत! तसेच ते यांत्रिक कुत्र्यांना ऑपरेट करणारे दोन जण पण आपल्या चार स्वागत फायटर्सला व्यस्त ठेऊन मुद्दाम अडकवून ठेवत आहेत त्यांना पण थांबवले पाहिजे!"

"पोलीस आणि चौघेजण त्यांना नमवण्यात सक्षम आहेत!"

तेवढ्यात एक स्वागत फायटर तिथे धावत आला.

^^^

## 34. त्यांना आमंत्रण

तो स्वागत फायटर म्हणाला, "ते दोघेजण बाईक वरून पडूनसुद्धा वाचले आणि आता त्यांनी मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेनमध्ये उडी मारून आसरा घेतलाय. ट्रेनमधले लोक घाबरलेत. टीव्हीवर लाईव्ह दाखवत आहेत! त्यांनी झटापटीत एका पोलिसाची बंदूक हिसकवली आहे आणि अनेक प्रवाशांना ओलीस धरले आहे!"

"मग हाडवैरी, तुला तिथे जायला हवं, त्यांना वाचवायला हवं. हे काम तूच करू शकशील मला माहित आहे. तोपर्यंत मला मुंबई ऑफिसमध्ये कॉन्टॅक्ट करून काही महत्त्वाच्या सूचना द्यायच्यात! तसंच पुढचा प्लॅन आखायचा आहे, आपल्याकडे आता वेळ कमी आहे!"

सध्या डिटेक्टिव्ह त्याच्या साध्या वेशात होता. कारण इतर जगासाठी तो हॉस्पिटलमध्ये होता. सुनिलने त्याच्या जवळ असलेल्या हॅट मधून सूक्ष्म वस्तू काढली, हातावर ठेवली, एक खोल श्वास आत घेतला आणि त्यावर जोराने फूक मारली. झिरको टेक्नॉलॉजीद्वारे ती वस्तू मोठी होऊन हाडवैरीच्या पोशाखात रूपांतरित झाली.

"घे, घाल हा पोशाख आणि वाचव ट्रेन मधल्या लोकांना!"

तो स्वागत फायटर म्हणाला, "ते दोघेजण आता गर्दीत कोणत्यातरी डब्यात लपलेत. त्यामुळे चालत्या ट्रेनमध्ये त्यांना शोधणे अवघड झालेय, असे टीव्हीवर दाखवत आहेत! पोलीस समांतर रोड ने पाठलाग करत आहेत आणि न्यूज चॅनेलवाले पण त्यांच्या मागेमागे आहेत."

सुनिल मिश्कीलपणे म्हणाला, "बघितलं का विशाल! हे सगळे टिव्ही चॅनल सगळीकडे असतांना माझ्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या डिटेक्टिव्हची काय गरज?"

"सर, चांगला जोक होता!", हाडवैरी आणि तो स्वागत फायटर हसायला लागले. ते दोघे पुढे म्हणाले, "आता ती अनघा पुण्याच्या ऑफिसमध्ये बसली आहे आणि बातम्या देत आहे आणि किशोर फिल्डवर आला आहे!"

सगळे हसायला लागले.

सुनिल म्हणाला, "ट्रेन थांबवायला सांगा चेन ओढून! सगळीकडे रेल्वे कंट्रोलरला सूचना द्या!"

"नाही! त्यांनी धमकी दिली आहे की ट्रेन थांबवायची नाही. त्यांना खंडाळ्याला उतरायचे आहे. तिथे ते ओलीस लोकांना सोडून देतील!", स्वागत फायटर म्हणाला.

"म्हणजे मला तुमच्या दूरदृष्टीची गरज लागणार त्या माणसाला ट्रेनच्या गर्दीत शोधण्यासाठी!", हाडवैरी म्हणाला.

"ठीक आहे. आपल्या स्पेशल फोनवरून तू माझ्या कायम संपर्कात राहा! मी तुला सांगतो तो कुठे लपला आहे ते!"

हाडवैरी स्वागतच्या एका कारमध्ये मागे बसला आणि ड्रायव्हरला त्याने ही घटना घडत असलेल्या मुंबई हायवेवर न्यायला सांगितले.

इकडे पुन्हा विमानतळावरच्या त्या गुप्त जागी असलेल्या केबिनमध्ये आल्यावर सायली आणि निशाला फोन करून त्याने सगळं सांगितलं आणि म्हणाला, "सायली तुम्हाला नेमून दिलेले काम लवकरात लवकर पूर्ण करा आणि आता वेळ आली आहे "त्यांना" जागे करून बोलावण्याची!"

"होय", सायली म्हणाली, "जलजीवांना आता जागृत केले पाहिजे!"

सुनिलच्या समोर सायलीने दिलेल्या एका रिपोर्टची फाईल होती, त्यावर लिहिले होते: "जलजीवा: The water demons!"

फाईलकडे बघत तो सायलीला म्हणाला, "मी जलजीवांना जागृत करायला सांगितले आहे आणि लवकरच ते मार्गस्थ होतील! माझे जलजीवांचा प्रमुख अमेय आचरेकरशी बोलणे झाले

आहे! त्याला मी एक दिवस आधीच जलजीवांना पाठवायला सांगितले आहे! जेनिफर पण आता जुने वैर विसरली आहे. एवढेच नाही तर ते दोघे आणि जलजीवा स्वागत टीम मध्ये सामील व्हायला तयार आहेत!"

"होय सुनिल, नक्कीच!", सायलीने दुजोरा दिला.

"आणि तुमचे काम लवकर करा. मला शंभर टक्के रिझल्ट पाहिजे!", सुनिलने अधिकारवाणीने सांगितले.

"नो प्रॉब्लेम! एकशे एक टक्के रिझल्ट मिळेल!", सायली म्हणाली.

काही वेळ सायली करत असलेले काम सुनिलने दूरदृष्टीने पाहिले आणि नंतर मुंबईत रजक डॉक्टरांच्या घराच्या आसपास काय चालले आहे ते बघायला सुरुवात केली. रजक आणि हितेन दोघे अपहरणाचे नाटक करून घरातून निसटून खंडाळ्याला येणार होते.

सुपर नेचर बेटावरून निघण्यापूर्वी एक दिवस आधी सुनिलने जलजीवांच्या जागृतीसाठी दोन स्वागत फायटर पाठवलेले होते त्याचेकडून नुकताच निरोप आला होता.

जलजीवा लवकरच पुणे आणि मुंबईकडे यायला सुरुवात झाली होती. तसेच पुणे मुंबईतील महत्त्वाच्या रस्त्यांच्या आजू बाजूला सुपर नेचर बेटावरून बोन्साय करून आणलेले ट्री मेन त्याने पेरून ठरवायला सध्या वेशात काही स्वागत फायटर्स पाठवले होते. काही बोन्साय त्याने सायली सोबत मुंबईला पाठवले होते.

तिथेही त्यांच्या टीमचे फायटर्स सगळीकडे लवकरच बोन्साय लावणार होते. वेळ आली की सुनिल त्यांना मूळ रुपात आणणार होता म्हणजे त्यांचा उपयोग लढण्यासाठी होईल!

^^^

# 35. हाडाचा लढवैय्या

गाडी अतिशय वेगाने चालवत ड्रायव्हरने शहरातील वेगळ्या मार्गाने हाडवैरीला आकुर्डीला आणले. मार्गात टीव्हीवर लाईव्ह प्रक्षेपण त्याच्या टॅबवर हाडवैरी बघत होता. आणि सुनिलच्या दृष्टीने हाडवैरीला सांगितले की ते नुकतेच आकुर्डी स्टेशनवर पोहोचतील पण अर्थात रेल्वे तिथे थांबणार नाही पण तिथे त्या ट्रेनला तो पकडू शकतो.

दोघेजण असलेल्या डब्याचा नंबर होता: CR2 हे सुनिलने सांगितले.

आकुर्डी आलं....

ट्रेन नुकतीच आकुर्डी स्टेशनमध्ये वेगाने शिरण्याच्या बेतात होती.

एव्हाना समांतर रस्त्यावरून पोलिसांची गाडी रेल्वेचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करत होती आणि MF1 आणि FF2 हे ट्रेनमध्ये CR7 डब्यात होते आणि त्या दोघांना शोधण्याचा प्रयत्न करत होते.

पोलिसांच्या गाडी मागे चॅनेलवाल्यांची गाडी होती. आणखी एक दोन चॅनेलच्या गाड्या आणि पत्रकार होते.

"किशोर, कसं वाटतंय आता तिथे फिल्डवर? काय परिस्थिती आहे तिथे असं इथे बसून विचारायला छान वाटतं पण प्रत्यक्ष फिल्डवर भीतीने आपली...", अनघा उपाहासाने पुण्यातील टीव्ही स्टुडिओत बातम्या देत म्हणाली.

"अनघा, प्लिज! चांगले शब्द वापर, पुणेरी टोमणे नको. लोक ऐकताहेत आपलं बोलणं!", किशोर शरमून म्हणाला.

"अरे चांगलेच शब्द आहेत. खोट तुझ्या विचारांत आहे. मी म्हणत होते की भीतीने आपली... गाळण उडते!",अनघा डोळे मिचकावत म्हणाली.

न्यूज चॅनेलचा सिटी हेड अनघा बातम्या देत असताना तिथे आला आणि म्हणाला, "अनघा, पुरे आता. गाळण बिळण बास करा! दोघेजण भांडू नका. बातम्या द्या बातम्या. लाईव्ह दाखवा लोकांना!"

"ओके ओके!", अनघाने ओशाळून खात्री दिली.

एका न्यूज चॅनेलने चर्चा सुरू केली. जसजसे फिल्डवर त्यांचे प्रतिनिधी रिपोर्ट द्यायचे तसतसे ते बसल्या बसल्या एकमेकांच्या अंगावर ओरडून माईक, पेन कागदपत्रे  एकमेकांना फेकून मारत होते. एक ग्रुप सरकारची बाजू घेत होता, दुसरा सरकारच्या विरोधात तर तिसरा कोणाचीच बाजू न घेता नुसता गोंधळ घालत

होता. व्हीडिओ कॉन्फरन्सद्वारे चर्चेत सामील झालेल्या लोकांची पण करमणूक होत होती आणि त्यांनाही वाटत होते की आपण प्रत्यक्ष स्टुडिओत असतो तर तिथल्या बसलेल्या लोकांच्या एकेक कानाखाली आणि थोबाडीत देता आली असती...

लाल रंगाचा बॉडी फिट असा कवटीचे चित्र असलेला पोशाख आणि डोक्यावर संरक्षण हेल्मेट घातलेल्या हाडवैरीने वेळ न दवडता कारच्या छतावर उभा राहून बाजूच्या झाडावर उडी मारली आणि बरोबर नेम साधून ट्रेन आकुर्डी स्टेशनमध्ये शिरताच विजेच्या तारांना धरून सरकत सरकत CR2 डब्याच्या छतावर उडी मारली. त्याला अर्थात कसलीही इजा झाली नाही कारण त्याची हाडे होतीच तशी! मजबूत! कधीही न तुटणारी! आणि त्वचा रबरासारखी लवचिक! आणि त्याला कोणत्याही विजेचा शॉक बसत नसे... तो शॉकप्रूफ होता!!

आता डब्याच्या आतमध्ये कसे जायचे? त्यासाठी छतावरून सरपटत उलटे खिडकीतून बघून त्याला दिसले की त्या दोघांनी दोन लेडीजला बंदुकीच्या टोकावर ओलीस धरले होते. डब्यात सगळ्यांना त्याने बंदुकीच्या धाकाखाली ठेवले होते. तेवढ्यात खिडकीजवळ बसलेल्या एका महिलेचे लक्ष खिडकीतून उलट्या दिसणाऱ्या हाडवैरीच्या हेल्मेटच्या आतमधल्या चेहऱ्याकडे गेले.

काचेसारख्या पारदर्शक धातूपासून बनवलेले ते हेल्मेट उघडझाप करता येत होते.

ती महिला ओरडली, "अगं बाई बाई बाई! हा सुपरहिरो थोडा लक्ष्मीकांत, थोडा गोविंदा आणि बराच आडदांड सारखा दिसतो!"

बाजूला बसलेली तिची भाची म्हणाली, "आडदांड नाही गं, अरनॉल्ड!"

"हा तेच ते! टर्मिनस पिक्चर मधला", ती तोंड विचकावत म्हणाली.

भाची, "टर्मिनस नाही गं!...बरं जाऊ दे! मी पण कोणाला समजवायला बसली!"

दोघींना थँक्स म्हणून तो म्हणाला, "त्या दोघांचे बारा वाजवायला आलोय मी! बघाच आता!" असे म्हणत आकुर्डी असे तीन वेगवेगळ्या भाषेत नाव लिहिलेल्या स्टेशनवरच्या नामफलकावर नेम धरून हाडवैरीने छतावरून त्यावर आडवी उडी मारली आणि वेगाने तिथून आपोआप उधळला जाऊन तो ट्रेनच्या दरवाज्यातून आतमध्ये पडला. पटकन सावरून उठला आणि म्हणाला, "सर्वांनी पटकन बाजूच्या डब्यात जा, पटकन!"

त्या दोघा गुंडांनी ओलीस धरलेल्या महिलांच्या गालावर जोराने बंदुका दाबल्या आणि हाडवैरीला वॉर्निंग दिली, "ए,

सकाळी त्या डिटेक्टिव्ह निगेटिव्हला वाचवू शकला नाहीस आणि आलाय इथे शहाणपण दाखवायला. आणि शर्टवर कवटीचं चित्र छापून तुला काय वाटलं आम्ही तुला घाबरून पळून जाऊ? या डब्यातील कोणीच कुठेही जाणार नाही, नाहीतर एकेकाला गोळ्या घालीन! आणि त्या दोघी? काय नाव म्हणाल्या त्यांचं त्या? निद्राजीता आणि मेमरी डॉल? कसली डोंबलाची डॉल ती? नुसती कापसाची मऊ मऊ डॉल आहे! लढायला उपयोगाची नाही ती! ती आणि तिची दुसरी साथीदार कोणत्यातरी वेगळ्याच डब्यात भरकटलेल्या आहेत. असले कसले रे तुम्ही सुपरहिरो? एक जण सकाळपासून हॉस्पिटलमध्ये आहे आणि म्हणे डिटेक्टिव्ह निगेटिव्ह? हा हा हा हा... कसला भारी जोक करता तुम्ही सगळे! स्वतःला सुपरहिरो म्हणवता आणि साध्या हिरोसारखी पण कामं जमत नाहीत!"

डब्यातील पब्लिक घाबरली. आहे तिथेच थबकली.

हाडवैरीचा पारा चढला. त्याच्या हाडांमध्ये जणू काही इलेक्ट्रिक करंट धावायला लागलं. हाडांमध्ये त्याला एक प्रकारची उष्णता जाणवायला लागली. एका क्षणी त्याच्या जागी सगळ्यांना फक्त एक मजबूत हाडांचा सापळा दिसायला लागला आणि जणू काही त्याच्या प्रत्येक हाडांतून आग ओकणारा प्रवाह धावत आहे. तो अवतार बघून ते दोघेही क्षणभर बावचळले आणि विद्युत वेगाने

पुढील घटना घडली. हाडवैरी ऐवजी दिसणारा हाडांचा सापळा त्या दोघांच्या जवळ आला आणि वेगाने एका गुंडाचे बंदूक धरलेल्या हाताचे मनगट इतक्या वेगाने पिरगळले की बंदूक हवेत बराच वेळ गोलाकार फिरत फिरत तर खाली पडलीच पण त्याच्या हाडांना जणू शॉक लागल्यासारखी फिलिंग झाली. दुसऱ्याच्या हातातील बंदूक कधी गळून पडली त्यालाच समजले नाही. दुसरा गुंड उसने अवसान आणून हाडवैरी वर चिडला आणि हाडवैरीला भिडला. डब्यातील सगळे जण दोन्ही बाजूला दूर जाऊन एकत्र झाले. त्यापैकी दोघांनी हातरुमाल टाकून बंदुका उचलल्या आणि रिकाम्या सीटवर ठेवल्या. एकाने चेन ओढून ट्रेन थांबवण्यास सुरुवात केली. मध्यभागी निर्माण झालेल्या रिकाम्या जागेत आता बघणाऱ्यांना एक मजबूत हाडांचा सापळा दोन गुंडांशी लढतो आहे असे अद्भुत दृश्य दिसत होते. ओलीस धरलेल्या दोन्ही महिला पटकन बाजूला झाल्या आणि डब्यातील गर्दीत सुरक्षितपणे जाऊन मिसळल्या.

दोन्ही हेल्मेट घातलेले गुंड हाडांच्या सापळ्याच्या रूपातील पारदर्शक हेल्मेटवाल्या हाडवैरीला जोर लावून मागे ढकलू लागले. हाडवैरीच्या कवटीचा जबडा कर्रर्रर्र असा आवाज करत दात ओठ खाऊ लागला. तेव्हा त्याच्या प्रत्येक दातातून वेल्डिंग करतांना उडतात तशा ठिणग्या उडू लागल्या. त्या दोघांकडून हाडवैरी मागे

ढकलला जात नव्हता. बराच वेळ ते दोघे हाडवैरीला मागे ढकलून वैतागले. थकले. पण तरीही त्यांनी आणखी उरलासुरला जोर एकवटला आणि त्याला ढकलायला सुरुवात केली. हाडवैरीला सुरुवातीला त्यांच्या चिवटपणाचे कौतुक वाटले पण नंतर त्याला राग यायला सुरुवात झाली आणि त्याने दोघांच्या हेल्मेटला धरले, दोघांच्या हेल्मेटधारी चेहऱ्यांना एकमेकांवर आदळायला जवळ आणले आणि त्याच वेळेस स्वतःचा पारदर्शक मजबूत हेल्मेट घातलेला चेहरा त्या दोघांच्या चेहऱ्यावर आदळायला एकत्र आणला. तीन हेल्मेटधारी चेहरे एकमेकांवर प्रचंड वेगाने आदळले. हाडवैरीच्या हेल्मेटच्या प्रचंड आघातामुळे त्या दोघांचे हेल्मेट अनेक जागी टिचून फुटले आणि हवेत काचेचे तुकडे उडाले. काही तुकडे त्या दोघांच्या चेहऱ्यात घुसले आणि त्यातून रक्त आले. हळूहळू दोघांचे हेल्मेट तुकडे तुकडे होऊन खाली पडले. त्यातून दोघांचे चिडलेले आणि रक्ताळलेले चेहरे दिसायला लागले. हाडवैरीने दोन्ही हातांनी एकाच वेळेस दोघांच्या गालांवर जोरात थोबाडीत मारली आणि म्हणाला, "ऊस खाल्लाय का कधी लहानपणी?"

कसेबसे ते दोघे गाल चोळत आणि सावरत म्हणाले, "ख ख खाल्लाय ना!"

"स्वतःच्या दातांनी सोलून मग छोटे छोटे तुकडे करून खाल्लाय की फक्त रसवंतीमध्ये जाऊन रस पिलाय?"

"सोलून छोटे तुकडे करून पण खाल्लाय, लय मजा यायची!"

"मोठ्या ऊसाचे दोन तुकडे केलेय कधी? उभ्या उभ्या? मांड्यांवर?"

"न न न नाही!"

"मग मी करून दाखवू का तसे दोन तुकडे तुमच्या दोघांच्या हातांना ऊस समजून?"

गर्दीतील एक सोळा सतरा वर्षाची मुलगी म्हणाली, "तुम्ही शेतकरी आहात का हो हाडवैरीजी?"

"हो, मी शेतकरी आहे. संपूर्ण जगाचा पोषणकर्ता असतो शेतकरी!", असे म्हणून पुढे तो गर्दीला उद्देशून म्हणाला, "ऊस तोडण्याचं प्रात्यक्षिक दाखवू का तुम्हाला? थांबा दाखवतो!"

आणि त्याने दोन्ही गुंडांचे एकेक हात आपल्या दोन्ही हातांनी घट्ट पकडले आणि ते स्वतःच्या गुडघ्यांवर आपटून त्यांचे दोन तुकडे करणार तेवढयात एकाने हाडवैरीच्या पायात पाय अडकावून त्याला पाडण्याचा प्रयत्न केला, पण हाडवैरी सावरला आणि त्याने दोघांच्या हातांच्या कोपराला एक दणका दिला, ते कळवळले.

हाडवैरी म्हणाला, "वा! वा! कमाल आहे. चांगली सहनशक्ती आणि चिवटपणा आहे तुमच्यात! बरं, मला एक सांगा कोल्हापूरी ठेचा खाल्लाय का तुम्ही दोघांनी कधी?"

वेदनेने कळवळत ते म्हणाले, "हो खाल्ला आहे!"

"कसा लागतो?"

"झ झ झ झणझणीत!"

"तुम्ही अजूनही ऐकत नाहीयेत म्हणून म्हटलं तुम्हाला थोडं झणझणीत इलेक्ट्रिक करंट देतो. गुडघ्यापासून सुरुवात करून ते करंट थेट मस्तकापर्यंत जाईल! चालेल ना तुम्हाला? मजा येईल खूप!! जिथे जिथे करंट वाहात जाईल तो भाग मस्तपैकी भुसभुशीत होईल, तुमच्या शरीराचे रखरखीत वाळवंट होईल, तुमच्या शरीराचे विविध भाग कुरकुरीत होतील आणि तुमची वाळू होऊन तुम्ही भरभुरीत होऊन उडून जाल हवेत! मजेत! मग सगळं काही खुसखुशीत होईल!"

गर्दीतील ती सोळा सतरा वर्षाची मुलगी पुन्हा बोलली, "तुम्ही मराठीचे शिक्षक किंवा लेखक पण आहात का हो हाडवैरीजी?"

तिच्याकडे बघत हसत हाडवैरी म्हणाला, "चांगला प्रश्न आहे! पण तुझ्या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी वाट बघ. तोपर्यंत मी या दोघांची वाट लावतो!"

असे म्हणून हाडवैरीने दोघांच्या पायाच्या गुडघ्यांवर आपले दोन्ही हात घट्ट धरले. करंटची भीती वाटायला लागून दोघे गुंड जाम घाबरले. दोघांनाही झणझणीत करंट नको होते. ते हाडवैरीच्या पाया पडू लागले. दोघांनी सपशेल शरणागती पत्करली.

"आम्हाला मारू नका, आम्ही शरण येतोय!"

"मी तुम्हाला इतका वेळ जास्त काही केले नाही. तुमच्या हातापायाच्या ऊसाचे मी अनेक तुकडे करू शकलो असतो, तुमच्या अंगात करंट सोडू शकलो असतो पण मी तसे केले नाही, का माहितीये?"

"का?"

"मला तुम्हा दोघांची लढाऊ वृत्ती आवडली. आमच्या स्वागत टीममध्ये सामील व्हा, देशासाठी काम करायला मिळेल. चांगले कर्म करायला मिळतील!आयुष्य सार्थकी लागेल!!"

"पण आमचे बॉस आम्हाला मारतील, सोडणार नाही."

"तुमच्या सुरक्षेची हमी मी घेतो. स्वागत टीम घेईल!"

"ठीक आहे, जशी आपली मर्जी, पण इथले सगळे लोक हळूहळू मरणार, आम्ही वाईट टीमसोबत प्रतिसृष्टीत जाणार होतो पण आता...?"

"कसली प्रतिसृष्टी आणि कसलं काय? आम्ही वाईट टीमचा प्लॅन फेल करायलाच आलोय! प्रतिसृष्टीचा पूर्ण प्रयत्न आम्ही यशस्वी होऊ देणार नाही! घाबरू नका!"

"प पण वा वाईट टीमचा प्लॅन फेल करणं एवढं सो सोपं नाहीये जेवढं तुम्ही स समजताहात!"

हाडवैरीने अंदाज केला की बहुतेक हे दोघेजण आता वाईट टीमच्या आजच्या बारा वाजेच्या प्लॅनबद्दल सांगतील त्यामुळे त्याने इतर गर्दीच्या नकळत त्या दोघांना डोळ्यांनी खूण करून पुढे काही बोलू नका असा इशारा केला. कारण डिटेक्टिव्ह निगेटिव्हने दूरदृष्टीने पाहिलेला वाईट टीमचा आजचा प्लॅन स्वागत टीमला कळला आहे, याची वाच्यता हाडवैरीला सार्वजनिकरित्या करायची नव्हती तसेच या दोघांकडून पण तो प्लॅन कुणाला कळता कामा नये कारण मीडियामुळे ते जगजाहीर होऊन त्यामुळे लोक सावध झाले असते हे जरी चांगले झाले असते पण त्यापेक्षा जास्त धोकेदायक म्हणजे वाईट टीम सावध होऊन त्यांनी त्यांचा प्लॅन बदलला असता.

"अरे तुम्ही कोणाकडून आहात? आमच्याकडून की त्यांच्याकडून?", हाडवैरी दोघांना म्हणाला.

"तु तु तुमच्याकडून!", ते दोघे म्हणाले.

"ओक्के! मग काळजी नक्को! जास्त टेन्शन नाही बरं घ्यायचं बाळांनो!"

आता सर्वांना मजबूत हाडांच्या सापळ्याऐवजी पुन्हा हाडवैरी दिसू लागला होता.

एव्हाना न्यूज चॅनेलवाले, पोलीस आणि MF1,2, FF1,2 आणि आणखी गर्दी तिथे जमा झाली होती. हाडवैरीने दोघांना चौघा स्वागत फायटर्सच्या हवाली केलं. मग त्यांना थोडक्यात खासगीमध्ये वाईट टीमच्या प्लॅनबद्दल अपडेट दिले. मग पोलिसांशी त्यांचे बोलणे झाले आणि त्या दोघांना स्वागत टीमकडे सुपूर्द करण्यासाठी परवानगी घेतली.

"तर आपण बघू शकता, की इथे हाडवैरीने सुपरहिरो नावाला सार्थ केले आहे. अशा प्रकारे आपण बघू शकतो की एक अद्भुत अशी फाईट लोकांना बघायला मिळाली आहे. त्या फाईटचे आमच्या चॅनेलने दर्शकांना थेट प्रक्षेपण दाखवले आहे. स्वागत प्रमुख डिटेक्टिव्ह निगेटिव्ह हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे म्हणून काय झालं, त्याचा साथीदार पण काही कमी नाही! त्याने एकच निरोप स्वागत टीम तर्फे सगळ्यांना दिला आहे तो म्हणजे घाबरू नका पण जागरूक राहा. आजपासून आतापासून जागरूक राहा, सावध राहा! आपल्या आजूबाजूला नीट निरीक्षण शक्ती ठेऊन काय चाललंय त्याकडे लक्ष असू द्या! स्वतः मधला लढवैय्या

कायम जागृत असू द्या! प्रत्येक जण हा हाडाचा लढवैय्या असतोच, फक्त विशिष्ट वेळ येऊ द्यावी लागते!"

"होय किशोर! अगदी बरोबर आहे हाडवैरीचे म्हणणे! आता आपला एक प्रतिनिधी हॉस्पिटलमध्ये गेला आहे डिटेक्टिव्ह निगेटिव्हची तब्येत कशी आहे ते विचारायला!"

"नक्कीच, अनघा! एकंदरीत आज दिवसभरात काय होईल ते सांगता येत नाही! मी या संदर्भातील प्रत्येक बातमी फिल्डवरून आपल्या दर्शकांना देतच राहीन. आपले काही प्रतिनिधी मुंबईतील व्हीआयपी च्या घराजवळ तैनात आहेत, त्यांच्याकडूनही तू काही अपडेट घेत राहा!"

"होय किशोर! आशा करूया की या सगळ्याचा लवकर अंत होईल!"

पण ही तर सुरुवात होती...

^^^

# 36. नरिमन ॲक्शन पॉईंट

मुंबईला पोहोचल्यावर काही स्वागत टीम मेंबर्सला घेऊन निद्राजीता साध्या वेशात पण आणखी दुसरा एक चेहऱ्याला फिट बसणारा म्हणजेच एक नवीन चेहरा वाटणारा मास्क घालून नरिमन पॉईंट जवळ जाऊन पोहोचली. सायलीपण साध्या वेशात आणि आणखी एका वेगळ्या चेहऱ्यासहित सुनिलने तिला दिलेल्या मिशनवर काम करायला मुंबईत एके ठिकाणी गेली होती.

अणुशास्त्रज्ञ रणवर्धन हस्तक आणि डॉक्टर रजक हडपकर यांची घरे नरिमन पॉईंट परिसरात होती. त्या घरांना आधीपासूनच पोलीस पहारा होताच. टीव्ही चॅनल वाले आधीपासूनच तिथेही ठाण मांडून बसले होते. परिस्थिती कशी हाताळायची याचा प्लॅन निद्राजीता करत होती आणि स्वागतच्या स्पेशल कम्युनिकेशन नेटवर्कद्वारे पुण्यातील सुनिल आणि हाडवैरीच्या संपर्कात होती.

तिकडे इसरो आणि नासा यांनी अवकाशात टेहळणी सुरू केली होती. दुर्बिणीतून तेथील सायंटिस्ट नव्या प्रतिसृष्टी ची जागा शोधण्यात व्यस्त होते. सुनिलने त्याच्याकडे दूरदृष्टी आहे हे जाहीर

केले नव्हते पण तो आधीच वाईट टीमच्या रॉकेट लॉचरच्या दिशेने अंतराळात बऱ्याच दूरवर जाऊन आला होता पण नंतर त्याच्या डोळयांना प्रचंड थकवा आला होता. अंतराळात गेल्या काही महिन्यांत कोणता तारा लोप पावला आहे त्या दिशेने इसरो आणि नासा आपल्या संशोधनाचा रोख ठेवत होत्या. जमलं तर सगळया दिशांनी वेगवेगळया सॅटेलाईट्सद्वारे पाठवलेले फोटो तपासण्याचा प्रयत्न सुरू होता. वेळ मिळेल तसे सुनिल कधी एका तर कधी दुसऱ्या दिशेने अंतराळात जाऊन पोहोचत होता.

अवकाशातील अंधारातही त्याला नीटपणे दिसायचे कारण त्याला सगळे निगेटिव्ह कलर्स दिसत. हवे तेव्हा तो स्फटिकाला स्पर्श करून गरजेनुसार आपली दृष्टी पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह अशी बदलू शकत होता. पण ते अदृश्य गोलाकार स्तंभातून वर जाणारे रॉकेट्स आणि निर्माण होत असलेली प्रतिसृष्टी अजून काही त्याच्या दृष्टीस पडली नव्हती कारण दिशा नीट सापडत नव्हती. नाहीतर त्या रॉकेट्समध्ये असलेले निगेटिव्ह कण त्याला दिसू शकले असते.

संपूर्ण भारतात या घटनेमुळे आणि वाईटच्या व्हीडिओमुळे रेड अलर्ट सारखी परिस्थिती निर्माण झालेली होती. जनता सावध झालेली होती पण आवश्यक कामासाठी बाहेर पडावेच लागत होते. आणि बेस्ट बस, मुंबई लोकल या मुंबईच्या रक्तवाहिन्या कधीही बंद ठेऊ शकत नसल्याने त्या सुरू होत्या, त्यामुळे गर्दी होतीच फक्त फार तर नेहमीपेक्षा कमी होती असे म्हणता येईल.

नरिमन पॉईंट परीसरात साधारण नऊ वाजेच्या आसपास मारिन ड्राईव्ह जवळच्या खडकांवर हजारोंच्या संख्येने खडकांच्या रंगाच्या एकसारख्या दिसणाऱ्या ज्या मांजरी आणि बोके टपून बसले होते ते तिथून चढून प्रचंड संख्येने रस्त्यांवर आले. तिथे असे दिसत होते की जणू काही काळसर रंगाच्या जाड समुद्राच्या लाटा चिडून समुद्रातून निघून डांबरी रस्त्यावर पसरल्या आहेत. क्षणभर तिथे असलेल्या लोकांना काय होतंय हे समजलंच नाही आणि मग अचानक हाहाकार माजला. घबराट पसरली. गोंधळ सुरू झाला. पळापळ सुरू झाली. अचानक डांबरी रस्त्यांवर मोठ्या आकाराच्या क्रूरपणे दात ओठ खाणाऱ्या मांजरी दिसायला लागल्या. त्या वाघाच्या डरकाळी पेक्षा मोठ्या आवाजात म्यांव म्यांव करायला लागल्या. त्यात मानवी मेंदू असलेल्या आणि यांत्रिक अशा दोन्ही प्रकारच्या मांजरी होत्या.

त्याच दरम्यान अरबी समुद्रात पाण्यामध्ये दूरवर काहीतरी हालचाली सुरू झाल्या होत्या. त्या हालचाली अजून शहरापासून दूर होत्या. अथांग समुद्रात होत्या पण त्या वेगाने शहराकडे येत असल्याचे जाणवत होते.

रस्त्यावर जाणाऱ्या कार्सच्या मध्ये अचानक करड्या रंगांच्या मांजराचा मोठा घोळका शिरल्याने गाड्यांनी करकचून ब्रेक्स दाबले आणि गाड्या स्लिप होऊन उलटल्या. काही डिव्हायडरला धडकल्या.

हे निद्राजीताला आणि स्वागत टीमला कळताच ते तिकडे धावले, आणि हे तिने सुनिलला सांगितले. त्याच सुमारास पुण्यात गणेशखिंड रोड आणि मनपा भवन जवळ मधमाशा, कावळे, पतंग, भुंगे, चिमण्या, घारी, कबुतरं, टोळ, नाकतोडे अशा अनेक पक्ष्यांनी आणि किटकांनी मोठा थवा बनवून एकदम या भागात हल्ला केला. आकाशात काळे ढग जमा होतात त्यापेक्षा जास्त अंधारून आले. सगळीकडे हलकल्लोळ माजला. पीएमटी बस चालकांना समोर दिसेनासे झाले. बस आजूबाजूच्या भिंतींवर आदळल्या. समोरच्या काचा फुटल्या. गाडीतले प्रवासी घाबरून खाली उतरले आणि

सैरभैर धावायला लागले, आजूबाजूला मिळेल त्या घरात, बिल्डिंगमध्ये, हॉटेलमध्ये आसरा घ्यायला सुरुवात केली.

निद्राजीता, हाडवैरी आणि DN तिघांनी एकमेकांना सूचना दिल्या की आता जे काही समोर येईल त्याचा प्रतिकार करायचा, लोकांना वाचवायचे आणि हितेन, रजक दोघांना त्यांच्या घरातून पळू द्यायचे नाही. सायली तिच्या नेमून दिलेल्या कामात गुंतली असल्याने तिला बाहेर सुरू झालेल्या या गोष्टींबद्दल अजून सांगितले नव्हते. जलजीवा लवकरच पुणे आणि मुंबईत येणार होते. जलजीवांचा "झिरकोडीयम" मिश्रण केलेला पाऊस पडला की त्यातून सगळीकडचे बोन्साय ट्री मेन मूळ रुपात येणार होते.

मांजरांचा अचानक हल्ला झाल्याने स्वागत टीम आणि निद्राजीता प्रथम गडबडले पण नंतर सावरले. काही स्वागत फायटर्स रणवर्धन आणि रजक यांच्या बंगल्यांबाहेर थांबले. निद्राजीता आणि इतर मांजरींनी हल्ला केलेल्या मरीन ड्राईव्ह परिसराकडे पळाले. वाईट टीमचा प्लॅन होता की सगळेजण या अचानक हल्ल्याने गडबडले की रजक, हितेन यांना घरातून शिताफीने अपहरणाचा बनाव करून गाडीतून खंडाळ्याला आणायचे...

एका भव्य मांजराने निद्राजीतावर उडी मारली. निद्राजीताला पण त्या मांजरीसारखीच लढण्याची वृत्ती आपोआप प्राप्त झाली. तिच्यात तशी शक्ती होती. मांजरीने तिला चारही पायांनी घट्ट धरून पुढच्या पायांनी बोचकायला सुरुवात केली. आणखी चार पाच मांजरांचा घोळका चारही बाजूंनी उडी मारून निद्राजितावर धावून आला. एका बोक्याने तिच्या जोराने थोबाडीत मारली. थोडा वेळ सुन्न झाले. दातांवर आघात झाल्याने ती डगमगली आणि मग सावरली. नंतर त्यापेक्षा दुप्पट वेगात तिने त्या बोक्याला थोबाडीत मारले. तो बोका हसायला लागला आणि म्हणाला, "बोका बनायच्या आधी अंडरवर्ल्ड मधला फेमस गुंड होतो मी. त्याचा मेंदू आतमध्ये आहे माझ्या. गावरान छत्री नाव होतं माझं!"

"गावरान छत्री? अच्छा!! तरीच म्हटलं हा बोका कसा ओळखीचा वाटतोय! तेच मी विचार करत होते की अचानक हा गुंड अंडरवर्ल्ड मधून गायब कसा झाला? सतरा गुन्हे आहेत ना रे नावावर तुझ्या? खूप माजलेला होता तू नाही का? आणि आता तर काय बोका बनला. अजून माज चढलेला दिसतोय तुला!"

"ए भवाने, माज कुणाचा उतरवतेस? अब तो तुझे मौत के घाट उतारने का समय आ गया है!"

प्रचंड वेगाने निद्राजीताने त्याच्या माजलेल्या चेहऱ्यावर वेगाने एक थोबाडीत ठेवली. त्याचा माजलेला चेहरा सुजला. सुजलेल्या चेहऱ्यावर पटापट वार ती करतच राहिली तोपर्यंत इतर मांजरी बोके तिला सुचू देत नव्हते. तिच्या अंगावर ते ओरखडे मारू लागले. त्यापैकी दोन तीन मांजरी गावरान छत्रीच्या गर्लफ्रेंड होत्या. त्या चवताळून म्हणाल्या, "आमच्या छत्रीला मारतेस? एवढी हिम्मत?"

"अरे वा? गावरान छत्रीच्या तुम्ही गावरान छपरी पोरी! नालायक कुठल्या!", असे म्हणत निद्राजीताने हवेत उडी मारली आणि वेगाने गोल गोल फिरत सगळ्यांना हवेतच अनेक थापडा, बुक्के, लाथा मारल्या. गावरान छत्री सहित ते सर्वजण उलटेपालटे होऊन वेगवेगळया रस्त्यावरच्या वाहनांवर पडले. इतर स्वागत फायटर्स पण मांजरांच्या घोळक्यांशी अविरतपणे लढत होते.

वाईट टीमने गुंड लोकांच्या मानवी मेंदू पासून हे सगळे प्राणी बनवले होते आणि स्वतःला मात्र बेरोजगार लोकांचा कैवारी म्हणवून घेत होते.

समुद्रातून आता वेगळ्याच दिसणाऱ्या पांढऱ्या फेसळणाऱ्या लाटा वेगाने शहराकडे आल्या. लाटांमध्ये दोन हात दिसू लागले, मग चेहरा तयार झाला आणि मग समुद्राच्या पाण्यापासून त्यांचे

पाय वेगळे झाले आणि त्या लाटांनी हळूहळू मानवांचे रूप घेतले. ते पाणीच होते पण मानवरूपात! जलजीवांचे आगमन झाले होते!!

त्या शेकडो लाटांनी माणसांचे रूप घेतले आणि नंतर त्या बर्फात रुपांतरीत झाल्या. आता मरीन ड्राईव्ह परिसरात बर्फाचे बनलेले मानव म्हणजे जलजीवा दिसत होते. गरजेनुसार जलजीवा वाफ, पाणी आणि बर्फ या रुपात हवे तेव्हा रूपांतरित होऊ शकत होते. तसेच वातावरणातील तापमानाच्या बदलानुसार स्वतःची अवस्था बदलू देणं किंवा न देणं याच्यावर जलजीवांचे नियंत्रण होते. वाफ बनून वेगाने मांजरांच्या घोळक्यात जाऊन त्यांना वेढून जलजीवा पुन्हा बर्फात रुपांतरीत होऊ लागले म्हणजे तेवढा घोळका बर्फात बंदिस्त होऊन थिजला. त्यांच्या विघातक हालचाली पण तिथेच थिजल्या. असे अनेक मांजरांना आणि बोक्यांना बंदिस्त केलेले थिजलेले बर्फगोळे सगळीकडे दिसायला लागले.

पण मांजरांच्या संपूर्ण संख्येला जलजीवा पुरेसे नव्हते. त्यासाठी आणखी जलजीवा लागणार होते. काही जलजीवा बर्फ मानव रुपात मांजरींना उचलून फेकू लागले तर काही गरम वाफ बनून मांजरींना भाजून काढू लागले.

मांजरी आणि बोके हमरीतुमरीवर आल्या. किंचाळू लागल्या. रस्त्यावरील, आजूबाजूच्या हॉटेल्स, घरे याठिकाणी घुसून उच्छाद मांडू लागल्या. आव्हान आणखी कठीण होऊन बसले. काही न्यूज चॅनेलवाले या ठिकाणी येऊन पोहोचले आणि लाईव्ह टेलिकास्ट करू लागले. हे प्रक्षेपण आयते बघत बघत वाईट टीम आपल्या खंडाळयाच्या गुहेतील आपल्या ठिकाणावर छोट्याश्या आक्रमणाने स्वागत टीमची काय हालत झाली आहे हे बघून हसत होते. बरेच कॅमेरामन जखमी झाले. पण तरीही जीवावर उदार होऊन त्यांनी शूटिंग आणि पत्रकारांनी वार्तांकन सुरूच ठेवले.

जलजीवांच्या आगमनाची वार्ता निद्राजीताने सुनिलला कळवली. सुनिलने लगेच सायलीलाही कॉन्फरन्स मध्ये घेतले. आता ते आवश्यक झाले होते. पुण्यातही अशाच प्रकारचे उडणाऱ्या पक्षांचे हल्ले झाले असल्याचे सुनिलने सांगून तिथली परिस्थिती थोडक्यात सांगितली. सुनिल त्यावेळेस पुण्यातील मनपा भवन जवळ काही स्वागत टीम मम्बर्स सोबत उभा होता आणि हल्लेखोर उडणाऱ्या पक्षी कीटकांना तोंड कसे द्यायचे या विचारात होता. दरम्यान शनिवार वाड्याजवळून एक हत्ती वेगाने वाहने तुडवत मनपा भवन कडे येऊ लागला होता. सुनिलला अजून याची खबर नव्हती कारण तो फोनवर बोलण्यात मग्न होता.

निद्राजीता म्हणाली, "सुनिल, हे प्राणी संख्येने खूप आहेत. जलजीवा आलेत खरे आणि त्यांच्यामुळे खूप मदत होतेय पण आपण कमी पडतोय असे वाटते. अनेक निरपराध नागरिक मारले जात आहेत!"

सुनिल पुढे म्हणाला, "ऐका ऐका तुम्ही दोघीजणी! पुण्याला हाडवैरीने पकडलेले ते दोघे वाईट टीमचे सदस्य ज्यांना हाडवैरीने स्वागत टीमला सामील होण्यासाठी तयार केले आहे ज्यांची वाईट टीम मधली नावं आहेत राऊटरन आणि वायफायर. त्यांचेकडून जस्ट आताच मला एक महत्त्वाची माहिती मिळाली आहे!"

सायली सारंग सोबत मुंबईतील ऑफिसमधील आपला प्रयोग पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करत होती तर निद्राजीता एका आडोशाला येऊन बोलत होती.

सायलीने विचारलं, "काय माहिती मिळाली आहे?"

सुनिल म्हणाला, "हे जे प्राणी पक्षी कीटक हल्ला करतात त्यात एक मोडस ऑपरेंडी असते. किंवा प्रोग्रामिंग आहे असं म्हण हवं तर! प्राण्यांच्या घोळक्यात फक्त दोन चार जण मानवी मेंदू असलेले स्मार्ट प्राणी असतात, बाकीचे मात्र त्यांच्याच सारखी बाह्य त्वचा असणारे पण आतमध्ये यांत्रिक असलेले प्राणी असतात. त्यांच्यात मोशन सेन्सर असते, म्हणजे मानवी प्राण्यांची

हालचाल बघून त्यांची कॉपी करणे. कारण इतक्या मोठ्या प्रमाणावर शहरात ते सोडत असलेल्या यांत्रिक प्राण्यांचे कंट्रोल करणारे इतर मानवी प्राणी आणि तेवढे रिमोट कंट्रोल डिव्हाईस हे त्यांचेकडे नाही. तसेच नुसते मानवी प्राणी पण सोडायचे म्हटले तर त्यांचेकडे ते तेवढ्या संख्येने नाहीत!"

निद्राजीता म्हणाली, "ओह, म्हणजे त्यांचा मुख्य मानवी प्राणी जर ओळखता आला आणि त्याला मारले तर इतर यांत्रिक प्राणी आपोआपच निष्क्रिय होतील! मग त्यासाठी तुला एकाच वेळेस सगळीकडे दूरदृष्टीने लाल वर्तुळ डोक्याभोवती असलेल्या प्राण्यांकडे लक्ष ठेवावे लागेल  आणि आम्हाला फोनने सूचना द्याव्या लागतील जेणेकरून आम्ही त्यांना मारू शकू. पण एकाच वेळेस सगळीकडे पुण्यात मुंबईतल्या सगळ्या भागात लक्ष देऊ शकत नाहीस.."

सायली मध्येच सुनिलला तोडत म्हणाली, "आणि म्हणूनच सुनिल... तू सांगितलेला प्रयोग करण्यात मी अविरत गुंतले होते आणि तो अर्ध्या तासातच यशस्वी होणार आहे!"

^^^

# 37. तो येतोय

तेवढ्यात एक मोठा बोका निद्राजितावर चालून आला. तिने त्याला जोराचा झटका देऊन उडवून लावलं. तो जमिनीवर आपटून ठिणग्या निघत फुटला. म्हणजेच तो यांत्रिक बोका होता.

पुढे सुनिल म्हणाला, "ओके. म्हणजे 6 तारखेला सुपर नेचर वरून निघण्यापूर्वी आपण त्या दंडगोलाकार वस्तूमधून काळजीपूर्वक बाहेर काढलेल्या "बिग कोलॅप्स निगेटिव्ह व्हायरस लिक्विड" चा वापर करून सुपर नेचर वरच्या तीन प्राण्यांचे पेशीसमूह तयार करून सोबत आणले होते त्यांचे मिश्रण तू पप्पू आणि मास्कवाल्या माणसाच्या मेंदूसोबत मिक्स करण्यात यशस्वी झालीस?"

पण निद्राजीता आश्चर्याने विचारू लागली, "पण पाच पेशीसमूह एकत्र? दोन मानवी आणि तीन प्राण्यांचे? हे कसे केले? वाईट टीम नुसार तर दोनच पेशीसमूह एकत्र होतात?"

सायली सांगू लागली, "आपल्या मुंबई ऑफिसमधील सायन्स अँड रिसर्च सेक्शन मधील डॉक्टर आणि सायंटिस्ट श्री राजमे यांच्या मदतीने, माझ्या आतापर्यंतच्या मेडिकलच्या ज्ञानाच्या आधारे आणि मी कमीत कमी वेळात जास्तीत जास्त ज्ञान

इंटरनेट आणि इतर पुस्तकांतून आत्मसात करून हा प्रयोग यशस्वी केला आहे. फक्त मर्यादा एकच की दंडगोल मधले लिक्विड मर्यादित असल्याने मी एकच मिश्रण तयार करू शकले!"

सुनिलच्या आनंदाला पारावार राहिला नाही, "म्हणजे तो तयार झाला? व्हेरी गुड सायली, माय ब्युटीफुल वाईफ! त्याचा मला फार उपयोग होईल कारण त्याच्यावर बसून मी आकाशात उंच उडत उडत या विचित्र प्राण्यांशी होणाऱ्या आपल्या लढाईत लाल वर्तुळाद्वारे मानवी आणि यांत्रिक असे प्राणी पक्षीं यांच्यात भेद करू शकेल आणि मानवी प्राण्यांना टार्गेट करून त्यांना मारू शकेन!"

"होय सुनिल! नक्कीच! तो तयार झाला आहे. बस, फक्त त्याला या जगात ॲडजस्ट व्हायला अर्धा तास लागेल!", सायली म्हणाली.

क्लिफ्टोन ह्या अतिवेगाने उडणाऱ्या पक्षाचा (falcon ची एक प्रजाती ) आणि युनिप्पस (sail fish ची प्रजाती) या वेगाने पोहणाऱ्या जलचर प्राण्याचा आणि जमिनीवरील टर्मिस (cheetah ची प्रजाती) या अति वेगाने धावणाऱ्या प्राण्याचा असे तिन्ही सुपर नेचर बेटावरचे पेशी समूह बनवून सुनिलने सोबत आणले होते. सारंगने जुहू बीचवरून ताब्यात घेतलेले दोन पेशीसमूह (पप्पू भुसनळ्या आणि तो मास्कवाला गुंड ज्याचे वाईट टीममधले नाव

होते डिश अँटीनाडू) घेऊन सायलीने त्यात जनुकीय बदल केले आणि मग ते त्या तीन प्राण्यांच्या पेशीसमूहासोबत एकत्र करून आकाश पाणी जमीन तिघांमध्ये संचार करू शकेल असा अद्वितीय आणि अद्भुत प्राणी मानव तयार केला होता.

सुनिल आणखी काही म्हणणार तेवढ्यात तो प्रचंड हत्ती तिथे आला आणि त्याने सुनिलला सोंडेने दूर ढकलले. सुनिल घसरत जवळच्या पुलाच्या कठड्याला जाऊन धडकला. तो हत्ती त्याच्याजवळ आला, हसायला लागला आणि म्हणाला, "मी जग्गू भुसनळ्या आहे. मला तुरुंगात टाकलं होतंस! आता बघ तुझी काय हालत करतो ते!"

सुनिल साध्या वेशात होता कारण लोकांसाठी डिटेक्टिव्ह निगेटिव्ह हा जखमी होऊन हॉस्पिटलमध्ये होता. त्यामुळे जग्गूने सुनिलला ओळखले होते.

त्या हत्तीने आपल्या पायाखाली तुडवायला पाय उचलला तेवढ्यात सुनिलने झिरको स्वरूपातला पोशाख खिशातून काढला होता आणि त्यावर फुंकर मारली होती. तो पोशाख मोठा झाला

आणि सुनिलने तो घातला. रणजित यांनी दिलेल्या सगळ्या पोलिसी ट्रेनिंगचा उपयोग करायची वेळ आली होती.

आता काळा कोट, पोशाखाला अखंड जोडलेली काळी हॅट, हॅटला ओपन क्लोज होऊ शकेल अशी सरकती खिडकी, हॅटच्या आतमध्ये भरपूर झिरको टेक्निकच्या सूक्ष्म वस्तू आणि काळा गॉगल असा डिटेक्टिव्ह निगेटिव्ह आणि त्याच्यासमोर त्याला मारायला टपलेला प्रचंड हत्ती असे दृश्य त्या पुलावर दिसत होते. तिथे उभे असलेले लोक हा अद्भुत प्रकार बघत जागीच थांबले होते. मग त्यांना दिसले की काळया कोट वाल्याने आपल्या पाठीमागे हात नेले. तोपर्यंत त्या हत्तीने त्याच्या पोटावर पाय द्यायला वर उचलला तेवढ्यात सोंडेला धरून कोटवाला हत्तीच्या पाठीवर चढला आणि हत्तीच्या मागच्या बाजूने पुलावर उडी मारली. हत्तीचा जड पाय सुनिलने एका गॅजेटच्या मदतीने पुलाच्या डळमळीत केलेल्या भागावर जोरात आदळला आणि पुलाचा तेवढा भाग कठड्यासहित तुटला आणि हत्तीचा तोल जाऊन तो पुलाखाली धापकन पडला. पडल्यावर थोडा वेळ तो नदीच्या पात्रात तसाच पडून होता. सगळयांचा समज झाला की तो हत्ती मेला.

शेवटी सुनिलने जाहीर केले, "संचेती हॉस्पिटलमध्ये जो आहे तो नकली आहे. मी आहे खरा डिटेक्टिव्ह निगेटिव्ह!"

तिथे न्यूज चॅनलवाले येऊन पोहोचले. सगळीकडे ही खबर पसरली.

सुनिल पुढे तिथल्या आणि एकूणच टीव्हीच्या दर्शकांना उद्देशून म्हणाला, "एवढेच नाही तर मुंबईला कारने जातांना ज्यांच्यावर हल्ला झाला त्या दोन्हीही नकली निद्राजीता आणि मेमरी डॉल आहेत! खऱ्या दोन्ही मुंबईत आहेत. लोकानो, घाबरू नका. वाईट टीमने जणू काही युद्ध सुरू केले आहे! आपल्याला सगळ्यांना मिळून ते युद्ध लढायचे आहे! कदाचित वाईट टीम आजच त्या दोन्ही व्हीआयपीना किडनॅप करू शकते! त्यामुळे आम्ही सावध आहोत!"

न्यूज चॅनेलवर सुनिलने दिलेल्या स्टेटमेंटमुळे वाईट टीमनेपण लवकरच एक छोटा व्हीडिओ सगळीकडे प्रसारित केला ज्यात अंधारात एक मास्कवाला माणूस म्हणत होता, "तुम्हाला वाटतंय आम्ही आजच त्या दोघं व्हीआयपीचे अपहरण करू? बरोबर

ओळखलं. आजच करू आम्ही त्यांचं अपहरण! पण या सगळ्या प्राण्यांपासून सामान्य लोकांना वाचवाल की दोघं व्हीआयपींना वाचवाल की मग आम्हाला अवकाशात पळून जाण्यापासून वाचवाल? आणि मी सांगतो आमचं ठिकाण कुठे आहे ते!! खंडाळ्याच्या घाटात पर्वतांमध्ये आहे ! चॅलेंज देतो की आम्हाला शोधून दाखवा! एक दोन हुशार चाली खेळून तुम्हाला वाटलं बुद्धिबळाचा डाव तुम्ही जिंकाल? माझेजवळ तुमच्या पेक्षा जास्त वजीर, हत्ती, घोडे आणि प्यादे आहेत! अरे मूर्ख डिटेक्टिव्ह निगेटिव्ह, तुझी आणि तुझ्या "स्वागत" टीमची अशी "वाईट" हालत करतो ना, की आयुष्यभर रडत बसशील आणि तुझं स्वागत करायला गल्लीतलं कुत्रंपण येणार नाही!!"

मग तो भेसूर मास्कधारी माणूस मास्कच्या आतमधून हसायला लागला आणि व्हीडिओ संपला. स्वागत टीमला या व्हीडिओबद्दल कळले.

डिटेक्टिव्ह फोनवर इतर तिघा सुपरहिरोना म्हणाला, "च्यायला हा व्हायरसिक! याला काय माहीत की बुद्धिबळाच्या खेळात त्याच्याकडे जरी वेगवेगळ्या प्रकारच्या प्याद्यांची संख्या

जास्त असली तरी माझेकडे, त्याने कधीही न पाहिलेले असे नवीन प्यादे आहेत!"

काही वेळातच सुनिलच्या आदेशानुसार मुंबई आणि पुणे शहरात स्वागत टीमचे फायटर्स असलेले काही हेलिकॉप्टर्स उडतांना दिसत होते.

दरम्यान, तो पक्षी प्रचंड वेगाने मुंबईहून निघाला होता, डिटेक्टिव्ह निगेटिव्हकडे!

^^^

# 38. युद्ध आमुचे सुरू

सुनिलने दूरदृष्टीने चौघांच्या घरी जाऊन ते ठीक आहेत याची खात्री करून घेतली. नंतर चौघांनी आपापल्या घरी कम्युनिकेशन डिव्हाईसच्या नॉर्मल मोबाईल फोन मोडवर जाऊन आपापल्या कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधला. आतापर्यंतचा थोडक्यात प्रवास सांगितला आणि स्वागतचे चौघे सुपरहिरो दुसरे तिसरे कुणी नसून तेच आहेत असे सांगितले. घरातून बाहेर शक्यतो पडू नका असे त्यांनी आपापल्या घरी बजावले.

नंतर सुनिलच्या प्लॅनप्रमाणे एकमेकांना फोनवर कॉन्फरन्सिंगद्वारे एकत्र घेऊन असे ठरले की पुण्यात FF1,2 आणि MF1,2 हे लढण्यासाठी सुनिलसोबत राहतील. पुण्यातील दोन्ही व्हीआयपीच्या घरांजवळ हाडवैरी आणि दोघे नुकतेच हाडवैरीने स्वागतमध्ये सामील केलेले राऊटरन आणि वायफायर असे तिघे राहतील.

निद्राजीता आणि इतर काही स्वागत फायटर्स नरिमन पॉईंट परिसर आणि इतर जिथेही मानवी आणि यांत्रिक प्राणी हल्ला करत आहेत तिथे राहतील तर सारंग, सायली आणि इतर फायटर्स मुंबईतील व्हीआयपीच्या घराजवळ राहतील, पण -

सायलीने ते नाकारले. ती म्हणाली, "मला आणखी काही वेळ द्या. मी इथेच लॅबरेटोरी मध्ये थांबते, मला आणखी काही प्रयोग करायचेत!"

"कोणते प्रयोग राहिलेत आता सायली? युद्ध सुरू झालंय बाहेर! आता लढायचं आहे, प्रयोग करायची वेळ आता संपली!"

"या प्रयोगाचा आपल्याला खूप फायदा होईल सुनिल! प्लिज प्रयोग पूर्ण होईपर्यंत ते सिक्रेट राहील, बाय! लव्ह यू! किस यू अ लॉट! आणि हो, तुझा तो पक्षी निघालाय वेगाने उडत. तुझ्याकडे! बाय!!", असे म्हणून तिने डिस्कनेक्ट केलेसुद्धा!

सुनिलसहित इतरांना तिने विचारांत पाडले. ही नेमकी करणार काय आहे? असो. हरकत नाही. तिला चान्स द्यायलाच हवा!

निद्राजीता एका बोक्याला लाथ मारता मारता म्हणाली, "हे मात्र बरंय सुनिल! एक रिमोट किस काय मिळाला, लगेच तिचं म्हणणं ऐकलं, नाही का?"

सुनिल पण गमतीने म्हणाला, "तसं काही नाही, तू किस द्यायला तयार असशील तर तुलाही देतो परवानगी प्रयोग करायला!"

"हो का? येऊन ट्राय करून पहा किस करायचा! माझा प्रियकर जो आता सूर्यफूल होऊन जमिनीत खोचून पडला आहे तो जिवंत होऊन येईल तुला मारायला!"

"ओह, कधी बोलली नाहीस त्याच्याबद्दल. काय नाव त्याचं? आणि तसे असेल तर येऊ दे की त्याला. त्यानिमित्ताने तो येईल तरी. त्यालाही स्वागत मध्ये सामील करून घेऊ! मदत करील तो आपल्याला!!", सुनिल म्हणाला.

"त्याचं नाव आहे सूर्यविराट!", असे म्हणत निद्राजीताने एका हल्लेखोर मांजराचा गळा धरला आणि तिला समुद्रात फेकले.

सुनिल म्हणाला, "सूर्यविराट? ग्रेट कॉम्बिनेशन! निद्राजीता आणि सूर्यविराट! चला, वेळ नाहीये आपल्याकडे. नंतर गंमत करूया आता, आता फायटिंग अँड विनिंग!"

रजक आणि हितेन यांना कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही बहाण्याने त्यांच्या घरातून निघू द्यायचे नाही हा सुनिलचा अजेंडा होता म्हणजे तोपर्यंत वाईट टीम खंडाळ्याहून हवेच्या अदृश्य स्तंभातून प्रतिसृष्टीकडे जाऊ शकणार नव्हते आणि मग त्यांना पकडता आले असते आणि पृथ्वीवर त्याचा विपरीत परीणाम पण टाळता येणार होता. तसेच स्वागतचे हेलिकॉप्टर आकाशात घिरट्या घालून स्वागतच्या जमिनीवरील या लढवैय्यांना मदत

करणार होतेच आणि सुनिल त्या सायलीने तयार केलेल्या पाणी आकाश जमिनीवर विहार करु शकणाऱ्या पक्ष्याची वाट बघत होता. पप्पू, अँटिनाडू हे मानव आणि क्लिफटाँन, युनिप्टस आणि टर्मिस हे प्राणी या पाच सजीवांपासून तयार झालेल्या पक्ष्याला सुनिल अँटीक्लिप म्हणणार होता.

न्यूज चॅनलवर लाईव्ह बातम्या बघतांना खऱ्या खोट्या डिटेक्टिव्ह निगेटिव्ह बद्दल आणि निद्राजीता, हाडवैरी बद्दल कळल्यानंतर आणि राऊटरन, वायफायर हे महत्त्वाचे माणसं पकडले जाऊन स्वागत मध्ये सामील झाल्याचे कळताच वाईट प्रमुख व्हायरसिक प्रचंड चिडला. त्याने लवकरात लवकर रजक, हितेन यांना कॉल करून त्यांच्या बनावट अपहरणाचा बेत लवकरच तडीस नेतो असे आश्वासन दिले आणि स्वागत टीमला जबरदस्त धडा शिकवायला मुंबई पुण्यात आतापर्यंत जिथे जिथे मानवी आणि यांत्रिक प्राणी सुप्त अवस्थेत होते त्यांना तयार करून ठिकठिकाणी सोडण्याचे आदेश त्याच्या टीमला दिले.

^^^

# 39. प्लॅन्डी

दरम्यान आकाशगंगेत एके ठिकाणी जेलीसारख्या द्रवपदार्थाने बनलेल्या लवचिक पारदर्शक, चमकणाऱ्या आणि सतत रंग बदलत राहणाऱ्या एका प्रचंड मोठ्या आकाराच्या ग्रहामध्ये (ग्रहा"वर" नाही, कारण हा मिती ग्रह होता ज्या"मध्ये" तिथले जीव राहत होते, "वर" नाही!) इतर मिती जीवांसोबत राहणाऱ्या स्मृतिका आणि रंगिनी या दोन्ही मितीजीव ग्रहाच्या आतमधल्या आपापल्या ठिकाणाहून निघून जेली बबल मधून प्रवास करत करत ग्रहाच्या बाहेर निघून अवकाशात आल्या. त्या ग्रहाचे नाव होते: प्लॅनेट ऑफ डायमेंशनस् (प्लॅन्डी)

आपापल्या जेली बबल मधून अवकाशात पृथ्वीकडे प्रवास करतांना त्या एकमेकींशी बोलत होत्या.

रंगिनी: "सुनिलने माझी आठवण काढली आहे!"

स्मृतिका: "हो ना! आणि योगायोग म्हणजे सायलीने पण मला बोलावलंय!"

रंगिनी: "पृथ्वीच्या नियमानुसार त्यांचं लग्न झालंय म्हणे! तरीही सध्या त्यांनी आपल्याला वेगवेगळ्या वेळेला वेगवेगळ्या ठिकाणी बोलावलंय!"

स्मृतिका: "लग्न म्हणजे तेच ना ते ज्यानंतर मानव जातीतले नर मादी ठरवून एके घरात एकाच ठिकाणी राहायला लागतात?"

रंगिनी: "हो, तेच ते. जोडीदार म्हणतात ते एकमेकांना! पण मग त्यांनी आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी का बोलावलंय?"

स्मृतिका: " हो ना. आपल्या ग्रहावर आपण सगळ्याजणी मादी आहोत. बरं आहे कुणी नर नाही ते! लग्न बिग्न झंझट नको! बरं ऐक! आपण ज्या कारणासाठी पृथ्वीवर मितींची विशेष शक्ती काही लोकांना देत आलो आहोत त्याची खरी परीक्षेची वेळ आता आली आहे. पृथ्वीवर वाईट नावाच्या एका संघटनेने पृथ्वीवरच्या लोकांना मारण्यासाठी काही वैज्ञानिक प्रयोग करून मानवी मेंदू असलेले आणि काही यांत्रिक असे प्राणी निर्माण केलेत. पण आपले मिती जीव आपण दिलेल्या शक्तीचं चांगल्या कामासाठी वापर करत आहेत. त्यांनी स्वागत नावाची टीम पण बनवली आहे!"

रंगिनी: "हो, माझ्या कानावर आलं ते. शक्तींचा वापर चांगल्या कामासाठी वापरला तर त्यांना आपण आणखी नव्या शक्ती देतो. सध्या त्यांना नवीन शक्तींची गरज आहे."

स्मृतिका: "त्याच कारणास्तव आपण जाऊन त्यांना भेटून येऊ. सायलीने नुकतेच आपल्या अद्वितीय स्मरणशक्ती आणि ज्ञानाचा वापर करून एक प्राणी बनवला आहे आणि म्हणूनच आता तिला मी अजून एक शक्ती देणार आहे! तिने माझी आधी सुपर नेचर बेटावर असतांना सर्वांच्या नकळत आठवण काढली होती, मी तिला जाऊन भेटले होते आणि तिच्या मनातील एका प्रयोगाबद्दल तिने मला विचारले होते. पण तिला मी सांगितले होते की ती जेव्हा आपल्या शक्तीच्या आधारे खूप मोठी उपयुक्त निर्मिती करेल तेव्हा तिला अपेक्षित असलेल्या प्रयोगासाठी मी शक्ती देईन! आपल्या ग्रहावरचा नियम आहे त्याप्रमाणे आपण चालतो!"

रंगिनी: "ठीक आहे. सुनिलला पण मी एक नवी शक्ती देणार! पण ती हळूहळू विकसित होणार! त्यानेपण माझी आताच आठवण केली आहे!"

स्मृतिका: "हो! दोघांना आता गरज पण आहे आणि ते लायक पण झालेत त्या नव्या शक्ती घ्यायला! आणि ती वाईट टीम आता अवकाशात नवीन पृथ्वीसारखी प्रतिसृष्टी उभारणार आहे म्हणे, हे आपल्या सर्वांसाठी खूप धोकादायक आहे, त्यांना थांबवायला आपल्याला असे आणखी मिती जीव पृथ्वीवर वाढवावे लागतील!"

रंगिनी: "हो नक्की! आपण पृथ्वीवरच्या घडामोडींमध्ये थेट हस्तक्षेप करू शकत नाही म्हणून आपल्याला या मितीशक्ती जन्मापासून काही योग्य जीवांना द्याव्या लागतात!"

स्मृतिका: "हाडवैरी आणि निद्राजीता यांचं काय?"

रंगिनी: "माहीत नाही. त्यांच्या मिती जीव सध्या दुसऱ्या कामात बिझी आहेत! जातील त्या दोघीपण, वेळ आली की! नाहीतरी त्या दोघी आपल्याला विश्वासात घेतात कुठे?"

आकाशात दूरवर अनंत अंधारात पृथ्वीच्या दिशेने वेगाने दोन विविध रंगांत चमकणारे जेलीसारखे दोघींचे दोन बुडबुडे जातांना दिसत होते. मध्येच दोन चार धूमकेतू आणि उल्का वेगाने त्यांच्या मार्गात आल्या. दोन्ही जेलीबबल वेगाने त्यांच्यावर आपटता आपटता वाचले. कालांतराने दोघीजणी पृथ्वीवर पोहोचल्या. एक

मुंबईला तर दुसरी पुण्याला गेली. त्यांचे जेली बबल पृथ्वीच्या वातावरणाबाहेर थांबले होते.

मग रंगिनीने सुनिलला नवी शक्ती दिली ज्याद्वारे तो वातावरणातील कुठेही लपलेले साध्या डोळ्यांनी दिसू न शकणारे सूक्ष्म जीव बघू शकणार होता आणि त्यातही जे विघातक असतील त्यांच्या समोर त्याला लाल वर्तुळ दिसू शकणार होते. तसेच सुनिलला साध्या मानवी डोळ्यांनी दिसू न शकणाऱ्या अनेक सूक्ष्म गोष्टी दिसू शकणार होत्या. त्याच्यात ही शक्ती हळूहळू विकसित होणार होती.

परत जातांना रंगिनी म्हणाली, "म्हणजे सुनिल आता तुझे डिटेक्टिव्ह हे नाव आणखी सार्थ झाले. जसा एखादा डिटेक्टिव्ह भिंग किंवा मॅग्नीफायर ग्लास ने सूक्ष्म गोष्टी शोधतो तसेच तुझे डोळे भिंग बनले आहेत! एके ठिकाणी एकसारखे दोन मिनिटं बघायचे आणि बघतांना डोळे घड्याळाच्या काट्याच्या दिशेने गोल गोल फिरवत राहायचे म्हणजे पुढच्या मिनिटाला तुला तिथल्या सगळ्या सूक्ष्म सजीव निर्जीव गोष्टी दिसायला लागतील!!"

सायलीला मिळालेल्या एका नव्या शक्तीद्वारे तिने एक अद्भुत प्रयोग करायला सुरुवात केली होती!

इकडे रंगिनीला बाय केल्यावर सुनिलला दिसले की पुलाखाली पडलेला भुसनळ्या हत्ती पुन्हा उठून नदीच्या पात्रात चालू लागला. नदीला जास्त पाणी नव्हते. तेवढ्यात त्या नदीपात्रात त्या हत्तीच्या विरुद्ध दिशेने हत्तींचा एक कळप वेगाने भुसनळ्या हत्तीकडे येऊ लागला होता. सगळे हत्ती पुलाजवळ आले आणि एकमेकांच्या अंगावर चढले आणि त्यावरून चढून एकेक हत्ती पुलावर चढू लागला.

आकाशात वेगवेगळ्या उडणाऱ्या पक्षी आणि कीटकांची आधीच प्रचंड गर्दी झाली होती त्यामुळे अंधारून आलं होतं आणि लोक जमेल तिथे आश्रय घेऊन आपापली सुटका करण्यासाठी धडपड करू लागले. न्यूज चॅनेलचे वार्ताहर आणि कॅमेरामन जमेल तशी शूटिंग करून सगळे प्रसंग लाईव्ह देण्याची धडपड करू लागले.

आपल्या हॅटच्या सरकत्या दरवाज्यातून एकेक सूक्ष्म शस्त्र काढून त्यावर फुंकर मारून त्यांना सुनिल मूळ रुपात आणत होता आणि एकेका उडणाऱ्या पक्ष्यांवर फेकत होता.

खरे पक्षी मरू नयेत याची तो काळजी घेत होता. फक्त यांत्रिक आणि विघातक प्रवृत्ती असलेले मानवी पक्षी (लाल वर्तुळ ओळखून) यांनाच तो मारत होता.

पण सध्या जिथे उभा आहे तिथेच तो असे निगेटिव्ह वर्तुळवाले पक्षी ओळखू शकत होता. आपली दृष्टी दूर दुसरीकडे नेली तर तिथले दिसेल पण जिथे उभा आहे ते चुकेल आणि इतक्या दूर शस्त्र मारणे शक्य नव्हते.

आणि तेवढ्यात....

^^^

# 40. अपहरण

आणि तेवढ्यात बहिरी ससाण्यासारखे शरीर, सेल फिश या माशासारखी शेपटी, डाव्या आणि उजव्या बाजूला प्रत्येकी दोन वेगवेगळे प्रचंड मोठे पंख, चित्त्यासारखे चार पाय आणि चित्त्यासारखे तोंड पण त्याला ससाण्यासारखी चोच असा भव्य पक्षी प्रचंड वेगाने उडत उडत डिटेक्टिव्ह निगेटिव्हकडे आला आणि पुलावर येऊन त्याच्याजवळ विसावला.

"चला, डिटेक्टिव्हजी बसा माझ्यावर!", अँटिक्लिप म्हणाला.

"वाव यार! मी जशी अपेक्षा केली होती त्यापेक्षा कितीतरी पट तू चांगला आणि मजबूत आहेस!", सुनिलचा आनंद गगनात मावत नव्हता.

"सर, धन्यवाद! आता मी तयार आहे. सायलीचे पण धन्यवाद! तीच माझी निर्माती आहे!"

सुनिलने उडी मारली आणि तो अँटिक्लिपवर बसला.

हितेन यांच्या घरासमोर वर्तुळाकार सिक्युरिटी तैनात होती. आसपासच्या भागांतून कोणत्याच वाहनांना जाऊ येऊ दिले जात नव्हते. वायफायर, राऊटरन आणि हाडवैरी हे तिथेच ठाण मांडून

होते. सगळीकडे बंदुकधारी सुरक्षा रक्षक पहारा देत होते आणि इकडे हितेन अस्वस्थ होत होते. व्हायरसिक ने त्यांना लवकरच तुम्हाला घरातून बाहेर काढतो असे आश्वासन दिले होते. त्यांच्या घरावर आता अचानक घुबडांच्या घोळक्याने हल्ला केला. एरवी घुबड फक्त रात्री कार्यरत असतात पण इथे आलेले काही घुबड हे मानवी पेशीसमूहापासून बनलेले आणि काही यांत्रिक होते. त्या घुबडांच्या भीतीदायक डोळ्यांमुळे तिथे असलेल्या सर्वजणांची घाबरगुंडी उडाली, क्षणभर सुरक्षारक्षक पण गांगरले. पळापळ सुरू झाली. त्यात भर म्हणून तिथे असंख्य मधमाशा घोंघावत आल्या आणि तिथल्या माणसांना शरीराचा जोही भाग उघडा असेल तिथे घोळक्याने चावायला सुरुवात केली.

हाडवैरी, वायफायर, राऊटरन तिघांनी सगळ्यांना न घाबरण्याचे आवाहन केले. वेळ न दवडता तिघांनी त्या घुबडांशी लढायला सुरुवात केली. मधमाश्यांच्या घोळक्यांना हाडवैरीने हातात पकडून शॉक द्यायला सुरुवात केली. त्यामुळे मानवी आणि यांत्रिक दोन्ही मधमाश्यांचा अंत होत होता. हाडवैरीच्या लक्षात येत होते की ज्या पद्धतीने सात आठ घुबडांनी मिळून वायफायर, राऊटरन यांना अचानक घेरले आहे त्यानुसार हे निश्चित होते की त्या दोघांनी वाईट टीम सोडून स्वागत जॉईन केल्याचा राग येऊन

त्या दोघांचा खात्मा करण्याचा त्या मानवी घुबडांचा उद्देश दिसत होता आणि अर्थात गोंधळ माजवून त्या गडबडीत हितेनला किडनॅप करायचे हा मुख्य उद्देश होता. पण आजूबाजूला एकही वाहन येऊ शकत नव्हते तसेच आकाशातही काही दिसत नव्हते.

दोघांनी त्या घुबडांच्या घोळक्याला लाथा बुक्क्यांनी बुकलून काढले. ते घुबडं आणखी त्वेषाने त्या दोघांवर चालून आले. ते दोघे अतिशय सहनशील आणि चिवट होते. त्यांनी त्या घुबडांना खूप ठोसे लागावले. या झटापटीत दोघे बरेच जखमी झाले.

तेवढ्यात स्वागतचे हेलिकॉप्टर्स तिथे पोहोचले पण त्यांना लगेच या घुबडांवर आकाशातून जमिनीवर गोळीबार करता येत नव्हता कारण निरपराध माणसांना गोळी लागण्याची शक्यता होती. हाडवैरीने पण त्यांना गोळीबार करण्यास मनाई केली. त्यामुळे सर्व हेलिकॉप्टर्स सध्या फक्त एकंदरीत शहरातील परिस्थितीचा आढावा घेत होते. त्यात एका न्यूज चॅनेलच्या हेलिकॉप्टरलाही स्वतःच्या संपूर्ण जबाबदारीवर परवानगी देण्यात आली होती.

"अरे, किशोर आता मला असं वाटतंय तुझ्या ऐवजी मी असायला हवे होते या हेलिकॉप्टरमध्ये वार्तांकन करायला!"

"कशाला? मरायला? तू आपली तिथेच स्टुडिओमध्ये बरी आहेस अनघा!"

"पण मला तुझी काळजी वाटतीय रे किशोर! आपल्याला लवकरच लग्न करायचे ना?"

"अगं, साखरपुडा तर करूया आधी? तो राहिलाय ना?"

"राहिलाय रे राजा, पण मला आता वाटतंय ही पत्रकारितेची नोकरीच नको. हे असले महायुद्ध? नको रे बाबा! आपण दोघे मिळून ही नोकरी सोडून देऊ, लग्न करू आणि शांततेत दुसरा काहीतरी बिझनेस करू!"

"अगं काय हे अनघा? लोक ऐकताहेत आपलं बोलणं!मला तर उलट हे युद्ध बघून हुरूप येतोय!!"

चॅनेलचा हेड पुन्हा कॅमेरासमोर आला आणि अनघाला म्हणाला, "अनघा बेबी! या गोष्टी नंतर! आधी बातम्या दे. अगं फक्त आपल्याच चॅनलला हेलिकॉप्टरमधून शूटिंग करून वार्तांकन करण्याची परवानगी मिळाली आहे. तुम्ही एका ऐतिहासिक युद्धाचे साक्षीदार आहात याचा अभिमान बाळगा, नोकरी सोडण्याच्या कशा बाता करता? नीट बातम्या दे नाहीतर मी तुम्हा दोघांना आताच नोकरीवरून काढून टाकेल!!"

"बरं बरं सर! नक्की! तर आपण बघत आहात की पुणे मनपा जवळ डिटेक्टिव्ह निगेटिव्ह लढतोय तर गणेशखिंड रोडवर हाडवैरी लढतोय. मुंबईतील स्थितीबद्दल लवकरच आम्ही आपल्याला अपडेट करू!"

हितेन यांच्या घरासमोरच्या उंच बिल्डिंगवरील टेरेसवरून अचानक दोन बाईकस्वारांनी हवेत उडी मारली आणि ते थेट हितेन यांच्या घरासमोर चाललेल्या गोंधळाच्या ठिकाणी येऊन थांबले!! ते बाईकस्वार संपूर्ण काळे बुलेटप्रूफ जॅकेट आणि हेल्मेट घालून आले होते. तिथल्या गोंधळात प्रथम कुणालाच या बाईकसमोर आल्यावर काहीच उमगले नाही.

त्या बाईकस्वारांनी अंदाधुंद गोळीबार करायला सुरुवात केली. त्यात तीन सुरक्षा रक्षक मारले गेले. ते बाईक स्वार बाईकसह थेट घरात घुसले आणि त्यांनी दोघांनी मिळून हितेन यांना उचलले, एका बाईकवर मागे बसवले आणि दोन्ही बाईक परत घुं घुं आवाज करत घोंगावत बाहेर आल्या.

"खबरदार कुणी गोळी मारली तर! इथेच हितेन यांना आम्ही गोळी घालू. त्यांचा पेशीसमूह नाही मिळाला तरीही चालेल!"

असे म्हणून ते वेगाने जायला निघाले. एका दोघा सुरक्षारक्षकांनी त्या बाईकच्या टायरवर गोळी मारली पण त्या टायर्सवर गोळीचा काहीच परिणाम होत नव्हता.

स्वागतच्या स्पेशल फोनद्वारे हाडवैरी सुनिलशी संपर्क साधून होता.

सुनिल म्हणाला, "मी मुद्दाम न्यूज चॅनलला शूटिंगसाठी परवानगी दिली आहे. लाईव्ह न्यूज व्हायरसिक खंडाळ्याला त्याच्या गुहेत लाईव्ह बघत असेल. आपल्याला दोघा बाईक वाल्यांना खंडाळापर्यंत पोचू द्यायचं नाही आहे. पण हितेन त्यांना सामील आहे हे आपल्याला माहीत आहे हे पण वाईट टीमला कळू द्यायचं नाही आहे. नाहीतर तो काहीतरी दुसरा अनर्थ करेल. त्यामुळे आपण हितेनला वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहोत असेच कॅमेरात दिसले पाहिजे. आणि आपण वाईटला सामील आहोत असे हितेन पण दाखवणार नाही कारण त्याला माहिती आहे की न्यूज चॅनल शूटिंग करत आहेत. राऊटरन आणि वायफायर या दोघांना त्यांच्या मागे बाईकने पाठवा, बाईक चालवण्यात एक्सपर्ट आहेत ते!!"

असे म्हणून सुनिल हत्तींना मारायला एकेक शस्त्र हॅट मधून काढत होता आणि त्यांना जखमी करत होता. सुनिल अँटिक्लिप वर बसला होता. तो जमिनीपासून बराच वर होता आणि उडणारे आणि जमिनीवरचे अशा विविध प्राण्यांशी लाल वर्तुळ पाहून मारा करत होता म्हणजे एका ग्रुप मधला एक मानवी प्राणी किंवा पक्षी मेला की मोशन सेन्सरद्वारे त्यांना कॉपी करणारे यांत्रिक प्राणी पक्षी आपोआप नष्ट होऊन खाली पडून जात होते. दरम्यान आकाशात सुनिलला घेऊन उडत असलेल्या अँटिक्लिपच्या वरच्या बाजूला दोन ढग आले, म्हणून अँटिक्लिप आकाशात पंख फडकवत त्याच जागी स्थिर झाला. ढगांतून आवाज आला तेव्हा सुनिलने वर पाहिले.

"सुनिल, आम्ही आता इथेही आलोत, तिथे निद्राजीताला मदत करणे सुरूच आहे. आमच्यापैकी काहीजण आता ढग रूपाने वेगाने प्रवास करत पुण्याला आलो आहोत!", ढग रूपातील जलजीवा म्हणाला.

"वाह! ग्रेट. प्लिज इथे मदत करा. जमल्यास तिकडे हाडवैरीच्या मदतीला जा! आणि एक जण इथे पुण्यात आणि मुंबईत मी जिथे जिथे झाड मानव छोट्या स्वरूपात ठेवले आहेत,

त्यांच्यावर झिरकोडीयम वायू हवेतून फवारून त्यांना मूळ मोठ्या आकारात आणा."

थोडक्यात सुनिलने गणेशखिंड रोडवरील परिस्थिती समजावून सांगितली आणि ट्री मेनचे बोन्साय जिथे ठेवले होते ती ठिकाणं सांगितली. मग ढग रूपातले जलजीवा पाऊस रूपाने हत्तीच्या समोर पडू लागले आणि एकेक पावसाचा थेंब एकत्र येत येत त्याचा पाणी मानव तयार झाला आणि मग तापमान कमी होऊन ते मानव गोठले आणि बर्फ रुपातील जलजीवा तयार झाले. मग एकेक हत्तीच्या अवतीभोवती वाफ गुंडाळली जाऊन ती पटकन त्याचा बर्फ होऊन एकेक हत्ती बर्फात बंदिस्त होऊ लागला.

एका जलजीवाला सुनिलने हॅट मधून काढून झिरकोडीयम लिक्विड दिले. मग तो जलजीवा दोन्ही हात बर्फ़ाचे आणि उरलेले शरीर वाफेचे आशा स्वरूपात रूपांतरित झाला. बर्फाळ कडक हातात त्याने लिक्विड झिरकोडीयम धरून ठेवले आणि उरलेल्या शरीरातील वाफेद्वारे ठिकठिकाणी उडत जाऊन पाण्याच्या रुपात खाली पडतांना स्वतःमध्ये झिरकोडीयम मिक्स करून तो बोन्साय ट्रीमेनवर पाऊस रूपाने पडू लागला. मग तो पुन्हा संपूर्ण ढग होऊन वेगाने उडत मुंबईला गेला. तिथेही त्याने तेच केले. त्यामुळे सगळे

छोटे ट्रीमेन हळूहळू मूळ रुपात मोठे होऊ लागले. त्यांची मुळं ही पाय बनली तर फांद्या त्यांचे हात बनले. मग एकेक ट्रीमॅन एकेका मांजराला आपल्या फांद्यांच्यामध्ये गुंडाळून फेकू लागला. इकडे पुण्यात ट्रीमेन हत्तींना आपल्या फांद्यांममध्ये ओढून जखडून ठेऊ लागले. झाडांच्या पानांमध्ये उडणारे कीटक अडकू लागले.

"याला म्हणतात स्वागत टीमचा धमाका! लगे रहो झाड मानव!", सुनिल म्हणाला आणि तेवढ्यात त्याला निद्राजीताचा कॉल आला.

"अरे सुनिल, प्रॉब्लेम झालाय!"

"काय आता आणखी नवीन? ट्रीमेनची मदत होत नाही आहे का?"

"होतेय, त्यांची आणि जलजीवांची चांगली मदत होते आहे, पण या सर्व गोंधळात रजक हडपकर टेरेसवरून एका हॉट एयर बलून मध्ये बसून उडत निघालाय! त्याच्या सोबत बलून मध्ये दोन जण आहेत आणि त्यांनी अनाऊन्समेंट स्पीकरद्वारे आम्हाला सांगितले आहे की आम्ही यांना कीडनॅप करतोय! आम्हाला मारण्याचा किंवा आमचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला तर रजक यांना आम्ही गोळी मारू! आम्ही जमिनीवर कडक सुरक्षा

व्यवस्था ठेवली होती पण आम्हाला काय माहित की ते असे हॉट एयर बलून मधून येणार ते?"

"तो बलून आकाशातून घराकडे आला तेव्हा तुम्हाला दिसला का?"

"नाही. कदाचित जवळच्या एखाद्या दुसऱ्या बिल्डिंगमधून ते दोघेजण बलून मधून बसून अचानक रजक यांच्या टेरेसवर उतरले असावे! आता काय करायचं सुनिल?"

"इथेही हितेन यांचं अपहरण झालंय. टीममधील दोघांना मी त्यांच्या मागावर पाठवलं आहे! तू काळजी करू नको. आपल्याला माहीत आहे की ते रजकला काही करणार नाहीत पण आपल्याला रजकला खंडाळ्याला वाईटच्या गुहेत त्यांना पोहोचू द्यायचे नाही आहे! मी माझ्या दूरदृष्टीने अधूनमधून त्या बलूनचा पाठलाग करतो आणि ते काय चर्चा करतात ते ऐकण्याचा प्रयत्न करतो, तोपर्यंत तू प्राण्यांशी लढत रहा आणि सामान्य लोकांना वाचव!"

"ठीक आहे सुनिल!"

तेवढ्यात सुनिलला सायलीचा कॉल आला.

"प्रयोग यशस्वी झालाय, डियर! बिग सक्सेस!"

^^^

# 41. गीता आणि नीता

स्मृतिकाने दिलेल्या गीता आणि नीता या दोन्ही मेमरी डॉल्स म्हणजे स्मृती बाहुल्यांमध्ये सायलीने बराच वेळ तिथल्या कॉम्पुटर तज्ज्ञांच्या मदतीने प्रयोग केला. त्यांच्यात वेगवेगळया मानवी डेटाबेस संबंधित कमांड टाकल्या. तो प्रयोग यशस्वी झाल्याचे सुनिलला कळवले. त्या बाहुल्या केसांद्वारे माणसांच्या डोक्याला जोडून त्यांच्यातील ठराविक मेमरी किंवा संपूर्ण मेमरी विशिष्ट कमांड (आज्ञावली) देऊन काढून टाकू शकत होत्या.

पण स्मृतिकाने दिलेली आणखी ज्यादा शक्ती म्हणजे या बाहुल्यांमध्ये सायली स्वतःच्या मेंदूचे पूर्ण प्रतिरूप टाकू शकत होती आणि टेलिपॅथीने या सगळया बाहुल्या सायलीशी जोडलेल्या होत्या आणि ती सांगेल तशा आज्ञा पाळू शकत होत्या, तिच्याशी आणि एकमेकांशी मनातल्या मनात बोलू शकत होत्या आणि स्वयंचलित होत्या. त्या आकाशात उडू शकत होत्या. सायली मनातल्या मनात त्यांना मुंबईतील प्रयोगशाळेत बसून सूचना देऊ शकत होती. त्या बाहुल्या मिती ग्रहावरील विशिष्ट जेलीने बनलेल्या होत्या.

विविध जमिनीवरील आणि आकाशातील उडणाऱ्या प्राण्यांशी मारामारी करता करता फोनवर सुनिलने मग सायलीने सांगितल्यानुसार प्लॅन आखला. त्याने हितेनवाल्या दोन बाईकचा पाठलाग करणाऱ्या राऊटरन आणि वायफायर यांना कॉल करून सायलीच्या दोन मेमरी डॉल्सच्या प्रयोगाबद्दल थोडक्यात सांगितले आणि गीता बाहुली उडत उडत तिथे येईपर्यंत हितेनची बाईक दुसऱ्या बाईकपासून वेगळी होईल असे करायला सूचना दिली.

तसेच निद्राजीताला पण सायलीच्या प्रयोगाबद्दल थोडक्यात सांगून जलजीवांना हॉट एयर बलूनचा पाठलाग करून नीता बाहुली तिथे पोहोचेपर्यंत त्या तिघांना फक्त गोंधळात टाकायचे अशी सूचना दिली.

गीता नीता या दोन्ही मेमरी डॉल्स सायली बसलेल्या प्रयोगशाळेतील दरवाज्यांतून वेगाने उडाल्या. सुनिल दूरदृष्टीने वेळोवेळी हितेन आणि रजक कुठे पोचले हे सायलीला सांगत होता आणि ती या दोघी बाहुल्यांना मनातून सूचना देऊन सांगत होती!

त्यानुसार बाहुल्या आपापल्या अवकाश मार्गाने आपले टार्गेट शोधत निघाल्या.

सायलीचा हा नवा सरप्राईज प्रयोग नसता तर मग सगळ्यांना परिस्थिती वेगळ्या पद्धतीने हाताळावी लागली असती. पण आता या दोन्ही मेमरी डॉल्स मदतीला धावून आल्या होत्या.

नीता डॉल लवकरच बलूनच्या मागावर जाऊ लागली. तोपर्यंत एक ढग बलूनच्या मागे धावू लागला आणि वाफेचे रूपांतर डायरेक्ट बर्फात होऊन त्याचा बर्फाचा जलजीवा तयार झाला आणि तो त्या बलूनमधल्या रजकच्या अपहरणकर्त्यांना आव्हान देऊ लागला.

तिकडे राऊटरन आणि वायफायर वेगाने अजून पाठलाग करतच होते. राऊटरनने एकट्या बाईकवाल्याच्या अगदी जवळ जात बाईकवाल्याला आव्हान दिले. हितेनला घेऊन जाणारा बाईकवाला बराच पुढे निघून गेला होता. त्याने मागच्याला राऊटरन आणि वायफायर यांचा समाचार घेण्यास सांगितले होते.

"ए, फुकटच्च्या पेट्रोलवर गाडी चालवणाऱ्या हलकट माणसा!", राऊटरनने त्याला डिवचले.

"च्यायला, तुला हजार वेळा सांगितले की आमच्या मागे येऊ नको तरी येतोच आहेस. एकतर आमच्या टीम मधून त्या टीमला सामील झालास. पण माझ्याकडे वेळ नाही तुझ्याशी हुज्जत घालायला! लवकरच हे शहर आणि जग नष्ट होईल. मग बस बोंबलत स्वागत टीमसोबत!", तो चिडून म्हणाला आणि त्याने गोळीबार सुरू केला पण राऊटरनने गोळीबार शिताफीने चुकवला. त्याच्या बंदुकीच्या उरल्या सुरल्या गोळया मारून संपल्या.

"अरे पण विकत घेऊन पेट्रोल वापरला असता तर कळलं असतं पेट्रोलच्या किमती काय आहेत ते? फुकट्या नारोबा!"

आता तो पुढचा प्रचंड चिडला, "फुकट्या कोणाला म्हणतोस रे गधड्या! तुझ्या बापाला जाऊन मागत नाही मी पेट्रोल! थांब तुझा कायमचा बंदोबस्त करतो. आणि काय रे, साल्या, आतापर्यंत आमच्याच सोबत राहून फुकट पेट्रोल वर मजा मारली आणि आता आम्हालाच शाणपट्टी शिकवतो?", असे म्हणत त्याने गाडी थांबवली आणि रस्त्याच्या बाजूला लावली. आसपास 2/3 हेलिकॉप्टर्स घिरट्या घालत होती. त्यात न्यूज चॅनलचे पण हेलिकॉप्टर होते.

"तर अनघा अशा पद्धतीने त्याने त्या माणसाला आव्हान दिले आहे आणि आता लवकरच कळेल पुढे काय होते ते!"

"धन्यवाद किशोर! मी प्रेक्षकांना सांगू इच्छिते की आपण बघतच आहोत की कशा पद्धतीने स्वागत टीमने वाईट टीमला आव्हान दिले आणि कशा पद्धतीने आता ते फायटिंग करतील आणि अशा पद्धतीने आम्ही आमचा जीव धोक्यात घालून बातम्या तुमच्यापर्यंत पोचवत आहोत! तर अशा पद्धतीने आपण बघत आहात की..."

तिथला चॅनल हेड परत स्टुडिओमध्ये आला, "अग, अनघा!! कशा पद्धतीने आणि अशा पद्धतीने असे शब्दप्रयोग एकसारखे करू नकोस नाहीतर मी तुम्हाला अशा पद्धतीने नोकरीतून काढेल की तुम्हाला कळणारच नाही की कशा पद्धतीने काढले?"

जीभ चावून अनघा म्हणाली, "तर अशा पद्धतीने तुम्ही बघू शकता की कशा पद्धतीने मला कॅमेरा समोर नोकरी वरून काढण्याची धमकी दिली गेली आहे!!"

तो चॅनल हेड कपाळाला हात लाऊन जागेवर बसला आणि शेजारच्या पत्रकाराला म्हणाला, "अशा पद्धतीने मला मला आता कळून चुकले की कशाच पद्धतीने यांना मी सुधारू शकत नाही!"

सगळीकडे टिव्हीवर हेलिकप्टरमधून शूट केलेले लाईव्ह दिसत होते की खाली हायवेवर दोन प्रचंड बाहुबल असलेले दोन योद्धे एकमेकांवर मुष्टी प्रहार करत आहेत.

वायफायर पण तिथे येऊन थांबला.

राऊटरनने वायफायरला दोघांच्या मध्ये येऊ नको असे बजावले. राऊटरनने उलटी लाथ फिरवून त्या माणसाच्या चेहऱ्याला लागलेल्या हेल्मेटवर प्रहार केला तर त्या हेल्मेटचे दोन तुकडे झाले.

"च्यायला, या डिटेक्टिव्हने आमचीच माणसं आमच्या विरुद्ध उभी केली, सगळे डावपेच माहीत आहेत याला!"

लगेच वेळ न दवडता त्याने आणखी एक लाथ घुमवून त्याच्या मानेवर मारली. त्याला सावरायला वेळ न देता राऊटरन ने आणखी एक जोराचा मुष्टि प्रहार त्याच्या छातीवर केला आणि नंतर पुन्हा त्याच्या दोन्ही मांड्यांमध्ये खालून वर जोराचा प्रहार केला. तो कळवळला.

दुसरा बाईकवाला पुढे जाऊन थांबला आणि मागे वळून आपला साथीदार मार खातोय पाहून पुन्हा मागे वळला. तेवढ्यात दूरवर "गीता मेमरी डॉल" वेगाने उडत आली आणि अगदी हितेनच्या जवळ गाडीला समांतर उडत राहिली.

साधारण 13/14 वर्षाच्या मुली एवढी वाटणारी, सायली सारखी दिसणारी पण हिरवे रोखून पाहणारे डोळे असलेली, भुरभुर केस उडत असलेली ती लाल रंगाची बाहुली होती. तिने हितेन यांच्या डोळ्यात रोखून पाहिले, त्यांना हिप्नॉटाईज केले, तेवढ्या वेळात उडता उडता तिने स्वतःच्या हातानी आपले केस हितेन यांच्या डोक्याच्या केसांना जोडले. सायलीला हे कनेक्शन समजले. तिने प्रयोशाळेतून कॉम्प्युटर इंजिनिअरच्या मदतीने विशिष्ट कमांड रन केली (आज्ञावली कार्यरत केली). हितेनच्या डोक्यातील सगळे अणू शास्त्र संदर्भातील ज्ञान बाहुलीत ट्रान्सफर झाले आणि हितेनच्या मेंदूतून डिलीट झाले. मग हितेन संमोहन प्रभावातून जागा झाला. या सगळ्या कमांड सायलीने लगेच पाठ करून टाकल्या.

हितेनला नेमके काय झाले ते कळलेच नाही. पण डोक्यात काहीतरी गडबड झाली आहे असे मात्र त्याला राहून राहून वाटत होते. हितेनच्या बाईकवाल्याने हे पाहून त्या बाहुलीवर गोळी झाडली तेव्हा त्या बाहुलीचे हवेतच आपोआप जेली स्वरूपात अनेक तुकडे तुकडे झाले आणि गोळी तिला लागलीच नाही आणि बाहुली पुन्हा आपोआप जोडली गेली. त्याने परत गोळ्या झाडल्या पण, बाहुली तोपर्यंत उडत दूर निघून गेली आणि गोळ्या चुकवण्यासाठी तुकडे होऊन पुन्हा जोडली गेली. आता ती सुरक्षितपणे मुंबईकडे प्रयोगशाळेच्या दिशेने निघाली.

ही बातमी सायलीने सुनिलला आणि सुनिलने राऊटरन आणि वायफायरला सांगितली. तोपर्यंत राऊटरनच्या ताब्यात असलेला माणूस मारला गेला होता.

त्या बाईक स्वाराने आता धमकी दिली, "जर आमचा कुणी पाठलाग केला तर मी हितेन यांना गोळी घालेन!"

सगळीकडे हेलिकॉप्टरमधून व्हीडिओ शूटिंग सुरू होती त्यामुळे हितेनला वाचवायचे होते. दुनियेच्या नजरेत हितेन, रजक हे चांगले व्यक्ती होते. नंतर राऊटरन आणि वायफायर सुनिलच्या सांगण्यावरून तिथून उलट दिशेने जायला निघाले कारण नाहीतरी आता हितेन व्हायरसिकच्या काहीच कामाचा राहिला नव्हता, पण हे व्हायरसिकला अजून अर्थातच माहीत नव्हते कारण त्या बाहुलीने नेमके काय केले हे कुणालाही कळले नव्हते. मग आपल्या साथीदाराला रस्त्यावर सोडून हितेनला घेऊन एकटा बाईकस्वार खंडाळ्याला निघाला.

इकडे मुंबईत बर्फाच्या जलजीवाने बलूनमध्ये मारामारी सुरू केली. त्या दोघांच्या बंदुकीतून गोळ्या आल्या की जलजीवाच्या बर्फाचे तुकडे होत होते आणि ते तुकडे जमिनीवर पडण्याच्या आधीच हवेतच एकमेकांकडे आकर्षले जाऊन एकत्र येऊन

पाण्यात रुपांतरीत होत होते आणि पुन्हा वाफ होऊन वर येऊन बर्फ बनून हॉट एयर बलूनवर हल्ला करत होते. त्यामुळे बलून मधल्या दोन्ही माणसांच्या बंदुकीच्या गोळ्या संपल्या. तोपर्यंत नीता बाहुलीने रजक डॉक्टरांच्या डोक्यातील माहिती डिलीट करून ती स्वतःमध्ये ट्रान्सफर करून सायलीकडे मार्गस्थ झाली. काम झाल्यावर जलजीवांनी बलूनला मुद्दाम आपल्या मार्गी जाऊ दिले आणि ते निद्राजीताला मदत करायला गेले.

टीव्हीवर वार्ताहर सांगू लागले, "हे स्वागतवाले स्वतःला समजतात तरी काय? छोट्या दोन उडणाऱ्या बाहुल्यांना पण लढायला बोलावलं होतं! यांचं काही कळत नाही!"

व्हायरसिक पण आपल्या गुहेत बसून मास्क काढून खदाखदा हसत होता. त्याचे इतर साथीदार आणि ताकामीशी मांजर पण खुदकन हसत होतं.

^^^

# 42. महायुद्ध

राऊटरन आणि वायफायर सुनिलकडे परत आले. इतर सगळे हेलिकॉप्टर्स तिथून परत पुणे शहराकडे  घेण्याचे आदेश सुनिलने दिले. हाडवैरी पण पुन्हा शहरात आला. कारण वेगवेगळे प्राणी ठिकठिकाणी हल्ला करतच होते.

ज्या फॉर्म्युल्यासाठी व्हायरसिक हा हितेन आणि रजक यांच्यावर अवलंबून होता तो फॉर्म्युला आता ते दोघे बाहुल्यांमुळे विसरले होते. हे कळेल तेव्हा व्हायरसिकचे धाबे दणाणेल आणि प्रतिसृष्टी आकाशात राहील आणि वाईट टीम पृथ्वीवर राहील, असे होईल. वाईट टीम आणि इतर लोक प्रतिसृष्टीत जाऊच शकणार नाहीत आणि मग इसरो आणि नासाच्या मदतीने वाईट टीमने तयार केलेली प्रतिसृष्टी नष्ट करण्याचा प्लॅन करता येईल.

त्यामुळे गुहेत जाऊन वाईट टीमला पकडण्याचा प्लॅन करण्याआधी निष्पाप नागरिकांना प्राण्यांच्या हल्ल्यापासून वाचवणे हे आता मोठे आव्हान होते. कारण गुहेच्या आसपास अदृश्य स्तंभात अजून काही तशी हालचाल दिसत नव्हती.

डायरेक्ट गुहेत हल्ला केला तर ती टीम आणखी वेगळ्या टेक्नॉलॉजीने हल्ला करण्याची शक्यता होती.

त्या हल्लेखोर प्राण्यांचा पाडाव करण्यात यश आलं की मग लवकरच खंडाळ्याला दूरदृष्टीने जाऊन त्या टीमला पकडता येणार होतं. सुनिल लढण्यात बिझी असल्याने इच्छा असूनही तो सध्या खंडाळ्याला गुहेत काय घडते आहे हे पाहू शकला नाही कारण आज सामान्य नागरिकांना त्याची गरज होती. तिकडे मुंबईत निद्राजीता आणि सारंग परिस्थिती सांभाळत होते.

इकडे आधी हितेन आणि त्यांच्यानंतर हॉट एयर बलून मधून आलेला डॉक्टर रजक हे दोघे आणि त्यांना घेऊन आलेल्या चौघांपैकी तिघे असे सर्वजण खंडाळ्याच्या गुहेत अदृश्य स्तंभातून आतमध्ये शिरले.

व्हायरसिकने त्यांना गुहेतील भव्य तळघरातील प्रयोगशाळेत नेले. तिथे अनेक स्क्रिन्स भिंतीवर लावलेल्या होत्या. समोर वेगवेगळे बटणं आणि पॅनेल्स होते. खूप मोठी सुसज्ज अशी प्रयोगशाळा होती. अवकाशात जाण्यास तयार असलेले चार भव्य यान तिथे तयार होते. तळघरातील एका भव्य पण अंधाऱ्या खोलीत

प्रतिसृष्टीत जाण्यासाठी तयार असलेले लोक व्हायरसिकने ठेवलेले किंवा डांबून ठेवले होते असे म्हणण्यास हरकत नव्हती. तो भाग तुरुंगासारखाच वाटत होता. सगळ्या देशांतील लोक तिथे होते. काही लोक चिंतेत उभे होते, काही बसून होते. काही येरझारा घालत होते. काही स्त्रिया आणि लहान मुलेही त्यात सामील होती. त्यांना एका स्वर्गीय अद्भुत जगात जाण्याचे आमिष व्हायरसिकने दाखवले होते पण प्रत्यक्षात त्या सगळ्यांना तो गुलाम म्हणून तिथे घेऊन जाणार होता.

या सगळ्या लोकांना गुहेत आल्यानंतर काही दिवसांनी हे सगळे समजले पण तोपर्यंत उशीर झाला होता. त्याने या सगळ्यांवर वेगवेगळे प्रयोग करायला सुरुवात केली होती. काहींना त्याने पेशीसमूहात रुपांतरीत केले होते. जे जिवंत होते ते जणू भाव भावना नसलेले चालते बोलते रोबोट किंवा प्रेतासारखे बनलेले होते. त्या सगळ्यांच्या हालचाली नैसर्गिक वाटत नव्हत्या.

आणखी एका रूम मध्ये वेगवेगळे रोबोट्स येरझारा घालत होते आणि एका रूममध्ये विविध हिंस्र प्राणी वेगवेगळे आवाज काढत इकडे तिकडे फिरत होते. या सगळ्या रूम्सवर ताकामीशी

लक्ष ठेऊन होता. व्हायरसिक त्याला हवे तसे राबवून घ्यायचा. तसेच इतर ठिकाणी त्याचे साथीदार सगळी कामं बघत होते.

प्रयोगशाळेत -

"हितेन, रजक! चला आता आकाशातील आपल्या नव्या जगात जायची वेळ झाली आहे. जास्त वेळ दवडून चालणार नाही. टाका तुमचा तो फिजिक्सचा फॉर्म्युला!"

हितेन त्या विविध बटनांच्या पॅनेलजवळ आला, एक खुर्ची त्याने ओढली आणि बसला. तो आठवण्याचा प्रयत्न करू लागला पण त्याला तो फॉर्म्युला आठवतच नव्हता!

त्याचा चेहरा बघण्यासारखा झाला. चेहऱ्यावरचा रंग उडाला. चेहरा घामाने डबडबला. मनातून त्याला थोडी शंका होतीच की बाईकवर असतांना हिरव्या डोळयांनी संमोहित करून त्या बाहुल्यांनी आपल्या डोक्यात काहीतरी गडबड केली ज्यामुळे आपल्याला तो फॉर्म्युला आठवत नाही आहे, पण हे तो व्हायरसिकला सांगू शकत नव्हता. त्याने हितेनला वेड्यात काढले असते.

"काय झालं हितेन? चेहऱ्यावर बारा का वाजले? आठवत नाही का फॉर्म्युला?"

हितेन त त फ फ होऊन म्हणाला, "न न न नाही म्ह म्ह म्हणजे हो हो, घरातून निघेपर्यंत आठवत होता, पण आता  आ आ आ आठवत ना ना नाही हो..!"

"येडा बनवतो का मला? फॉर्म्युला न आठवल्याचं नाटक करून तुझा काहीतरी प्लॅन दिसतोय. पोलिसांना, सरकारला आणि स्वागत टीमला तर सामील नाही ना झालास?"

रजक डॉक्टरला पण बाहुलीबद्दल तसा संशय आला होता आणि त्याने पण त्याच्या लिक्विडबद्दल माहिती मनातल्या मनात आठवून बघण्याचा प्रयत्न केला पण त्यालाही काही आठवत नव्हते.

रजक घाबरत म्हणाला, "म मला वाटते बॉस त्या बाहुलीत काहीतरी गडबड होती, संमोहन शक्ती होती! मलाही माझा फॉर्म्युला आठवत नाहीये!"

व्हायरसिकने चार पाच वेळा समोरच्या पॅनेलवर हात आपटला आणि तो जोरजोरात हसायला लागला.

"मेरी बिल्ली और मुझसेही म्यांव? पानी मे रहकर मछली से बैर? कोणत्यातरी फडतूस स्वागत टीमने पाठवलेल्या बाहुल्यांना

दोष देता आणि स्वतःचा कृतघ्नपणा झाकता? नालायक हरामखोर साले, दोघेच्या दोघे! पण माझी खरी बिल्ली ताकामीशी मला कधीच म्यांव करत नाही, माझे मानवी मेंदू असलेले मासे पण माझ्याशी वैर धरत नाहीत, पण तुम्ही दोघे पडले शेवटी माणसंच! तेही पृथ्वीवरचे! तेही आजच्या युगातले! म्हणून धोकेबाज असणारच!"

दोघेजण घाबरले. थरथर कापू लागले.

पुढे व्हायरसिक म्हणाला, "हे बघा!! आता जास्त झालं. पण तुम्हाला काय वाटलं की तुम्ही मुद्दाम टाईमपास कराल, मला गुंतवून ठेवाल आणि तोपर्यंत बाहेरून येऊन ते लोक गुहेला वेढा घालून मला पकडतील? नो नो नो!"

दोघेजण पाया पडू लागले.

"अहो, नाही. आम्ही तुमच्याशी प्रामाणिक आहोत. आम्हाला खरंच काही आठवत नाही!"

"बास झाली तुमची नाटकं! आणि तुम्हाला काय वाटलं की माझ्याकडे प्लॅन B नाही? आहे! गेले आठ दिवस तुमच्या दोघांच्या घरात आमचे यांत्रिक भुंगे हेरगिरी करून सगळी तुमच्या फॉर्म्युल्याची माहिती गोळा करत होते. आतापर्यंत तुम्ही गुप्तपणे आम्हाला खूप मदत केली आहे म्हणून तुमचा मान राखला आणि

आमच्या प्रतिसृष्टीत तुम्हाला स्थान द्यायचे मी ठरवले पण तुम्ही मलाच धोका दिला? त्या भुंग्याद्वारे मिळालेल्या माहितीचे माझे प्रयोगशाळेतील इतर तज्ञ विश्लेषण करत आहेत. ते पूर्ण झाले की आम्ही इथून छू मंतर!! पण त्या आधी मला एक काम करायचे आहे!"

असे म्हणून त्याने एका मजबूत रोबोटला बोलावले आणि कंट्रोल पॅनेलवर एक कमांड दिली. तो रोबोट दाण दाण पाय आपटत हितेन आणि रजक यांचेकडे येऊ लागला.

"नका हो आम्हाला नका मारू!", ते दोघे रडू लागले.

व्हायरसिक मोठमोठ्याने हसत होता.

"आता एकदा का फॉर्म्युला मिळाला की वेळ न दवडता मला सगळे यान कार्यरत करून प्रतिसृष्टीकडे प्रस्थान करायचे आणि "बिग कोलॅप्स निगेटिव्ह कण" स्फोटाद्वारे सोडायचे म्हणजे ही गुहा ब्लॅक होल होईल आणि सगळं यात ओढलं जाऊन नष्ट होईल!"

रोबोट त्या दोघांना दोन्ही हातांनी उचलून चालू लागला. तो रोबोट त्यांना एका गरम गॅसच्या चेंबर मध्ये फेकणार एवढ्यात-

"थांबा थांबा! त्या भुंग्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आम्ही पुन्हा फॉर्म्युला बनवण्यासाठी प्रयत्न करतो! आम्हाला मारू नका, एक संधी द्या!

"दिली! रोबोट, सोडून ये रे दोघांना त्या प्रयोगशाळेत!", जवळच्या टेबलावर चार पाच वेळा हात आपटत व्हायरसिक म्हणाला आणि वेड्यासारखे हातवारे करत हसायला लागला. धक्क्याने टेबलावरचे दोन चार उपकरण खाली पडले.

मग हितेन आणि रजक पुन्हा स्वतःचेच फॉर्म्युले पुन्हा शोधण्यासाठी इतरांसोबत कामाला लागले.

तोपर्यंत व्हायरसिक आणि नेटवर्किता टीव्हीवरचे मुंबई पुण्यातील लाईव्ह प्रक्षेपण बघू लागले.

तो नेटवर्किताला म्हणाला, "दोन्ही शहरातल्या आपल्या टीमला सूचना दे. आणखी प्राणी सोडा स्वागत टीमवर. आपला स्पेशल रोबोट ॲक्टिव्हेट करा आणि सोडा त्यांच्यावर! नष्ट करून टाका त्यांना. नष्ट करा दोन्ही शहरातील नागरिकांना!!"

नेटवर्किता म्हणाली, "जशी आपली आज्ञा बॉस!"

तिचे नाव उगाचच नेटवर्किता नव्हतं. तिने वाईट टीमचं अनेक शहरांत चांगलं जाळं (नेटवर्क) निर्माण केलं होतं.

दरम्यान नासा आणि इसरो यांनी आपल्या वेगवेगळ्या सॅटेलाईट्स, दुर्बिणी आणि स्काय लॅब्सच्या आधारे अवकाशात

एके ठिकणी एक ज्यादा ग्रह शोधून काढला जो अगदी पृथ्वीसारखाच दिसत होता, त्याच्या भोवती एक चंद्रासारखाच दिसणारा ग्रह फिरत होता पण त्यांची फिरण्याची गती कधी कमी कधी जास्त होत होती. आणखी शनी सारखा दिसणारा एक ग्रह हळूहळू तयार होत होता. म्हणजे गोल ग्रह तयार होता पण त्या भोवती एक निळे कडे हळूहळू निर्माण होत होते. हे सगळे स्वागत टीम आणि भारतातील आणि भारताच्या मित्र देशांतील महत्वाच्या व्यक्तींना आणि संस्थांनाच फक्त कळवण्यात आले होते. त्या ठिकाणी एक वेगळेच चुंबकीय क्षेत्र तयार होत होते. हे नवे निर्माण होत असलेले ग्रह नष्ट करणे भाग होते.

सुनिल भारताच्या पंतप्रधान आणि राष्ट्रपती तसेच तिन्ही लष्कराच्या प्रमुखांशी संपर्क साधून होता. त्यांच्याकडून स्वागत टीमला संपूर्ण मदतीचे आश्वासन मिळाले होते. तसेच इसरोने आणि नासाने मिळून भारतातील सर्व महत्वाच्या राजकिय आणि विज्ञान क्षेत्रातील व्यक्ती यांना विश्वासात घेऊन एक प्लॅन आखला त्यानुसार एक रॉकेट इसरोच्या प्रक्षेपण केंद्रातून लाँच करून व्हायरसिक बनवत असलेली प्रतिसृष्टी नष्ट करता येणार होती. त्यासाठी युद्धपातळीवर तिथले शास्त्रज्ञ काम करायला लागले. वेळ

कमी होता, त्यामुळे आधीच इतर कामासाठी तयार असलेले रॉकेट्स या कामासाठी थोडा बदल करून वापरायचे ठरले.

जिथे शक्य होते तिथे आर्मीचे हेलिकॉप्टर्स आणि राष्ट्रीय सुरक्षा दलाचे जवान मुंबई पुण्यात येऊन सामान्य नागरिकांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत होते पण जिथे सामान्य माणसाची ताकद कमी पडत होती तिथे सुपर पॉवर असलेल्या स्वागतच्या सुपरहिरों शिवाय पर्याय नव्हता.

मुंबई पुण्यात अनेक महत्त्वाच्या ठिकाणी आता वेगवेगळ्या यांत्रिक आणि मानवी प्राण्यांचा आणखी हल्ला झाला. सुनिलने यांत्रिक प्राणी ओळखले की त्यांच्यावर लष्करी आणि स्वागतच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने गोळीबार करता येत होता. त्यासाठी सुनिल आपल्या अँटिक्लिपवर बसून उडत उडत खूप उंचावर गेला आणि तिथून वेगवेगळ्या ठिकाणी जिथे प्राण्यांचा हल्ला झाला तिथे दृष्टीने जवळ जाऊन लाल वर्तुळातील मानवी प्राणी ओळखून हॅट मधून आपले सूक्ष्म शस्त्र काढून मोठे करून ते शस्त्र त्यांच्यावर फेकून त्यांना मारत होता. ते मेले की त्यांना फॉलो करणारे इतर यांत्रिक प्राणी पण निष्प्रभ होत होते, मग लष्कर हेलिकॉप्टरमधून

त्यांच्यावर स्फोटकं टाकून त्यांना नष्ट करत होते. सुनिलजवळच्या शस्त्राने जे मानवी प्राणी मरत नव्हते त्यांना मारण्यासाठी सुनिल फोनद्वारे इतर स्वागत मेम्बर्सला सूचना द्यायचा आणि मग ते झाड मानव आणि जलजीवा यांच्या मदतीने त्यांचा खात्मा करत होते.

बहुतेक यांत्रिक प्राणी शॉक देऊन देऊन त्यांच्यातले सर्किट जाळून हाडवैरीने नष्ट केले. निद्राजीताला नरिमन पॉईंटवरील सत्तर टक्के मांजर आणि बोक्यांना मारण्यात यश आले होते. मदतीला आणखी बरेच जलजीवा अरबी समुद्रातून लाटांच्या स्वरूपात शहरात येत होते. पुण्यात मुळा मुठा नदीत पण बरेच जलजीवा शिरले होते. काही जलजीवा ढगांच्या रुपात येऊन आपले काम साध्य करत होते. आधी सुनिलच्या डोक्यात विचार आला की खरे कुत्रे या मानवी मांजरांवर सोडले तर? पण प्राणीमित्र संघटनानी त्याला परवानगी दिली नाही. निरपराध प्राण्यांना या युद्धात मुद्दाम सामील करून त्यांचा बळी देऊन मानवांनी जगणे स्वार्थीपणा झाला असता. प्राणी मित्र संघटना त्यांच्या दृष्टीने बरोबरच होत्या. मुंबईतील लोकल ट्रेन्स आणि बेस्ट बस वर वटवाघळे हल्ला करू लागली. त्यांच्याशीही सारंग आणि निद्राजीता जमेल तसे लढू लागले.

इकडे पुण्यात मनपा भवन जवळचा जग्गू भुसनळ्या हत्ती खूप चिवट होता. तो मरत नव्हता. सुनिलने त्याच्याजवळ उडत उडत अँटिक्लिपला नेले. अँटिक्लिपमध्ये दोन मानवी मेंदू पैकी एक असलेला पप्पू भुसनळ्या त्याला म्हणाला," भावा! सोडून दे ही वाईट कामं! स्वागत टीमला सामील हो!"

"नाही, लहानपणापासून या जगाने मला काय दिलं? तुला काय दिलं? मला एकही ठिकाणी धड नोकरी मिळाली नाही. आपण गरीब होतो. गरीब लोकांना कुणीही वाली नाही. आठवत नाही दादा तुला आपण कसे दिवस काढले? शेवटी या गुन्हेगार लोकांनीच आपल्याला काम दिलं, रोजी रोटी दिली. तू कारखान्यात काम करत होतास पण ते पैसे पुरत होते का आपल्या आजारी आई वडीलांच्या ऑपरेशनच्या खर्चासाठी?", हत्तीमधला जग्गू म्हणाला.

"हो रे, आठवतं! पण याचा अर्थ सगळं जग वाईट आहे असा नाही. आपल्यासोबत वाईट घडलं म्हणून आपल्याला आवडलं नाही आणि मग पुन्हा आपणही त्यामुळे वाईट बनून इतर निष्पाप आणि निरपराध लोकांना त्रास देऊन त्यांच्या सोबत पण वाईट करायचं? याला काय अर्थ आहे? मी बदललो, तसा तूही बदल कर स्वतःच्या दृष्टीकोनात!!", अँटिक्लिपमधला पप्पू म्हणाला.

"तुमच्या आई वडिलांची जबाबदारी यापुढे स्वागत टीम घेईल. सोड हे सगळं आणि सामील हो आम्हाला!"

बराच वेळ चर्चा होऊन आढेवेढे घेत शेवटी जग्गू तयार झाला. आता हाच हत्ती आपल्या इतर साथीदारांवर तुटून पडला आणि त्यांना मारू लागला. वाईट टीमचे सगळे मानवी आणि यांत्रिक हत्ती जग्गू हत्तीने सोंडेत धरून आपटले आणि नदीत फेकले. नदीत अनेक जलजीवांनी त्यांना बर्फात गोठवले.

सुनिलने वेळ मिळताच दृष्टी गुहेत नेली, सगळीकडे काय काय चालले आहे ते पहिले आणि चिडलेला व्हायरसिक बघितला. तो हितेन आणि रजक यांना म्हणत होता, "विसरलेला फॉर्म्युला लवकर शोधा नाहीतर तुमचा थेट वर जाण्याचा फॉर्म्युला मी बनवून ठेवला आहे!"

गुहेचे लोकेशन सुनिलला कळल्यामुळे हेलिकॉप्टरमधून सरळ त्या गुहेवर बॉम्ब टाकता आला असता पण तिथे असलेल्या व्हायरसिकने फसवून डांबून ठेवलेल्या अनेक लोकांची सुटका करणे आवश्यक होते. त्यासाठी काय करता येईल, गुहेत कसे जाता येईल याचा सुनिल विचार करु लागला तेवढ्यात त्याच्यावर हल्ला झाला म्हणून त्याने परत लढायला सुरुवात केली. नंतर सायलीला

फोन करून त्याला एक शक्यता पडताळून बघायची होती की आणखी जर का काही नवीन बाहुल्या तयार करता आल्या तर त्यांच्या मदतीने मानवी प्राण्यांची सगळी मेमरी डिलीट केली तर ते आपोआपच लढायचे विसरून जातील. त्याने सायलीला बराच वेळ फोन केला पण तिचा रिस्पॉन्स आला नाही...

कारण तीची मेमरी फुल झाल्याने मेंदू हँग होऊन ती मुंबईतील प्रयोशाळेतच बेशुद्ध पडली होती. डॉक्टर राजमे यांनाही कळत नव्हते की ही अचानक बेशुद्ध का झाली?

अँटिक्लिपवर बसल्या बसल्या सुनिलने दृष्टी मुंबईतील प्रयोग शाळेत नेण्यास सुरुवात केली व अर्ध्या वाटेवर असतांनाच त्याच्यावर समोरून कुणीतरी प्रखर लेसर सदृश्य वेगळीच किरणे सोडली आणि डोळ्यासमोर अंधारून आले. डोळ्यांनी ते किरण सोडणारा तो एक भव्य रोबोट होता. बाजूच्या एका वाईट टीमच्या घरातून त्याचे पार्ट जोडून त्याला तयार केले गेले होते. नेटवर्किताच्या सांगण्यावरून हा रोबोट तयार करण्यात आला होता. त्याने वेगाने सुनिलला धक्का मारून अँटिक्लिप वरून खाली फेकले. खाली पडतांना सुनिलला तो रोबोट अंधुकपणे दिसला होता.

सुनिल खाली पडल्याचे लक्षात येताच हाडवैरी तिकडे पळाला आणि सुनिलने त्याला लेसर किरणांच्या माऱ्यामुळे दिसत नसल्याचे सांगितले. तेवढ्यात अँटिक्लिप म्हणाला, "काळजी करू नका सुनिल. मी आहे ना! मी तुमची दृष्टी बनतो! तुम्ही माझ्यावर बसा!"

सुनिल अँटिक्लिपवर बसला आणि हाडवैरीला म्हणाला, "तू त्या रोबोटला निकामी कर! मी ठीक आहे!"

सुनिलने स्फटिकला स्पर्श करून रंगिनीशी मनातल्या मनात संवाद साधला. तिने सांगितले की जवळपास अर्धा एक तास या किरणांचा प्रभाव राहील आणि तुझी दृष्टी पूर्ववत होईल, तोपर्यंत आवाज आणि वास यांच्या आधारे तू निगेटिव्ह गोष्टी ओळखण्याचे काम कर!"

मग सायलीच्या मेंदूची मेमरी फुल झाल्याने ती बेशुद्ध आहे हे सुनिलला तेव्हा समजले, जेव्हा त्याच्या कम्युनिकेशन डिव्हाईसच्या साध्या मोबाईल मोडवरून त्याने डॉक्टर राजमे यांना फोन केला. मग त्याने रंगिनीशी पुन्हा संवाद साधून सायलीबद्दल स्मृतिकाला सांगायला सांगितले.

खूप गर्दीपासून दूर एके ठिकाणी खूप उंचावर अँटिक्लिप सुनिलला घेऊन गेला आणि तिथे आकाशात स्थिर राहिला. दोन जलजीवा त्याच्या संरक्षणार्थ आजूबाजूला ढगांच्या रुपात फिरत राहिले. पण वातावरणात इतक्या ठिकाणी निगेटिव्हीटी होती की सगळे आवाज आणि वास मिक्स होत होते. त्यामुळे आता दृष्टी परत येईपर्यंत काही न करता एके ठिकाणी शांतपणे वाट बघायचे ठरले. अँटिक्लिप पंख फडकवत हवेत उंचावर स्थिर राहिला आणि सुनिलला खाली चाललेले युद्धाचे वर्णन करून सांगू लागला. उडण्याचा वेग खूप असल्याने कधी पुण्यातील एका ठिकाणी तर कधी दुसऱ्या तर काही वेळानंतर मुंबईत असा अँटिक्लिप उडत राहिला आणि सुनिलला वर्णन सांगत राहिला.

"सगळीकडे धुरळा उडतोय. दृष्यमानता कमी झाली आहे. हे सगळे टीव्हीवर लाईव्ह बघून सहसा सामान्य नागरिक घरातच बसून आहेत पण अत्यावश्यक कामासाठी जे सकाळपासून आधीच बाहेर पडले होते ते या सर्व प्राण्यांच्या हल्ल्यांची शिकार झाले आहेत"

"आपले स्वागत फायटर्स ठिकठिकाणी ह्या प्राण्यांचा हल्ला परतवून लावत आहेत. जग्गू हत्ती सुद्धा इतर प्राणी आणि हत्तींना मारण्यात मदत करत आहे. इतर हत्ती ताकदीने स्वतः भोवतीचे

बर्फाचे आवरण फोडून टाकत आहेत पण जग्गू त्यांना सोंडेने उचलून वेगाने जलजीवांकडे फेकत आहे आणि जलजीवा पुन्हा त्यांना बर्फात बंद करत आहेत."

"लोकल ट्रेन्स आणि बेस्ट बसेसवर वटवाघूळ हल्ला करत आहेत आणि ट्रीमेन, जलजीवा, सारंग, इतर स्वागत फायटर्स तो हल्ला परतवून लावण्याचे प्रयत्न करत आहेत. सध्या बऱ्याच लोकल ट्रेन्सच्या डब्यांवर बर्फमानव रूपातले जलजीवा उभे आहेत. लोकल पुलाखालून गेली की ते वाफ बनून पुन्हा अडथळे दूर झाले की पुन्हा बर्फ बनून वटवाघूळांना बर्फात बंदिस्त करून ठेवत आहेत. निद्राजीता पण लोकल डब्यांमध्ये घुसून तिथे गर्दीत घुसलेल्या वटवाघूळांना लोकलच्या दरवाज्यातून बाहेर रुळांवर फेकते आहे."

"इकडे पुण्यात हाडवैरी रोबोटशी लढतोय. त्या रोबोटच्या डोळ्यातील किरण टाळण्यासाठी त्याच्या डोळयात सरळ न बघता तो त्या रोबोटशी लढतो आहे. एरवी या रोबोटशी कुणीच लढू शकले नसते कारण रोबोटला ज्याचाही स्पर्श होतोय तो शॉक लागून मरतोय पण आपला हाडवैरी शॉक प्रूफ असल्याने फक्त तोच रोबोटशी लढू शकतोय!"

"हाडवैरीने आता रोबोटचा पाय धरून त्याला दोन्ही हातांनी उचलले आणि घोळक्याने हल्ला करणाऱ्या अनेक वाईट

प्राण्यांच्या अंगावर भिरकावले त्यामुळे त्यातील मानवी प्राणी शॉक लागून मेले आणि यांत्रिक प्राणी तुकडे होऊन नष्ट झाले. हाडवैरी आता रोबोटला उचलून कुठेतरी घेऊन चालला आहे. जाता जाता सगळ्या प्राण्यांना तो रोबोटचा स्पर्श करत करत चालला आहे. ओह! मला वाटते तो त्याला विजेच्या ट्रान्सफॉर्मर जवळ घेऊन जातोय. अरे! वा, हाडवैरीने त्या बावळट रोबोटला ट्रान्सफॉर्मरला चिकटवले आणि आता शॉक लागून रोबोटचे पार्ट पार्ट वेगळे होत आहेत. तो रोबोट फुटला आहे आता!"

"मेलेल्या या सगळ्या प्राण्यांचा कचरा आपल्या फांद्यांमध्ये उचलून त्या फांद्या लांब करून करून आपले अनेक झाड मानव तो कचरा महापालिकेने ठिकठिकाणी ठेवलेल्या कचरा गाड्यांमध्ये टाकत आहेत!"

सुनिलला आपल्या डोळ्यांचे कधी नव्हे एवढे महत्व आता जाणवत होते.

^^^

# 43. वादळ शांत

खंडाळ्याला घाटात सिग्नल नव्हतं म्हणून एका ट्रेनला थांबावं लागलं. खिडकीतून लहान मुलांना झुडुपांवर माकडं दिसत होती. खाली खोल दरी होती. एका लहान मुलीने आपल्या हातातले केळ देण्यासाठी खिडकीतून हात बाहेर काढण्याचा प्रयत्न केला तेवढ्यात तिच्या वडिलांनी तिला रागावून थांबवलं.

"ए हात बाहेर नको काढूस! दुरून फेक केळ त्याच्याकडे!"

"ठीक आहे पप्पा!"

तिने माकडांच्या समूहाकडे केळ फेकलं. माकडांनी ते झेलले आणि खाऊ लागले. त्या मुलीला ती गंमत आवडली. तिने स्वतःन खाता आपल्याजवळचे सगळी केळी त्यांच्याकडे फेकली.

एक केळ अचानक माकडाच्या हातातून हवेत ओढले गेले आणि दरीच्या दिशेने उडत निघाले. माकड बावचळले. दुसरे केळ पण आपोआप दरीकडे जायला लागले. माकडांची त्रेधातिरपीट उडालेली पाहून ती मुलगी टाळ्या वाजवून हसू लागली.

"पप्पा बघा ना! सगळी केळ आपोआप उडून गेली!"

पप्पा पेपर वाचत होते.

"काहीही काय? केळ कसे उडतील?"

तेवढयात त्यापैकी एक माकड हवेत आपोआप उडून खाली दरीकडे ओढले गेले.

ती मुलगी टाळ्या वाजवू लागली.

"पप्पा, पप्पा ते माकड उडायला लागलंय!"

"काहीही काय गं? माकड कशाला उडेल?"

सगळी माकडं दरीकडे आपोआप ओढली गेली. मग पप्पांच्या हातातला पेपर, जेवणाचा डबा, बॅग सगळ्या गोष्टी खिडकीतून बाहेर उडायला लागल्या. ज्या खिडकीच्या गजातून बाहेर निघू शकत नव्हत्या त्या वस्तू खिडकीला चिकटून राहिल्या आणि जणू बाहेर जायला धडपडू लागल्या. नंतर ती मुलगी उडून खिडकीला चिकटली, पप्पा, त्यांच्या मागे डब्यातील सगळे लोक, बॅग या माकड उडाले त्या दिशेला ओढल्या जाऊ लागल्या.

दरवाजा उघडा असल्याने बरेच दरवाज्यात उभे असलेले लोक प्रचंड वेगाने दरीकडे ओढले गेले. वस्तूपण दरवाज्यातून उडाल्या. काही जण हा अजब प्रकार शुटींग करून न्यूज चॅनलला पाठवू लागले, मित्रांना व्हाट्सएपवर पाठवू लागले, नातेवाईकांना फोनवरून सांगू लागले. आणि नंतर तेही शक्य झाले नाही कारण सगळे मोबाईल, वस्तू, मोबाईल धारक व्यक्ती पण ट्रेन मधून दरीकडे

ओढले जाऊ लागले. सगळ्या डब्यात आरडाओरडा आणि हलकल्लोळ माजला. ट्रेनच्या चालकाला पण समजत नव्हते काय झाले ते आणि डब्यातील लोखंडी हॅंडलला घट्ट धरूनसुद्धा तोही पकड सुटून हवेत उडून दरीत ओढला गेला. मग संपूर्ण ट्रेन रुळांवरून हवेत उचलली गेली आणि दरीकडे ओढली जाऊ लागली.

हायवेवर असलेल्या कार, ट्रक, बाईक्स या रस्त्यावर धावता धावता अचानक हवेत वर उचलल्या गेल्या आणि दरीकडे ओढल्या जाऊ लागल्या. आसपास पायी फिरणारे प्राणी, माणसं तसेच जमिनीच्या थोडे वर उडणारे पक्षी हे सर्वजण पण तसेच ओढले जाऊ लागले. आसपासच्या घरांतील, बिल्डिंग मधील भांडीकुंडी, लहान मोठ्या वस्तू घरातून बाहेर निघून उडू लागल्या. काही ठिकाणी जमीन भुसभुशीत होऊन लोक जमिनीत गाडले जाऊ लागले. त्या दरीच्या आसपास हवेत उडत असलेले अनेक कीटक, पक्षी पण वेगाने दरीकडे ओढले जाऊ लागले.

जसे चक्रीवादळ येऊन त्यात धूळ आणि इतर वस्तू गोल गोल फिरतात तसे सगळेजण गोल फिरू लागले. ट्रेनचे डबेपण गोल फिरत डीएनए रचनेसारखे एकमेकांभोवती गुंडाळले जाऊ लागले.

ही बातमी वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली. स्वागत टीमला कळली, न्यूज चॅनलतर्फे सगळ्या महाराष्ट्रात आणि भारतात पसरली. देश विदेशांत पोहचली.

हे सगळे जे घडत होते ते हितेन आणि रजक यांच्या एका निर्णयामुळे!!

त्याचे झाले असे की रजक आणि हितेन यांना किंवा प्रयोगशाळेतल्या इतर कुणालाही तो फॉर्म्युला पुन्हा बनवणे शक्य झाले नाही. पण रजक आणि हितेन यांच्या मनात काही वेगळेच चालले होते. फॉर्म्युला शोधला नाही तर हा आपल्याला मारणार! आणि तिथली सुरक्षा व्यवस्था एवढी मजबूत होती की तिथून बाहेर निघणे पण शक्य नव्हते. अदृष्य दरवाज्यांपैकी कोणत्याही दरवाज्यातून बाहेर निघण्याचे कंट्रोल हे फक्त व्हायरसिककडे होते. इतर दरवाजे भक्कम होते, त्यांना तोडून बाहेर पळून जाणेही शक्य नव्हते. त्यापेक्षा फॉर्म्युला शोधता शोधता त्यांनी असे ठरवले होते की आता व्हायरसिकला कसेही करून अवकाशात जाऊ द्यायचे नाही. याला अद्दल घडवायची! काहीही झाले तरी चालेल! कारण

फॉर्म्युला पुन्हा बनवण्यासाठी गेल्या अर्ध्या तासात व्हायरसिकने त्या दोघांचा खूप छळ केला होता.

अवकाशात प्रतिसृष्टीकडे प्रस्थान केल्यावर ज्या यंत्राच्या आधारे "बिग कोलॅप्स निगेटिव्ह कण" व्हायरसिक रिमोटने सुरू करणार होता, त्या यंत्राचे रिमोट कंट्रोल व्हायरसिकने कुठे ठेवले आहे ते त्यांनी हेरले. मग प्रयोग करता करता एक इलेक्ट्रॉनिक आयसी त्यांनी मुद्दाम जास्त करंट सोडून जाळली. पण युक्ती अशी केली की, प्रयोग करता करता अनावधानाने झालेली ती एक चूक वाटली, एक योगायोग वाटला.

आणि मग -

"बॉस, हा फॉर्म्युला सक्सेस होण्यासाठी ह्या आयसी शिवाय गत्यंतर नाही! पण आयसी तर जळाली!"

"जळाली का तुम्ही जाळली?"

"नाही बॉस, जळाली, हे सगळे सायंटिस्ट साक्षी आहेत!"

सायंटिस्टनी माना डोलावल्या. दुजोरा देणे भाग होते कारण त्यांनाही काही तो फॉर्म्युला बनवता येत नव्हता. हितेन रजक वर सगळ्या आशा केंद्रित होत्या.

"मग आता?"

"त्या "बिग कोलॅप्स निगेटिव्ह कण" सोडणाऱ्या यंत्राचे रिमोट आहे ना त्यात अशीच एक आयसी आहे! असे आम्हाला या सायंटिस्टने सांगितले! ते रिमोट आम्हाला द्या!!"

तो सायंटिस्ट हो म्हणाला. त्याला दोघांनी आधीच विश्वासात घेतले होते आणि त्यांच्या प्लॅन मध्ये सामील करून घेतले होते.

"ठीक आहे! घ्या, पण काही गडबड नकोय मला!"

"बॉस, आम्ही रिमोट कशाला चालू करू? आम्हाला आमचा जीव प्यारा आहे!"

रिमोट हातात मिळताच क्षणाचाही वेळ न दवडता हितेनने बटण दाबून यंत्र सुरू केले. बिग कोलॅप्स निगेटिव्ह कण जमिनीत गाडलेल्या एका टॉवरसारख्या दिसणाऱ्या यंत्रातून बाहेर पडू लागले. सृष्टी नष्ट होतांना आणि वस्तुमानाचे पुन्हा ऊर्जेत रुपांतर होतांना जसे होते तसे प्रचंड शक्तीचे चुंबकीय क्षेत्र तयार होऊ लागले. तिथले सगळे केमिकल्स, कंट्रोल पॅनेल्स, बटणे, लॅपटॉप, स्क्रीन्स, रोबोट्स, खोलीत कोंडलेली माणसं हवेत उडाली. विजेच्या तारा, कनेक्शन वायर्स तुटल्या. स्क्रीन्स बंद पडल्या. जिकडे तिकडे शॉर्ट सर्किट झाले. बरीच विजेची उपकरणे जळाली. बऱ्याच जणांचे मास्क चेहऱ्यावरून निघून पडले. पासवर्डनचा मास्क गळून पडला. तो दुसरा तिसरा कुणी नसून हाराकू नाकामुरा

होता. रोबोट्सचे नियंत्रण ठेवणारे ताकामीशी मांजर पण गुहेत अधांतरी उडत उडत गोल फिरुन म्यांव म्यांव करत ओरडायला लागले. यंत्र चालू करणारे ते रिमोट पण उडून गेले आणि आजूबाजूला भिंतींवर आदळून तुकडे होऊन नष्ट झाले. पण ते टॉवर मात्र जमिनीत गाडले असल्याने नष्ट न होता निगेटिव्ह मॅग्नेटिक पार्टीकल सोडतच राहिले.

तिथे ब्लॅक होल तयार व्हायला सुरुवात झाली. सगळ्या वस्तू त्या ठिकाणी खाली जमीन भुसभुशीत होवून तिथे ओढल्या जाऊ लागल्या. जसे पाण्यात दगड टाकल्यावर वर्तुळाकार तरंग दूर पसरत जातात तसेच हळूहळू त्या चुंबकीय क्षेत्राची व्याप्ती वर्तुळाकार क्षेत्रात वाढू लागली. म्हणून आजूबाजूच्या सजीव निर्जीव वस्तू ओढल्या जाऊ लागल्या. म्हणून ट्रेन आणि कार, ट्रक ओढले जाऊन वावटळीसारखे गर्रर गर्रर फिरू लागले. एक प्रचंड मोठे चुंबकीय वादळ तयार झाले होते. गुहेच्या मध्ये आणि वर ते वादळ गोल गोल फिरत होते आणि सगळ्या सजीव निर्जीव गोष्टींना वेगाने गोल फिरवत होते. एखादा लहान मुलांचा खेळण्याचा भोवरा जसा फिरतो तसेच ते वाटत होते. तो भोवरा लवकरच आणखी तीव्र चुंबकीय क्षेत्र निर्माण झाल्यावर जमिनीला छिद्र करत करत आपल्यात अडकलेल्या सगळ्या गोष्टी जमिनीत अज्ञात पोकळी

निर्माण करून त्यात घेऊन जाऊन नष्ट करून टाकणार होता. सगळेकाही ऊर्जेत रुपांतरीत होणार होते.

सगळ्यांचा जणू काळोखाकडे प्रवास सुरु झाला होता. नकारात्मकतेकडे प्रवास सुरु झाला होता. पण डिटेक्टिव्ह निगेटिव्ह कदापिही हे होऊ देणार नव्हता कारण त्याची दृष्टी परत आलेली होती आणि त्याने हे दृश्य पाहिले होते आणि तो वेगाने अँटिक्लिपवर बसून त्या गुहेकडे येऊ लागला होता....

या चुंबकीय नकारात्मक वादळाबद्दल सुनिलने स्फटिकाला स्पर्श करून रंगिनीला विचारले तेव्हा तिने सांगितले की, "तुझ्यात आतापर्यंत विविध लोकांची एकवटलेली निगेटिव्ह एनर्जी वापरण्याची वेळ आली आहे!"

आणि तिने पूर्वी दोघांचा झालेला संवाद त्याला आठवायला सांगितले....

दूरदर्शन शक्ती मिळायच्या आधी झालेला तो संवाद सुनिलला आठवला....

त्या दिवशी स्फटिकाकडे बघत सुनिल पुलावर कठड्याला हात टेकून उभा राहून विचार करू लागला होता:

"अशा किती नकारात्मक घटनांचा साक्षीदार मला बनावं लागणार? ही नकारात्मकतेची डिटेक्टिव्हगिरी मला स्वतःलाच एक निगेटिव्ह माणूस तर बनवणार नाही ना? या सगळ्यांचा माझ्या मनावर नकळत एक ताण येत चालला आहे. बरेचदा रात्री झोप येत नाही! माझ्या ज्ञानाचा आणि विशिष्ट शक्तीचा उपयोग मला समाजाच्या आणि देशाच्या भल्यासाठी करता येतोय याचा आनंद आहे पण..."

"पण चिंता करू नको"

"कोण?"

"विसरलास? मी रंगिनी!"

"मला मार्गदर्शन कर रंगिनी, मला कधी कधी भीती वाटते या सगळ्यांची!"

"भीती? काढून टाक! मनात शंका ठेऊ नको आणि आता माझे ऐक. आता तुझ्या मनातली भीती काढायला मी आलेली नाही. ते काम तुला स्वतःला करायचं आहे. इतरांच्या मनातील नकारात्मक गोष्टींचा सकारात्मक विचारांत रूपांतर करणारा तू, स्वतःच नकारात्मकतेकडे झुकत चालला आहेस?"

"तसं होतंय खरं! आणि माझ्या मनात निगेटिव्ह विचार सुरू असतांना मी स्वतःला आरश्यात पाहिलं तरी मला माझ्या डोक्याभोवती लाल वर्तुळ दिसत नाही!"

"अर्थातच दिसणार नाही कारण अदृश्य किरणं आरसा डिटेक्ट करू शकत नाही. स्वतःचे निगेटिव्ह वर्तुळ बघायची तुला गरजच काय?"

"मला माहीत आहे, तशी गरज नाही कारण मला स्वतःला माहित असेल की मी काय विचार करतोय ते पण तरीही समजा बघायचे तर?"

"असे तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुझाच क्लोन तुझ्यापासून वेगळा होऊन तुला तुझ्या समोरून बघेल!"

"होय खरं आहे. ते जाऊ दे. मला सांग मी असा इतरांच्या नकारात्मक लहरींचा माझ्यावर नकारात्मक परिणाम होण्यापासून स्वतःला कसा वाचवू?"

"त्याकडे तटस्थपणे बघायला शिक! असाच तुझा काल्पनिक क्लोन तयार कर जो या सगळ्यांपासून मनाने, भावनेने आणि बुद्धीने निराळा असेल, तटस्थ असेल. जमेल हळूहळू तुला! तो क्लोन हवेतून तुला कुठेतरी बघेल, तो क्लोन तू असशील आणि खऱ्या सुनिलकडे तो एक वेगळी व्यक्ती म्हणून बघेल!"

....हा संवाद आठवला तेव्हा सुनिल म्हणाला, "म्हणजे, मी माझ्यात आतापर्यंत साठलेल्या नकारात्मक ऊर्जेचा एक क्लोन बनवून त्या चुंबकीय वादळाला थांबवू का?"

"होय, तिथे जा आणि लहानपणापासून आतापर्यंत तुझा जेव्हा जेव्हा नकारात्मक शक्तींशी संबंध आला ते सगळे प्रसंग आठव. त्या लाल वर्तुळाकार लहरी आठव! मग तुझा गॉगल काढून डोळ्यांनी त्या वादळावर लक्ष केंद्रित कर. आणि सगळी निगेटिव्ह एनर्जी तुझ्या डोक्यातून निघून त्या वर्तुळाकार वादळात आतमध्ये सोड..."

FF1,2 आणि MF1,2 तसेच इतर फायटर्स, जलजीवा, झाड मानव यांच्यावर शहरातील जबाबदारी सोपवून डिटेक्टिव्ह हाडवैरीला मागे बसवून घेऊन गुहेकडे निघाला तेव्हा पुणे मुंबईतील बहुतेक सर्व यांत्रिक प्राण्यांची शक्ती संपून ते नष्ट होत होते कारण त्यांना कंट्रोल करणारी गुहेतली यंत्रणा पण आता नष्ट होत होती. आता आणखी नवे प्राणी येणार नव्हते. उरल्या सुरल्या मानवी प्राण्यांना मारण्यास ते सगळे समर्थ होते. मुंबईत पण सुनिलने गुहेतील वादळाबद्दल सांगितले.

मुंबई पुण्यात वाईट टीमला सामील झालेले जितके लोक होते त्यांचे नाव पत्ते स्वागत सुपरहिरो आणि फायटर्स यांनी मानवी प्राण्यांना पकडून विचारले आणि त्यांना स्वागत टीम मध्ये सामील होता की तुरुंगात जाता असे दोन पर्याय देण्यास सुरुवात केली.

आर्मी, स्वागत आणि न्यूज चॅनल्सचे हेलिकॉप्टर्स हवेतून त्या गुहेजवळच्या वादळात ओढले जाऊ नये म्हणून त्यांना तिकडे येण्यासाठी मनाई केली गेली. त्यांना शक्य तेवढे दूर जाण्यास सांगण्यात आले! तिकडे आता फक्त सुनिलचे काम होते!!

अँटिक्लिपवर बसून सुनिल आणि हाडवैरी जसजसे खंडाळ्याला त्या गुहेकडे जाऊ लागले तसतसे त्या वादळाचे वर्तुळाकार क्षेत्रफळ वाढून जास्त सजीव निर्जीव त्यात ओढले जात होते. कालांतराने त्या मॅग्नेटिक एनर्जीकडे अँटिक्लिपसहित सुनिलपण ओढला जाऊ लागला. पण निगेटिव्ह एनर्जी हीच निगेटिव्ह एनर्जीला तोंड देऊ शकते या हिशेबाने त्याच्यातील निगेटिव्ह एनर्जी त्या मॅग्नेटिक एनर्जीला रोखत होती.

दरम्यान, सुनिलवर आणि अँटिक्लिपवर वादळात ओढल्या जात असलेल्या अनेक गोष्टी आदळायला लागल्या. सजीव गोष्टींना हाडवैरी हाताने बाजूला करत होता आणि निर्जीव वस्तूंना हॅट मधल्या शस्त्रांनी बाजूला करत करत सुनिल गुहेकडे मार्गक्रमण करत होता. काही अवजड शस्त्रे निर्माण करून सुनिल उडणाऱ्या माणसे आणि स्त्रिया मुले यांना देऊ लागला ज्याद्वारे त्यांना धरून ते कुठेतरी जमिनीत अडकवून चुंबकीय वादळात जाण्यापासून स्वतःचा बचाव करू शकतील.

"सुनिल, हा अँटिक्लिप लय भारी आहे! मला पण असा एक पाहिजे", हाडवैरी म्हणाला.

"अरे, वेड्या तुझ्यातील शक्ती जागृत झाल्यावर तुझं करंट लागून पक्षी मरून जाईल! आता पण सावध राहा नाहीतर हा अँटिक्लिप बिचारा शॉक लागून मरेल!"

"नाही, सुनिल! शक्ती जागृत झाली तर त्या आधीच मी उतरून जाईन! किंवा माझ्यासाठी असाच एखादा शॉक प्रूफ प्राणी पक्षी बनवा!", हसत तो म्हणाला.

"मी कुठून बनवू? त्यापेक्षा त्या व्हायरसिकला सांग किंवा मग गुहेतील ते जपानी ताकामीशी मांजर त्याला सांग! तो बनवून देईल, आपण त्याचे अपहरण करू!"

"चांगली विनोद बुद्धी आहे सुनिल तुझी!"

गुहा आली. समोर वादळ घोंगावत होते. आतापर्यंत अँटिक्लिपने चार पैकी मागच्या दोन पंखाच्या वेटोळयात हाडवैरीला धरून ठेवलं होतं त्यामुळे तो उडाला नाही आणि सुनिलच्या निगेटिव्ह एनर्जीमुळे अँटिक्लिप पण वादळाकडे ओढला गेला नाही.

सुनिल हाडवैरीला म्हणाला, "तू त्या टॉवरला निकामी कर आणि मी तोपर्यंत नकारात्मक चुंबकीय ऊर्जा नष्ट करतो!"

सुनिल अँटिक्लिपवर बसून अंगावर आदळणाऱ्या गोष्टी झेलत हवेत एके ठिकाणी स्थिर झाला. डोळे बंद करून आकाशाकडे चेहरा करत दोन्ही हात कवायत करतो तसे शरीराला 90 टक्के कोनात आणि जमिनीला समांतर करून त्याने आतापर्यंत लहानपणापासून ज्या काही नकारात्मकतेशी सामना केला होता

त्या सगळ्या गोष्टी, व्यक्ती, घटना आठवायला सुरुवात केली. स्टेशनवर आत्महत्येपासून परावृत्त केलेला मुलगा, एके ठिकाणी टाळलेला बलात्कार, मुलांची टाळलेली रॅगिंग, ज्येष्ठ नागरिकांना चोरांपासून वाचवले ते, ज्वेलरी शॉप मध्ये पकडलेला चोर, ट्राफिक पोलिसांचे वाचवलेले प्राण, दारूच्या नशेत होऊ शकणारा पण टाळलेला खून, पुलावरून छोट्या मुलीला खाली फेकण्याची घटना टाळण्यात आलेले यश, रणजित यांच्यासोबत पुलावर पकडलेला जग्गू, पोलिस स्टेशनमध्ये अचूक हेरलेले बरेच गुन्हेगार असे एक ना दोन...अशा सगळ्या घटना तो आठवू लागला, त्या घटनांतील सगळी नकारात्मक प्रखर जळती लाल वलयं तो आठवू लागला, ती जणू काही त्याच्यात आता एकवटून संचारली....

त्याच्या शरीराच्या आजूबाजूला एक अदृश्य नकारात्मक शक्ती वेढली गेली आणि मग सुनिलसारखाच दिसणारा त्याच्याच आकाराचा एक नकारात्मक ऊर्जेने भरलेला ऊर्जेचा लोळ त्याच्या शरीरापासून वेगळा झाला आणि सुनिलच्या विचारांनी तो नियंत्रित होऊ लागला....

सुनिलने त्याला त्या चक्रीवादळात पाठवले. त्यात जाऊन तो स्थिर झाला. पण त्याला त्या चुंबकीय चक्रीवादळामुळे जो प्रचंड विरोध झाला तो अनुभव इकडे सुनिललाही येऊ लागला. मग समोरच्या सुनिलच्या नकारात्मक ऊर्जेच्या लोळामध्ये सगळी चुंबकीय शक्ती एकवटून आत शिरायला लागली. तिथे प्रचंड इलेक्ट्रिक एनर्जी तयार झाली. विजा चमकतात तास ऊर्जेचा प्रचंड खेळ तिथे दहा मिनिटे सुरू होता आणि एका क्षणी सगळं शांत झालं....

ओढले जाणारे सजीव निर्जीव त्याच ठिकाणी खाली जमिनीवर पडले. सुनिल आता ती निगेटिव्ह मॅग्नेटिक एनर्जी आणि इतर लोक यांच्यात एक ढाल झाला होता. आता जर ही एनर्जी गुहेच्या बाहेर थांबवली नसती तर लाखोंच्या संख्येने लोक त्यात ओढले गेले असते कारण त्याचा वेग आणि शक्ती आता खूप प्रचंड झाली होती...

सुनिलला मात्र ती एनर्जी खूप त्रास देत होती. गुहेतून प्रचंड वेग बाहेर येऊन सुनिलच्या त्या क्लोनवर आदळत होता आणि त्या क्लोन मधली निगेटिव्ह एनर्जी त्या चुंबकीय शक्तीला रोखून धरत होती. सुनिलला प्रचंड वेदना होत होत्या.

"हाडवैरी, ते टॉवर लवकर शोध आणि निकामी कर! जास्त काळ मी हे सहन करू शकत नाही!"

"होय सुनिल, नक्की, मला सापडलं आहे ते टॉवर!"

इकडे हाडवैरीने गुहेतील मॅग्नेटिक एनर्जीमुळे तुटून वेगळे झालेल्या गुहेच्या एका दरवाज्यातून गुहेच्या आत प्रवेश केला आणि वेगाने एका अनंत काळोखी वर्तुळाकार विहिरीसारख्या भागात ओढला जाऊ लागला पण त्याने पटकन स्वतःला सावरले आणि एका जमिनीत भक्कम गाडल्या गेलेल्या लोखंडी खांबात आपला पाय अडकवून ठेवला. त्या मॅग्नेटिक एनर्जीला विरोध करून एका जागी स्थिर राहणे सोपे नव्हते. बऱ्याच गुलाम लोकांना त्याने ढकलून ढकलून एका गजाच्या भिंतीवर फेकले. तिथे त्यांनी गज धरून ठेवले. त्या टॉवरचा गुहेत अर्धा भाग होता आणि गुहेच्यावर अर्धा भाग होता. एका हाताने ते टॉवर गदागदा हलवून त्याने ते कडा कडा मोडून काढले. त्यातल्या इलेक्ट्रिसिटीचा हाडवैरीवर काहीच परिणाम झाला नाही. मग त्याने गुहेतील टॉवरचा भाग मुळापासून उखडून काढला आणि त्या विहिरीत भिरकावून दिला. ताकामीशी मांजर उडत उडत गोल गोल फिरत

त्या अनंत विहिरीकडे जातांना त्याला दिसले, त्याने क्षणाकरता आपला पाय सोडला आणि मांजराला झेप घेऊन पकडलं पण त्यामुळे तो अनंत काळोख्या विहिरीकडे ओढला जाऊ लागला. पण वेगाने झेप घेऊन पुन्हा एकदा लोखंडी खांबाला त्याने एका हाताने धरले. आता त्या चुंबकीय वादळाचा प्रभाव कमी होत होता. आणि मग अचानक तिथला अनंत विहिरीचा काळा गोल भाग नष्ट झाला आणि तिथे साधी जमीन दिसायला लागली. तोपर्यंत अनेक सजीव निर्जीव गोष्टी त्याच्या आतमध्ये जाऊन गडप झाल्या होत्या.

ब्लॅक होलचा प्रभाव संपला होता. हाडवैरी गुहेतील सगळयाच गुलाम माणसांना वाचवू शकला नाही पण बऱ्याच लोकांना त्याने पकडून गुहेच्या वर फेकले. मग शेवटी ताकामीशी मांजराला हातात पकडून तो गुहेबाहेर आला.

जमिनीवर त्या गुहेच्या जागी प्रचंड मोठा खड्डा पडला होता जणू काही तिथे आकाशातून येऊन एखादी उल्का आदळली आहे!

तो सुनिलच्या आकाराचा निगेटिव्हीटीचा लोळ गुहेजवळून निघून आता पुन्हा सुनिलच्या अंगात समाविष्ट झाला.

"अरे, तू माझं बोलणं अगदी सिरियसली घेतलं, खरंच आणलं त्या मांजराला!", सुनिल जिंकल्याच्या अतीव आनंदाने म्हणाला.

"मग बॉस, आपलं कामच तसं आहे! हे दिसतं गरीब मांजर पण सगळे फॉर्म्युले याला माहीत आहेत. सुजित लहानेचा हवेपासून पेट्रोल आणि पाणी बनवण्याचा फॉर्म्युला पण याला माहिती आहे", हाडवैरी त्या ताकामीशी मांजराला कुरवाळत म्हणाला.

मांजर छद्मीपणाने खुदकन हसलं.

"ओके, पण विशाल, आता हे ब्लॅक होल जरी बंद झालंय तरीही आतापर्यंत त्यात ओढल्या गेलेल्या सजीव निर्जीव गोष्टी त्या ब्लॅक होलच्या दुसऱ्या टोकाला कुठेतरी फेकल्या गेल्या असतील!! मग ते दुसरे टोक पृथ्वीवरच दुसऱ्या एखाद्या देशात असेल की अवकाशात इतर कुठे दुसरीकडे ते सांगता येणार नाही!"

थोड्याच वेळात सगळीकडे ही बातमी पसरली. सुनिलने पुण्या मुंबईत स्वागत मेंबर्स आणि इतर सगळ्यांना धोका टळल्याचे सांगितले.

तिकडे मुंबईतील प्रयोगशाळेत स्मृतिका सायलीला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करत होती. त्या कार्यालाही यश येत होतं.

इसरोने इकडे आनंदाची बातमी दिली होती. वाईट टीमने तयार केलेली आकाशातील प्रतिसृष्टी नष्ट करण्यात त्यांना नासाच्या मदतीने यश आलं होतं.

सगळीकडे स्वागत टीम, भारतीय लष्कर आणि त्यांच्या या चार अनोख्या सुपरहिरोंची वाहवा होत होती. सुपर नेचर बेटावर तर ही बातमी कळली तेव्हा अतिशय आनंदाचे वातावरण निर्माण झाले. जगासाठी चारही सुपरहिरोंचे चेहरे वेगळे दिसत होते (मास्क नुसार) आणि त्यांच्या जवळच्या लोकांसाठी त्यांचे चेहरे मूळचे म्हणजे ओरिजिनल होते.

रणजित, नेत्रा आणि सुजित लहाने यांना आणि प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे ज्यांनी यासाठी बलिदान दिले त्यांना ही खरी श्रद्धांजली होती.

आता दुपारचे तीन वाजले होते!

न्यूज चॅनल वाल्यांचे ब्रेकिंग न्यूज सगळीकडे फटाफट ब्रेक होत होते. सगळीकडे आनंदोत्सव साजरा होत होता.

विशेष म्हणजे किशोर आणि अनघा यांनी आठ दिवसानंतरची लग्नाची तारीख ठरवून टाकली!

जगभर वाईट टीम मुळे अर्धवट नष्ट झालेल्या काही महत्त्वाच्या वास्तू मानवाने निसर्गावर केलेल्या अतिक्रमणाची आणि

विज्ञानाच्या केलेला दुरूपयोगाची साक्ष देत होत्या आणि मानवाला आता सुधारण्यासाठी जणू विनंती करत होत्या. सुपर नेचर बेटावरच्या डॉक्टर शिशिर यांच्या सांगण्यानुसार आता स्वागत टीम आर्टिफिशयल इंटेलिजन्स आणि एकूणच विज्ञान, निसर्ग, तंत्रज्ञान, मानवता यांचा समतोल कसा साधता येईल यासाठी जगभर प्रबोधन आणि जागृती करणार होते तसेच यापैकी कोणत्याही घटकांवर अन्याय होणार नाही हे आता बघणार होते. त्या नष्ट झालेल्या वास्तू आता पुन्हा तयार कराव्या लागणार होत्या.

सुनिल विशालला म्हणला, “हाडवैरी मित्रा, तुझी आणि निशाची कथा मला ऐकायची आहे फावल्या वेळात! सांगशील ना!”

विशाल म्हणाला, “नक्की, आपण चौघे सुपर नेचर बेटावरच्या ट्री हाऊस मध्ये बसून एकदा भरपूर गप्पा मारू! तेव्हा नक्की कथा ऐकवेन!”

(समाप्त)

एके ठिकाणी -


निद्राजीताचा प्रियकर सूर्यविराट मुक्त झाला आणि सूर्याकडे बघून त्याने छातीवर दोन्ही हात आपटत एक मोठी आरोळी ठोकली आणि तो एका दिशेला चालू लागला, तिथे एकजण आधीपासूनच त्याची वाट बघत होता...

(सूचना: याच लेखकाची जलजीवांवर आधारित "जलजीवा" नावाची स्वतंत्र कादंबरी आधीच प्रकाशित झालेली आहे.

जलजीवांबद्दल अधिक जाणून घ्यायचे असेल तर ती तुम्ही वाचू शकता!)

पुस्तकांच्या कव्हरवर क्लिक करा.

पुस्तक उघडेल






# लेखकाचे मनोगत

माझे मनोगत मी जाणीवपूर्वक कादंबरीच्या शेवटी व्यक्त करत आहे कारण वाचकांना ही कादंबरी वाचल्यानंतरच काही गोष्टींचा उलगडा होईल ज्याबद्दल मी येथे लिहिले आहे आणि कथेआधीच त्याबद्दल चर्चा करून मला माझ्या प्रिय वाचकांचा रसभंग करायचा नव्हता. माझी यापूर्वीची "वलय" ही सिनेटीव्ही क्षेत्रावर आधारित कादंबरी 27 फेब्रुवारी 2018 ला प्रकाशित झाली होती त्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर "डिटेक्टिव्ह निगेटिव्ह" ही कादंबरी आली आहे. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि ऑफिसच्या कामाचा व्याप सांभाळून ही कादंबरी मी लिहिली असल्याने लिहायला जवळपास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी लागला. काही महिने फक्त कादंबरीची रूपरेषा आणि विषय ठरवण्यात गेले तसेच संबंधित वैज्ञानिक माहितीबद्दल संशोधन करण्यात गेले.

लहानपणापासून अनेक सायन्स, सुपरहिरो, फँटसी आणि डिटेक्टिव्ह कथा/कॉमिक्स वाचून मी मोठा झालो. जसे फँटम, स्पायडरमॅन, हिमॅन, सॅमसन, नागराज, फौलादी सिंग, तसेच लोकमत कॉमिक्स मधला एक डिटेक्टिव्ह (बहुतेक त्याचे नाव ढंपू

होते), व्योमकेश बक्षी, एक शून्य शून्य, परमवीर, कमांडर, विक्रम वेताळ, सिंहासन बत्तीशी, अल्लादिन, गुल बकावली, रॉबिन हूड, परीकथा, तसेच आपले महान ग्रंथ रामायण, महाभारत आणि इतर फँटसी कथा. या सर्व मला काहीतरी नवीन अद्भुत पात्रनिर्मिती करण्यासाठी नेहमी खुणावत होत्या पण कधी वेळेचे गणित जमत नव्हते तर कधी मनासारखे पात्र जन्म घेत नव्हते.

मग माझ्या मनात आले की असा एक डिटेक्टिव्ह आपण निर्माण करू ज्याच्याजवळ सुपरपॉवर पण असतील, नंतर एखादा पॉवरफुल व्हिलन घेऊ आणि त्याला सायन्स, फँटसी आणि थरारक कथेची जोड देऊ ज्याद्वारे मनोरंजनासोबतच एखादा चांगला संदेश पण दिला जाईल. तसेच यानिमित्ताने मला काही अस्सल मराठी दमदार सुपरहिरो निर्माण करता आले याचे समाधान आहे ते काही औरच! यातील सुपर हिरोंच्या टीम मध्ये शेवटी शेवटी मी माझ्याच पूर्वीच्या "जलजीवा" नावाच्या एका सायन्स फिक्शन कादंबरीतील सुपरहिरो जलजीवांना पण बोलावले आहे. यापूर्वी बहुतेकांनी जलजीवा कादंबरी वाचली असेलच.

दरम्यान 2008 साली शास्त्रज्ञांनी युरोपातील CERN प्रयोगशाळेत "बिग बँग थियरी" वर सुरु केलेल्या प्रयोगाने मला भुरळ घातली होती. तो प्रयोग 2010 साली यशस्वी झाला होता. तेव्हापासूनच त्यातून प्रेरणा घेऊन आणि आणखी थोडी कल्पनाशक्ती वापरून या कादंबरीचा विषय माझ्या मनात घोळत होता. पण कल्पनेला मूर्तरूप येऊन पुरता योग जुळायला आणि त्याचे रूपांतर कादंबरीत व्हायला अनेक वर्षे जावी लागली. यात मी अनेक वैज्ञानिक संकल्पना वापरल्या आहेत. काही खऱ्या तर काही काल्पनिक आहेत. पण आज ज्या वैज्ञानिक संकल्पना काल्पनिक वाटत आहेत त्या कदाचित भविष्यात सत्यात उतरतीलही!!

ही कादंबरी लिहितांना आणि लिहून झाल्यावर, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे ज्या सर्वांची मला मदत झाली आहे त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. प्रकाशनापूर्वी ज्यांनी ही कादंबरी वाचून मला त्याबद्दल अभिप्राय दिले किंवा काही चुका लक्षात आणून दिल्या त्या सर्वांचे खूप आभार! या कादंबरीच्या प्रकाशकांचे मी मनापासून आभार मानतो.

ही कादंबरी तुम्हाला कशी वाटली ते नक्की कळवा. आपल्या प्रतिक्रियांची मी वाट बघत आहे.

आपला: निमिष सोनार, पुणे
ईमेल: sonar.nimish@gmail.com
व्हाट्सएप/कॉल: +91-8805042502
(सप्टेंबर 2020)

# निमिष सोनार



लेखक निमिष सोनार हे पुणे येथील खासगी कंपनीत काम करतात आणि लेखन हा त्यांचा आवडता छंद आहे. लेखनाव्यतिरिक्त चित्रकला, व्यंगचित्रं काढणे, वाचन, संगीत ऐकणे तसेच पौराणिक, ऐतिहासिक, सस्पेन्स थ्रिलर आणि प्रवासवर्णने या प्रकारचे वाचन करणे तसेच या विषयाशी संबंधित चित्रपट आणि टीव्ही कार्यक्रम बघणे लेखकाला आवडते. लेखक हे पत्नी मंजुषा, दोन मुले- अथर्व, आरोही तसेच आई वडील यांचेसह पुणे येथे रहातात. लेखकाच्या आतापर्यंत जलजीवा, वलय, विश्वरचनेचे अज्ञात भविष्य या कादंबऱ्या तर इतर अनेक लघुकथा विविध ठिकाणी प्रकाशित झाल्या आहेत.

सायन्स फिक्शन, फँटसी, थ्रिलर, सस्पेन्स, प्रेमकथा हे कथा प्रकार लिहिण्यात लेखकाला रुची आहे. लेखकाच्या “पलीकडचा मी” या गूढकथेवर लवकरच कोल्हापूर येथील "एकदम झकास प्रॉडक्शन" एक शॉर्ट फिल्म बनवणार आहेत.

लेखकाशी sonar.nimish@gmail.com या इमेल आयडी वर संपर्क करता येऊ शकतो.

लेखकाचा व्हॉटस्अप नंबर आहे: +91-8805042502

तसेच लेखकाला खालील सोशल मीडीयावर फॉलो करू शकता:

https://twitter.com/nimishtics

https://www.facebook.com/nimishtics

लेखकाचे ब्लॉग्स:

https://lekhnaimish.blogspot.com/

https://nimishtics.blogspot.com/

http://artimidis.blogspot.com/

# प्रकाशनपूर्व आलेल्या काही प्रतिक्रीया

सायफाय या कादंबरी प्रकारात लेखकाने कल्पनाविलास अत्यंत चांगल्या पद्धतीने केला आहे. जलजीवा आणि रंगिनी हा प्रकार तर अदभुत आहे. कादंबरीतील स्थळ आणि त्याचे वर्णन पाहता लेखकांची भटकंती आणि त्या जागेबाबतचे ज्ञान याचे दर्शन होते. सुनील, सायली, हाडवैरी, निद्राजिता या साऱ्यांची सांगड घालण्यात लेखकाला यश आले आहे. वाईट लोकांच्या विरोधात लढण्यासाठी जाताना सुनील आणि सायली यांचा विवाह मात्र प्रसंगाशी सुसंगत वाटत नाही.  लेखकाने शेवटपर्यंत उत्सुकता मात्र ताणून धरली आहे. आगामी लेखनासाठी शुभेच्छा!

- विलास पंढरीनाथ बारी, शिरसोली, जळगाव-खान्देश (एम. ए. मास कम्युनिकेशन, व्यवसाय : पत्रकारिता, आवड: वाचन, भटकंती, संगीत आणि चित्रपट पाहणे)

***

मराठीमध्ये सायफाय प्रकारच्या कादंबऱ्या तश्या कमीच आढळतात. त्यात अश्या विषयाला रहस्याची डूब देऊन अखेरपर्यंत उत्सुकता ताणली आहे. विषयाचा विस्तार मोठा आणि

सहसा न वाचलेला असा आहे. अश्या विषयावर एखादा चित्रपट निघू शकेल. उत्तम प्रयत्न! आणखी असे साहित्य वाचायला आवडेल.

- स्वप्निल जिरगे, कराड (मेकॅनिकल इंजिनियर, सॉफ्टवेअर ट्रेनिंग इन्स्टिटयूट. छंद: वाचन, लेखन, भटकंती, फोटोग्राफी)

***

विज्ञानातील विविध संकल्पनांचा "डिटेक्टिव्ह निगेटिव्ह" या कथेमध्ये उपयोग करून कथा अतिशय उत्कृष्टपणे गुंफली आहे. कथेची मांडणी एखाद्या रहस्यमय चित्रपटाप्रमाणे उत्कंठावर्धक आहे आणि त्यामुळे शेवटपर्यंत उत्सुकता ताणली जाते. अनेक पात्रांची नावे आजवर कधीही न ऐकलेली अशी आहेत पण ती कथेला साजेशी आहेत.

- मंजुषा सोनार, पुणे (गृहिणी आणि ज्योतिष/अंकशास्त्र सल्लागार, छंद: वाचन, पाककला)

***

कादंबरी खूप छान वाटली. कादंबरीमध्ये असलेल्या सस्पेन्समुळे माझा कादंबरी मधील इंटरेस्ट वाढत गेला. तुमची

कल्पनाशक्ती खूप ग्रेट आहे. माझी प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडत आहेत. हॅट्स ऑफ टू यु सर!!

- अक्षता दिवटे, बंगलोर (खासगी कंपनीत जॉब, छंद: वाचन, लेखन)

# लेखिका मेधा इनामदार (पुणे) यांचा अभिप्राय:

सायन्स फिक्शन म्हणजे विज्ञान कथा हा साहित्यातला अत्यंत कठीण प्रकार आहे. मराठी साहित्यात तर विज्ञानकथा लेखक अगदीच मोजके आहेत. श्री जयंत नारळीकर, श्री निरंजन घाटे यांच्यासारख्या काही ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लेखकांनी विज्ञानकथा कादंब-या लिहिल्या आहेत.

विज्ञानकथा लिहिणं सोपं नाहीच. संपूर्णपणे काल्पनिक विश्व निर्माण करायचं परंतु त्या विश्वातली वास्तवाची जाणीवही हरवू द्यायची नाही हे विज्ञानकथेचं वैशिष्ठय असतं. आयझॅक असिमोव्ह, रॉबर्ट हेईनलीन आणि आर्थर सी क्लार्क हे त्या काळातले अत्यंत श्रेष्ठ असे विज्ञानकथा लेखक होते. त्यांनी निर्माण केलेल्या "रोबो सीरीज" आणि काल्पनिक ब्रहमांड या वैज्ञानिक संकल्पना इतक्या वास्तव ठरल्या की आज खरोखरीच रोबो माणसाच्या मदतीसाठी तयार आहेत. विज्ञानकथालेखकांनी पाहिलली अनेक स्वप्नं आज प्रत्यक्षात आलेली आपण अनुभवतो आहोत.

लेखकाची दृष्टी अत्यंत विशाल असते आणि विज्ञान कथालेखकाची दृष्टी तर त्याहूनही विशाल.

श्री निमिष सोनार यांनी लिहिलेली डिटेक्टिव्ह निगेटिव्ह ही कादंबरी त्यांनी मला वाचायला दिली. 255 पानांची ही दीर्घ कादंबरी खरोखरीच आगळीवेगळी आहे. सुरुवातीपासूनच पकड घेणारी आहे.

एका सामान्य कुटुंबात जन्मलेला असामान्य सुनील कळतनकळत त्याच्यातील असामान्यत्व जाणून घेतो. वेगवेगळे अनुभव घेत मोठा होतो. आसपास असणा-या निगेटिव्हिटीची लाल वर्तुळं त्याला दिसतात आणि मग हळूहळू त्याच्या आयुष्यात अनेक गोष्टी घडू लागतात. वेगवेगळया मिती आणि त्या मितीच्या रंगिनीसारख्या आभासी आकृती त्याला भेटतात. सायलीसारखी विशेष शक्ती असलेली मेमरी डॉल त्याच्या आयुष्यात येते. डॉक्टर नेत्रा, हाडवैरी, निद्राजीता यासारख्या पॉझिटिव्ह शक्तींचा एक ग्रुप आणि व्हायरसिक, डिश अँटिनाडू, राऊटरन, वायरफायर यासारख्या दुष्ट शक्तींचा एक गट यांच्यातील संघर्ष निमिष सोनार यांनी उत्तम रीतीने रेखाटला आहे. विचित्र आकाराचे कृत्रिम प्राणी

पक्षी, हिप्नोटाईज करणा-या बाहुल्या, या सर्वच कल्पना मुळापासून वाचण्यासारख्या आहेत.

प्लॅनेट ऑफ डायमेन्शन ही अत्यंत आगळीवेगळी कल्पना निमिष यांनी 'घडवली' आहे. या विश्वात वेगवेगळया मिती आहेत. आणि त्या सर्व मितींचे ज्ञान अद्यापही शास्त्रज्ञांना झालेले नाही हे आज सत्य असले तरीही भविष्यात कधीकाळी प्लनेट ऑफ डायमेन्शनची आभासी दुनिया वैज्ञानिकांना सापडेलही!

प्रतिसृष्टी निर्माण करुन इथल्याच लोकांना गुलाम म्हणून घेऊन जाणारा व्हायरसिक. त्यासाठी त्याची चालू असलेली धडपड आणि नायकासह सर्वांनी त्याच्यावर मिळवलेला विजय या भोवती रचलेली ही कादंबरी आहे. चांगल्या वाईट प्रवृत्तींचा संघर्ष आणि अखेर सुष्टांचा विजय ही नेहमीचीच कल्पना निमिष यांनी मोठया कल्पकतेने मांडली आहे. कथेतील प्रत्येक पात्राचं नावही त्यांनी मोठया खुबीनं आणि रंजकतेनं ठरवलं आहे. निद्राजीता, व्हायरसिक, रंगिनी, स्मृतिका, अँटिक्लॅप ही आणि या कांदबरीत वापरलेली सगळीच नावं त्या पात्राचं वैशिष्ठय अलगदपणे वाचकासमोर उभं करतात.

जलजीवा ही देखील एक नवीन संकल्पना त्यांनी 'घडवली' आहे. सागराच्या लाटांनी मानवी रुप घेऊन माणसांना संकटातून सोडवण्यासाठी मदत करणे ही कल्पनाही खूपच निराळी आहे. हे जलजीवा जल, बर्फ आणि वाफ या तीनही रुपांचा योग्य वेळी योग्य तसा वापर करु शकतात ही निमिष यांच्या विलक्षण कल्पनाशक्तीची प्रचीती आहे हे निश्चित!

अत्यंत गुंतागुंतीचा असा हा संघर्षाचा आणि विजयाचा खेळ निमिष यांनी सुंदर मांडला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन! अनेक ठिकाणी विज्ञानविषयक संकल्पनाही त्यांनी सोपेपणाने समजावून सांगितल्या आहेत. त्यामुळे हा सारा लेखकाच्या कल्पनेचा खेळ असूनही वास्तवावर आधारित आहे असं वाटत राहतं आणि हेच या कादंबरीचं यश आहे. निमिष यांची भाषा सिनेमॅटिक आहे. वाचताना ते सारं काही प्रत्यक्ष समोर घडतं आहे असा भास वाचकाला होत राहतो.

आणखी एका गोष्टीबद्दल निमिष यांचे मनापासून कौतुक करावेसे वाटते की पुस्तकाचं आकर्षक मुखपृष्ठचित्र आणि त्याच्या

अत्यंत नाविन्यपूर्ण जाहिरातीचे व्हिडीओही त्यांनी स्वतः बनवले आहेत. त्यामुळे पुस्तक वाचण्याविषयीची उत्सुकता नक्कीच जागृत होते.

एक चांगली कांदबरी विज्ञानविश्वाला दिल्याबद्दल लेखकाचे अभिनंदन. आणि पुढील वाटचालीला शुभेच्छा !

--- मेधा इनामदार, लेखिका

403, अ जे अँवहॅन्यू, कर्वेनगर, पुणे

फोन 9370063245

(पुरुषोत्तम, महाराणी पद्मिनी, सीमांत, किशोर कथा, गौतम बुद्ध, स्वामी विवेकानंद, सोनेरी परीकथा, वैज्ञानिकांच्या कथा, आपली मुले आणि आपण यासारख्या अनेक पुस्तकांच्या चतुरस्त्र लेखिका)

# राहुल दवे (कॅलिफोर्निया) यांची प्रस्तावना:

मला निमिष सोनार यांनी लिहिलेल्या "डिटेक्टिव्ह नेगेटिव्ह" या कादंबरीच्या प्रस्तावना लेखनासाठीचे आमंत्रण म्हणजे मी माझे भाग्य समजतो. सर्वप्रथम निमिष सोनार यांच्या या नव्या कादंबरीचे मी मनापासून स्वागत तसेच अभिनंदन करतो. जरी मी आणि निमिष एकाच महाविद्यालयातून अभियांत्रिकीचे स्नातक झालो तरी आमची ओळख ही एका मित्राद्वारे झाली असून ती अगदी औपचारिक होती.

जवळ-जवळ पंचवीस वर्षांनी आम्ही पुन्हा संपर्कात आलो आणि त्याचे श्रेय जरी सोशल मेडिया सारख्या टेक्नॉलॉजिला जात असले तरी कारण मात्र आमची मराठी लेखनाबद्दल असलेली रुची आणि निमिष सोनारांचे त्याबद्दल योगदान हेच होते. निमिष यांनी आपल्या मराठी लेखनाबद्दलच्या आवडीला न्याय देतांना बरीच तारेवरची कसरत केली आहे यात तिळमात्र शंका नाही. कारण स्वतःचे वैयक्तिक जीवन ज्यात नोकरी तसेच कुटुंबाची जबाबदारी पार पाडून देखील आपली लेखनासारखी आवड जोपासणे हे किती

अवघड आहे ते मी अगदी अनुभवाने समजू शकतो. त्यांची ही आवड जोपासण्याची जिद्द त्यांच्या लेखन कौशल्यतेत दिसून येते.

आज-काल प्रेमकथा, प्रवासवर्णन, राजकारण  वगैरे मराठी लिखाण खूप वाचायला मिळते किंबहुना उपलब्ध आहे परंतु सायन्स फिक्शन च्या जोडीने डिटेक्टिव्ह कथा कादंबर्या तेही मराठीत वाचण्यास / ऐकण्यास मिळणे विरळाच. म्हणून "डिटेक्टिव्ह-निगेटिव्ह" ही कादंबरी अगदी आजच्या टेक्नॉलॉजिला लक्षात घेऊन मराठी वाचकांना डिजिटल स्वरूपात वाचण्यासाठी तसेच किंडल सारख्या टेक्नॉलॉजिद्वारे ऐकण्यासाठी देखील उपलब्ध करण्याच्या निमिष सोनार यांच्या या उपक्रमाचे मी अभिनंदन करतो आणि ही कादंबरी "सायन्स फिक्शन "तसेच "डिटेक्टिव्ह" या श्रेणींमध्ये खूपच लौकिक मिळवेल अशी माझी खात्री आहे.

याच प्रकारे निमिष सोनार यांनी विविध विषयांवर कादंबऱ्या लिहीत राहाव्यात आणि मराठी वाचकांना वाचनाचा लाभ आणि आनंद देत राहावे या सदिच्छेने ही प्रस्तावना येथेच संपवतो.

-- राहुल दवे, कॅलगरी (कॅनडा), ह.मु. कॅलिफोर्निया

(अमेरिकेतील खासगी कंपनीत अभियांत्रिकी सलागार)

# अक्षर प्रभू देसाई (कॅलिफोर्निया) यांची प्रस्तावना:

कुठलीही काल्पनिक कथा वाचायची म्हटली तर वाचकाला सुद्धा आपली कल्पनाशक्ती वापरावी लागते आणि ज्या गोष्टी प्रत्यक्षांत शक्य नाहीत त्या शक्य आहेत असे समजून कथा वाचावी लागते. "तो सरदार घोड्यावर बसून लढाईला गेला" इतके साधे वाक्य जरी वाचले तरी घोडा का  होता कि पांढरा, सरदार चा पोशाख काय होता इत्यादी अनेक गोष्टी वाचक म्हणून आम्हाला मनात चित्रित कराव्या लागतात. विज्ञान कथा वाचताना हे आणखीन क्लिष्ट होते कारण विज्ञान कथा लेखकाचा जो कॅनवास असतो तो फारच मोठा असतो. इथे ग्रह तारे निर्माण केले जाऊ शकतात किंवा समुद्राच्या गर्भांत शहरे वसवली जाऊ शकतात. त्यामुळे लेखकाप्रमाणे वाचकाला सुद्धा कथा वाचायची मेहनत करावी लागते. कथा जर जास्तच किचकट असली तर मग त्यांत आनंद उरत नाही. किंवा कथा जर फार साधी सोपी असली तर त्यांत मजा येत नाही. त्यामुळे विज्ञान कथा लेखकाला एक तारेवरची कसरत करावी लागते. वाचकाला घेऊन कल्पनाशक्तीची भरारी घ्यायची असतेच पण त्याच वेळी वाचकाने भरकटू नये म्हणून काळजी घ्यावी लागते.

निमिष ह्याचे पुस्तक डिटेक्टिव्ह निगेटिव्ह माझ्या मते एक पहिले पाऊल आहे. ह्या पुस्तकांत निमिष ह्यांच्या लेखनाची काही महत्वाची वैशिष्ट्ये दिसतात ती सामान्य वाचकाला कदाचित प्रथमदर्शनी लक्षांत येणार नाहीत पण विज्ञान कथा किंवा सुपरहिरो कॉमिक्स च्या वाचकांना नजरेत भरतील. पण डिटेक्टिव्ह निगेटिव्ह ह्या पुस्तकांतून निमिष ह्यांनी जो भरभक्कम पाया घातला आहे त्यावर निमिष ह्यांनी आणखीन कथानके वाचकांपुढे आणावीत असे मला वाटते.

डिटेक्टिव्ह निगेटिव्ह ह्या कथेतून निमिष ह्यांनी हा बॅलन्स फार चांगला सांभाळला आहे. मी वाचकांना स्पॉईलर देऊ इच्छित नाही त्यामुळे मला ज्या गोष्टी आवडल्या त्या इथे विस्तृत पणे सांगणार नाही. पण खालील काही वैशिष्ट्ये मी जरूर नमूद करेन.

निमिष ह्यांनी "वर्ल्ड बिल्डिंग" वर खूप भर दिला आहे. खूप कमी लेखकांना हि गोष्ट जमते. आपल्या नायकाला पहिल्या पानावरुन हिरो न बनवता त्यांनी हळू हळू नायकाचे पात्र उभे केले आहे आणि त्याच वेळी मुंबई शहर, डिटेक्टिव्ह निगेटिव्ह च्या शक्ती

ह्यांची माहिती खोलवर दिली आहे. फक्त सुपरपावर आहे असे नाही तर त्यामागे नक्की शास्त्र काय आहे हे सुद्धा वाचकांना सांगण्याचे कष्ट त्यांनी घेतले आहेत. अनेक नवीन लेखक हि महत्वाची बाब विसरून जातात. आयर्नमॅन चे अनेक चित्रपट आम्ही पहिले असले तरी त्याची ओरिजिन स्टोरी आम्ही कधीही विसरू शकत नाही. बॅटमॅनच्या आईवडिलांचा क्राईम एली मध्ये खून होतो हि घटना तशी मोठीशी नसली तरी असंख्य बॅटमॅन कॉमिक्स आणि चित्रपटांतून ती आमच्या मनावर कोरली गेली आहे. हि वर्ल्ड बिल्डिंग ची खूप छान उदाहरणे आहेत. डिटेक्टिव्ह निगेटिव्ह वाचताना निमिष ह्यांनी वर्ल्ड बिल्डिंग वर खूप भर दिला आहे हे जाणवते. x-men सारख्या कॉमिक बुक्स प्रमाणेच निमिष ने डिटेक्टिव्ह निगेटिव्ह ची टीम उभी केली आहे.

दुसरी गोष्ट ठळक पणे उठून दिसते ती म्हणजे ज्या बारकाईने निमिष ह्यांनी विविध घटना लिहिल्या आहेत. सर्व कथा पुणे-मुंबई सारख्या खर्या शहरांत घडते गॉथम सारख्या काल्पनिक शहरांत नाही त्यामुळे, स्थळे आणि काळ विषयी लिहिताना लेखाला विशेष ध्यान द्यावे लागते. रावन सारख्या बिग बजेट चित्रपटांत सुद्धा मुंबई शहराबद्दल इतक्या चुकीच्या गोष्टी दाखवल्या होत्या कि तो चित्रपट बघावासा वाटला नाही, पण निमिष ने विशेष ध्यान

देऊन बारकाईने आपली स्थाने कथेत गोवली आहेत. त्यामुळे कथा आल्हादायक आणि तर्कशुद्ध वाटते. जे वाचक ह्या शहरांत राहत असतील त्यांना हि कथा वाचून विशेष आनंद मिळेल.

निमिष ह्यांनी अश्याच प्रकारे मराठी साहित्यांत भर घालावी आणि आधुनिक माध्यमांचा वापर करून आपले नाविन्यपूर्ण साहित्य वाचकांकडे पोचवावे अशी मी आशा करतो.

- अक्षर प्रभू देसाई - कॅलिफोर्निया

(गूगल मध्ये इंजिनयर आहेत, त्याशिवाय बूक्सट्रक हे मराठी आणि हिंदी साहित्याचे संकेतस्थळ चालवतात)

# आदित्य भागवत, ठाणे यांचा अभिप्राय

लेखक निमिष सोनार यांच्या अचाट कल्पनाशक्तीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. रहस्य, थरार, गती, धाडस, आव्हान, गूढत्व आणि अचाट कल्पनाशक्ती यांचे मिश्रण "डिटेक्टिव्ह निगेटिव्ह" या कादंबरीत दिसून येते. मनुष्य स्वत:चा मेंदू जेमतेम १०% च वापरतो, असे म्हणतात की जर त्याने २०-२२% मेंदूचा वापर केला तरी अनेक अचाट गोष्टी तो करु शकतो.

मनुष्याने मेंदूचा किती भाग वापरला आणि कोणता भाग वापरला तर किती प्रमाणात आणि काय प्रकार तो करु शकेल याची कल्पना करणे अशक्यच आहे. या कादंबरीत आहे तश्या प्रकारच्या एखाद्या पात्राचीसुद्धा कल्पना करणे मनुष्यास अवघड जाते पण लेखकाने एकाहून एक अशी कित्येक पात्रे या कथेत एकत्र आणून एक शिवधनुष्यच पेलले आहे आणि नुसते पेलले नसून त्यावरुन मंत्रमुग्ध करणाऱ्या घटनांचे बाण चालवून वाचकांना मोहित केले आहे.

वैज्ञानिक संकल्पना, शोध, विविध पात्रे आणि सुपर पॉवर्स एकमेकात दुध-साखर आणि केशर यांच्याप्रमाणे मिसळून गेले आहेत आणि एक अप्रतिम मिष्टान्न या निमित्ताने मराठी साहित्यात अवतीर्ण झाले आहे.

निमिष सोनार यांनी अशक्य वाटणाऱ्या अशा अनेक शक्यतांची कल्पना करत त्या कल्पनासुमनांचा उत्कृष्ट पुष्पगुच्छ बनवला आहे. वैज्ञानिक संकल्पनांच्या झऱ्यासोबत शृंगाररसाची कारंजीदेखील तितक्याच आकर्षकतेने नटवलेली आहेत. सामान्य माणसाच्या जीवनातील दैनंदिन घडामोडी आणि सुपरहिरोंच्या आयुष्यातील घटना अगदी सहजतेने आणि लीलया रंगवल्या आहेत.

मराठीत मुळातच विज्ञान कथा कमी लिहिल्या जातात त्यामुळे मराठीत विज्ञानकथा म्हंटल्यावर एक कुतुहल जागृत होतेच, त्यात निमिष सोनार यांनी ही कथा ज्याप्रकारे विविध रंगांनी रंगवली आहे ते मनास भारावून टाकते. लेखकाने विविध कल्पनांची सुत्रबध्द गुंफण करुन वेगवान घटनांची जी कथारुपी साखळी निर्माण केली आहे ती वाचकांना खिळवून ठेवेल यात शंका नाहीच. लेखकाला

केवळ विज्ञानच नव्हे तर इतरही अनेक विषयांत उत्तम गती आहे, त्यांच्या कल्पनाशक्तीतील उत्तुंगता लपून राहू शकत नाही. त्यांच्या लेखनात प्रज्ञा आणि प्रगल्भता यांचा सुवर्ण संगम दिसून येतो.

श्री निमिष सोनार यांच्याकडून अश्या अनेक रंजक कथा आम्हाला वाचायला मिळतील अशी मला खात्री आहे, त्यांच्या पुढील वाटचालीस खुप खुप शूभेच्छा!!

- आदित्य भागवत, ठाणे (वास्तू ज्योतिष सल्लागार) (मो: 9029581590)

# ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.
# निमिष सोनार यांचं ई साहित्यवरचं हे तिसरं पुस्तक.

निमिष सोनार हे नाव नेटवरील साहित्य वाचणाऱ्यांमधे चांगलेच लोकप्रिय आहे. लेखनातील सातत्य आणि विषयांतील नाविन्य हे त्यांचं वैशिष्ट्य. त्यांच्या वलय अणि जलजीवा या कादंबऱ्यांना वाचकांकडून अतोनात प्रतिसाद मिळाला. स्तुतीचा वर्षाव झाला. खरेतर अशा स्तुतीनंतर लेखकाला त्याच प्रकारात लिहीत रहाण्याचा मोह होणे स्वाभाविक असते. पण निमिष यांनी आपल्या लेखनासाठी पुन्हा नवीन दिशा निवडली. आपल्या लेखनातले नाविन्य, ताजेपण आणि प्रायोगिकता टिकवण्यासाठी.

निमिषसारखे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता

अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना दर्जानुसार मानमरातब व मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर काना-कोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे हे आमचे उद्देश आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता

देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, प्रतिक म्हात्रे, अनिल पिसे, पवन सोनवणे, वैभव तांबटकर, धनंजय कलमष्टे, पुर्वा राऊत  असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान. बस्स. अजून काय पाहिजे?

टीम ई साहित्य प्रतिष्ठान